
# काळसमुद्रांतील रत्ने



REFBK-0008858

लेखक व. गो. वि. देशगुरव

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# -: कालसमुद्रातील रत्ने :-

( रत्नकरण्डक २ रा )

ग्रंथ संग्रहालय
ग्र. क्र. ८५५
शाखा (स्था. १८)

१५५५५
९६५
१५५५५

लेखक,

गोविंद विनायकराव देशमुख
बॅरिस्टर-अॅट-लॉ
माजी एम. एल. ए.

REFBK-0008858

सन १९५५ ] ★ [ किंमत २ रूपये

प्रकाशक व मुद्रक :-
**कृष्णराज श्रीमुरलीधर महानुभाव**
गोरक्षण मुद्रणालय, वर्धा मार्ग,
नागपूर.

या ग्रंथाचे सर्व हक्क लेखकाने आपले स्वाधीन ठेवले आहेत.

[ प्रथमावृत्ति–१९५५ ]

# —: प्रस्तावना :—

—:( ० ):—

'कालसमुद्रातील रत्ने' ह्यांचा तिसरा करण्डक आजे वाचकांस सादर करीत आहे. ह्यांतील घटना १९३७ ते १९४५ चे दरम्यानच्या आहेत. ह्या घटनावरून सुचलेले विचार जरी १९४७ साली लिहिल्या गेलेत तरी आजही फक्त 'महाविदर्भा संबंधीचे खेरीज करून कोणतेही बदलण्याची गरज दिसत नाहीं. महाविदर्भा' एवजो 'संयुक्त महाराष्ट्राची'च मागणी करणें हल्लीच्या परिस्थितीत योग्य आहे असे मला वाटते

कै. गोपाळराव ओगले, माझे मित्र, ह्यानी मला माझे आत्मचरित्र लिहावयास सांगितले. व त्या आग्रहपूर्वक केलेल्या सुचनेस अनुसरून मी माझे आत्मचरित्र लिहिले. ते लिहित असताना महत्वाच्या मनोरंजक पण उद्बोधक घटना ह्यांच्याकडेच लक्ष दिले. तरुणपणच्या खेळण्याकुदण्याच्या मारामारीच्या, तुफान घोडयांवर बसण्याच्या, कुस्ती खेळण्याच्या व अभ्यासाच्या घटना, नंतर कायद्याच्या व्यवसायातील माझ्या समकालीन व्यवसाय बंधुच्या व न्यायाधिशांच्या संबंधी व राष्ट्रीय मंडळाच्या राजकारणासंबंधी, तदनंतर १९२० मधे असहकारितेच्या काळापासून व्यवसाय बंद केल्या नतर १९४६ पावेतो झालेल्या सर्वघटना संबंधी व आलेल्या अनुभवा संबंधी जर लिहू लागलो असतो तर एक मोठा ग्रंथच झाला असता. म्हणून महत्वाच्या मनोरंजक पण उद्बोधक घटनाच तेवढ्या लिहावयाच्या ठरविले. तसे ते ठरविल्यानंतर माझ्या समोर किंचित वेळ एक प्रश्न उभा राहिला. तो म्हणजे जनता ह्या 'आत्मचरित्रा'चे स्वागत कसे काय करील ? आपण काही साहित्यिक नाही. ग्रंथाची भाषा, शैली, प्रासंगिक विचार ह्या सर्वांवरच टीकाकारांचे टीकास्त्र सुरू होणार. वाचक वर्ग ह्या पुस्तकाचे स्वागत कितपत करेल ही शंका आलीच. काल मादक वाङ्मयीन वातावरणाचा. प्रेमकथाना भयंकर पीक. वाचक गुदगुदल्या करणाऱ्या वाङमयास सोकावलेले. त्यातच रंगलेले. तेव्हां माझ्या सार-

ल्याचा-केव्हांतरी वर्तमान पत्रांतून नैमित्तिक व ते ही राजकीय व क्वचित सामाजिक प्रश्नावर लिहिणाऱ्याच्या-पुस्तकाचे भवितव्य काय हा विचार मनांत आला. पण कोणत्याहि शंका कुशंकाना महत्व न देता फिरस्त्या पहेलवानाच्या भूमिकेस अनुसरून कै. गोपाळराव ओगले ह्यांच्या सूचनेस मान देण्याचे ठरविले.

## फिरस्त्या पहेलवानाची रंगतदार कुस्ती

फिरस्ते पहेलवान देशावर कुस्ती करण्यास निघत ते लतिफी, बेडर व बेदरकार वृत्तीने. लोकाशी वागण्यात अति नम्र. जोडीदार भारी असला तरी कुस्ती लढण्याची तयारी व कुस्तीच्या निकाला बद्दल, हार जिती बद्दल अगदी बेफिकरी. इनाम मिळाला तरी बर न मिळाला तरी बर. त्या बद्दल त्याना मुळीच पर्वा नाही. पण अशा फिरस्ती पहेलवानाने कुस्ती मारली नाही तरी जाणते त्याची चहा केल्या वाचून राहत नाहीत. अशा एका कुस्तीची मला ह्या ठिकाणी आठवण होते.

१९०१-२ सालची गोष्ट. कै. नवलोजीराव गुजराच्या वाड्या समोरील पटांगणांत राजाश्रय असलेल्या अमीर पहेलवानाची व बुंदी नावाच्या स्वतःचं खाऊन पहेलवानकी करणाऱ्या फिरस्त्या पहेलवानाची कुस्ती होती. दोघांत जमीन अस्मानच अंतर. अमीर चांगला जाडाजुडा तर बुंदी डोळ्यांत न भरण्यां इतका सडपातळ. दोघांची कुस्ती डावावर तोड व तोडीवर डाव अशा रीतीने सरासरी एक दीड तास चांगलीच रंगली. बुंदीच्या अंगांत अशी मुलामी की तो अमीरच्या डावातून हरहिकमतीन सुटून जात असे. आणि मग अशा वेळेस माझ्या आजूबाजूच्या गर्दीतून आवाज उठत होते 'वो बचा' 'वा भाई वा ! बचनेवाले की भी क्या बात है ! 'बचनेवाले की भी क्या' तारीफ है !' 'छोटीशी जान लेकीन खूब लढ रहा है !' कुस्ती होत असतानाच बुंदी एकदाचा खाली असा सापडला कीं अमीरने त्याच्यावर पेटो कसली, व बुन्दीच्या नाकातोंडाजवळ माती गोळा करून त्याच्या हाताच्या सांडी काढून त्याला रग्गे मारने व छातीचे दनके देणं सुरू केले. उद्देश हा कीं बुंदीने त्याचा जीव कासावीस

झाल्यामुळे हार खावी. पण अशाहि परिस्थितींत बुंदी काही वेळ दम धरून होता. कुस्ती पहाण्याकरिता आलेल्या लोकांना हा अघोरी प्रकार पाहवल्या गेला नाही. त्यांच रक्त उसळून आल व त्यांनी एकच गिल्ला केला. 'कुस्तो छोड देव' 'कुस्ती छोड देव' 'क्या गरीब का जान लेने हो क्या !' 'ये कुस्ती नही ये जान लेना है.' छोडो कुस्ती, कुस्ती छोडो.' ह्या लोकांच्या गिल्ल्या नंतर नवलोजीराव, डॉ गद्रे व इतर श्रेष्ठी ह्यानी ती कुस्ती सोडवली. कुस्तो सोडवण्यांत आल्याबरोबर लोकांनी बुंदी पहेलवानाकडे धूम ठोकली व त्याने कुस्ती मारली नव्हती तरी त्याच्या कुस्ती खेळण्यावर फिदा झालेल्यांनी त्याला मिठ्या मारल्या व एकाने तर त्याच्या कंबरीला बिलगून त्याला वर उंच उचलले. त्या सरशी काही जणांनी आनंदाने बेहोष होऊन त्याच्या अंगावर आपल्यो गळ्यातले सोन्या चांदीचे ताईत फेकले व काहींनी रेशमाचे व साधे दुपटेहि. लोकांनी केलेल्या सत्कारान बुंदीचा चेहरा प्रफुल्लित झाला. त्याने हासऱ्या चेहेऱ्याने सर्वांना नमस्कार केला.

## "मला मिळालेले ताईत व दुप्पटे."

मीहि विपरीत–अनुकुल नसलेल्या म्हणजे प्रेमकथान सर्द झालेल्या वातावरणांत माझ्या पुस्तकाचे भाग प्रसिद्ध करित गेलो व मला तसे करताना घस सोसावी लागली तरी त्या बद्दल हीस केली नाही. दर्दी माणसाकडून मलाहि मानाचे ताईत व दुप्पटे मिळाले. त्यांच्याकडून पत्र पाठवून मागितलेले अभिप्राय खाली दिले आहेत. ते आजपर्यंत प्रसिद्ध केले नाहींत पण ते केव्हां तरी प्रसिद्ध होतील ही जाणीव ठेवून वास्तव अभिप्राय पाठवावेत अशी विनंति त्यांना केली होती. प्रस्तावनेतील, दैनिकांतील व साप्ताहिकांतील अभिप्राय वाचकांनी वाचले असतील म्हणून गाळले आहेत.

## पहिल्या करण्डका संबंधी·

| "शारीरिक व सैनिक शिक्षणाचे महत्व आपण स्वतःच्या |
| व समकालीन मित्रांच्या उदाहरणांवरून व स्वदेशांतील |

> व परदेशांतील अनुभवावरून उत्तम पटवून दिले आहे. आपल्या सार्वजनिक आयुष्यांत आपल्या समाजांतील ज्या उणीवा आपल्या निदर्शनास आल्या त्यांचें योग्य आविष्करण आपण केले आहे."

डॉ. पेंडसे. एम ए. एम. ओ. एल. यांचे पत्र १६-३-४९

> "पुस्तक हातीं घेतलें तें संपल्याशिवाय खालीं ठेवलेच नाही; ह्यांतच अभिप्रायाचें सारसर्वस्व येतें. स्वाभिमान, बाणेदारपणा, निस्पृहता, औदार्य ह्या विचारानी प्रत्येक मंजुषा तुडुंब भरली आहे. हे आत्मचरित्र प्रत्येक कुटुंबाने संग्रही ठेवावे व प्रत्येक विद्यार्थ्याने एकदांतरी वाचावे अशी आग्रहाची सूचना आहे."

**डॉ. कृ. श्री. म्हसकर चेअरमन बोर्ड ऑफ फिजिकल एज्युकेशन, प्रेसिडेंट बॉम्बे फिजिकल एज्युकेशन अँड रिक्रियेशन, वर्किंग प्रेसिडेंट ए. आय. असोशिएशन फिजिकल एज्यूकेशन** यांचे पत्र ता. ५।७।५०

> "आपण स्वतःला, अगदीं अपरिहार्य उल्लेख सोडून सुसंस्कृत घरंदाजीला साजेशा सौजन्याला अनुसरून प्रमुखपणा न देता एकंदर परिस्थिति व तींत संबंधीत आलेल्या व्यक्तिंचाच गौरवाने उल्लेख केला आहे. मला आश्चर्य वाटते तें

याच गोष्टीचें कीं फाजील अहंकार व अवास्त व विनय या दोहों-पासून अलिप्त राहून व त्यांचें तारतम्य संभाळून, स्वतःचे, स्वतःच्या कुटुंबीयांचे आप्तेष्टांचे व परिस्थितीचें सहज वर्णन या पुस्तकांत साधले आहे. आपल्या या सरळपणामुळेच ह्या कालखंडातील इतिहास, ह्यांतून वेळोवेळी आपणास सुचलेले विचार, परकीय व स्वकीय लोकांच्या गुणाव-गुणांचे तौलनिक उल्लेख, आपण व्यक्तिशः व समाजशः शिकण्यासारख्या गोष्टी, शरीराच्या जोपासने पासून सामाजिक व राजकीय क्षेत्रापर्यंत सर्व

क्षेत्रांतील उलाढाली व त्यांत होत गेलेले बदल व विकास यांचा व्यवस्थित बोध करून देण्यास आपले पुस्तक समर्थ झालें आहे." **सर संघ चालक श्री. मा स. गोळवलकर** यांचे पत्र ता. २९।१।५०

"भाषा सरळ व आकर्षक असून त्याला (स्मृति-चित्राला) अनुरूप आहे. चौथी व पाचवी मंजुषा फार बहारीची उठली आहे."

**कै. श्री. व्यं. पुणतांबेकर पॉलिटिक्सचे प्रोफेसर** यांचे पत्र ता. २९।२।५०

"आमचा व आपला दोघानाहि समान असलेला विषय म्हणजे शारीरिक शिक्षण होय. ह्या संबंधीच्या परिस्थितीचे, प्रतिबिंब आपल्या लिखाणांत उत्कृष्ट उठले आहे. तीन प्रसंग अत्यंत औचित्यपूर्ण वर्णन करून साधारणतः सर्व तऱ्हेच्या जीवनांतहि मानसिक, बौद्धिक शक्तिच्या बरोबर शारीरिक बलाची उपासना करण्याच्या आवश्यकतेचे महत्व वर्णन केले आहे. ही अत्यंत इष्ट अशी गोष्ट घडली आहे. हे आपले धोरणही नाविन्यपूर्ण आहे" **श्री. भा. ज. बनसोड, प्रधान मंत्री ह. व्या. प्र. मंडळ** अमरावती यांचे पत्र ता. १३।४।५०

## दुसऱ्या करण्डका सबंधी.

"१९२१ साल म्हणजे मला नागपुरात येऊन ३-४ वर्षे होऊन गेलीं होतीं आणि त्यामुळे नागपुरांतील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आरोग्य-विषयक वगैरे विविध चळवळी, त्यांतील पुढारी, त्या त्या चळवळीचे खरे सूत्रधार इत्यादि गोष्टींचे सामान्य स्वरूप माझ्या परिचयाचे झाले होते. शारीरिक शिक्षणाची मला स्वतःला आवड नसल्याने कांही व्यक्तींचा प्रत्यक्ष संबंध आला होता. त्यामुळे बॅ० देशमुख यांच्या ग्रंथांतील दुसरा भाग वाचू लागताच मी त्या पुस्तकाशी एकदम समरस झालों. पहिल्या भागाप्रमाणे ह्याहि भागात नागपुरी भाषेंतील काही चटकदार ढंग, लकबा, शब्द, वाक्य रचना यांचा आस्वाद याहि भागांत मला अनुभविता आला. ×× बॅ० गोविंदराव देशमुख यानी लिहिलेली 'सत्यकथा' असून पुढील पिढीच्या दृष्टिने हा

* नागपुरचा इतिहास अत्यंत सरस व जिव्हाळ्याचा आहे असे मला वाटले. या ग्रंथाचा एक विशेष मला वाटला तो असा की 'मर्दानी बाणा' म्हणजे काय व वाचकांच्या मनांत त्याची आंदोलने कशी होतात हें येथे अनुभवास येते. या ग्रंथाचे वाचन मनाच्या आरोग्याला अत्यंत पुष्टिवर्धक आहे." कै प्राचार्य ह. नाना. नेनें. यांचे पत्र.

"कालसमुद्रातील रत्ने करण्डक २ रा अवर्णनीय आहे. त्यांत आत्मचरित्र येते तत्कालीन इतिहास येतो. मुत्सद्देगिरी राजकारण खेळण्याची शास्त्रोक्त पद्धति, स्वधंद्याचा अभिमान, लोकसभेतील अवर्णनीय व दरारा बसविणारी कामगिरी, संघटना करण्याची कुशलता आणि त्या कालच्या कुस्तिगिरांचाहि विश्वास संपादन करण्याची कला, विशेषतः ह्या कलेची हौस व प्रविणता, अशा शेकडों घटना वाचताना आपण सजीव जीवनाचा इतिहास वाचीत आहोत असा भास होतो ×× सत्यप्रियता, ध्येयवाद, निर्धार, मित्रांशी इमान, स्वार्थत्यागाची परमावधी प्रेमळपणा, सज्जन संगतीची आवड, कुशाग्र बुद्धि वगैरे सद्गुण हल्लीच्या पिढीस अनेक दृष्टिने मार्गदर्शक होतील" डॉ. म्हसकर * ह्यांचे पत्र २१-१०-५२

"I have gone thrugh कालसमुद्रांतील रत्ने II fairly closely. As it is you have mase a contribution to the country of which you can be reasonably proud. The narration part of your book is quite feaithful. where it concens your opinious I think you are within your right to give your own Interpretation of events and assess the worth of individuas and

institutions" **Shri M. G. Kanitkar** Letter Dated 22. No. 52.

"पहिल्या भागाप्रमाणें हाहि भाग मला फार आवडला. पुस्तक संपेपर्यंत खालीं ठेवावेसें वाटले नाहीं. या पुस्तकांत वर्णिलेल्या कालखंडांत मी नागपुरातच असल्यामुळें मला त्या सर्व घटना पुनः डोळ्यासमोर घडत आहेत असें वाटलें यावरून आपल्या वर्णनाची यथातथ्यता कोणाच्याहि लक्षांत येईल. सर्वत्र पुस्तक वाचनीय आहे. राजकीय, धार्मीक व सामाजिक बाबींविषयी आपले विचार निर्भीडपणें मांडले आहेत. त्याचें प्रत्येकानें मनन करणें जरूर आहे. मुलांचे शिक्षण, हिंसा– अहिंसा स्त्रियांची स्वसंरक्षण क्षमता इत्यादि विषयीं आपण केलेलें विवेचन व प्रदर्शित केलेले आपले विचार अनेकांस मान्य होतील या ग्रंथाचे दोन्ही भाग नागपूर वऱ्हाडच्या आधुनिक बोलींत लिहिले असल्यामुळें ती आता ग्रंथ निविष्ट झाली आहे हा ही या पुस्तकाचा एक संस्मरणीय विशेष आहे" **म. म. वा. वि. मिराशी** यांचे पत्र १६-१०-५२.

"ह्या पुस्तकाचा समुच्चयानें विचार केल्यास ह्यात १९२१ ते १९३५ ह्या कालांतील राजकीय, शासकीय, सामाजीक, धार्मिक, औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रात झालेल्या घडामोडींचा इतिहास आहे. जातीयता व परधर्म असहिष्णुता ह्यांस ह्या पुस्तकांत स्थान नाही. ह्यांत प्रसंगानुरूप नागपुरी, वऱ्हाडी, हिंदी व उर्दू शब्द वापरले आहेत व त्यांत आक्षेप घेण्यासारखें कांहींच नाहीं. कारण मुलें साहित्यातली भाषा तर शिकतातच पण ह्या प्रांतांत रूढ असलेली भाषा, तिच्यांतील वाक्प्रचार, म्हणी च विशिष्ट शब्द इत्यादिकांशी विद्यार्थ्यांचा परिचय होण्यांत वावगे असे काय आहे !

भाषाशैली अकृत्रिम असून तिच्यांत जिवंतपणा आहे व वर्णनात आटोपशीरपणा आहे.

शीघ्रवाचनाचें पुस्तक भाषेच्या सखोल अभ्यासाकरिता नसून व्यापक वाचनाकरिता ठेविलेलें असतें तो उद्देश ह्या पुस्तकाच्या

वाचनाने साध्य होण्यासारखा आहे." श्री सदाशिव नारायण पंचवटीकर **S. N. Panchwati-kar Assisant District Inspector of Schools.**

"मला आपली दोन्ही पुस्तकें आवडली आणि तिसऱ्याची मी उत्सुकतेने वाट पहात आहे. आपली वर्णन शैली, भाषा पद्धति, आणि विषय प्रतिपादन हृदयंगम आहे" श्री हरिहरराव देशपांडे **Liasion and welfare officer, Home guards.** Amrawati Letter 22-11-52.

अनेक दैनिकांचे साप्ताहिकांचे व मासिकांचे ह्या दोन्ही भागासंबंधी अनुकूल असेच अभिप्राय पडलेत. तेव्हां तिसरा भाग लिहिण्यास बरीच हिम्मत आली हे सांगावयास नको. ज्यांना प्रस्तुत करण्डकाचे हस्तलिखित वाचण्याची संधि मिळाली त्यांना हा प्रसिद्ध झालेला करण्डक संक्षिप्त रूपाने प्रसिद्ध झाला ह्याबद्दल आश्चर्य वाटेल. पण १९३७-४६ हा काल आधुनिक म्हणून बऱ्याच जणांच्या माहितीचा असणार तेव्हां विशेष खोल पाण्यात न घसता ठोकळ मानाने वृत्तांत लिहावा—भिजत घोंगडे ठेवण्याची वेळ नव्हे—असा विचार केला.

'काल समुद्रातील रत्ने' ह्या माझ्या आठवणींच्या म्हणा, चरित्राच्या म्हणा, आठवणीवजा आत्मचरित्राच्या म्हणा. स्मृतिचित्राच्या म्हणा, जीवनचरित्राच्या म्हणा किंवा चित्रपटाच्या म्हणा काही ही म्हणा दोन करण्डकांचे जे स्वागत दर्दी लोकांनी केले त्याचप्रमाणें ह्याहि करण्डकाचे स्वागत होईल अशी आशा करणे अनाठायी होणार नाही असे वाटते.

इतके दिवस धूळ खात असलेला करण्डक प्रकाशात आणण्याचे श्रेय माझ्या दोघा मुलीकडे कु. मालती बी. ए. बी. टी. कोविद व कु. शांता बी. ए. बी. टी. कोविद ह्यांच्याकडे आहे. त्यांनी निश्चयपूर्वक ते काम हाती घेतले व ता० १५ जानेवारी पूर्वी म्हणजे एका महिन्यात ग्रंथ छापला जावा व माझ्या जन्म दिवशी म्हणजे ता० १७ जानेवारी १९५५ रोजी त्याचे प्रकाशन व्हावे असा तगादा लावला. पण असे करताना त्यांनी एक जबाबदारीही घेतली. प्रुफ तपासण्याचे कामही त्यांना आपली इतर

कामे संभाळून करावे लागे. तेही अधून मधून प्रकृति ठीक नसताना. माझ्या अधून मधून नागपूर सोडून जाण्यामुळे, पुस्तकाच्या मुद्रणाची वेळ थोडी असल्यामुळे व मुलींना आपली इतर कामे संभाळून प्रुफ्स पहावे लागल्यामुळे मुद्रण दोष राहून गेलेत ह्याची जाणीव मला आहे व त्याबद्दल मी वाचकांची क्षमा मागतो. शेवटी गोरक्षण प्रेसचे चालक श्री. कृष्णराज महानुभाव ह्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हा ग्रंथ प्रारंभ केल्यापासून वीस दिवसात छापून दिला याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

१२- जा० १९५५
धनतोली
नागपुर.

गो. वि. देशमुख

# — अनुक्रमणिका —

| विषय | पृष्ठ |
|---|---|


**रत्नमंजुषा १ ली—युद्धाच्या आघाडीवर—**

युद्धाच्या आघाडीवर क्रांतिकारक संन्याशाची अकल्पित भेट—बंगालकडील मंडळींच्या भेटी स्वामीजींचा चिव्वटपणा - फुट्याविरुद्ध बंगालातच चळवळ का—सरकारचा व माझा बुद्धिबळाचा डाव—जशास तसे बिलाच्या पायाची तयारी—अरे, तू मारतोस रे या मद्राशांना—हजारो लोकांचे जीवन मूर्खांच्या स्वाधीन करणार नाही—गोविंद की गोपाळ ?—जशास तसे बिलाचा पाया पक्का केला—ब्रिटिश साम्राज्याचे संरक्षण आम्ही काय म्हणून करावे ? झांजीबारचे लवंगी प्रकरण—मि. जिना ह्यांचे राजकारणातील डाव तुम इनको नही जानते—साहसे श्री प्रतिवसति — खानाच्या चिर्बाचा कडक बुरखा—आप कांग्रेसवाले महजब को बिघाडते हो—खळबळ उडवून देणार मुस्लिम-विवाह विच्छेदक बिल—जशास तसे बिल—कांग्रेसवाल्या मधली यादवी—नेताजींच्या फॉरवर्ड ब्लॉकचा जन्म. १

**रत्नमंजुषा २ री—लढाईच्या वातावरणात—**

कांग्रेसचा वनवास—महायुद्धात कांग्रेसची सरकारला मदत—कांग्रेस वर्किंग कमिटीने युद्धमंडळ नेमले-जिना म्हणतात मोक्षदिन पाळा—वनवासातला माझा चौफेर ३६

हल्ला—रिक्रुटिंग ऑफीसरची भीषण प्रतिज्ञा—सभ्रतीला सुरवात झाली—माझी भीष्म प्रतिज्ञा सिद्धीस नेली—पाखरात काऊ व मानसात नाऊ—शेतकऱ्यांच्या हितावर निखारे ठेवणाऱ्याचा समाचार घेतला—शेतकऱ्यांच्या व शहरवासीयांच्या परस्परांच्या हितात विरोध —उडाणटप्पूपणापेक्षा कार्य करून दोष पत्करणे बरे—कांग्रेस मध्यवर्ति असेंब्लीत हजर—डीफेन्स ऑफ इंडीया ॲक्ट खाली बायकोचा ताबा—संघटित दणकट व जागरूक लोकमत पाहिजे.

## रत्नमंजुषा ३ री—फिरून आघाडीवर—

प्रश्नांची फैर—सरकार मुसलमानांना किती लाडावणार ? ६२

ये बाबू लोक क्या लढेंगे ?—सत्य बोलण्याला मर्यादा पाहिजे का ?—क्रांतिकारक ' हिंदु म्यारिएज डीसएबिलिटीज रिमूव्हल' बिल—वर्णाश्रम स्वराज्य संघाचा माझा सामना—आम्ही धर्म सोडू—पिछेसे चलते आई—माझ बिल सिलेक्ट कमिटीकडे—गोपाळन बिल पास करून घेतल—मनुस्मृतीत झालेले फरक आन्तर प्रांतियात लग्न होण इष्ट आहे का ?—महाराष्ट्रीयांनो आपल्या मुली सांभाळा—गरिबीन होरपळलेल्या कुटुंबाला संभाळणाऱ्या मुली - धन्य. है ! महाराज धन्य है !!—कापूस शेतकऱ्याची दाद घ्या—वस्तूंच्या नियंत्रणाला प्रांतिक सरकारच जबाबदार—शेतकऱ्यांचा विश्वासघात करणाऱ्या प्रतिनिधींचा समाचार असा घ्या—कापसाच्या किमतीच्या बाबतीत सरकारचा पिच्छा पुरवला—जशास तसे - युनायटेड नेशन्सच डिक्लेरेशन पाहिजे—च्यांग काय शेक कडून अपेक्षा—बुद्ध्या पेचान मात केली ? –

रत्नमंजुषा ४ थी—युद्धाच्या आघाडीवरील चकमकी—

नशीब कस अकल्पित रीतीन खुलल !— हुजुरपागेजवळ सैनिकी शिपायांची गैरवर्तणूक— क्रिप्स आले व हात हालवत गेले—बहुढंगी राजाजीची हिंदुस्थानच्या—फाळणीची योजना—जारे मारबत Quit India बंडखोर म्हणून ट्रान्सफ्युजन ऑफ ब्लड नाही—बादशहाशी हस्तांदोलन केलेला बेकार मुलगा—गांधीजीचा उपवास—सांगा आम्ही कस वागाव—एका इंग्रजान मागितलेली तऱ्हेवाईक माफी—जशाच तसे—शेतीच्या कायम घडी बसविण्याचे प्रयत्न—अहो असेंब्ली सेशन आल की ताप भरतो—All the girls are in love with you—पेनशनरांना नोकरीत घेतल्यान सार्वजनिक नुकसान—हिंदुसभेन बोलाविलेल्या शेतकी परिषदेच अध्यक्ष होण्याच नाकारू नका—संत पाचलेगावकरांनी केलेले माझ अपूर्व स्वागत. ९६

रत्नमंजुषा ५ वी—मध्यपूर्वेकडील युद्धक्षेत्रांना भेट—

सीप्लेनन मध्यपूर्वेकडे उड्डाण—महाऽराज्या ! महाऽऽराज्या !!—लौकीकास साजेशी कृति केली पाहिजे—मराठ्यांनी आपल नाव राखल—मराठ्यांनो दुसऱ्यांना स्वातंत्र्य मिळवून देता स्वतःच मिळवा—माझ्या भोवती सैनिकांचा गराडा—हिंदुस्थान, आव जाव घर तुम्हारा—लॉर्ड कर्झनची आठवण झाली—एकांकी एक प्रवेश नाटक—बॉम्बरच्या कॉकपिटमधला अनुभव—कैरोमधला फोटो—मिस्टर देशमुख परदेशातल्या तुमच्या मित्राच्या मुलासंबंधी तुमच कर्तव्य कोणत ? प्रेसिडेंटला दोन्ही हातांनी घंटा बडवावी लागली. १२७

## रत्नमंजुषा ६ वी—युद्धाच्या आघाडीवर सामसुम—

हा कोण आला तिम्मारखां—सैनिकाच्या तक्रारीचा ठराव १९३
काढून घेणार नाही—बगैर फेरने वालेको मला समशेर क्या कर सकती है—कोंबडीला जितके पिसऽनितके ह्या सरकारला मिमंऽ तू माझा भाऊ नव्हेस—आदरातिथ्याच्या बाबनीत अमेरिकनला हार जाणार नव्हतो--गव्हरनर कॅसी संबंधीच्या काम तहकुबीच्या सुचनेला गव्हरनरजनरलचा विरोध--सैनिकी बायकांचे बंड--प्रो--रंगावर बाजु उलटली--हिंदुस्थानीयांची फुकटा फाकटी नमती उठाठेव--अंग्रेज रहते तो वे ऐसा करते क्या ?--मायला बडवल--जयप्रकाश नारायण व डॉ. लोहिया--साऊथ आफ्रिका व ईस्ट आफ्रिका—युद्धोत्तर सरकारचं धोरण काय राहिल ! अधिकार ग्रहणाकडे राजाजींची ओढ--किती जणांच्या रक्तावर तुम्ही आपल्या तुंबडया भरणार ? संस्मरणीय असे १९४५ साल—हैद्राबादमधे सत्याग्रह करू नका - कीर्ति करून नाही मेले ते उगेच आले आणि गेले।

## आमचे निवेदन २१५

—x—

ज्यान वैद्यकीय व्यवसायाच्या सुरवाती बरोबरच सार्वजनिक कार्य सक्रिय
करण्यास प्रारंभ केला, ज्यान मातृ-पितृ ऋण फेडण्याकरिता सौ. दादी-
बाई देशमुख हिंदुमुलींची शाळा व विनायकराव देशमुख
हायस्कूल काढण्याकरिता उदार अंतःकरणाने मदत करून
विद्यादानाचा नवीन मार्ग दाखवून दिला, ज्यान
समाजाकरिता विशेषतः स्त्रीजीवन स्वाभि-
मानाच समाधानच, व प्रतिष्ठेच
होण्याकरिता आटोकाट असे
सफल प्रयत्नकरून एक
स्मृति उत्पन्न केली
त्या

**डॉ. गोपाळ बंधूला**

**गोविंद** कडून

८५५८.

# कालसमुद्रातील रत्ने

## रत्नकरण्डक ३ रा

—— :*: ——

## रत्नमंजुषा १ ली

# युद्धाच्या आघाडीवर

१०७५ ... ता. ... १५-१२-५५

युद्धाच्या आघाडीवर – क्रांतिकारक संन्याशाची अकल्पितभेट – बंगालकडील मंडळींच्या भेटी – स्वामीजींचा चिव्वटपणा – फुक्याविरुद्ध बंगालातच चळवळ का – सरकारचा व माझा बुद्धिबळाचा डाव – जशास तसे बिलाच्या पायाची तयारी – अरे, तू मारतोस रे या मद्राशांना – हजारो लोकांचे जीवन मुर्खांच्या स्वाधीन करणार नाही – गोविंद की गोपाळ ? – जशास तसे बिलाचा पाया पक्का केला – ब्रिटिश साम्राज्याचे संरक्षण आम्ही काय म्हणून करावे ? – झांजीबारचे लवंगी प्रकरण – मि. जिना ह्यांचे राजकारणातील डाव – तुम इनको नही जानते – साहसे श्री प्रतिवसति – खानाच्या बिबीचा कडक बुरखा – आप कांग्रेस वाले महजबको बिघाडते हो – खडबळ उडवून देणार मुस्लिम – विवाह विच्छेदक बिल – जशास तसे बिल – कांग्रेसवाल्या मधली यादवी – नेताजीच्या फॉरवर्ड ब्लॉकचा जन्म.

———

सन १९३७ साली कांग्रेसने ज्या ज्या प्रांतात तिचे बहुमत होते तिथला तिथला राज्यकारभार आपल्या हातात घेतला पण मध्यवर्ति असेंब्लीत तिने परकीय व बेजबाबदार सरकारशी लढा सुरूच ठेवला होता. त्या कामात ती असेंब्लीतील मुस्लीमलीग, कांग्रेसन्याशन्यालिस्ट वगैरे पक्षा पेक्षा जास्त आघाडीवर होती. तिथे जाण्याकरिता त्या प्रांतातर्फे माझी निवड झाली व १९३७ सालच्या आगष्ट महिन्यात मी सिमल्यास भरणाऱ्या मध्यवर्ति असेंब्लीच्या अधिवेशनास हाजर राहण्यास निघालो.

## क्रांतिकारक संन्याशाची अकल्पित भेट

घामाच्या धारा लावणाऱ्या, उकडणाऱ्या हवेतून पाणी गोठणाला लावणाऱ्या, पाण्याचं बर्फ बनविणाऱ्या हवेत जावयाचं होत. नागपूर ते सिमला रेल्वेचा लांबचा प्रवासही काही कमी त्रासदायक नव्हता. अशा ह्या परिस्थितीत मी सिमल्यास गेलो. होटेल 'सेसील' मधे बिऱ्हाड ठेवल. त्याच दिवशी संध्याकाळी थोडा पाऊस पडला होता. त्यामुळे हवेत चांगलाच गारठाही आला होता. एकंदर परिस्थिती अशी ही बिकट होत गेली व मी पडस व खोकला ह्यांना दुसऱ्याच दिवशी सकाळी बेजार झालो. दोनच दिवसांनी म्हणजे २३ तारखेला मध्यवर्ति असेंब्लीच अधिवेशन सुरू होणार होत. आपल्याला हजर राहता येईल की नाही हा प्रश्न माझ्यापुढे उभा झाला.

मी सिमल्यास गेलो त्याच्या दुसऱ्याच दिवशी बिमार झाल्यामुळे आपल्या खोलीतच सकाळच ब्रेकफास्ट (न्याहारी) घेऊन बिछान्यावर पडल्या पडल्याच 'टाईम्स ऑफ इंडीया' व 'हिंदुस्थान टाईम्स' वर्तमान पत्र चाळत होतो. सरासरी ९ वाजता माझ्या खोलीची घंटा वाजली. आपण कालच आलो, आपली कोणाशी ओळख ना देख, कोणी अपॉइंटमेंट ही केली नाही, व्हिजीटिंग कार्ड ही पाठवल नाही तेव्हां ही घंटा वाजविणारी व्यक्ति कोण ह्या बुचकळ्यात मी पडलो. असा हा गोंधळ माझ्या मनात चालू असतानाच मी म्हणालो 'Please Come in' "मेहेरबानी करून आत या" व बिछान्यावरच सावरून बसून खोलीच्या दरवाजाकडे, येणारा कोण आहे, हे जाणण्याच्या इच्छेने डोळे रोखून पाहू लागलो तो काय! भगवी वस्त्र परिधान केलेले एक भव्य संन्यासी. त्यांना नमस्कार करून जवळच एक खुर्ची होती तिकडे बोट दाखवून 'कृपा करून खुर्चीवर बसा' अशी विनंति केली.

स्वामीजी खुर्चीवर बसल्यानंतर मी त्यांना म्हणालो "स्वामीजी, मी अझूनही बिछान्यातच पडून आहे व प्रसंगास अनुरूप असे योग्य ते कपडे

न घालतानाच आपल स्वागत करतो आहे ह्या बद्दल क्षमा करा. मी आहे बिमार. सबब मी बिछाना सोडला नाही व इथेच पडून आहे"

स्वामीजीः—"काय झालं आहे आपल्याला ?"

मीः—"पडस व खोकला. इन्फ्लुएंझाच म्हणाना. अशक्तता विशेष वाटते"

स्वामीजीः—"आपण थोडी ब्रँडी व किंचीत कोमट पाणी घेतल्यास किंवा 'पोर्ट' किंवा 'शेरी' ह्या वाईन्स Wines दारूचा एखादा 'पेग' घेतल्यास बरे वाटेल. आपणास मी हे औषध म्हणून सांगतो आहे"

मीः "स्वामीजी त्यांना मी स्पर्शही केला नाही व करू इच्छित नाही"

स्वामीजीः "आनंदाची गोष्ट ! मी सूचना केली याच कारण युरोपातील हिंदी गृहस्थांना व विलायतेहून आलेल्या मंडळींना ही सवयच जडलेली असते म्हणून. बाकी भयंकर दारु पिणाऱ्यांचे कसे हाल होतात, कुटुंबातील मंडळींना त्यांच्या करिता कशा खस्ता खाव्या लागतात हे मला माहित आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला म्हणजे असच होणार. 'अति तिथे माती. युरोपियन लोकांना, विशेषेकरून इंग्रज लोकांना नेमस्त-पणा माहित आहे. ते संयम राखू शकतात. आपल्याकडे, आपल्या लोकांचा सर्वच बाबतींत बेछूटपणा"

मीः— "बर स्वामीजी मी आपणाकरिता काय मागवू ? दूध, कॉफी, चहा ? काही फळ ? काय घ्याल आपण ? "

स्वामीजीः—" काय घ्यायच ते मग पाहू, प्रथम आपणाकरिता मी ग्रेपज्युसच्या ( द्राक्ष रसाच्या ) दोन तीन बाटल्या मागवतो, आपण दिवसातून तीन वेळा एक एक औंस घेत चला. आपणाला बर वाटेल " अस म्हणून त्यांनी खोली बाहेर बसलेल्या आपल्या शिष्याला हाक मारली व त्याला द्राक्ष रसाच्या बाटल्या आणायला सांगितल. मी पैसे देण्याच्या हेतून त्यांची किंमत विचारली, पण

स्वामीजींनी ती सांगितली नाही व पैसे घेण्यास इन्कार केला. शिष्य गेल्यानंतर मी स्वामीजींना म्हणालो " स्वामीजी, युरोपातील हिंदी माणसांना दारूची सवय असते असं आपण म्हणाला ते ऐकीव की ' चक्षुर्वै सत्यं ' पैकी ? " स्वामी म्हणाले " पहिल्या जागतिक लढाईत मी सैन्यांत भरति झालो. फ्रान्समधे व युरोपात इतर ठिकाणी जाण्याचे प्रसंग मला आलेत. एका लढाईत मला इथ इथे गोळी लागली. ( स्वामींनी कंबरेच्या वरच्या पण पाठीच्या कण्याच्या ( Spine च्या ) बाजूला सरासरी दोन तीन इंच अंतरावर अशी जखमेची जागा दाखविली ) मला दवाखान्यात नेण्यात आलं व जखम बरी झाल्यानंतर मला हिंदुस्थानात पाठवण्यात आलं. मी युरोपमधे असतांना काही हिंदी गृहस्थांच्या भेटी गाठी झाल्या. परिचय झाला. तेव्हा हिंदी गृहस्थासंबंधी जे बोललो ते स्वतःच्या माहितीवरूनच. स्वामीचं इतकं बोलणं झाल्यानंतर मी घंटी वाजवून एका वेटरला बोलावून स्वामीजी करिता दूध व फळफळावळ आणण्यास सांगितलं व पुढे बोलायला सुरवात केली.

मीः— " स्वामी, आपण सैन्यात भरती झालात ते काय आपला तिकडे ओढा होता म्हणून ? आपण त्या पुर्वी काय करीत होता ? "


स्वामीः—मी कलकत्ता युनिव्हर्सिटीचा ग्रॅज्युएट. ' अनार्किस्ट ' मंडळीचा सभासद. साहसी काम करण्याकडे प्रवृत्ति. पण अनार्किस्ट चळवळीला अपयश आलं व सिव्हिल नोकरी मिळणं अशक्य झालं, बेकार बनलो, काहोच करता येईना पण स्वस्थही बसवेना. लढाईची संधि आली तेव्हां एकदाचा काय सोक्ष मोक्ष व्हायचा असेल तो होऊ द्यावा म्हणून सैन्यात भरती झालो. नशिबाची परीक्षा पहाण्याचा चंग बांधला. पण तेही जमलं नाहीं. वापस यावं लागलं. नंतर दोन तीन वर्षांनी विनापाश जनसेवा करता यावी म्हणुन संन्यास घेतला."

मीः—" स्वामीजी, अवांतर गोष्टी बोलून मी आपला बराच वेळ घेतला. माफ करा. मी आपली काय सेवा करू शकतो ? मी एक

मध्यम वर्गातला, मामुली मनुष्य-सुशिक्षित पण अप्रसिद्ध असा-आहे हे लक्षात घेऊन माझ्या हातून होण्यासारखीच सेवा मला सांगा."

स्वामीकरिता वेटर फळफळावळ व दूध घेऊन आला व माझ्या करिता स्वामीचा शिष्य द्राक्षरस घेऊन आला. स्वामींनी बोलायला सुरवात केली.

**स्वामीः**--"तुम्ही वजनदार (Influential) मनुष्य नसाल, समाजात तुमचा दर्जा श्रेष्ठ नसेल पण अप्रसिद्ध खात्रीन नाहीं." दुभत्या जनावरावर 'फुका' म्हणून जो क्रूर प्रयोग करण्यात येतो तो बन्द



करण्यासंबंधी आपण जे बिल आणणार आहात व ज्याला प्रसिद्धी सर्व वर्तमान पत्रातुन मिळाली त्यामुळे आपली ही प्रसिद्धी झाली आहे- विशेषेकरून बंगालात. आणि हा प्रश्न तर बंगाली लोकांच्या जिव्हाळ्याचा. आपणाला ह्या बिलाच्या बाबतींत काही मदत करता आलीं तर पहाव असा विचार करून मी आपणांकडे 'हरिद्वार' हून आलो. बंगालमधे 'फुक्या' विरुद्ध खूप चळवळ झाली. होत आहे. पण अजुनही ती क्रूर पद्धत कायद्यान बन्द करण्याचे प्रयत्न कोणीही केले नाहीत. आपल्या प्रयत्नाला यश येवो. बर आता आपण विश्रांति घ्या. मी उदईक सकाळी येईन" इतक बोलून स्वामीजी गेले.

## बंगालकडील मंडळींच्या भेटी

स्वामी गेल्यानंतर थोड्या वेळान कलकत्त्याचे सनातनी मताचे व 'वर्णाश्रम स्वराज्यसंघाचे सभासद श्रीमंत बजोरिया शेटजी असेंब्लीचे सभासद हे ही मला भेटायला आले. त्यांनी माझ्या बंधूच्या 'हिंदु वुईमेन्स राईट टु प्रॉपर्टी बिल'- जे "देशमुख ॲक्ट" म्हणून प्रसिद्ध आहे त्याला विरोध करून बरीच प्रसिद्धी मिळवली होती. माझ 'फुक्या' विरूद्धच बिल-

'प्रिव्हेनशल ऑफ क्रुएल्टी टु ॲनिमल्स ॲक्ट अमेन्डमेंट बिल' त्याच सेशनमधे निकालात निघाव म्हणुन असेंब्लीच्या सभासदांच्या सह्यांचा एक अर्ज सरकारकडे रवाना करण्याची कल्पना माझ्यापुढे ठेवली. 'विचार करीन' अस मी म्हटल्यानंतर ते गेले. काही वेळान कलकत्त्याचे एक मुसलमान गृहस्थ भेटीला आले. त्यांनीही माझ्या बिलाला मदत करण्याकरिता आलो अस सांगितल. ते एका गोरक्षण सभेचे प्रचारक होते. असेंब्लीतील मुसलमान सभासदांना भेटून त्यांना 'तुमच्या बिलाला मदत करा अस सांगतो' म्हणुन म्हणाले. 'तूर्त तशी काही गरज दिसत नाहीं' अस सुचवून त्यांना वाटेला लावल. आणखीही मंडळी आली. त्यांचीही तशाच रीतीन रवानगी केली. डॉक्टर बंधु ( गोपाळ ) आल्यानंतरच त्याच्या सल्ल्यान जे काय करायच ते कराव अस मनाशी ठरवल.

## स्वामीजीचा चिव्वटपणा

स्वामीजी दुसऱ्या दिवशी सकाळी म्हटल्याप्रमाणे हजर. ते म्हणाले की बॅ. असफअली कांग्रेस असेम्बली पक्षाचे सेक्रेटरी त्यांच्या ओळखीचे आहेत त्यांना भेटू. मी म्हणालो चला. कांग्रेस असेम्बली पक्षाचा मी. सेक्रेटरीची भेट झालीच नव्हती ती अनायासे घडून येणार होती. स्वामींना मी सांगितल 'बॅ. असफअलीची व माझी भेट १९१६ साली झाली होती. लो. टिळकांच्या होमरूल लीगचे सभासद पंडीत नेकीराम शर्मा यांच्यावर सरकारने केलेल्या राजकीय खटल्यात त्यांचा बचाव करण्याकरिता मी दिल्लीस गेलो होतो. त्या वेळची त्यांची माझी भेट. त्याच वेळेला सरकारने त्यांच्यावरही खटला केला होता. ते डॉ. ॲनिबिझांट बाईच्या होमरूल लीगचे सभासद. अशा रीतीन त्यांची माझी ओळख झाली. पण नंतर भेटलो नाही' स्वामीजी व मी बॅरिस्टर असफअली यांच्या घरी गेलो. बॅरिस्टर साहेब घरी नव्हते. त्यांच्या पत्नि मिसेस अरुणा असफअली--कम्युनिस्ट आहेत म्हणे--एका टेबलावर व्यवस्थित रीतीन फुलांनी भरलेले फ्लॉवरपॉट ठेवत होत्या. स्वामी त्यांना म्हणाले " माताजी-पुढच संभाषण बंगालीत " स्वामी मला

म्हणाले " बाई म्हणतात बॅरिस्टर साहेब महत्वाच्या कामाला गेले आहेत.

आम्ही दोघही होटेलमधे वापस आलो. स्वामींना थोडा फलाहार दिल्यानंतर मी म्हणालो " स्वामीजी आता आपण तसदी घेऊ नका. मी व माझा भाऊ डॉ. देशमुख दोघ मिळून हे बिल कस लवकर पास करून घेता येईल ह्याची सल्ला काढू. माझे बंधु माझ्याआधी एक दोन वर्ष असेम्बलीत आलेत. त्यांच्या शस्त्रक्रियेतील नैपुण्यामुळ, समाजातील प्रतिष्ठेमुळ, मुंबईचे माजी मेयर ह्या नात्यान व एक प्रमुख सार्वजनिक कार्यकर्ते म्हणुन त्यांच कॅांग्रेस असेंबली पक्षात बरच वजन आहे तेव्हां माझं बिल पास करून घेण्याकरितां काय काय युक्त्या योजाव्या ह्या संबन्धी त्यांची मला चांगली मदत होईल. आपण फिकीर करू नका. आपण ' हरिद्वार ' ला जाऊन आपल्याला जे काय कर्तव्य असेल ते करू शकता ह्या बिलासंबन्धी मला जे काय करता येण शक्य असेल ते केल्यावांचून राहणार नाही." इतक बोलून--मी स्वामीला नमस्कार केला. स्वामी मला यश चिंतून, नमस्कार करून गेले.

## फुक्या विरुद्ध बंगालातच चळवळ कां ?

गाई म्हशीनी पान्हा चोरून न ठेवता सर्व दूध, अगदी थेंबऽन थेंब, दिल पाहिजे म्हणुन दुभत्या जनावरांवर डेअरीवाले ( दुधाचा व्यापार करणारेगवळी व इतर) कांही क्रूर प्रयोग करतात त्या पैकी एक बंगालमधे ' फुका ' म्हणून प्रसिद्ध आहे व आपल्याकडे एक 'दुमदेव ' ह्या नावाने ओळखला जातो. आपल्याकडे हा प्रकार फार विरळा. डेअरीवाल्यांना दुधाच महत्त्व. जितक काढता येईल तितक काढाव. मग वासरू मेल तरी हरकत नाही ही त्यांची मनोवृत्ति. आणि केव्हां केव्हां तर वासरू मरण्याची वाट न पहाता ते खाटकाला विकून टाकण्यात येत. त्याच मांस व्हील Veal ह्यालाही बरीच किंमत येते. दूध देणाऱ्या गाई म्हशी भाकड झाल्या म्हणजे त्यांना पोसण डेअरीवाल्यांच्या-विशेषकरून कलकत्ता सारख्या मोठ्या शहरी-जिवावर येत. त्यांना ते परवडत नाही खर्चान काम. तेव्हां ते त्या विकीस काढतात. त्या विकत घेण खाटकांना परवडत,

कारण स्वस्तात विकल्या जातात व कलकत्त्या सारख्या शहरी, जिथे युरोपियन, मुसलमान वगैरे अहिंदु बरेच आहेत तिथे गोमांसाला चांगली मागणी असते. बंगालात–त्यांतही पूर्व बंगालात शेकडा ७० तरी मुसलमान असतात तेव्हां तिकडे गोहत्त्या किती होत असेल ह्याची कल्पना करता येते. गोमांसाला किंमत म्हणुन गोहत्त्या. पण त्याचबरोबर कातड्याचीही किंमत. अशा रीतीन किती तरी भाकड गाई निकालात निघतात. दुभती जनावर नाहीशी झाली म्हणजे त्याचा परिणाम दूध महाग होण्यात होतो. जनावरांचा तुटवडा पडला म्हणजे शेतकऱ्यांना शेतीकरिता बैल मिळण मुष्किल होत. बैल मिळण्यासारखे असले तरी त्यांच्या किंमती शेतकऱ्याच्या आटोक्याबाहेर जातात. अर्थातच शेतीची उस्तवारी होत नाही व झालीच तर कशी बशी. व मग शेतातील पीकही यथा तथाच. ह्या सर्व दृष्टिन 'फुक्या'ची पद्धत समाजाच नुकसान करणारीच. तेव्हां तिच्याकडे काना डोळा करून चालत नाही. ही झाली व्यवहारिक दृष्टी. हीच उल्लंघन करून जस चालत नाही तसच (Humanity) ह्युम्यानिटिची दयाळूपणाची–जीवदयेची दृष्टी होही बाब आहे. विशेषतः हिंदुला तर ती ध्यानात घेतलीच पाहिजे. 'दया धरम का मूल है' ही त्यांच्या धर्माची शिकवण आहे. महाराष्ट्रांत बंगाल सारखी गोहत्त्या नाही कारण प्रांतात हिंदुची संख्या जास्त. जवळ जवळ शेकडा नव्वद. शिवाय प्रांतात जंगल बराच. तेव्हां भाकड जनावर पोसण इतक कठीण नाही. पण म्हणून आहे ती गोहत्त्या क्षम्य आहे अशातला भाग नाही.

वर केलेल्या विवेचनावरून हे दिसून येईल की माझ 'प्रिव्हेन्शन ऑफ क्रूएल्टि टू अनिमल्स् ॲक्ट अमेंडमेंट बिल्' हे अप्रत्यक्षपणे पण परिणामी गोहत्त्या बंद करणार बिल होत-निदाऽनच पुष्कळ आळा घालणार तर होतच होत.

## सरकारचा व माझा बुद्धिबळाचा डाव

मी सिमल्यास गेल्यानंतर दोन तीन दिवसांनी असेंब्ली अधिवेशनाच्या कामास सुरवात झाली. सुरवातीला आपण बर की आपल काम बर अशी

मी आपली वृत्ति ठेविली होती. त्या सेशनमधे मी कोणातच मिसळत नसे. असेंब्लीच काम सुरु झाल्यावर ७।८ दिवसांनी माझा भाऊ डॉ. गोपाळ मुंबईहून आला व एक दोन दिवसांनीच त्याच व माझ माझ्या बिलासंबंधी असेंब्लीच्या लॅाबीत बोलण झाल.

**गोपाळः**—"कायरे गोविंदा आज मला स्पेन्स ( हा गृहस्थ आयू. सी. एस्. सरकारी व्हिप्.) म्हणत होता 'तुझ्या भावान आणलेल बिल प्रॉव्हिशिअल सब्जेक्ट आहे तर त्याला ते काढून घ्यायला सांगन"

**मीः** "माझ बिल ज्या विषयासंबंधी आहे तो विषय कंकरंट लिस्टवर आहे. ज्याप्रमाणे प्रांताचा त्याचप्रमाणे तो सेंटरचाही आहे. माझ काम अगदी कायदेशीर आहे. स्पेन्स डुब देऊ पहातो काय लेकाचा !"

**गोपाळः**—"तुझ काम जर अगदी कायदेशीरच आहे तर मग मला काही म्हणायच नाही. ने रेटत"

मला शह देण्याचा सरकारचा हा डाव फसला. मग माझ्या भावान गोपाळन व मी सरकारवर एक डाव टाकून सरासरी ६० (साठ) सभासदांच्या सह्यांचा अर्ज मी माझ्या बिलाच्या चर्चेकरिता व ने त्याच सेशनमधे तातडीन पास होण्याकरिता विशिष्ट दिवस देण्यात यावेत असा सरकारकडे पाठवला. पण ही सरकारच्या अधिकारातली गोष्ट. तेव्हा त्यांनी वाटाण्याच्या अक्षदा लावल्या. दोघाही भावाचा हा डाव हुकला. माझ बिल मी वापस घेतल नाही म्हणून सरकारन सूड घेतला. फिटंफाट पैकी प्रकरण-कोणाचीच बाजू कोणावर राहिली नाही.

काही दिवसानंतर गोपाळ फिरुन असेंब्ली लॅाबीत मला म्हणाला "काय झाल गोविंदा, तू कानामागून आलास नि तिखट झालास. तुझ्या ह्या बिलान एका संस्थेची कुंभकर्णी झोप नाहीशी झाली व एका बाईच्या तोंडच पाणी पळाल. फूका बंद व्हावा म्हणून बंगालात खूप चळवळ झाली, ठिकठिकाणीं ठराव पास झाले. पण इतकही झाल तरी ' ऑल इंडीया प्रिव्हेन्शन ऑफ क्रूएल्टी टु ॲनिमल्स' ह्या संस्थेची झोप कायमच

व त्या असोसिएशनची सेक्रेटरी एका मोठ्या सरकारी इंग्रज अधिकाऱ्याची बायको. तिनही ह्या बाबतीत पुढाकार तर घेतलाच पण काहीच हालचाल केली नाही. संस्थेचं नाव गेलं; बाईची ऐट गेली आणि तो बिचारा 'उत्तम सांड पाळा' म्हणून ज्याच्या त्याच्या पाठीमागे लागणारा व्हाईसरॉय-लिनलिथगो-ह्या संस्थेच्या नावानं व त्या बाईसंबंधानं काय रडत असेल कोणास ठाऊक ? चांगली शेकली लेकांची !"

माझ्या बिलानं सरकारची अशी धावपळ मचवली की काही विचारु नका ! सर मॅक्सवेल ह्या एक्सिक्युटीव्ह कौन्सिलरनं माझ्या भावाला माझं बिल मी काढून घेण्यासंबंधी विनंति केली. माझा भाऊ म्हणाला तुम्ही जर माझ्या भावाच्या बिलापेक्षा जास्त उत्तम असं बिल आणलं तर मग मी त्याला त्याचं बिल काढून घेण्यास सांगीन" मॅक्सवेल साहेबानं आश्वासन मागितलं. भाऊ गोपाळ म्हणाला "मी आपला शब्द देत आहे. तो खरा करीन. असेंब्ली मधल्या माझ्या दोन वर्षांच्या वर्तनावरुन तुम्हाला मी जे बोलतो त्यावर विश्वास ठेवायला पाहिजे. मि-क्रेग ह्यांना मी आपला शब्द किती चोख रीतीनं पाळतो त्याचा अनुभव आहे. त्याला विचारुन आपली खात्री करून घ्या " डॉक्टर गोपाळ बंधुच्या उत्तरात ज्या प्रसंगाचा हवाला दिला आहे तो असा. सन १९३६ सालच्या सिमला येथील असेंब्ली अधिवेशनाच्या वेळची गोष्ट. एक दिवस सकाळी डॉक्टर गोपाळ बंधु व कॉंग्रेस असेंब्ली पार्टीचे व्हीप सरदार जोगेंद्रसिंग हे सिमला येथील 'लव्हर्सलेन' च्या तोंडाशी असलेल्या सिमला पोस्ट ऑफीसपाशी उभे होते. त्यांच्या जवळून 'लव्हर्सलेन' कडे मि. क्रेग व एक इंग्रज बाई घोड्यावर बसून गेले. काही यार्ड दूर गेले असतील तोच मि क्रेग घोड्याला पलटवून डॉक्टर बंधूकडे आले व म्हणाले "मिस्टर देशमुख आजच्या दिवस तू माझ्या बरोबर पेअर ऑफ (Pair off) करशील का ?" Pair off चा परिणाम हा की तो गैरहजर तर डाक्टरहि गैरहजर. म्हणजे त्याला त्या दिवशी असेंब्लीत गैरहाजर राहावयाचं होतं पण त्याच्या गैरहाजर राहण्याचा परिणाम सरकारकडच्या मतं मोजणीवर

१५१.४ ... ५१ ११५० १५१७

होऊ द्यावयाचा नव्हता. त्याकरिता विरूद्ध पक्षाच्या सभासदानें गैर हाजर राहण आवश्यक होत. डॉक्टरन ताडल की ह्या गृहस्थाला ह्या बाईबरोबर आजचा दिवस चैनीत घालवावयाचा आहे पण तसे वडून येण्याकरिता असेंब्लींत त्याला गैरहाजर रहावे लागेल. पण त्याच्या गैरहाजर राहण्यान सरकारकडच्या मतदानावर परिणाम वडू नये हीहि त्याला काळजी लागली आहे हे ही ओळखल. त्याला त्याच्या ह्या अडचणीतून सोडवण्याकरिता डॉक्टर बंधु म्हणाले "हो पेअर ऑफ करीन." मि. क्रेग "मग तू आज असेंब्लोत जाणार नाहीस तर?" डॉक्टर म्हणाले "जाईन. पण मत देणार नाही." मि. क्रेग- "तुझ्यावर अवलंबून राहू तर" डॉक्टर- "होय." मि. क्रेग ह्यांनी डॉक्टरचे आभार मानले व त्यांच्याबरोबर जी बाई घोड्यावर बसून जात होती व 'लव्हर्सलेन' मधे मि क्रेगची वाट पाहात होती तिला जाऊन मिळाले व मग ते दोनेही 'लव्हर्सलेन' मधून घोड-दौड करीत गेले. मि. क्रेग गेल्यानंतर सरदार जोगेंद्रसिंग डॉक्टरला म्हणाला "डॉ. तुमने यह क्या किया? मुझे या पार्टी को पूछे बगैर ही तुम ने क्रेग को वचन दे दिया.!" डॉक्टर म्हणाले "क्या इस पार्टीका मेम्बर होने से शराफत को भी भूल जाना चाहिये? मैने तो एक शरीफ आदमी को जो करना चाहिये वही किया." डॉक्टर असेंब्लीत गेले पण कोणत्याहि प्रश्नावर त्यांनी मत दिल नाही हे मि. क्रेग ह्यांना कळल तेव्हां त्यांनी डॉक्टरचे आभार मानले व म्हणाले "देशमुख तूझ ते हिंदू वूईमेन्स राईट टू प्रापर्टी बिल आहेना त्यासंबंधी तू व सर नृपेंद्र काय करायच ते ठरवून टाका. मी त्या गोष्टोला राजी आहे." आश्चर्याची गोष्ट अशी कीं ह्याच गृहस्थान ४ दिवसांपूर्वी ह्या बिलाला विरोध केला होता. ह्या वेळेला सर नृपेंद्र सरकार, लीडर ऑफ दी हाऊस होते व क्रेग होम मेंम्बर होते. सर नृपेंद्र लीडर ऑफ दी हाऊस म्हणजे असेंब्लीतील अजेंडा ठरविणे ही त्यांच्या हातची गोष्ट. त्यांनी सांगितल डॉक्टरला की त्यांच्या बिलाकरिता सरकारी दिवसांपैकी एक दिवस देण्यात येईल ( करण्डक १ ला पान नं. १७४ पण बिलाला विरोध करण, लांबणीवर टाकण किंवा मदत करण हे मि.

क्रेगच काम वर सांगितलेल्या डॅाक्टरच्या स्त्रदाक्षिण्याच्या घटनेन बिल पास होण सुलभ झाल. डॅाक्टरच्या स्त्रोदाक्षिण्यामुळें मि. क्रेग ह्यांचही स्त्रीदाक्षिण्य उसळून आल व बिल पास झाल. हिंदू वुईमेन्स राईट टू पॉपर्टी बिल ( देशमुख ॲक्ट ) पास होण्याच्या मागच्या काही घटना अशा आकस्मिक व मनोरंजक आहेत.

सन १९३८ च्या सेशनमधे सरकारन एक विस्तृत स्वरूपाच बिल आणल. त्यात माझ्याहि बिलाचा समावेश केला होता. मी म.झ बिल काढून घ्याव अशी सूचना सरकारकडून गोपाळ बंधुला आली. कांग्रेस असेंब्ली पक्षाचे सभासद मी बिल काढून घेण्याच्या विरूद्ध होते. गोपाळ म्हणाला "ते काही नाहीं. गोविंदा तू आपल बिल काढून घे. तुला जे पाहिजे ते त्या बिलात आहे. मग उगीच टेकी धरण्यात अर्थ नाही. हे कांग्रेसवाले लेकाचे काहीही म्हणोत"- मी आपल बिल काढून घेतल. मॅक्सवेल साहेबाच्या बिलान मुक्या जनावरांच्या त्याचप्रमाणे पक्षांच्याही—कोंबड्या वगैरे—प्रश्नांचा निकाल उत्तम रीतीन लागला.

> * पण निव्वळ कायदा केल्यान मुक्या जनावरांचे व पक्षांचे *
> | हाल थांबतील अस समजण्यात अर्थ नाही. त्या |
> | कायद्याला चालना द्यायला पाहिजे कायदा मोडणाऱ्या |
> | विरूद्ध मुक्या जनावरातर्फे कोणी तरी तक्रार गुजरली |
> | पाहिजे तरच कायद्याचा उद्देश सिद्धीस जाणार. मग हे |
> * आम्ही करणार की नाही ! *

कायदा अमलात आणण्याकरिता लोकांनी सरकारला सहकार्य दिल पाहिजे. सहकार्य दिल तरच काम होणार. 'अहिंसा' हा आमचा धर्म अस अभिमानाने सांगणारे आम्ही, 'नच धर्मो दयापरः' असं म्हणणारे आम्ही थोड आंग मोडून आपला धर्म पाळण्याकरिता सरकारशी सहकार्य करू का ? की धर्म बोलायचा असतो तो अमलात आणण्याकरिता खस्ता खाण्याची जरूरी नाही, आचारात आणायचा नसतो असच हे धर्माभिमानी समजतात.

* धर्म व व्यवहार ह्यांची सांगड घालता येत नाही— *
| पुराणातली वांगी पुराणात— व्यहारावरच जोर द्यायला |
| पाहिजे असे जे म्हणतात ते जनतेत दांभिकपणा उत्पन्न- |
| करण्यास कारण होतात. म्हणूनच आजकाल राजकारणात |
| पडणारे बोलतात स्वार्थत्यागाची भाषा व साधतात स्वार्थ. |
| त्यांना त्याच काहीच वाटत नाही. अगदी मेल्या पित्ताचे |
* लोक आहेत ते. *

जनतेन जागरूक राहून त्या लोकांची योग्य तीच संभावना केली पाहिजे. नाहीतर चांगलाच पश्चाताप करण्याची पाळी तिच्यावर येणार. अन् पश्चाताप होऊन नुकसान भरून निघणार नाही ते नाहीच. म्हणून अगदी सुरवाती पासूनच नेहमी जागृत असायला पाहिजे.

## जशास तसे बिलाच्या पायाची तयारी

मुक्या जनावरांवर होत असलेले अत्याचार बंद करण्यासंबंधी प्रयत्न केलेत त्याचप्रमाणे हिंदुस्थानाबाहेर हिंदी लोकांवर वसाहतीत गोऱ्या लोकांकडून जे अत्याचार होत होते ते बंद करण्यासंबंधी प्रयत्न सुरू केले. 'जशास तशी' वागणूक त्यांना मिळाल्यास ते रस्त्यावर येतील ह्या विश्वासान 'जशास तसे' ह्या बिलाच्या तयारीस लागलो. कारण वसाहतीतील श्वेतवर्णी लोक तेथील हिंदी लोकांना माणुसकीन वागवत नाहीत— नागरीक ह्या नात्यान तर दूरच राहिले. ते शिरजोर आहेत, त्यांच ब्रिटीश सरकार काहीच वाकड करु शकत नाही— शिवाय सरकारचेच जातभाई ते. तेव्हां ब्रिटीश सरकारचा पाठिंबा त्यांना केव्हांही राहणारच. वसाहतींतील हिंदी लोकांना मिळणाऱ्या वागणुकी संबन्धी किती तरी तक्रारी ब्रिटिश सरकारकडे गुजरल्या होत्या. लार्ड हार्डीज ह्यांनीही पहिल्या युद्धाच्या वेळेस ह्या वसाहतींची मद्रास येथील भाषणात चांगलीच कान उघाडणी केली होती. पण हे कसले निगरगट्ट ! कोणालाच दाद देत नव्हते.

आणि म्हणूनच ऑनरेबल श्री. निवासशास्त्री ह्यांनी, श्रीकृष्णाने त्यांची कौरवाकडची शिष्टाई निष्फळ ठरल्यानंतर जो उपदेश पांडवांना केला त्याच प्रमाणे हिंदुस्थानी लोकांना केला. त्यांची इंग्लंडमधली शिष्टाई निरर्थक ठरल्यानंतर ते म्हणाले "Not justice or truth but the amount of trouble that a party is able to cause prevails with His majestry's Government to day. Having this lesson burnt into them Indians let us hope will not ever forget it again". "आज विलायत सरकारला न्यायाची वा सत्याची चाड नाही. जो पक्ष त्याला खूप त्रास देईल त्याचीच चलती राहील." नाठाळ सरकारला रस्त्यावर आणण्यास आणखी दुसरा कोणता परिणामकारक मार्ग असू शकतो. त्रास देण्याचा ? स्वरूप त्याचे सामुदायिक सत्याग्रह किंवा बंड, किंवा आर्थिक बहिष्कार असे कोणतही



( ऑनरेबल श्री. निवासशास्त्री )

परिस्थितीला अनुसरून असेल. नाक दाबल कि तोंड उघडते. ?"
श्री. शास्त्री ह्यांचे हे शब्द माझ्या मनावर पक्के ठसलेले होते आणि म्हणून विलायत सरकारवर अवलंबून न राहता व त्या सरकारची पर्वा न करिता आपणास काय करिता येईल ह्याचा विचार केला. कोणतीही ब्रिटीश वसाहत जी व जशी वागणूक देईल ती व तशीच वागणूक तिच्या पदरात टाकावी म्हणून 'जशास तसे' ह्या बिलाच्या तयारीस याच सेशनमधे लागलो.

ह्या सेशनमधे कोणत्या ब्रिटीश वसाहतीला व्यापारातील खास सवलती ( Imperial preference ) हिंदुस्थानाकडून मिळतात- उद्देश हा की ज्या वसाहती आम्हांला वाईट रीतीन वागवतात त्यांच्या सवलती काढून घ्याव्या-, सिलोन, डोमिनियन्, स्टेट्सच्या वसाहती व परके देश ह्यांजशी व्यापारी करारमदार करतांना हिंदुस्थान सरकारचा राजकीय दर्जा काय आहे-हेतु असा की स्वतंत्र रीतीने तह करता येत असल्यास ह्या वसाहतीवर व्यापारी तहातील अटीच्या रूपान दबाव आणावा-, ब्रिटिश वसाहतीवर हिंदुस्थान सरकारन काही निर्बंध घातले आहेत की काय? घातले असल्यास कोणते? ब्रिटीश वसाहतींत ब्रिटीश नागरीकांना जे नागरीकत्वाचे हक्क आहेत तेच हिंदी डोमीसाईल्ड ( domiciled ) लोकांना आहेत की नाहीत, ब्रिटीश वसाहतीत हिंदी लोकांवरील निर्बंध नाहीसे करण्याकरिता व नागरीकत्वाचे हक्क प्राप्त करून देण्याकरिता हिंदी सरकारने काय प्रयत्न केलेत, वसाहतींतून हिंदुस्थानात परकीयांनी येण्यासंबंधी काय नियम केलेत वगैरे प्रश्न विचारून 'जशास तसे' ह्या बिलाचा पाया घालण्यास सुरवात केली.

## अरे, तू मारतोस रे ह्या मद्राशांना !

ह्या वेळच्या असेंब्लीत चार पाच मद्रासी सभासदांची काम करण्याबद्दल ( प्रश्न व पुरवणी प्रश्न विचारणे, ठराव आणणे, कोणाच्याही ठरावावर व बिलावर भाषण करणे ह्याबद्दल ) फार ख्याती होती.

सत्यमूर्ति, स्वामी वेंकटाचलम चेट्टी, अविनाशलिंगं चेट्टी (हे गृहस्थ १९४६ नंतर मद्रासच्या कांग्रेस मिनिस्ट्रीत मिनीस्टर होते ) सन्तानम अनंत शयनम् आयंगार (मध्यवर्ति असेंब्लीचे डेप्युटी स्पीकर ) ह्यांच्या इतके चळवळे गृहस्थ असेंब्लीत नव्हते. मात्र ह्यांच्यापैकी कोणीही एखाद बिल आणल नाही. आणि मी तर सर्वच प्रकारची काम-प्रश्न, पुरवणी प्रश्न, ठरावावर भाषण, बिल- अगदी सुरवातीपासूनच मोठ्या प्रमाणावर करायला लागलो होतो. माझा भाऊ गोपाळ माझ्या ह्या बहुढंगी व विस्तृत प्रमाणावर केलेल्या कामावरून म्हणाला " अरे तू ह्या मद्राशांना, दादासाहेब खापर्डे ज्यांना रूद्राक्ष म्हणत त्यांना, अगदी चोपड केलस. मारतोस लेकांना "

## हजारो लोकांचे जीवन मूर्खांच्या स्वाधीन करणार नाही.

जाता जाता हे ही सांगून टाकावस वाटत की राजकीय कैदी किंवा हिंदुस्थानातून सरकारच्या रोषामुळे पळून गेलेले हिंदी लोक उदाहरणार्थ-, मेक्सिकोतील खानखोजे ह्यांच्या खेरीज वैयक्तिक स्वरूपाचे प्रश्न किंवा जातीय प्रश्न मी विचारले नाहीत. ह्या सेशननंतरही मी असले प्रश्न विचारले नाहीत. ते काम मुस्लिमलीगचे सभासद, सरदार संतसिंग व कर्नल गिडने हे ॲंग्लोइंडियन गृहस्थ आपआपल्या जमातीसंबंधी व जमातीतील व्यक्तिसंबंधी करीत असत. एखाद्या व्यक्तीच्या बढतीपासून तो लोकसंख्येच्या प्रमाणात प्रत्येक खात्यात नोकरीत माणस आहेत की नाही हे पहाण्यापर्यंत. नंतर नंतर तर लोक संख्येच्या प्रमाणात मिल्स वगैरे सारख्या खाजगी कारखान्यातूनही लोकसंख्येच्या प्रमाणात मुसलमानांना नोकरी दिली पाहिजे—तस सरकारन कराव अस म्हणण्या पर्यंत मुस्लिमलीगन पाळी आणली होती. त्यांच्या विक्षिप्तपणाच एक उदाहरण देता येण्यासारख आहे. काय झाल की मुस्लीमलीगच्या सभासदान रेल्वेखात्यात गार्डस (Guards), इन्जीन ड्रायव्हरस (Engine Drivers) फारच अल्प आहेत, लोक संख्येच्या प्रमाणात मुस्लीमाना नोकऱ्या देऊ ह्या वचनाला सरकार हरताळ फासते अस म्हटल. त्या

सरशी सरकारच रेल्वे खात ज्याच्याकडे होत (क्लो किंवा ढो) तो एक्झिक्युटिव्ह कौन्सीलर जरा चिडूनच म्हणाला 'काहीही झाल तरी हजारो लोकांच जीवित मीं अज्ञानी, अडाणी अशा नोकरांच्या हातात ठेवणार नाही. I am not going to entrust the lives of thousands of persons to ignorant and inefficient men" जातवार मागण्या करणारांनी व त्या पुरविणाऱ्या सरकारनं काही तारतम्य पाळल पाहिजे हेच ह्यावरून उघड होत नाही काय ?

## गोविंद की गोपाळ ?

ह्याच १९३७ च्या आगष्ट सेशनमधे माझा एक प्रश्न 'न्यूजप्रिंट' वरील 'ड्यूटी' कमी करण्यासंबन्धी होता. प्रश्न वर्तमानपत्र कर्त्यांच्या जिव्हाळ्याचा. सरकारन कर कमी करतो म्हणून उत्तर दिल व नंतर केलाही. ह्या 'न्यूजप्रिंट' च्या ड्यूटीच्या प्रश्नानच एका विनोदी प्रसंगास जन्म दिला.

ह्या सेशनमध्ये मी व भाऊ गोपाळ दोघेही होटेल 'सेसील' मधेच निरनिराळ्या मजल्यावर राहत होतो. त्यान एक दिवस सकाळी ८ वाजता 'मला भेटायला ये, आताच ये' असा निरोप पाठवला. मी थोडक्या वेळान त्याच्या खोलीत गेलो. त्याची पत्नि सौ. अन्नपुर्णाबाई देशमुख-मुंबई प्रांतिक असेंब्लीच्या त्या वेळच्या सभासद-व त्यांच्या मुली (सौ. कमळा तळवलकर व सौ. सुशीला पंडित) ह्या सर्व ड्रॉईंगरूम मधे बसल्या होत्या. मी खोलीत पाय ठेवल्याबरोबर गोपाळ उठून उभा राहून एका हातात वर्तमानपत्र घेऊन खूप जोर जोरान नाचू हासूं लागला सबंध खोली दणाणून सोडली. त्याच्या पत्निनही माझ्याकडे पाहून स्मित केल; काय, गौड बगांल आहे समजेना ! मी त्याला म्हणालो "काय, झाल काय इतक हासायला. ? जीवति हासवते वाटत ? जीवति नसेल तर दुसर कोणी ?" उत्तर नाही. ह्याच हासण सुरूच-अखेरीस मी म्हणालो "अजी भाई कहो तो सही बात क्या है ?" काहीच उत्तर न देता त्यान 'टाईम्स ऑफ इंडीया' चा त्या दिवशीच सकाळी आलेला

अंक माझ्या समोर केला व त्याचा फोटो प्रसिद्ध झाला होता त्या ठिकाणी बोट ठेवल व हासत हासतच म्हणाला. ही न्यूज वाच-' मी ती न्यूज वाचल्यानंतर मलाही खूप हासायला आल. ' न्यूज ' मी विचारलेल्या ' न्यूज प्रिंट प्रश्नासंबंधी मात्र ब्लॉक माझ्या-भावाचा डॉ. देशमुखचा. त्याला जोडूनच त्याच्यासंबन्धी लहानस स्फूटही. तो व मी दोघही हासत असतांनाच मी म्हणालो " अरे झाल काय त्यात ! गोविंद गोपाळ ही कितीतरी वर्षाची चालत आलेली सांगड. आठवतच असेल लहानपणचा श्लोक. " गोविंद गोपाळ हे दोघे बन्धु ! जेवित होते दहीभात निंबू ! " वगैरे.

आम्हा दोघांही भावांचे नावाची आद्यअक्षरे इंग्रजीत G. V. ( जी. व्ही.) व मराठींत (गो. वि.). नाही म्हणायला भाऊ डॉक्टर व मी बॅरिस्टर. पण त्या उपाधीची दखल वर्तमानपत्राचे रिपोर्टर्स घेतात कशाला ? त्यामुळे बरेचदा 'संशय कल्लोळ ' उत्पन्न व्हायचा. एकदा बाबू बजोरिया शेठजींनी असेंब्लीत भाषण करतांना म्हटल " काम करतो मिस्तर देशमुख व नाव होत डॉ. देशमुखच. " तेव्हां गोपाळन म्हटल ' It is unfortunate that he is hacndicapped by having a very distingushed brother.—

तेव्हां सर्व सभासद चकितच झाले. गोपाळचा हा आकस्मिक विनोदी धक्का इतका जबरदस्त की लोकनायक बापुजी अणे ह्यांनी एकदम आ वासला व भोंवया वर चढवल्या. मौ. शौकतअली आम्हा दोघां भावाकडे वळून म्हणाला " अजी भाई मेरा भी ऐसाही होता था. मैने कुछ करना-और नाम महम्मदअली का होना " ह्यावर गोपाळ म्हणाला " मैने किया मैने-ऐसा किया कहने की सब बडे भाईयोंको आदतही होती है . "

## जशास तसे बिलाचा पाया पक्का केला

१९३७ च्या आगष्ट महिन्याच्या सिमला सेशनमधे वसाहती व डोमीनीयस ह्यांत हिंदी लोकांना कसे वागविण्यात येते वगैरे प्रश्न

विचारून जी माहिती मिळविली होती तीत ह्या नंतरच्यान सेशनमधे म्हणजे १९३८ च्या जानेवारीच्या बजेट सेशन-मधे प्रश्न विचारून आणखी भर घातली. हिंदुस्थान सरकारच्या नोकरीत परदेशातील किती, कोण कोण व कोठले माणस आहेत, परदेशाशी केलेले व्यापाराचे करार ह्यावर मध्यवर्ति असेंब्लीचा शिक्कामोर्तब असतो की नाही वगैरे प्रश्न विचारले. ह्यानंतर १९३८ च्या मे महिन्यात नागपूरच्या इंग्रजी वर्तमानपत्रात ' इन्डीयन डेली न्यूज ' मधे ' व्यापारी करारांची कार्यक्षमता Efficiency of Trade Agreements' व ' बॉम्बेक्रानकल' ह्या इंग्रजीत निघणाऱ्या वर्तमान पत्रामधे 'व्यापारी करार: राजकारणात त्यांची उपयुक्तता Trade agreements their utility is politics' ह्या शीर्षकारवाली लेख लिहिलेत. जे देश किंवा ज्या वसाहती त्यांच्या देशात राहत असलेल्या हिंदी लोकांना नीट वागवणार नाहीत त्यांना वठणीवर आणण्याची जादू व्यापारी करारात कशी भरली आहे हे दाखवून दिल. वसाहतींतील हिंदी लोकांची नाजूक परिस्थिती लोकांच्या नजरेस आणून देण्याकरिता नागपूर येथील ' इंडी-पेंडट ' व ' हितवाद ' ह्या इंग्रजीत निघणाऱ्या वर्तमानपत्रात १९३८ च्या जून मधे लेख लिहिलेत अशा रीतीन वसाहतींतील हिंदी लोकांसंबंधी चळ-वळ एकसारखी सुरू ठेविली. ह्या नंतर थोड्याच दिवसांनी वसाहती संबंधी व ह्यांचीच साथ देणाऱ्या ब्रिटीश सरकार संबंधी माझ्या भावना व विचार गव्हर्नमेंट समोर व असेंब्ली समोर मांडण्याचा प्रसंग आला तो मी फुकट जाऊ दिला नाही.

## ब्रिटीश साम्राज्याच संरक्षण आम्ही काय ह्मणून कराव ?

असेंब्ली सेशनमधे डीफेन्स सेक्रेटरींनी ' आर्मी रिक्रूटमें, ' संबंधी बिल आणल. त्या बिलाचा उद्देश, साम्राज्याचे संरक्षण ' defence of the Empire ' हा दिला होता. त्या बिलाला विरोध करणार भाषण मी केल. ज्या ब्रिटनन हिंदुस्थाच खूप रक्त शोषण केल ( bled white ) व जे ब्रिटन तिच्या वसाहती कडून किंवा

डोमिनियन्सकडून तिथे राहणाऱ्या हिंदी लोकांना माणुसकीचे हक्क प्राप्त करून देत नाही त्या ब्रिटनच्या साम्राज्य रक्षणाची फिकीर आम्ही का करावी ? करणार नाही. अशा आशयाच भाषण केल ते नागपूरच्या ' इंडीपेंडंट ' मधे " What shall we fight for ? Mr. deshm ukh's straight questionह्या शीर्षकाखली सप्टेंबरच्या १० तारखेच्या अंकात प्रसिद्ध झाल. आहे. असेंब्ली हाऊसमधे हे भाषण इतक उठाव दार व चिमटे घेणार झाल की पेशावरचा कांग्रेसवाला असेंब्ली सभासद ( Fire-estar फायर इटर ) अब्दुल कयुमखान- मुस्लीम-लीगर व मिनिस्टर आहे. मला असेंब्लीतच म्हणाला: —

"वा भाई ! आपने खूप सुनाई। हमसे तो यह न होता।" मी म्हणालो "तुम जैसी खुल्लमखुल्ली क्योरोंके गालियें देना तो मेरे लिये मुमकिन न था। वैसे तो तुम्हे देख मुझे मेरे मित्र अभ्यंकर की याद आजाती है ! तुम्हारा डीलडौल, गर्दन, आवाज और स्पीच की स्टाईल सबकुछ मेरे दोस्त अभ्यंकर से मिलती जुलती है। वह भी १२३-२६ में असेंब्लीका काँग्रेस सभासद था."

## झांजीबारच लवंगी प्रकरण

'जशास तसे' ह्या कायद्याच्या तयारीला आरंभ केला असेल नसेल इतक्यात एक लवंगी प्रकरण उत्पन्न झाल. प्रकरण लहान वस्तूसंबंधी पण त्यान बराच तिखटपणा उत्पन्न केला होता व प्रकरण अगदी हातघाईवर आल होत. झांजीबारमधे काही हिंदी लोक त्यातही बहुतेक मुसलमानच-लवंगाची लागवड त्याचप्रमाणे व्यापार करतात. झांजीबार सरकारन-सुलतानशाहीच सरकार ते व त्यातच गोऱ्या व्यापाऱ्यांची फूस, 'आधीच मर्कट तशात भूत बाधा' पैकी प्रकरण-हिंदी व्यापाऱ्यांच्या व्यापाराला धक्का पोचेल व हिंदी लोकांना लवंगीच्या लागवडीचो वाढ करण अशक्य होईल-अस फर्मान काढल. त्याविरूद्ध सत्याग्रह झाला हिंदुस्थान सरकारला-'ओव्हरसीज डीपार्टमेंटला-प्रश्न टाकलेत व सरकार आपल कर्तव्य बजावत नाही म्हणून १९३७ साली कामतहकुबीची सूचना

आणली होती. ती आणण्यात व तिचा पाठपुरावा करण्यात कांग्रेसपक्षाच पुढाकार घेतला होता. तिला सरकारचा विरोध होता एवढच नाही तर मि. जिना यांचाही म्हणजे मुस्लीमलीगचाही. तस म्हटल तर काही मुस्लीम सभासदांना मि. जिनाच हे धोरण पसंत नव्हत. पण करतील काय बिचारे ! मि. जिनाच्या विरुद्ध जाण्याची हिम्मत कोणाची होती ! सरकारची व मुस्लीमलीगची युती झाल्यामुळे कांग्रेस सभासदान आखलेली काम तहकु-बीची सुचना फेटाळल्या गेली. ही सुचना फेटाळून लावण्यात कांग्रेसची फजीती करण हाच मुस्लीमलीग सभासदांचा म्हणजे मि. जिनाचा उद्देश. मुसलमानांच्या हिताच्या प्रश्न कांग्रेस हातळित होती. कामतहकुबीची सूचना पास झाली असती तर कांग्रेसच मुसलमानाच हित पाहते असा जिकडे तिकडे समज झाला असता मि. जिनाला नेमक हेच व्हायला नको होत. त्यांना पाहिजे होती कांग्रेसची फजीती. कांग्रेसवाल्यांना वाटल होत मि. जिनाच्या विरुद्ध वादळ उठेल. ते झांजीबारच्या मुसलमानांना साथ देत नाही म्हणजे काय ! तिथेले इथले मुसलमान खवळून उठतील !! पण झाल काय ? वादळ तर राहूंच द्या पन पाण सुद्धा हालल नाही ! त्यांच्या विरुद्ध कोठे सार्वजनिक सभा झाली नाही कोठे वर्तमान पत्रात लेख आले नाहीत. आणि ह्या गोष्टीला फारच महत्त्व आहे.

## मि. जिना ह्यांचे राजकारणातील डाव

मि. जिना ह्यांनी त्यांना वाटल तर कांग्रेसला मदत करून सरकारचा पराभव करावा किंवा सरकारला मदत करून कांग्रेसचा पराभव करावा. असेंब्लीतील पक्षांच बलाबल अस की अल्पसंख्य मुस्लीमलीग सभासदांनी साथ दिल्यावांचून कोणाचाच जय होऊ नये व ह्या गोष्टीचा फायदा मि. जिना वारंवार घेतल्यावांचून राहिले नाहीत. हाऊस ऑफ कामन्स--इंग्लंड मधली पार्लमेंट-मधील आयरीश पार्टीप्रमाणे ही पार्टी, व मि. पार्नेल सारख मि. जिनाच वर्तन-अडवणुकीच. कांग्रेसन आपल्यासमोर एकच ध्येय ठरवल होत. सरकारशी असहकारिता—सरकारचा पराव. तेव्हां त्या पक्षाला आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरिता मुस्लीमलीगची मनधरणी करण

भागच होत. पण तेच मुस्लीमलीगच धोरण ठरलेल नव्हत. बरं ज्या वेळेला ते सरकार विरूद्ध एखादा महत्त्वाचा सार्वजनिक स्वरूपाचा प्रश्न उपस्थित करीत त्या वेळेला कांग्रेसला आपण होऊनच त्यांना साथ द्यावी लागे. तेव्हां कांग्रेसला मिधे राहण्याचा प्रसंग त्यांना कधी आला नाही. तेच कांग्रेस मात्र मुस्लीमलीगच्या मदतीची आपणास नेहमीच गरज लागते ह्या जाणीवेन तिला मदत करण्यास एका पायावर तयार असे. फायनान्स बिल फेटाळून लावायच हा तर कांग्रेस असेंब्ली पार्टीचा दरवर्षीच्या कार्यक्रमापैकी मुख्य भाग. आणि हे मुस्लीमलीगच्या मदतीवांचून कस जमून येणार ! मग ते फेटाळून लावण्याकरिता कांग्रेस व लीगची भिन्न भिन्न कारण असली तरी हरकत नाही. 'कांग्रेस न्याशन्यालिस्ट पार्टी' ही कांग्रेसवाल्यांचीच पार्टी—फक्त एका गोष्टीवरून 'कांग्रेस पार्टी' व 'कांग्रेस न्याशन्यालिस्ट पार्टी' मधे मतभेद झाला होता. कम्युनल अवार्डवरून. तेव्हां महत्त्वाच्या सार्वजनिक प्रश्नावर कांग्रेस पार्टीला न्याशन्यालिस्ट पार्टीच सहकार्य न मागताही मिळत असे.

| एकदंर परिस्थितीचा परिणाम असा कीं कांग्रेस *
| पार्टीजवळ मुस्लीमलीगचा भाव वाढला व न्याशन्या- |
| लिस्ट पार्टी त्यांचीच म्हणून तिला भावच राहिला |
| नाही. 'घरची म्हणते देवा देवा व बाहेरची म्हणते चोळी |
| शिवा' पैकी गत झाली. *

बर मुस्लीमलीगची वरवर केल्यान-मुसलमानांची तळी उचलून धरल्यान-अगदी कम्युनल अवार्ड संबंधी 'Neither accept nor reject ना स्वीकार ना नकार' हे धोरण ठेवल्यान काही कांग्रेसचा फायदा—मुस्लीमलीगचा हृदय पालट झाला का ? तर तेही नाहीं. मग काय मिळवल ? कांग्रेसबद्दलचा अविश्वास, तिटकारा. मि. जिना ह्यांच कांग्रेस हायकमांडसंबन्धी फारच वाईट मत होत व ते त्यांनी नेहमी बोलून दाखवाव. म. गांधीनी आपण होऊन त्यांच्याकडे जाऊन कितीदा तरी मि. जिनांना स्वतःकडे ओढण्याचा प्रयत्न केला पण जिना त्यांना

बघले नाहीत. मात्र उलट जिनानी अशा रीतीन स्वतःचा भाव वाढवून घेतला. ही झाली महात्माजीच्या संबन्धी गोष्ट. तसच हायकमांडच्या एका प्रमुख व्यक्तीना तर ते Show boy of the Congress शो बॉय ऑफ धी कांग्रेस ' म्हणून नेहमीच संबोधित. कांग्रेस संबन्धी मि. जिनाची ही वृत्ति तर सरकार संबन्धी अशी. असेंब्लीत त्यांनी कांग्रेसला मदत करून सरकारचा पराभव केला तरी किंवा सरकारला सहाय्य करून कांग्रेसचा पराभव केला तरी ते सरकारला एका गोष्टीच उचकण दिल्या वांचून राहत नसत. त्यांनी सरकारला म्हणाव " हे कांग्रेसवाले बंडखोर. यांच्याशी तुम्ही हात मिळवू चाहता. ते हात पुढे करीत नाहीत. ते तुमचा हात झिडकारतात तरी तुम्ही त्यांची मनधरणी करता व आम्ही आपला हात पुढे करतो तर तुम्ही तो झिडकारता. तुम्हाला धडा मिळाला तो ध्यानात ठेवा " मि. जिनांना सरकारशी अखण्ड असहकारिता कधींच पटली नाही. फार तर केव्हां केव्हां सहकार्य दिल नाही. म्हणूनच त्यांच्या पक्षात ' सर ' की मिळवलेले बरेच राहू शकलेत व वैयक्तिक फायदाही त्या पक्षातील काही सभासद मिळवू शकले. लोकसंग्रहाच्या दृष्टिन व सार्वजनिक कार्यात सर फेरोजशा मेथा इत्यादि Liberals उदारमतवादी पुढाऱ्यांच्या व लो. टिळक ह्यांच्या सहवासात मिळवलेल्या अनुभवान

* त्यांनी आपल धोरण आखल होत. कांग्रेस जवळून *
| ज्या सवलती मिळाल्या, सरकारजवळून जे हक्क मिळाले |
* ते आत्मसात करून आणखी मिळविण्याकरिता एक- *
| सारखी खटपट करीत राहीले व ती खटपट करीत |
* असताना साधनांच स्वरूप मर्यादित करून ठेवल नाही. *

वाटल्यास तटस्थता, वाटल्यास सहकार्य; बहुतकरून शांततेचे मार्ग पण भागच पडल्यास अशांततेचेही अस त्यांनी धोरण ठेवल होत. कांग्रेस-बद्दल व कांग्रेस हायकमांडबद्दल मि. जिनांच्या मनात-मुस्लीमलीगच्या मनात द्वेष होता अस म्हणायला हरकत नाही.

## तुम इनको नहीं जानते

ह्याठिकाणी आम्हा दोघा भावासंबंधान व इतर कांग्रेस सभासदा संबंधान मौ. शौकतअलीन-शौकतअली म्हणजे मि. जिनाचा उजवा हात, मुस्लीमलीगचे दुय्यम नेते व मि. जिनाचे एकनिष्ठ स्वयंसेवक-काय म्हणाव हे सांगण्या सारख आहे. मुसलमानांना दुखवू नये म्हणून कॉम्युनल अवॉर्ड संबंधी कांग्रेसच धोरण Neither accept nor reject ( स्वीकारूही नये व नाकारूही नये ) हे ठरल होत असा उल्लेख वर आलाच आहे. तरीपण माझ्या भावान गोपाळन कांग्रेसन ठरवलेल्या धोरणाविरूद्ध जाऊन १९३५ सालीच कॉम्युनलअवॉर्डच्या विरूद्ध मत असेंब्लीत दिल. त्यामुळे बरच वादळ माजल होत. नंतर तो व मी वेळप्रसंगी मुस्लीमलीग सभासदांच्या रागलोभाची पर्वा न करता स्पष्ट काय असेल ते बोलत होतो. इतकही असून त्यांना आमच्या-बद्दल आदर होता. मौ. शौकतअलीन म्हणाव "अरे भाई तुम इनको नही जानते. तुम मरठ्ठे हो. हम तुमको जानते और तुम हमको जानते हो. लेकीन इनको तुम नही जान सकते. खाली हमही जान सकते." कांग्रेस हायकमांड संबंधान हे लोक नेहमीच साशक राहिलेत. आणि ज्या भुलाभाई देसाईन कांग्रेस हायकमांडच्या श्रेष्टींची सुटका घडवून आणली त्याला क्याबिनेटतर्फे आलेल्या मंडळीशी कांग्रेसतर्फे बाकीच्या प्रतिनिधी बरोबर एक प्रतिनिधी म्हणून चर्चा करण्याचाहि मान देण्यात आला नाही तेव्हा मौ. शौकत अलीचे शब्द खरेच नव्हेत का ? भुलाभाई देसाई कांग्रेस असेंब्ली पार्टीचा लीडर, हायकमांडच्या पश्चात् तिची जबाबदारी पत्करलेला मनुष्य. विद्वान तसाच धनवान. त्याला च्याट ! 'तुम इनको नही जानते' हे मौ. शौकतअली म्हणाला तेच खर.

## साहसे श्रीः प्रतिवसति

असेंब्लीमधील काम करत असतांनाच केव्हां केव्हां सार्वजनिक सभातून व्याख्यानबाजी करावी लागे. "साहसे श्रीः प्रतिवसति" हे शब्द लोकनायक बापुजी अणे ह्यांनी माझ्या एका व्याख्यानाचा

समारोप करताना म्हटलेल्या एका संस्कृत श्लोकातील-वेदाच्या ऋचेतील ही म्हण Motto ( मोटो ) प्रत्येकान आपल्या नजेरस नेहमी पडेल अशा ठिकाणी ठेवायला पाहिजे. माझं व्याख्यान कोठे व कोणत्या विषयावर झाल हे कळल्यास ह्या अमोल म्हणीची यथार्थता कळून येईल. आणि हे सर्व मी आपल्या मुलींना कु. मालती ( बी. ए. बी. टी. कोविद) व कु. शांता ( बी. ए. बी. टी. कोविद ) ह्यांना त्या इंग्रजी दुसऱ्या तिसऱ्या वर्गात होत्या त्या वेळेला; म्हणजे १९३८ च्या फेब्रुवारी महिन्यात, लिहिलेल्या पत्रात दिल आहे. त्या नुकत्याच दिल्ली, आग्रा, फत्तेपुरसिकरी, मथुरा, गोकुल वृंदावन ही गावे पाहून नागपुरला परत गेल्या होत्या.

“ × × × × × ×

काल दिल्ली येथील न्यू दिल्ली व जुनी दिल्ली येथील दोन्ही महाराष्ट्र समाजांनी मिळून जुनी दिल्लो येथील त्यांचे क्लबात माझे व्याख्यान ठरविले. विषय त्यांनाही धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय नको होता असे दिसल व नाहीतरी मी काहीतरी निराळ्याच विषायावर बोलाव असा विचार केलाच होता. कारण ‘ सद्यःस्थिती’ ‘ राजकीय सुधारणा ’, ‘ स्वराज्य ’ वगैरे विषय असे की ज्यावर जो तो उठल्या बसल्या व्याख्यान देत असतो. मी त्यांना सांगितले ठीक आहे. **विषय हा—मनुष्याचा सर्वांगीण विकास करणारे खेळ** ’ अध्यक्ष लोकनायक बापुजी अणे होते. व्याख्यानाच्या तारखेच्या दोन दिवसापुर्वीच लोकांना हा विषय माहित होऊन गेला होता. मी व्याख्यानाच्यापूर्वी म्हणालो हे एक कोडे टाकले आहे. ‘क्रॉसवर्ड पझल ’ व जो कोणी सोडवेल त्याला अल्प बक्षीस देणार आहे. एकानेच सोडवले तर त्यालाच बक्षीस. सर्वांनीच सोडवले तर सर्वांत ते वाटले जाईल व कोणीच सोडवले नाही तर काय करायचे हे मी ठरवले आहे. थोडा वेळ बोलल्यानंतर पांच मिनिटे थांबलो. तेवढ्यात चिठ्या वाटल्या गेल्या. त्यांवर काही मंडळींनी उत्तरे

लिहून पाठविलि. श्रोते मंडळीत 'रॉयल एअर फोर्स' च्या ऑफीसमधील मंडळी, आर्किऑलॉजीकल डीपार्टमेंट मधला मुख्य अधिकारी, रेल्वे खात्यातील-मंडळी व अकाऊन्टस् डिपार्टमेंट मधली मण्डळी व काही-पण फारच थोडे-खाजगी धन्दा करणारे. एकूण ७५ मंडळी होती व बाजूच्याच खोलीत ५।६ स्त्रिया होत्या. कोणचे खेळ आवश्यक आहेत हे मी सांगितल्यावर निरनिराळ्या मण्डळींच्या चिठ्या वाचण्यात आल्या व जेव्हां का हशा पिकला की विचारू नको. खूप गमतीची उत्तरे होती. बापूजी व इतर मंडळी खूप हसायला लागली. रॉयल एअर फोर्स ऑफीसमधल्या एका माणसान 'कुस्ती' लिहिली होती व इतरही खेळ लिहिले होते. मी त्यांना आपण हे लिहिले हे ठोक-त्याची बाकीची यादी चुकली होती- पण काय कारणामुळे आपण कुस्ती हा खेळ यादीत घातला हे विचारले. त्या गृहस्थाला उत्तर काही देता येईना. खूपच मंडळी हसू लागली. मी म्हटले घोड्याच्या शर्यतीत ज्याप्रमाणे आपल्याला काहीही घोड्यासंबंधी माहिती नसली तर उगीच एखादे वेळेला एखादे घोड्यावर आपण टिकीट टाकतो व तो घोडा जिंकतो तशापैकी तुमचे झाले पण संबंध लिस्ट काही आली नाही. त्यानंतर काही वेळ भाषण केल्यानंतर बापूजी अणे यांनी सांगितले की व्याख्यात्यांनी रूपये वापस नेण्याचा इरादा केलेला दिसतो. त्यांचे भाषण समारोपाचे ठीक झाले. माझी तारीफही केली. सभा संपली असे सांगितल्यावर मी एक दहा रूपयाची नोट त्यांचे समोर ठेविली व सांगितले मंडळींच्या आता चहा कॉफी करिता हे रूपये देत आहे. माझा विचार रूपये आणतानाच असा ठरला होता की आपणा चार मंडळींची ओळख व्हावी व मला आपणा सर्वांना माझेकडे 'चहाला' बोलावणे शक्य नाही तर इथेच मी आपणाला चहा देतो. मंडळींनी दुग्धपान केल्यानंतर आम्ही वापस आलो. अगदीच नवीन तऱ्हा व्याख्यानाची. सर्व अगदी खुष"

वाचकांच्या माहितीकरिता ह्या पत्रात नाही व थोडक्यात द्यावयाचा मजकूर असा. मी 'मनुष्याचा सर्वांगीण विकास करणारे खेळ' दोन ठरविले. एक कुस्ती व दुसरा फुटबॉल, मी आपल्या व्याख्यानात

दुसऱ्यांची उत्तर कशी चुकली होती हे विस्तृतपणे दाखवून दिल होत व माझीच उत्तर बरोबर का हे ही खुलासेवार स्पष्ट केल होत. ते सर्व येथे सांगणे सोयीचे होणार नाही. इथे थोडक्यात सांगून वाचकांची रजा घेतो.

१ **कुस्तीः**— स्नायु बळकट करते, अंगात शक्ति आणते, दम व कस वाढविते, तोल संभाळण व बिघडवण शिकवते, नजर तीक्ष्ण करते, डावपेच-कला-शिकवते, निर्णय घ्यावयाचा व तो एकदम अमलात आणायचा-म्हणजे संधीचा फायदा घ्यायला शिकवते-अंगात तडफ आणते, ब्रम्हचर्य पाळायला (आखाडे वाल्यांच्या भाषेत लंगोट बंद राहण्याला) भाग पाडते. मार देण्याचे व मार चुकवण्याचे म्हणजे चढाईचे व बचावाचे कार्य शिकवते. मार सहन करण्याचो सवय लावते. वैयक्तिक विकासाच्या दृष्टिने कुस्तीमुळे जरी बरेचसे गुण अंगी येत असले तरी.

(२) **फुटबॉल सारखा खेळ त्याच मनुष्याला येण आवश्यकः**— ज्याला ( Team Spirit ) टीम स्पीरीट म्हणतात ते निव्वळ कुस्तो शिकून येत नाही. चार चौघ मिळून शिस्तपणे खेळ खेळण हे ही आवश्यकच आहे. स्वतःच्याच नावाकडे न पाहता टीमच नाव वाढवायच-, म्हणजे आवश्यक तो स्वार्थत्याग करण्याची शिकवण, शिस्त पाळण्याकडे कल वगैरे सद्गुण अंगो बाणतात. क्रिकेट पेक्षा फुटबॉल मी पसंत करतो कारण ह्यांतही खेळणाऱ्यांचा एकमेकाशी धसमुसळेपणा रेटा रेटी व पडझड, चढाईचे व बचावाचे धोरण वगैरे आहेत. हे गुण 'डु डु' उर्फ 'कबड्डी' ह्या देशी खेळात ह्या प्रमाणात नाहीत म्हणून फुटबॉल हा परकीय खेळ मी पसंत केला आहे. कुस्ती – फुटबॉलही-विशेषेकरून कुस्ती-मारामारीच्या कामास येते, म्हणून हे दोन खेळ मी पसंत केले. कारण जग तर अस आहे धकाधकीच आणि—

"धकाधकीचा मामला ।। कैसा गमे अशक्ताला ।।" व म्हणूनच **रामदास स्वामी म्हणतात.:**—

"शक्त तो सर्वही भोगी", "शक्ति युक्ति जिये ठायी तिथे श्रीमंत धावती"

माझ्या व्याख्यानाचा समारोप लोकनायक बापुजींनी ज्या संस्कृत श्लोकान केला त्यात 'साहसे श्रीः प्रतिवसति' हे सुभाषित आहे. हे सुभाषित-हा Motto-प्रत्येकान आपल्या डोळ्यासमोर ठेवावा हे मात्र खचित. स्वतःच, स्वतःच्या समाजाच व देशाच नांव वाढविण्यास ह्या मंत्रासारखा दुसरा मंत्र नाही. ह्या देशाच नाव वाढविण्यास, त्याला उच्चदर्जा प्राप्त करून देण्यास सन १९४२ साली साहसी लोक पुढे आलेत. काही भूमिगत होऊन सरकारशी सामना करू लागले, तर काही उघड उघड. ह्या उघड उघड मुकाबला करणाऱ्या साहसी लोकांचे श्री. नेताजी सुभाषचंद्र बोस हे मुकुटमणी. त्यांच १९४२ नंतरच जीवन किती साहसी व म्हणूनच अद्भुत व रम्य अस झाल आहे ! हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामी त्यांचा नंबर १ ला. गोपाळच्या, माझ्या भावाच्या भाषेत सांगायच म्हणजे 'नेताजीचा नंबर पहिला. इतरांनी सोंग आणल-त्याच्या मानाने इतर सोंगाडे व फुसके बार'.

## खानाच्या बिबीचा कडक बुरखा

वर सांगितलेल्या व्याख्यानानंतर सरासरी तीन चार महिन्यांनी म्हणजे १९३८ च्या आगष्ट महिन्यात सिमला सेशनला हजर राहण्या-करिता मी नागपूरहून ग्रँड ट्रंकने निघालो. गाडी रात्री आठचे सुमारास भोपाळला पोचली. गाडी थांबल्यानंतर एक गृहस्थ एका काळ्या बुरखे-वालीला-बुरखा नखशिखांत-घेऊन माझ्या सेकंड क्लासच्या डब्यात आला. मी बसलो त्या डब्यात ५ बर्थस. पाचही रिझर्व्हड. अर्थातच ह्या बुरखेवालीला व तिच्या बरोबरच्या गृहस्थाला आमच्या डब्यात जागा नव्हती. दोघही जाणारे दिल्लीचे तेव्हां त्यांच्या समोरचा जागेचा प्रश्न सुटावा कसा ? मधल्या बर्थवर एक कांग्रेसवाला खादीधारी मुसलमान होता. तो डब्यात आलेल्या गृहस्थाला म्हणाला " जनाना डब्बे में आप जनानाको क्यों नहीं

बैठाते ? यहांपर तो आदमी को बैठने के लिये जगह नहीं. और आप अपना जनाना भी साथ लेकर आये !"

तो:—"मै तो जनानेको अपनेही पास बैठाऊंगा. जनानाके डबेमें ले जाना नहीं चाहता"

खादीधारी मुसलमानान आपल्या बर्थवरची बरीचशी जागा खाली करून मला त्या जागेवर बसण्याची व माझी बर्थ त्या बुरखेवालीला व तिच्या सोबत्याला खाली करून देण्याची विनंति केली. मी मधल्या बर्थवर गेलो व माझी प्लॅटफार्मकडची बर्थ ह्या दोघांना खाली करून दिली. झाल बिबीमुळे खानाला जागा मिळाली. नाहीतर आम्ही मेहेरबानी केलीच असती तर त्याला खाली जमिनीवर ( Floor वर बसू दिल असत. खान व बिबी मी रिकाम्या करून दिलेल्या बर्थवर बसल्यानंतर खानान एक खूप लांब रूंद काळा कपडा काढला व मधली बर्थ व प्लॅटफार्मकडची बर्थ ह्या दोनमधे बांधला. म्हणजे खान व बिबी पडद्याच्या एका बाजूला व दुसऱ्या बाजूला मी व खादीधारी कांग्रेसवाला मुसलमान. बुरखेवालीच्या बुरख्याचा डबल बंदोबस्त झाला. काय मजाल होती आमची कोणाचीही—वरच्या खालच्या बर्थवाल्याची-नजर ह्या डबल बुरख्यातून भेदून जाण्याची !

## आप कांग्रेसवाले महजबको बिघाडते हो !

खादीवाल्या मुसलमानान बुरख्यापासून होणाऱ्या तोट्यांच लेक्चर सुरू केल. काही वेळ खानान ते ऐकून घेतल व नंतर एका सणसणीत मात्रेन चूप बसवल. तो जरा तिरसटपणानच म्हणाला "आप कांग्रेसवाले हो. महजबको बिघाडते हो. आपसे बोलने में फायदा नही" बिबीला काय वाटल ते सांगता येत नाही पण बिबीचा कड घेऊन बोलणारा मुसलमान चूप बसला.

१९४३ साली मी इजिप्तला गेलो होतो. इजिप्त हा देशही इस्लामधर्मी देश आहे. पण तिथे खेड्यातील बायका खेरीज कोणी

बायका 'पडदा' पाळतांना दिसल्या नाहीत. खेड्यातील बायका पाळ-ात तो ही असा. काळ्या कपड्यान सर्व आंग झाकून घेतात; पण संबंध चेहरा उघडा ठेवतात. नखशिखांत पडदा असा हा आमच्या हिंदुस्थानातच. उच्चदर्जाचा इस्लाम कायम राहणार फक्त हिंदुस्थानातच तर !

## खळबळ उडवून देणार मुस्लीम विवाह विच्छेदक बिल

ह्या अधिवेशनात खळबळ उडवून देणार मुस्लीम विवाह विच्छेदक बिल चर्चेला येणार होत. मुस्लीम विवाह विच्छेदक बिलाला मी खळबळ उडवून देणार बिल म्हणतो हे सर झाफरूल्ला व सर मन्मथनाथ मुकर्जी ह्या दोघा एक्झिक्युटिव्ह कौन्सीलर्सला स्वतःच भिन्न मत प्रतिपादण्याच स्वातंत्र्य व्हाईसरॉयन दिल ह्या एका गोष्टीवरूनच स्पष्ट होणार आहे. मुस्लीम विवाह विच्छेदक बिल 'सिलेक्ट कमिटी' कडे जाण्याची सूचना ( Motion ) असेंब्लीसमोर होती व त्या सूचनेवर बोलतांना ह्या दोघा एक्झिक्युटिव्ह कौन्सीलर्सनी भिन्न भिन्न मत प्रतिपादन केल व मतदानही.

बंगालमधे बंगाली हिंदुलोकांच्या मुली व तरुण विधवा मुसलमान जबरदस्तीन पळवून नेतात व त्यांना मुसलमानी धर्म स्वीकारण्यास भाग पाडतात अशी किती तरी वर्षांची ओरड. मी अमृत बझार पत्रिकेत ह्या बातम्या बऱ्याचदा वाचल्या होत्या. ह्या बिलान हिंदूंच्या विशेषतः बंगाली हिंदूंच्या पोटात कळ उठण साहजिक होत. पण मुसलमानांच्या पोटातही तिडीक उठण तितकच साहजिक होत. कारण आर्यसमाजिस्ट, मुसलमान स्त्री पुरुषांना हिंदू करून घेत होते. तेव्हां ह्या बिलाला मुसलमान व मुसलमानेतर अशा दोन बाजू. पण ह्या दोघां कौन्सीलर्सनी बोलण्यापूर्वी मला बोलण्याची संधि मिळाली होती. कांग्रेस पार्टीचा व्हीप सरदार जोगेंद्रसींग ह्यान मला प्रथम सांगितल अर्धातास बोल व नंतर काही वेळान सांगितल सबंध दिवस घे. कांग्रेस व मुस्लीमलीग ह्या पक्षात काय मतभेद झाला असेल कोणास

टाऊक. पण मला सबंध दिवस बोल अस जोगेंद्रसिंग म्हणाला. मी सबंध दिवस घेतला तर हीच सिलेक्ट कमिटीची मोशन पुढच्या सेशन-वर गेली असती. ते तर मुस्लीम लीगला नको होत. पण तशी ती पुढे ढकलण्यात यावी अस काहीतरी कारणामुळे कांग्रेसपक्षाला वाटत होत. आणि अस कांहीतरी कांग्रेस करणार ही भीति मुसळमानांच्या पोटांत मी बोलत असतांना उत्पन्न झाली असावी. मुसलमानांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर, सर अब्दुर रहीम सारख्या कायदेबाज व शिस्तबाज अध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली तासचे तास बोलण काही सोप काम नव्हत पण मी ते करीत होतो. ते करीत असतांनाच जोगेंद्रसिंग व्हीप आला व म्हणाला आटोप. मी भाषण आटोपल. अर्थात मी समजलो ह्या दोन्ही पक्षांचा काहीतरी तडजोडीचा मार्ग निघाला असला पाहिजे. असेंब्लीच त्या दिवशीच काम संपायला फार तर एक तास राहिला असला पाहिजे. तो वेळ ह्या दोन कौन्सीलर्सनी घेतला व सिलेक्ट कमिटीची सूचना पास झाली. माझ्या भाषणातील काही मुद्दे सर झाफरूल्लाना योग्य वाटले व त्यांचा स्वीकार करण्याचा उपदेश त्यांनी मुस्लीम लीग पार्टीला केला. बाकीच्या बाबतीत त्यांनीं निराळ धोरण ठेवल. सर मन्मथनाथ ह्यांनाही माझे काही विचार पटले. पण दोघांचाही ह्या बिलाकडे पहाण्याचा दृष्टिकोन अगदी भिन्न.

स्त्री व पुरुष एका धर्माचे असतांना ज्यांनी लग्न केल त्यांच्या पैकी एकान जर धर्मांतर केल तर त्यांचो वैवाहिक बंधन(Status)काय असावीत ह्यासंबंधी बारकाईन ह्या कायद्यात विचार केलेला आहे. मुस्लीमामधे कायदेशीर विवाह केव्हां होऊ शकतो, मूर्तिपूजक व मूर्तिभंजक ह्यांचा कायदेशीर विवाह होऊं शकतो का हे ही ह्या बिलावरील चर्चेत विशेषेकरून सर झाफरूल्ला ह्यांचे भाषणात—सांपडणार आहे. आणि मग अस दिसून येईल की भोपाळ पासून बुरखेवाली बरोबर ज्या गृहस्थान माझ्या डब्यात प्रवेश केला त्याच जहांगीर बादशाहा दासीपुत्र होता म्हणण बरोबर असण्याला काही आधार होता. मुसलमानेतर मूर्तिपूजक धर्माच्या बाईला

जर मुसलमानाशी लग्न करावयाचे असेल तर तीन मुसलमानी धर्माचा व बुरख्याचाही स्वीकार केला पाहिजे. ह्या बिलावरील एकंदर चर्चा मोठी-बोधप्रद आहे.

## " जशास तसे " बिल.

१९३९ च बजेट सेशन थोड्याच महिन्यांनी दिल्लीस भरणार होत ते भरण्यापूर्वी महिना दीड महिना अगोदर ' जशास तसे ' ह्या माझ्या बिलाला मी वर्तमान पत्रांतून प्रसिद्धि दिली. वर्तमानपत्रांनी हिंदुस्थान सरकारचा व ब्रिटीश सरकारचा खरपूस समाचार घेणार व बिलाला पाठींबा देणारे लेख लिहिलेत. हे बिल मी ग्रेट ब्रिटन, बर्मा, सिलोन, आफ्रिका व इतर वसाहती ह्यांना लागू होणार केल होत. फक्त आयर्लंड रिपाब्लीक तेवढ वगळल होत. हे बिल सादर करण्यापुर्वी हिंदुस्थान बाहेरील हिंदी माणसांच्या हितसंबंधीच्या खात्यांच्या मागणीत काट सुचवला होता. तो पास झाला होता. सहजच आशा उत्पन्न झाली की आपल बिल पास होणार. काटाला मदत करणारे आपल्या बिलालाही मदत करतील-केल्या वांचून राहणार नाहीत अस मनाला वाटल. पण म्हणतात ना ' मनसा चिंतीत कार्यं दैवमन्यत्र चिंतयेत्. ' दैवान धोका दिला. त्याच अस झाल की हिंदुस्थान सरकान असेंब्लीस न विचारता दुसऱ्या जागतिक लढाईत भाग घेतला, ह्या कृत्याचा निशेध म्हणून कांग्रेसन १९३९ च्या सप्टेंबर महिन्यापासून असेंब्लीवर बहिष्कार पुकारला. बिल पास होण्याच्या मार्गात मांजर हे अस आडव गेल. ' जशास तसे ' बिल बारगळल. पण कांग्रेसचा बहिष्कार सुरू होता तरी एक वर्षानंतर मी ह्या बिलाला जिवंत केल व कांग्रेस पक्षाच्या गैर हाजरीत म्हणजे तिच्या मदती शिवाय १९४३ साली पास करून घेतल. ते कस ? ही हकीकत पुढे येईलच.

## कांग्रेसवाल्या मधील यादवी

१९३८ हे साल मध्यप्रांतातल्या राजकारणाच्या दृष्टिन फार वाईट गेल, कांग्रेसवाल्यांच्या व म्हणूनच कांग्रेसच्या इभ्रतीस काळीमा लागली,

३३८

लोकांत व सरकारी नोकरांत त्यांच्या बद्दल अनादर उत्पन्न झाला. महाकोशल मधून घेतलेल्या मिनिस्टर्समध्ये व मराठी मध्यप्रांत व वऱ्हाड यातून घेतलेल्या मिनिस्टर्समधे अक्षरशः जरी नाही तरी जूतेपैजार सुरू झाली, फक्त प्रत्यक्ष जोडाजोडी तेवढी व्हावयाची राहिली-व ह्या सर्व गोष्टीच उघड उघड प्रदर्शन होऊ लागल. कांग्रेसवाल्यांपैकी काही व्यक्तींनी डॉ. खरे ह्यांना नोकरी किंवा कॉन्ट्रॅक्टस देण्याकरिता शिफारसपत्र देऊन आपल्या ओळखीच्या व स्नेही मंडळींना पाठवल. ह्याचा अर्थ असा की वशिलेबाजीला सुरवात झाली. तिचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. सत्य, न्याय प्रामाणिकपणा इत्यादि गोष्टींना चाट मिळाली, व वाटेल तो अंधेर होण्यास वाव मिळू लागला. त्यामुळे कांग्रेसवाल्यासंबंधी सरकारी नोकरांच्या मनातील आदर सपशेल नाहीसा झाला. कांग्रेसमधल्या श्रेष्ठांत श्रेष्ठ अशाही व्यक्तींचे ( clay feet ) खरे स्वरूप दिसू लागले. महाकोशल मधील मिनिस्ट्री बहुमतात, तेव्हां बहुतेक गोष्टी बहुमताच्या जोरावर त्यांच्या मताप्रमाणेच होऊ लागल्या—त्या योग्य असोत नसोत, न्याय्य असोत नसोत. अल्पसंख्यावाल्यांची कदर राहिली नाही. बहुमतवाल्यांनी अल्पमत वाल्यांवर कुरघोडी सुरू केली. मराठीमध्यप्रांतातील व वऱ्हाडांतील लोकांना आपली कुचंबणा होऊन राहिली आहे, आपणाला अन्याय होऊन राहिला आहे, असं वाटायला सबळ कारणं उत्पन्न होऊ लागली. आणि ह्या लठ्ठालठ्ठीचा शेवट डॉ. खरे प्राईम मिनिस्टर, व श्री. रामराव देशमुख व श्री. गोळे मिनिस्टर्स ह्यांच्या राजीनाम्यांत झाला. पण गोष्ट एवढ्या वरच थांबली नाही.

## महाविदर्भाची जोराची चळवळ

मध्यप्रांतातील मराठी जिल्हे व वऱ्हाड ह्यांचा स्वतंत्र अलग प्रांत करण्याच्या चळवळीला तोंड फुटल व तिचं पर्यवसान प्रांताची

भाषावार घटना करण्यात यावी ह्या मुद्यावर एक भाषी म्हणजे मराठी बोलणाऱ्यांचा प्रांत सुसंघटित करण्याकरिता ' महाविदर्भ सभा ' स्थापन करण्यात झाली. ही स्थापना करण्यात लोकनायक बापुजी अणे ह्यांनी प्रमुखपणे भाग घेतला. महाविदर्भाचा नागरीक ह्याची व्याख्या अशी- नागपूर वऱ्हाडात स्थायीक झालेला आणि तेथील जनतेच्या हितसंबंधाना जागरुक राहणारा प्रत्येक मनुष्य मग त्याची जात, धर्म किंवा मातृभाषा किंवा मूळ प्रांत कोणताही असो.

श्री रामराव देशमुख, बॅरिस्टर, हे विदर्भसभेचे अध्यक्ष. ह्यांची आफ्रिकेस हायकमिश्नर म्हणून नेमणूक झाल्यानंतर व ते तिकडे गेल्यानंतर माझी कार्याध्यक्ष पदावर १९४५ साली नेमणूक झाली. मी अध्यक्ष असताना महाकोसलच्या नेहमीच्या कटकटीतून मुक्त होण्याकरिता भाषावार प्रांत रचनेला अनुसरून 'महाविदर्भ' बनविण्यात यावा अशा तऱ्हेची ब्रिटीश मंत्र्यांच्या शिष्ट मंडळाला मागणी केली. त्या कैफियतीत मध्यप्रांत असेंब्लीत तसा ठराव केला आहे ह्याचाही उल्लेख केला होता. क्याबिनेट मिशनने कैफियत पोचली हे कळविण्यापलीकडे जास्त काही केल नाही.

नागपूरच्या सरकारी यंत्रात ज्याप्रमाणे बिघाड होऊन राज्यकारभार सुरळीत चालेनासा झाला त्याचप्रमाणे नागपूरच्या म्युनिसिपॅलिटीतही झाला. डॉ खरे यांच्या राजीनाम्यानंतर नागपूर म्युनिसिपॅलिटीचे अध्यक्ष श्री. ढवळे ॲडव्होकेट व श्री. साळवे वकील, श्री. नायडू (पी. एम्.) वकील आणि जनरल आवारी ह्यांच्यात झोंबाझोंबी सुरू झाली, एकमेकाच्या छातीवर बसण्याचे प्रयत्न सुरू झाले. एका सभेत अशी दंगल माजली की त्यानंतर ढवळे यांना अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला.

## नेताजीच्या " फॉरवर्ड ब्लॉकचा जन्म "

प्रांतातल्या कांग्रेसवाल्यांत तर फाटाफूट झालीच पण हिंदुस्थानातल्या कांग्रेसवाल्यामध्येही—श्री. सुभाषचंद्र बोस व त्यांचे अनुयायी आणि महात्मागांधी,श्री. पटेल वगैरे असे दोन तट पडले व श्री. बोस यांचा 'फॉरवर्ड ब्लॉक' जन्मास आला. 'एका म्यानात दोन सुऱ्या राहू शकत नाहीत' ह्याच हे प्रत्यंतर. 'फॉरवर्ड ब्लॉकचे जन्मदाते श्री. सुभाषचंद्र बोस -नेताजी ह्यानी हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या बाबतीत खाल्लेल्या खस्ता, त्यांची ज्वलज्जहाल देशभक्ति, त्यांच साहस, त्यांची कर्तबगारी, त्यांच धैर्य, लढाईच्या विमानातील त्यांचा गूढ मृत्यु, सर्वच्या सर्वच अतुलनीय. ह्या तरवार बहादुर मुत्सद्यास कोण विसरू शकतो ?



—x—

## रत्नमंजुषा २ री

# लढाईच्या वातावरणात

कांग्रेसचा वनवास–महायुद्धात कांग्रेसची सरकारला मदत–कांग्रेस वर्किंग कमिटीने युद्धमंडळ नेमले जिना म्हणतात मोक्षदिन पाळा–वनवासातला माझा चौफेर हल्ला–रिक्रूटिंग ऑफीसरची भीषण प्रतिज्ञा–सरबत्तीला सुरवात झाली–माझी भीष्म प्रतिज्ञा सिद्धीस नेली–पाखरात काऊ व मानसांत नाऊ–शेतकऱ्यांच्या हितावर निखारे ठेवणाऱ्याचा समाचार घेतला–शेतकऱ्यांच्या व शहरवासीयांच्या परस्परांच्या हितात विरोध–उडाणटप्पूपेक्षा कार्य करून दोष पत्करणे बरे–कांग्रेस मध्यवर्ति असेंब्लीत हजर–डीफेन्स ऑफ इंडीया ॲक्ट खाली बायकोचा ताबा–संघटित, दणकट व जागरूक लोकमत पाहिजे.

## कांग्रेसचा वनवास

सन १९३९ साली कांग्रेसला काय अवदसा आठवली कोणास ठाऊक तिने कांग्रेसच्या प्रांतीय मिनिस्ट्रीला (सरकारला) राजीनामे द्यायला सांगितल व प्रांतीय व मध्यवर्ति असेंब्लीतील सभासदांना असेंब्ली सेशनला जायच नाही अस फर्मान सोडल. हे फर्मान सोडण्याच कारण दिल; नाही अस नाही. कारण काय सांगितल की १९३९ सालच्या जागतीक युद्धांत हिंदुस्थान सरकारने असेंब्लीला न विचारता म्हणजेच देशाला न विचारता, त्याची सम्मति न घेता, भाग घेण्याच ठरवल म्हणून आम्हाला सरकारला ह्या युद्धात मदत करावयाची नाही. प्रांतीय व मध्यवर्ति असेंब्लीच्या सभासदांनी सेशनला हजर राहू नये असा सरकारचा निषेध म्हणून कांग्रेसचा हुकुम सुटला. तो कांग्रेस मंत्र्यांनी व सभासदांनी पाळला. मध्यवर्ति असेंब्लीतील सभासद, ज्यांनी सरकारशी युद्ध करण्याकरिता आघाडी उभारली होती त्यांनी युद्धाच्या आघाडीवरुन पोबारा करुन वनवास पत्करला. पण कांग्रेसच्या ह्या हुकुमाचा सरकारला

कसा फायदा मिळणार होता व देशावर काय परिणाम होणार होते हे मी लवकरच दाखवून दिलं.

## महायुद्धात कांग्रेसची ब्रिटीश सरकारला मदत !

## लढा देण्याची इच्छाच नाही

कांग्रेसनं जरी असं म्हटलं की ब्रिटीश सरकारला ह्या युद्धांत मदत करणार नाही तरी मदत कशी होणार आहे हे मी सविस्तरपणे एक लांब लचक लेख 'महाराष्ट्राच्या' १९३९ च्या सप्टेंबरच्या ६ तारखेच्या अंकात प्रसिद्ध करून दाखवून दिलं. त्याचं शीर्षक 'महायुद्धात काँग्रेसची ब्रिटीश सरकारला मदत ! लढा देण्याची इच्छाच नाही' असं आहे. ज्या कांग्रेसवाल्यांनी आतून म्हणजे सेंट्रल असेंब्लीतून व प्रांतीक असेंब्लीतून साम्राज्य शाहीशी झगडू म्हणून म्हटलं-हल्लीचा (१९३५) चा गव्हर्नमेंट ऑफ इंडीया ॲक्ट हाणून पाडू असं म्हटलं त्यांनी ऐन वेळी कसा अवसान घातकीपणा केला हे त्यात स्पष्ट केलं. हिंदी लोकांना वसाहतीत चांगलं वागवण्यात यावं म्हणून वसाहतीवर साम्राज्य सरकार कडून दबाव आणण्याची, त्यांना कैचीत धरण्याची, जी संधि होती ती घालवून दिल्याबद्दल दोष दिला आहे. ब्रिटीश सरकारला पेच टाकण्याचे प्रसंग तर घालवलेच पण हिंदुस्थानातील हिंदी लोकांचे हित-संरक्षण करण्याचे ही प्रसंग कसे घालवलेत हे ही स्पष्ट केलं आहे. निदान मध्यवर्ति असेंब्लीत तरी, जिथून सरकारवर मारा करता येत होता व करीत होतो तिथे तरी सरकारशी झुंज बंद नको होती. "आत बाहेर सर्वत्र झुंज बन्दचा प्रोग्रॅम ठरवून दिल्यामुळे सरकारला आपल्या मनासारखं करण्यास रान मोकळं करून दिलं" असं म्हटलं.

कांग्रेसनं सरकारशी असा हा असहकार पुकारल्यानंतरही कांग्रेस-वाल्या व्यापारी लोकांनी सरकारला निरनिराळा माल विकला. मी एक वर्षानंतर असेंब्लीत गेलो तेव्हां एक प्रश्न टाकला. त्याला सरकारनं दिलेल्या उत्तरावरून असं दिसून आलं की खादी वस्त्र भांडारच्या

शाखांनी सरकारला घोंगड्या पुरवल्या. ह्यानंतर काही दिवसांनी महात्मा गांधीची मुलाखात एका प्रसिद्ध काँग्रेसवाल्यान घेतली. नाव आठवत नाही. पण मुलाखत वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झाली होती. महात्माजीन म्हटल होत की व्यापाऱ्यांना अहिंसक माल विकण्याची मनाई नाही, मग घेणारा कोणीही असो. सैन्याला भरपूर अन्न व वस्त्र पाहिजे हे कोणीही सांगेल. शाकहारी अन्न जरी असल व देशी घोंगड्याच जरी असल्या तरी त्या प्रत्येक सैनिकाला पाहिजेतच. मग असल्या वस्तूही की ज्या वांचून सैन्यातील शिपायांच लढणच बंद होईल, त्यांची योग्य ती कार्यक्षमता राहणार नाही, सरकारला विकण सरकारशी असहकार कसा ठरू शकतो? अस विचारावस वाटत. हिंदुधर्मातील काही चालीरीतीबद्दल ज्याप्रमाण बुद्धी ला पटेल असा खुलासा देता येत नाही तेव्हा बुवा म्हणतात की मी म्हणतो म्हणून किंवा शास्त्रात लिहिल आहे म्हणून करायला पाहिजे नाहीतर अधर्म होतो त्याचप्रमाणे महात्माजी म्हणतील ते शास्त्र समजून बुद्धी गुंडाळून ठेऊन वागायला पाहिजे अस दिसत.

## काँग्रेस वर्किंग कमिटीन युद्ध मंडळ नेमल

'महायुद्धात काँग्रेसची ब्रिटीश सरकारला मदत' हा माझा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर 'वर्किंग कमिटीन' कमिटीच्या सभेत आठच दिवसांनी म्हणजे सप्टेंबरच्या ता. १४ ला पुढील ठराव पास केला. 'हिंदुस्थानात लोकशाही स्थापन झाली पाहिजे. त्याला ( हिंदुस्थानाला ) घटना समितीद्वारा स्वयंनिर्णय करण्याचा हक्क मिळाला पाहिजे व स्वतःच धोरण आखता आल पाहिजे' अशी ब्रिटीश सरकारला मागणी करायची. त्याचप्रमाण तिन दुसऱ्या एका ठरावान 'युद्ध मंडळ' नेमल व माझ्या लेखाला उत्तरच म्हणून की काय बाहेर झुन्ज करण्याची तयारी आहे हे दाखवून दिल.

## डिसेंबर २२ मोक्षदिन पाळा

युद्ध मंडळ नेमण्याच्या ठरावानंतर काँग्रेसच्या पार्लमेंटरी पक्षाच्या आदेशानुसार प्रांतोप्रांतीच्या काँग्रेस मंत्रिमंडळांनी चालू बैठकी संपताच

राजिनामे दिले. त्यांच्या वनवासाला आरंभ झाला. त्या सरशी बॅ. जिनांनी १९३९ च्या डिसेंबरची २२ तारीख हा दिवस " मोक्षदिन " ( Day of Deliverance ) पाळा असा आदेश मुस्लीम लीग ला दिला. हा ' मोक्षदिन ' पाळताना हिंदुमुसलमानांत दंगे धोपे होतील असा आक्षेप घेणारांना जिनांनी उत्तर दिल की ' मोक्षदिन ' हा हिंदु-जातीच्या निषेधपर साजरा करण्यात येणार नसून फक्त कांग्रेस सरकारच्या राजवटीतून मोकळीक झाल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी निश्चित करण्यात आलेला आहे. सत्य व अहिंसा हे कांग्रेस वाल्यांच ब्रीद ! त्यांच्याचपैकी काही जणांच बनलेल सरकार आणि अशा त्या सरकारच्या राजवटीतून मोकळीक झाल्याबद्दल आनंद !

आतापर्यंतची कांग्रेसची राजवट मोठीशी स्पृहणीय झाली होती अस म्हणता येत नाही. कांग्रेसेतर हिंदुसभासदांना प्रांतिक असेंब्लीत कस्पटासमान लेखण्यात येत होत; मुंबईकडचे सभासद साक्ष देतील. कांग्रेस दत्तक घेईल तो मुसलमान कांग्रेसमन व म्हणून मिनिस्टर; त्याच्या पूर्वेतिहासाकडे पहाण्याची गरज त्यांना भासली नाही. मध्यप्रांत साक्ष देईल. मजूर वर्गावर गोळीबार; मुंबई साक्ष देईल. हिंदी शिकण्याच्या सक्ती विरूद्ध चळवळ करणाऱ्यावर अश्रुधुमाचा लोट; मद्रास साक्ष देईल. वशिलेबाजी, पक्षबाजी बद्दल, सरकारी नोकर सांगतील. आणि हे सर्व अगदी थोडक्या काळात झाल. सत्तेच्या मदान डोक फिरल होत काही प्रांतांतल्या कांग्रेस मिनिस्ट्रीजचं. आणि असाही विचार मनाला चाटून जातो की कांग्रेस सरकारच्या ह्या असल्या राजवटींना वैतागून जाऊन महात्माजीनच मंत्र्यांना मिनिस्ट्री सोडायला लावल. ह्या अनुभवानंतर कांग्रेस शहाणी होईल, जबाबदार रीतीन, न्यायान, सचोटीन वागेल, तिच्यात परमतसहिष्णुता व लोकसंग्रह करण्याची बुद्धि दिसून येईल अस वाटण अस्वाभाविक नाही.

' मोक्षदिन ' हा हिंदुजातीच्या निषेधपर साजरा करण्यात येत नाही अस जरी हिंदुमुसलानात दंगे होतील अशी भीति बाळगणा-

त्यांना बॅ. जिनानी सांगितल होत तरी काही काही ठिकाणी दंगे झालेत. व का होऊ नये ? बॅ. जिनानी उठल्या बसल्या कांग्रेस ही हिंदुची सभा ( Hindu Body ) आहे अस सर्वांना सांगत सुटल्यावर काग्रेसची राजवट म्हणजे हिंदुची राजवट ! ह्यातून मोकळे झाल्याबद्दल मुसलमानांनी दंगे धोपे का करू नये ? भीति अगदी साधार होती व म्हणूनच दंगे धोपे झालेत.

ज्या कांग्रेसन हिंदुमुस्लीम ऐक्याकरिता ( Hindu Muslim Unity करिता ) मुसलमानाला ढुंगणाच सोडून देण्यापर्यंत खस्ता-खाल्या तीन अखेरीस काय साधल ? तर तिच्या सरकारच्या राजवटीतून सुटल्याबद्दल मुस्लीमांना झालेला आनंद, डे ऑफ डिलीव्हरन्स ! ह्याला म्हणतात Irony of fate ( आयरनी ऑफ फेट ). काय हा नशिबाचा चक्कर !

## वनवासातला माझा चौफेर हल्ला

कांग्रेस असेंब्ली पक्षातील मी ही–तेव्हा मी ही वनवास पत्करला. पण तो तात्पुरताच. मात्र त्या कालातही निष्क्रिय राहिलो नाही. चौफेर धुमाकूळ माजवून दिला. हिंदुस्थानात व हिंदुस्थानाबाहेर परिस्थिती बिकट होत चालली होती. तेव्हां लोकहिताच काम करण्याकरितां ज्या कोणाशी दोन हात करावे लागतील त्याच्याशी ते करून काम साध्य करून घ्याव हा निश्चय केला व उद्योगास लागलो.

धान्याचे भाव लढाईच्या दिवसात वाढल्यामुळे भावाच नियंत्रण करा अशी शहरवासीयांची हाकाटी सुरू झाली. सरकारी नोकरांचे प्रतिनिधी, गिरण्यातील मजुरांचे पुढारी व शहरातील मध्यमर्गीय लोक ह्यांनी वर्तमानपत्रातून धान्याच्या किंमतीवर सरकारचे नियंत्रण पाहिजे अशी चळवळ सुरू केली. ह्या चळवळीला मला तोंड द्याव लागल. त्याच-प्रमाणे सरकारशीही मुकाबला करावा लागला. सैन्यांत रंगरूट भरतीला सुरवात झाली होती व इमर्जन्सी कमिशन देण्याकरीता सुशिक्षित माण-सांची निवड करण सुरू झाल होत. ह्या दोन्ही गोष्टीत पक्षपात होत होता.

सैन्याचं हिंदी करण करा म्हणून आम्ही नेहमी ओरड करणारी माणसं. आणि संधि आली तेव्हां जावयाप्रमाणे रुसून बसलो! सरकार मनधरणी करायला येईलच व आपण आपली मागणी समोर ठेविली की सर्व काही मिळेल अशी खोटीच आशा उराशी बाळगून बसलो. पण सरकार असलं खमंग की त्यानं कांग्रेसकडे ढुंकूनही पाहिलं नाही व बरं झालं कांग्रेसची पीडा गेली असं म्हणून जे करायचं ते दुप्पट उत्साहानं सुरु ठेवलं. पण नेमकी ह्याच वेळेला सरकारच्या विरूद्ध मी उठावणी केली आणि त्याचा चांगलाच समाचार घेतला. कांग्रेस स्वस्थ बसली होती. तिलाही धक्के द्यायला कमी केलं नाही. कांग्रेस, सरकार व शहरवासी ह्यांच्याशी लढा मांडला-ते अर्थातच वर्तमानपत्रातून. पण नेटाचा व आणिबाणीचा. प्रथम सरकारचा समाचार घेतला.

## रिक्रूटिंग ऑफिसरची भीषण प्रतिज्ञा

१९४० च्या जुलै मधली गोष्ट. नागपूरला एक दिवस सकाळी मी आपल्या खोलीत वर्तमानपत्र वाचत बसलो असताना एक वृद्ध गृहस्थ माझ्याकडे आले. त्यानी मला नमस्कार केला. मी ही त्याना नमस्कार केला. नंतर त्यांच्या व माझ्या भाषणाला सुरवात झाली.

तो: "देशमुख साहेब मी एक्साईज डिपार्टमेंट मधे नोकर होतो. आता पेन्शनर आहे. माझा एक मुलगा म्याट्रिकमधे आहे. तो परीक्षा दोन वर्षांपासून पास होत नाही. मी त्याला म्हणतो परिक्षा पास कर. कोठेतरी नोकरी लावून देईन.

मी:—कशी लावून देणार नोकरी तुम्ही! अहो एम्. ए. वाल्याला नोकरी मिळणं अशक्य होऊन राहिलेलं आहे.

तो:—सरकारी नोकरीत होतो. तेव्हां अजून चार ओळखीची माणसं आहेत. नोकरी लावून देता येईल. पण मुलगा म्हणतो मला परीक्षेला बसायचं नाही. मी सैन्यात भरती होणार.

मी: —फार चांगल म्हणतो. तुम्ही त्याच्या मर्जीच्या विरुद्ध जाऊ नका. कोणत्याही कारणान का असेना पण त्याच जर ह्या शिक्षणात लक्ष लागत नाही तर मग त्याच्यावर तुम्ही ते लादता का ? फायदा होणार नाही. उलट त्याची इच्छा जर सैन्यात जाण्याची आहे तर त्याला तिथेच जाऊ द्या. आड येऊ नका.

तो:—मी येत नाही. त्यान नन्नाचाच पाढा वाचला तेव्हां मी तरी काय करणार ? मुलगाही काही लहान नाही. सज्ञान आहे चांगला १९।२० वर्षांचा. मी त्याच्या म्हणण्याच्या आड येत नाही. आड येतो आहे रिक्रूटिंग ऑफिसर. मुलगा रिक्रूटिंग ऑफिसरच्या ऑफिसमध्ये गेला असताना त्याला ऑफिसरन सांगितल ' मी ब्राम्हणाना घेणार नाही. '

मी:—त्यान अस सांगितल तर तुम्ही डॉ. खरे प्रांतिक वॉर कौन्सीलचे अध्यक्ष व श्री भाऊसाहेब काळीकर, कौन्सील ऑफ स्टेटचे सभासद, व प्रांतिक वॉर कौन्सीलचे सभासद यांना जाऊन भेटा. रिक्रूटिंग ऑफिसर काय म्हणाला ते त्यांना सांगा व अशा रीतीन आपल्या मुलाला भरती करून घ्या. मी आहे कांग्रेसवाला सभासद-सरकारच व आमच सूत नाही. शिवाय तुमच्या मुलाला रिक्रूट करून घेतल नाही हा झाला वैयक्तिक प्रश्न. आणि मी असेंब्लीत असतो तरी ह्या वैयक्तिक प्रश्नाकडे लक्ष दिल नसत.

तो:—डॉ. खरे व भाऊसाहेब काळीकर यांना भेटल्या वांचून राहिलो म्हणता, सर्व केल व मगच तुमच्याकडे आलो. त्याना भेटून काम झाल असत तर मग तुमच्याकडे येण्याची गरजच उरली नसती ब्राम्हणाना सैन्यात घ्यायच नाही ही आहे सरकारची नीति म्हणे. मुलगा परिक्षा पास करत नाही व ब्राम्हण म्हणून सैन्यात रिक्रूट भरती करत नाही तेव्हा काय कराव असा पेच पडला व म्हणून आपल्याकडे आलो.

मी: — ठीक आहे. निराश होऊ नका. ब्राम्हणाना सैन्यात घ्यायच नाही ही सरकारची नीति आहे म्हणतात ना. ठीक आहे. सरकारशी मुकाबला करण्याचा प्रसंग आहे तर तो वाया जाऊ देणार नाही. तुमचा

मुलगा शरीर प्रकृतिन कसा काय आहे ? सैन्यात शिपाई भरती होऊ इच्छिणाऱ्यांच्या बाबतीत शिक्षणापेक्षा शरीर प्रकृतिकडेच कोणीही लक्ष देईल. असे करा त्या मुलला माझ्या भेटीला घेऊन या. बर. आपल नाव ?

**मी:**—माझ नाव क्षीरसागर. धनतोलीवरच राहतो. तो गृहस्थ दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या मुलाला घेऊन माझेकडे आला. तो मुलगा चागला धट्टा कट्टा दुहेरी हाडाचा, उंचा पुरा असा होता. त्याला पाहिल्याबरोबर मी क्षीरसागरांना म्हणालो "तुम्ही आपल्या मुल बरोबर रिक्रूटिंग ऑफीसरकडे जा जर त्यान रिक्रूट केल नाही तर कारण विचारा. काही मेडिकल सांगितल तर डॉ. खरे कडे जा. त्यांच्याजवळ त्या ऑफिसरच म्हणण बरोबर आहे की काय ते विचारा. पण मेडिकल अस कोणचहि कारण न सांगता तो जर तुम्हाला म्हणाला की मुलगा 'ब्राम्हण' म्हणून घेणार नाही तर मग त्याची प्रतिज्ञा खरी होते की माझी हे पाहू. मी त्याला 'ब्राम्हणाला सैन्यात घ्यायला लावीन' ही माझी प्रतिज्ञा--त्यान मला एक रणक्षेत्र उत्पन्न करून दिल अस समजा त्याच्या व माझ्या लढाईला आता सुरवात होईल. त्याच्या पाठीशी सरकार व मी एकटा असा जरी सामना असला तरी मी यश मिळवीन ही माझी खात्री आहे. पहा गम्मत.

## सरबत्तीला सुरवात झाली

क्षीरसागराच्या मुलाला घेतल नाही 'ब्राम्हण' म्हणून. मी खटाटोप आरंभला तो क्षीरसागराच्या मुलाला घ्याव अशाकरिता नव्हे. "ब्राम्हणाला घेणार नाही" ह्या रिक्रूटिंग ऑफिसरच्या व त्याच्या पाठीशी असलेल्या हिंदुस्थान सरकाच्या नीति विरूद्ध. ही नीति सरकारची आहे अस मी म्याट्रीकमधे शिकत असताना नागपूरचे डॉ. परांजपे व त्यांचे बंधू यांच्याकडून व स्नेही डॉ. वाकरे उर्फ चिंगाटी ह्यांच्याकडून कळल होत. पण ती अजून कायमच होती अस दिसते. फरक एवढाच

की ह्याबाबतींत त्या नीतिचा सोक्षमोक्ष लावून घेण्याच्या परिस्थितीत मी आता होतो.

* मी सरबत्तीला सुरवात केली. पण ती करीत असताना *
| ब्राम्हणांना अन्याय होत आहे तो दूर करावा ही |
| भूमिका घेतली नाही तर पंजाब खेरीजकरून |
| इतर प्रांतांना व मुसलमान खेरीज करून इतर जमातीना |

* होणारा अन्याय नाहीसा करण्याची भूमिका घेतली *

अशा रीतीन मी माझ कार्यक्षेत्र वाढवल खर पण हे वाढवत असताना इतर प्रांताना व जमातीना आपल्या बाजूच केल ( Allies ). आणि हा अन्याय कसा धडधडीत होत आहे हे दाखवायला सुरवात केली.

क्षीरसागराच्या भेटीनंतर एका महिन्याच्या आतच आगष्टमहिन्याच्या सुरवातीलाच ' महाराष्ट्र, ' ' हितवाद, ' बॉम्बे क्रॉनिकल ' व हिंदू' ह्या मध्यप्रांत, मुंबई व मद्रासच्या वर्तमानपत्रातून एका पाठीमागून एक अशी लेखांची मालिका सुरू केली. " हा अन्याय कशा करिता. ? भरतीत पक्षपात काय म्हणून ? " सैन्य भरतीतील अन्याय थांबवा ! मुसलमानांचे स्तोम का माजविता ? ,, —ह्या लेखात सैन्य, नाविक दल व एअर फोर्स ह्यात असलेल्या निरनिराळ्या जातींची संख्या, व प्रांताप्रांतातून घेतलेल्या लोकांची संख्या दिली असून पंजाब सोडून इतर प्रांतांना व मुसलमान जमात सोडून इतर जमातीना कसा अन्याय होतो हे दाखवून दिल. लेख मराठीतून व इंग्रजीतून देत होतो. प्रत्येक प्रांतातून युद्ध फंड गोळा होत असे व वॉर फ़ॅन्डस लोक घेत होते. पण ह्या प्रांतापैकी काही प्रांत तर असे होते की एखादा दुसराच रिक्रूट भरती केल्या जात असे. पैसा सर्वांनी द्यायचा पण त्याचा उपयोग मात्र फार मोठ्या प्रमाणावर एकट्या पंजाबन व त्यातही पंजाबी मुसलमानान घ्यायचा ! शिपाई तिकडचा, ठेकेदार तिकडचे व कामही तिकडचेच. सर्व प्रांतातले पैसे एकटया पंजाबमधे ओतले जात. मद्रासी व मराठा

यांच्या तोंडाला नुसते पान पुसले जात होते. सिंधी, बंगाली, यु. पी, ओरीसा वगैरे ह्यांना तर हरी हरी म्हणायची पाळी. माझे लेख, प्रसिद्ध झाल्यानंतर डॉ. झा ह्या यु. पी. तील प्रोफेसर कडून व इतर व्यक्ती-कडून ह्या लेखासंबंधी व ह्याच विषयासंबधी अवांतर माहितीची मागणी आली. अशा रीतीन इतर प्रांताच लक्ष ह्या चळवळीन आपल्याकडे वेधून घेतल, माझ्या ह्या चौफेर चळवळीचा हा परिणाम झाला की पंजाब खेरीज बाकीचे प्रांत माझे दोस्त झालेत. त्यांची मदत मिळाली. व माझ्या चळवळीन सर्वत्र पेट घेतला.

माझी ही सरबत्ती चालू असतानाच अंधारे नांवाचा एक कॉलेज-मधला मुलगा माझ्याकडे आला. तो म्हणाला " मी इमर्जेन्सी कमिशन करिता माणस निवडण्याच जे बोर्ड आहे त्या बोर्डापुढे हजर झालो होतो. मला ब्राम्हण म्हणूनच नापास केल" मी त्याला प्रश्न विचारले " तुम्ही शाळेत असताना स्काउटिंग Join केल होत का ? युनिव्हर्सिटी कोअर मधे होता का ? यु. टी. सी मधे ऑफीसर होता का" हे प्रश्न त्याला मिलीटरी पेशाची आवड आहे की नाही व तो त्या पेशास योग्य आहे की नाही ह्या बुद्धीन मी विचारले होते. मी खटपट करतो. पण ती त्याच्याकरिंता नसून ब्राम्हणाना घेत नाही' ही जी सरकारची नीति तिच्या विरूद्ध लढण्याकरिता अस सांगितल तो लढा यशस्वी होऊन तुम्हाला 'कमिशन' मिळाल तर तुम्हाला व मलाही अनंद होईल. मात्र तुम्हाला न मिळता इतर ब्राम्हणानाही मिळाल तरी ही मला आनंद होणार आहे. मी व्यक्तिकरिता भांडत नाही. सरकारच्या नीति विरूद्ध भांडतो आहे. तस करण हे मी माझ कर्तव्य समजतो". ह्या सैन्यातील कमिशनासंबंधी होत असलेल्या पक्ष-पातीपणा व अन्याया बद्दलच्या प्रश्नालाही त्याच जातीय स्वरूप न ठेवतां सार्वजनिक व सर्व प्रांतिक स्वरूप देऊन जनतेला व प्रांताना (त्यांना) आपल दोस्त बनवून सरकारशी ह्याही बाबतींत व्हायच्या लढाईच स्वरूप व क्षेत्र वाढवल

## माझी भीष्म प्रतिज्ञा मी सिद्धिस नेली

'सरकार व हिंदुस्थानची तयारी. नुसते द्रव्य बळ हवे. मनुष्यबळ का नको ? हा लेख अंधारे यांच्या भेटीनंतर लगेच 'महाराष्ट्रात' लिहिला व त्याच अर्थाचा लेख इंग्रजी वर्तमान पत्रातून-वर निर्देश केलेल्या वर्तमानपत्रातून-दिला. महाराष्ट्रातून प्रसिद्ध झालेल्या माझ्या लेखातील थोडासा भाग येथे देतो "× × × मी काही दिवसापूर्वी इमर्जन्सि कमिशन् देताना व सैन्यात मामुली शिपाई भरती करताना जात, पात, विवक्षित समाज किंवा प्रांत यानांच महत्त्व देण्यात येते व भेदभाव दाखविण्यात येतो हे दाखवून युद्धमंडळाला सुद्धा अशी सूचना दिली होती की ह्या बाबतीत त्यांनी जर योग्य ते प्रयत्न करून लोकांची ही तक्रार दूर केली नाही तर त्यांना युद्धफंड गोळा करण्याच्या बाबतीत व इतर युद्ध विषयक चळवळी करण्यात अडचणी उत्पन्न होतील." लोकात-कांग्रेसवाल्यांत बोलणं सुरु झाल "देशमुख सत्याग्रहाची चळवळ करतात की युद्धाला मदत ?"

"मध्य प्रांतातील योग्य त्या लोकांना जर सैन्यांत भरती केलं नाही व इमर्जन्सी कमिशन्सकरिता निवडण्याचं नाकारलं तर मध्य प्रांतातील वॉर कौन्सीलवर निंदाव्यंजक ठराव आणावा लागेल व 'आमचा मनुष्य नाही तर तुमचे वॉर बॉन्डन्स् व वॉर लोन्स् नाहीत ' अशी चळवळ हाती घ्यावी लागेल" अशा अर्थाचं माझं पत्र नागपूरच्या इंग्रजी वर्तमान पत्रांत 'New India न्यू इंडीयात' प्रसिद्ध झालं. मला माझ्या एका स्नेही संपादकान कळवलं 'आपले लेख प्रसिद्ध करू नयेत अशी सरकार-कडून सूचना आली आहे.' आईबुढीन कोंबडा बेंडला म्हणून दिवस उगवायचा थोडाच राहतो ! माझे लेख 'बॉम्बे क्रॉनिकल' चे मि ब्रेलवी हे परिचयाचे होते त्यांनी प्रसिद्ध करावेत व नागपुरला मद्रासच्या 'हिंदू' चा रिपोर्टर होता त्यान समारोप करुन 'हिंदू'त प्रसिद्ध करावेत.

अखेरीस मध्यप्रांत सरकारन माझ्या ह्या सरबत्तीला २२ सप्टेंबर १९३९ ला एक पत्रक काढून उत्तर दिलं. माझ्या लेखांचा त्यात उल्लेख

करुन म्हटल आहे "अलिकडे लष्करी अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र ब्राम्हणांनाही घ्यावयला सुरवात केली आहे". 'अलिकडे' हा शब्द ध्यानात घ्या. मी गड जिंकला. माझी भीष्म प्रतिज्ञा मी पुरी केली. आनंदाचा गोष्ट ही की क्षीरसागर व अंधारे ह्यांच्याही आकांक्षा पूर्ण झाल्या. प्रांताप्रातानाही होणारा अन्याय दूर होऊ लागला.

ह्याच सरकारी पत्रकात 'मराठे व माळी रिक्रूट भरती करिता का पुढे येत नाहीत' असा सवाल केला होता. त्याला उत्तर म्हणून "म्हणे मराठे व माळी कोठे आहेत ? आजवरचा पक्षपात भोवत आहे" ह्या शीर्षकाखाली १९४० च्या सप्टेंबरच्या २९ तारखेच्या अंकात एक लेख दिला "बुद्धिपुरःसर त्याच क्षात्रतेज मारण्याचे प्रयत्न झालेत. त्याना आजपर्यंत कोणत्याही तऱ्हेच उत्तेजन दिल नाही. व येथून तेथपर्यंत सर्व पक्षपाती धोरण स्वीकारल त्याचा हा परिणाम" असा जबाब दिला. ह्याच अर्थाच एक आर्टिकल 'न्यू इंडिया' ह्या नागपूरच्या इंग्रजी वर्तमान-पत्रातून प्रसिद्ध केल.

सरकारशी माझा जो अटीतटीचा सामना झाला त्यात यश मिळण्यात जसे माझे चिकाटीचे प्रयत्न कारण झालेत त्याचप्रमाणे ठिकठिकाणच्या वर्तमान पत्रकर्त्यांची व नागपूरच्या वर्तमानपत्रकर्त्यांची सहानुभुतिही. वर्तमानपत्राची तोफ ही जर मला न मिळती तर माझा दांडगा उत्साह, धैर्य चिकाटी व दारूगोळा काय काम देता ? सरकारने एका वर्तमान-पत्रावर माझे लेख छापू नयेत असा दबाव आणला ह्याचा उल्लेख मी वर केलाच आहे.

* ज्याला सरकारच्या रागलोभाची पर्वा न करता आपल्या *
| मताचा प्रचार करावयाचा आहे, सरकारवर कडक |
| टीका करावयाची आहे त्याच स्वतःच वर्तमानपत्र |
| तरी पाहिजे किंवा स्वतंत्र बाण्याच्या वर्तमानपत्राची |
| मदत तरी पाहिजे ही गोष्ट वाचकांच्या निदर्शनास |
| आली असेलच. स्वतंत्र बाण्याची वर्तमानपत्रच कोण- |
| त्याही सरकारला ताळ्यावर आणू शकतात. हे काम |

| सरकारला मिंधे असलेल्या वर्तमानपत्राकडून होण शक्य |
| नाही. सरकारच्या दबावाखालची वर्तमानपत्र सरका- |
| रचाच नगारा वाजवतील व जनतेची दिशाभूल |
* करतील. *

## लष्करी शिक्षण आवश्यक केल पाहिजे

**Military Training should be Compulsory.**

सर्व जमातीच्या व प्रांताच्या माणसांना लष्करात शिरण्याचा मार्ग मोकळा करून देण्याच्या फंदात मी जो जिद्दीन पडलो ह्याला ब्राम्हणांना व महाराष्ट्र मध्यप्रांत ह्यांना होणारा अन्याय हे एक निमित्त झाल होत. खर म्हणजे लष्करी शिक्षण आवश्यक Compulsory असाव ह्या मताचा मी व म्हणून निदान जे उत्सुक आहेत त्यांना लष्करात जाण्याचा मार्ग मोकळा करून द्यावा हा हेतु तेव्हां पासूनचा.

'लष्करी शिक्षण आवश्यक असाव' हे माझ मत मी केव्हांही बदलल नाही व ते बोलून दाखवण्याचे जेव्हां जेव्हां प्रसंग आलेत तेव्हां ते बोलून दाखवल्यावांचून राहिलो नाही १९२४।२५ साली मध्यप्रांतात स्वराजिस्टांची असेंब्ली होती त्यावेळेला डॉ. मुंजे ह्यांच्या ठरावाला अनुसरून (Physical and military Training Committee) फिजिकल अँन्ड मिलिटरी ट्रेनिंग कमिटी नेमली होती त्या वेळेला त्या कमिटीचा मी सभासद होतो. तेव्हां ही मी हे आपल मत प्रदर्शित केल व त्याच धोरणास अनुसरून युरोपियन साक्षीदारांची उलट तपासणी केली. ते शारीरिक शिक्षण आवश्यक पाहिजे म्हणायला मोठ्या मुष्किलीन कबूल झाले. पण मिलिटरी ट्रेनिंग कम्पलसरी करण्याच्या विरुद्ध. Compulsion कम्पलशनच तत्त्वच त्यांना मान्य नव्हत पण ते अखेरीस फिजीकल ट्रेनिंगच्या बाबतीत आपल मत बदलण्यास तयार झाले.

फिजीकल व मिलटरी ट्रेनिंग आवश्यक करायला पाहिजे हेच मत मी इंडीयन सॅन्ढर्स कमिटीची उर्फ स्कीन कमिटीची ' इंडियन

सॅन्डर्स ' स्थापना करण्याविषयींची प्रश्नावली माझ्याकडे आली त्या वेळेस मी माझ्या उत्तरात नमूद केल ते ' हितवाद ' पत्राच्या १९२५ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या ता. १५ च्या अंकात दिल आहे. थोडक्यात सांगायच म्हणजे मी अस म्हटल आहे की "(१) सर्व शाळा-तून व कॉलेजातून शारिरिक शिक्षण सक्तीच केल पाहिजे (२) कॉले-जातील प्रत्येक मुलाला त्याची शरीर प्रकृति योग्य असल्यास यूनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोरचा मेम्बर होण सक्तीच केल पाहिजे (३) हायस्कूलमधे मिलिटरी हिस्ट्री सारखे विषय ठेविले पाहिजेत व मिनिएचर रेंजचे रायफल क्लब्स काढले पाहिजेत. ह्यानंतर मी १९३७ साली मिलिटरी ट्रेनिंग आवश्यक कराव असा ठराव मध्यवर्ति असेंब्लीकडे पाठविला होता पण तो चर्चेस येऊ शकला नाही. लष्करी शिक्षण आवश्यक करण्याच आता पर्यंत आपल्याला जमल नाही तर आता जेवढ जमेल तेवढ कराव अशा इराद्यान मी ह्या सरकारविरूद्धच्या लढ्यात पडलो व जे सैन्यात जाऊ इच्छित होते त्यांच्या मार्गातील काटे दूर केले. मी सरकारच्या धोरणाविरूद्ध बंड पुकारल १९३८ च्या नोव्हेंबर सेशनमधे व १९३९ च्या बजेट सेशनमधे पुष्कळसे प्रश्न विचारून माहिती मिळवली. तिचा उपयोग वर्तमान पत्रातील वर सांगितलेल्या लेखांत केला.

हिंदी लोकांना व विशेषतः हिंदु लोकांना संरक्षण खात्यातील काही विशिष्ट हुद्याच्या जागा व शिक्षणाच्या सोयी करून देण्याचे प्रयत्न केलेत पण ते १९४० च्या नोव्हेंबरमधे. तो कथाभाग यथावकाश पुढे देण्यात येईल. हल्ली मी कथाभाग सांगतो आहे मी वनवासात होतो त्या वेळचा.

## पाखरात काऊ व माणसात नाऊ.

असेंब्ली बहिष्काराच्या एका वर्षात हिंदुस्थान सरकाच्या सैन्य भरतीच्या व कमिशन देण्याच्या पूर्वीच्या धोरणात कसा बदल घडवून आणला व त्यांना सर्व प्रांतातून व सर्व जातीतून सैन्यात भरती करून

वेण व कमिशन्स देण कस भाग पाडल याचा वृत्तांत वर आला आहे. ह्याच वर्षात मला शेतकऱ्याकरिता सरकारशी व दुर्दैवान आमच्याच शहरवासीयांशी तितक्याच जिद्दीन झगडाव लागल. त्याला कारण अस झाल.

१९४० च्या फेब्रुवारीत मी आपल्या गावी वाढोन्यास गेलो. एक दिवस नुकताच दिवस निघाला असेल नसेल अशा वेळेला मी फिरावयास गेलो. फिरता फिरता एका शेताजवळ गेलो. शेत लहानसच १०।१२ एकराच. शेताच्या एका बाजूला ओढा. शेताच्या बांध्यावर तुरळक तुरळक व खुरटी पळसाची व काटेरी झाड शेतात सोंगून आणलेल्या तुरीच्या पेटयांच्या थप्या व खुडून आणलेल्या जवारीच्या कणसांच्या उंच उंच राशी दिसत होत्या. मला माणसांचा आवाज ऐकू आला. मी शेतात गेलो. लहान लहान कास्तकार पाण्याच्या सोयीन व एकमेकांना प्रसंग पडल्यास मदत करण्याकरिता ह्याच शेतात तीन चार खळे व एक मांडव करून होते. जवळच कडब्याचा एक गुडही होता.

मी शेतात गेल्यानंतर थोड्या अंतरावर मला जवारीच्या तळीवर बैलाची पात धरली होती ती दिसली. एक बारा तेरा वर्षांचा पोरगा दावनीत बांधलेल्या बैलांना हाकलत होता. बैल मेढी भोवती फिरत होते. दोन तीन माणस तळी जवळ बसले होते. थोड्या अंतरावर एक मनुष्य एका तिपायीवर उभा होता. चुरन झालेल्या जवारीचा उडवून झालेला लहानसा ढीग तिपायी समोर पडला होता व तो आणखी जवारी उडवण्याकरिता वाऱ्याची वाट पहात होता.

"अरे पोट्ट्या, जोरान काहून नाही हाकलत बैल. तोंडातून लेकाच्या आवाजही नाही निघतन. रात्री कोंबड खाऊ घातल ना बे." तळी जवळ बसलेला मनुष्य बैल हाकणाऱ्या पोरास म्हणाला.

"कोंबड मुन्डकी कडच खाऊ घातल की शेपटी कडच ? मुन्डकी-कडच खाऊ घातल असऽल त बाग देईन, नाहीत काह्याचा आवाज देईन?" कोणी तरी म्हणाला.

८५५८.

पोऱ्यान थोडा आवाज चढवून रेंगाळणाऱ्या बैलांना 'बैला, ए बैला, म्यणतोना' अस म्हणून बैलांना धाक घातला व हातातल्या धांडयान बैलांना लौकर लौकर चालण्यास इशारा केला. दरम्यानच्या काळात हवेकरिता वाट पाहाणारा कास्तकार महार आहे, तळीवाला न्हावी आहे अस कळून आल.

जवारी उडवण्यासाठी हवेकरिता वाट पाहणाऱ्या कास्तकाराला मी म्हणालो "किती वेळ वाट पहाणार तू ? समज दिवसभर हवा नाही आली मग राहयल तूझ काम. अन हवा आता येईल मग येईल अस करता करता अडकून पडलास धान्य उडवण्याच एक यंत्र आहे. ते जवळ असल तर वाऱ्याची वाट पाहावी लागत नाही व मनुष्य इतर कामास मोकळा होतो" तो:— ते खर. पण यंत्रासाठी पैसा आनता कोठून ? यंत्र-गिंत्र पैसे वाल्याचे काम व्हयेत. आमच्या सारख्या गरीबाचे नव्हयेत. कास्तकाराला जगनच त कठीन झालऽ असे साल एका मागून एक पडले. त्यातच ह्या लढाईचा मारामायचा फेरा. अनाज उतन्न कराव पन खायाले दाना नाही, कापूस उतन्न करावा पर आंग झाकाले कपडा नाही, पान्या पावसात काम करता करता बिमार पडलो त दवाईला पैसा नाही असा आमच्या गरीबावर वखत आला आहे. जवारीचे अन् कापसाचे भाव सपशेल निजलेत. पर सरकारच अन सावकाराच देन त चुकत नाही. अशा कैचीत सापडलो अहो. मेहनत कराव अन् नशिबाची परिक्षा पहाव असे दिवस आहेत. आता पावतर त नशिबान साथ देली नाही" जवारीच्या चुरन्याजवळ न्हावी कास्तकार बसला होता तो म्हणाला "महाराज, समजा यंत्र आनल अन दो दिवसात आमच काम उरकल, मग त्या यंत्राच काय कराव ? पडल राहील हवा खात. काही बैल नव्हेत की या नाही त्या कामाला येतील ? अन बिघडल त मग गळ्यात घोरपडच पडली. त्या यंत्राले दुरूस्त तरी कोन कराव ? चालल आहे तेच बर आहे. बर समजा यंत्र नाही बिघडल अन काम भी एका दिवसात झाल तरी बी फालतु वखत राहील त्याच कराव तरी काय ?"
म:—"का बर, त्यावेळात एखादा धंदा. निव्वळ शेतीवर राहण्याचे दिवस

गेले. तुम्हीच म्हणताना की भाव निजले, शेतोही बराबर पिकत नाही म्हणून." महार कास्तकारः - "ह्याचाच त शिवाय धंदा ह्यान बंद केला" म्हाल्याकडे बोट करून "पहयले लोकाच्या इजामती करत होता. आता फकत शेती." म्हालीः–"मामुली कास्तकाराला बाराही महिने कास्तकारीच काम पुरते. बर असलीही फुरसत तरी धंद्यात 'राम' राहिला नाही. माझ्या धंद्याची तर राहूच द्या पन इतर धंद्याची तरी काय घडगत आहे ? जवारी उडवून राहयला ह्या महाराची, तसच गावच्या तेल्याची, चांभाराची समद्याची तेच गत.

| यंत्राच्या माला सामने आम्ही काय दम धरू शकतो ? |
| खेड्यातला मालाला कोऽनी विचारत नाही. |
| अन् नाही विचारत खेड्यातल्या मानसाला बो. |
| फकत इलेकशन पिलेकशनच्या वक्ती येतेत |

धूम करतेत, लाळ घोटतेत, अन ते आटपल का बेपत्ता, कोठच्या कोठ-आमच्या काबूच्या बाहेर. त्याहीले दर साल जर आमच्याकडे येन भाग पडत की नाही त मंग घेतला असता समाचार." मीः–"कांग्रेस-वाल्या उमेदवारा संबंधान सुद्धा हेच म्हणण आहे तुमच ?" तोः–"आजी कांग्रेसवाले भी. अन त्यातबी किती तरी 'रामनाम जपना पराया माल अपना' समजने वाले. गांधीजी की जय म्हनतेत पर आपल्या खाटकाच्या करनीस चुकत नाहीत. घटकाभर राहू द्या मी म्हनतो ते. पर तुम्हीच सांगा आता ते काय करतेत आमच्या साठी. आम्हाले दीनाचा कैवारी त कोनोच दिसत नाही." मी बाकीच्यांना विचारल "तुम्हालाही असच वाटत का ? " सर्वांनी माना डोलवल्या. महार म्हणाला "शहानपनाच्या बाबतीत पाखरात काऊ व मानसात नाऊ." आमच्यात तोच शहाना अन् आमचा तोच म्होरक्या." व आपल्या सोबत्यास म्हणाला 'अरे त्या लक्ष्या आल्या म्होर व्हय. मी भी येतोच तुह्या मांग मांग. त्याहीले तुरीच्या पेंडया वाटून दे." बायानी त्या पेंडया झोडपायला सुरवात केली. मी घरी वापस जाण्यास निघालो. चालता चालता मनात विचार आले, प्रांतिय असेंब्लीतील सभासद ह्यांना भेटत नाहीत ते दर वर्षी

भेटायला पाहिजेत म्हणून त्यांना दर वर्षी निवडणुक पाहिजे! उमेदवारान आपल्या कामाचा फाडा ह्यांच्या समोर दर साल वाचन हे जरूर. ते होण हे ही जरूर. पण त्यासाठी दर साल निवडणुकी सरकारच्या राज्ययंत्राचा खोळंबा. सर्वांनांच खर्चाची आच—सरकार व उमेदवार दोघांनाही.

| आणि वेळ किती खर्च होणार. मात्र प्रत्येक उमेदवारान |
| दरवर्षी आपल्या मतदार संघापुढे जाऊन आपण |
| त्यांच्याकरिता काय केल ही सांगण्याची जबाबदारी |
| त्याच्यावर कायदेशीररीत्या टाकलीच पाहिजे, तरच |
| ह्या खेडुतांचा निभाव लागणार. |

ह्या कास्तकारांच्या भेटीन व संभाषणान मला एक काम मिळाल. 'मालाचे भाव निजलेत' म्हणून त्यांनी म्हटल. सालही एका पाठीमागून एक असे पडले की जगन मुष्कील झाल असही ते म्हणाले. एकंदरीत त्यांच्या ह्या दीन स्थितीला कारणं निसर्ग, सरकार व सावकार. निसर्गाच्या विरूद्ध आपण काय करू शकतो? काहीच नाही. अगदी लाचार. पण सरकारच्या व सावकाराच्या बाबतीत, ते ही सरकार मार्फतच काही तरी केल पाहिजे असा विचार करून सरकार विरूद्ध मोहीम करण्याच ठरवल व उद्योगास लागलो.

## शेतकऱ्यांच्या हितावर निखारे ठेवणाऱ्यांचा समाचार घेतला

१९४० च्या नोव्हेंबरमध्ये म्हणजे शेतातील अन्नधान्य व कापूस बाजारात येण्याच्या सुमारास धान्याच्या व इतर खाद्य वस्तूंच्या किंमती वाढू लागल्या होत्या. शेतकऱ्याकडे-त्यांच्याच भाषेत बोलायच तर-देवान डोळे उघडून पाहायला सुरवात केली होती. झोपी गेलेल्या देवाला त्यांच्या प्रार्थनांनी एकदाच जाग केल होत. त्यांच्या गरीबीची हरीपी जरी

झाली नव्हती तरी परिस्थिती हळू हळू सुधारण्याच्या मार्गास लागली होती. पण दैवाशी झगडणाऱ्या शेतकऱ्यांच्या हितात विघ्न उत्पन्न करणारे देशात होतेच की. त्यांनी उपद्रव मांडला. त्यांनी शेतात उत्पन्न होणाऱ्या मालाच्या किंमतीवर सरकारने आळा घालण्यासंबंधी पत्रव्यवहार वर्तमानपत्राकडे सुरू केला. सरकारशी भांडण्यापूर्वी असल्या व्यक्तिचाच समाचार मला प्रथम घ्यावा लागला.

ओरड करणाऱ्यात पहिले प्रथम एक अँग्लोइंडियन बाई होती असे वाटत. तिला साथ आणखीही इतरांनी दिली. त्यांना मी उत्तरं ही दिलीत. त्यांच्या चळवळीचा मला भीति वाटली नाही. वाटली श्री.



रूईकर लेबर लीडर ह्यांनी नागपूरच्या '**हितवाद**' मधे प्रसिद्ध केलेल्या पत्राची. हे पत्र डिसेंबरच्या ता. २ च्याअंकात प्रसिद्ध झाल "ट्रेड युनियन्सच्या मार्फत वस्तूंच्या किंमती आटोक्यात आणाव्या. त्यावर निर्बंध घालावेत–तशा तऱ्हेचे सुसंघटित प्रयत्न व्हावेत" अशा आशयाच ते पत्र. शेतकऱ्यांच्या बाजून लढायच ठरवल त्या वेळेला मला वाटल होत मला सरकारशीच मुकाबला करावा लागेल. सर्वशक्तिमान सरकारशीच मला तोंड द्याव लागेल अस वाटल होत. पण प्रथम मला भांडाव लागल शेतकऱ्यांविरूद्ध सरकारची मदत मागणाऱ्या आमच्याच व्यक्तीशी. अन् आता गांठ पडली Trade Union ट्रेड युनियनशी. सरकार संघटीत संस्था. तशीच Trade Union ट्रेड युनियनहि. जरी सरकार

मा. पं. ५५६ ... ५२

इतकी शक्तिमान नाही तरी तिचही सामर्थ्य उपेक्षा करण्यासारखे नव्हते. श्री. रूईकरांच्या पत्राला मी 'हितवाद' मधूनच उत्तर दिले त्याचा सारांश असा "तयार केलेल्या मालांच्या ( Manufactured Goods ) किंमतीवर निर्बंध घालून कॅपिटलिस्ट लोकांचा ( पुंजीपतिंचा ) मुनाफा कमी केला तर मी त्यांची श्री. रूईकरांची तारीफच करीन. खदानीच्या मालकांचा मुनाफा कमी करणे हे ही योग्यच होईल. मध्यम वर्गाच्या व कामकरी लोकांच्या अडचणी अशा रीतीने कमी केल्यास ते इष्टच होईल. परंतु कापूस, तीळ वगैरे तेल, धान्य व जवारी तूर वगैरे अन्न-धान्याचे भाव कमी करण्याचा खटाटोप करणे ( Unwise Step ) असमंजसपणाच होणार आहे. दहा बारा वर्षांपासून नापिकीमुळे शेतकरी लोकांची स्थिती फार वाईट झाली आहे; व आता त्यांना त्यांची आर्थिक परिस्थिती सुधरण्याची संधि मिळाली तेव्हां किंमतीवर निर्बंध घालू पहाता ! त्यांची परिस्थिती दिवसें दिवस बिकट झाली आहे. त्याना तशा परिस्थितीत सरकारने कोणत्याही रीतीने मदत केली नाही' शेवटी ( Price Control Enthusiasts ना ) किंमतीवर निर्बंध घाला म्हणणाऱ्या उत्साही गृहस्थांना विनंती केली आहे की 'बाबांनो हात आटोपा. किंमती वर जात आहेत त्यांना अडथळा करू नका. ( Manufactured Goods) कारखान्यात तयार झालेल्या मालावर नियंत्रण कराल तर माझी त्याला हरकत नाही. ते इष्टच आहे' कॅपिटलिस्ट लोकांना किंमती कमी करा, मुनाफा थोडा घेणेच इष्ट होईल अशी सूचनाही केली" ह्यानंतर मी ह्या प्रांतातील शेतकऱ्यांच्या काही

* परिषदांचा अध्यक्ष झालो व ट्रेड युनियन्सशी त्याच *
| प्रमाणे सरकारशी भांडण्यास सुसंघटित Agricultural |
| Unions (एग्रिकलचर युनियन्स्) शेतकऱ्यांच्या |
* संस्था स्थापण्याची सल्ला दिली. *

मी ज्या शेतकऱ्यासंबंधी भांडण्यास मनावर घेतले ते शेतकरी खरीपाची पिके पिकवणारे वजे सर्वस्वी वरच्या पाण्यावर म्हणजे पावसा-

वर अवलंबून असतात ते—नागपूर व वर्धा जिल्ह्यातील व वऱ्हाडातील शेतकरी. त्यांचा मला प्रत्यक्ष अनुभव आला होता. Irrigation वर म्हणजे कालव्याच्या पाण्यावर—वलोतावर—तांदूळ वगैरे पिकविणारे शेतकरी सुस्थितीत असतीलही. मी नाही म्हणत नाही.

## शेतकऱ्यांच्या व शहरवासीयांच्या परस्परांच्या हितात विरोध

शेतकऱ्यांच्या मालाच्या किंमती कमी होऊ नयेत म्हणून मी माझी चळवळ असेंब्लीत फिरून गेल्यावर नेटान सुरूच ठेविली व त्यात यश मिळवल. अर्थात् शहरवासीयांना ही आवडण्यासारखी नव्हती. खेड्यातील शेतकऱ्यांच्या व शहरातील पांढरपेशा व इतर शहरवासीयांच्या म्हणजे कामकरी मजूर वगैरेच्या हितसंबंधात केव्हां केव्हां कसा तीव्र विरोध असतो हे दिसून आल असेलच. मजूर जे शहरात मिल्स वगैरे मधून काम करतात त्यांच्या पुढाऱ्यांनाही ही माझी चळवळ पसंत नव्हती. श्री. एन. एम. जोशी लेबर लीडर—मुंबईचे, व डाक्टर सर झीयाउद्दीन—आग्रा युनिव्हर्सिटीचे व्हाईस च्यान्सेलर—दोघही असेंब्लीचे सभासद. यांच्यासारखे शहरवासी असेंब्लीतील सभासद शेतकऱ्याच्या हितासंबंधी—किंमतीला आळा बसू नये ह्यासंबंधी–चालविलेल्या माझ्या प्रयत्नाविरूद्ध होते. त्यांना शेतकऱ्यांच्या मालाच्या भाव नियंत्रणा-विरूद्ध चालविलेली माझी चळवळ पसंत नव्हती. पण मी तीत यश मिळवल. ते कस ? हे पुढे दिसून येईल. तूर्त सरकारविरूद्ध चाल-विलेल्या लढ्याखेरीज ज्या एका संघटित संस्थेशी–कांग्रेसशी लढा दिला तिचा बयान करण्याची इच्छा आहे.

## उडाणटप्पूपणा पेक्षा कार्यकरून दोष पत्करणे बरे

लोक हिताची चर्चा निव्वळ वर्तमानपत्रातून करण्यापेक्षा मध्यवर्ति असेंब्लीत हजर राहून सरकारशी दोन हात करून लोकांच्या पदरात काय पाडून घेता येईल ते घ्याव असा इरादा केला. असेंब्लीत जाण हेच श्रेयस्कर होणार आहे हे माझ मत मी १९४० च्या आक्टोबर महिन्याच्या

ता. २७ च्या महाराष्ट्रात "असेंब्ली बहिष्कार आता तरी उठवा" ह्या शीर्षकाखाली स्पष्टपणे व विस्तृत रीतीने मांडले. अगदी मोक्याचे वेळीच, ज्या वेळेला शेतकऱ्यांची स्थिती सुधारता आली असती, निर्गत व्यापार वाढवता जरी नाही तरी कायम ठेवता आला असता, डीफेन्स ऑफ इंडीया ॲक्टच्या नियमाखाली लोकांवर अन्याय होत आहेत, ॲक्टचा दुरूपयोग होत आहे. अशा वेळी—कांग्रेस पक्ष गैर हजर! ह्या बाबी अशा की कांग्रेसपक्षाचे, इंडीपेंडंट कांग्रेस पक्षाचे व मुस्लीम-लीगचे एकमेकांना साह्य झाले असते व बहुमताच्या जोरावर सरकारवर मात करता आली असती—बहुमत झालेच असते; कारण विषयच असे होते की त्यात हिंदुमुसलमान हा जातीय प्रश्नच उत्पन्न होत नव्हता. कांग्रेसच्या असेंब्ली बहिष्काराचा परिणाम तिने सरकारशी अप्रत्यक्षपणे सहकार्य करण्यात झाला, अडथळा करण्यात नाही असे दाखवून शेवटी म्हटले "एडमंड बर्क हा ब्रिटीश मुत्सद्दी म्हणतो 'केवळ अंगाला दोष चिकटू नये म्हणून निरर्थक कालक्षेप करण्यापेक्षा कोणत्याही धोक्याची फिकीर न करता योग्य मार्गाने उत्साहभराने जाणे हेच आपले कर्तव्य आहे' कारण त्यानेच एका ठिकाणी म्हटल्याप्रमाणे 'जो पहारेकरी पहाऱ्यावर खुशाल झोपी जातो किंवा जो शत्रुला जाऊन मिळतो, तो कर्तव्यच्युतच समजला पाहिजे.' ह्याच रोखाचा माझा एक आर्टिकल नागपूरच्या 'न्यू इंडीया' व 'हितवाद' मधेही त्याच सुमारास प्रसिद्ध झाला.

## कांग्रेस मध्यवर्ति असेंब्लीत हजर

असेंब्ली बहिष्कार उठवण्यासंबंधी मी वर्तमानपत्रातून आक्टोबरमधे चळवळ केली तिचा परिणाम म्हणून म्हणा किंवा 'कावळा बसण्याशी व फांदी मोडण्याशी एकच गांठ झाली असे म्हणा' काहीही म्हणा, कांग्रेस सभासद नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यातच मध्यवर्ति असेंब्लीच्या बैठकीस हजर राहिले. इथाच असेंब्ली सेशनमधे अगदी सुरवातीलाच सरकारला एका कामतहकुबीच्या सूचनेच्या रूपाने मी 'छुटते सलामी'

दिली. तहकुबीची सूचना अशीः- " हिंदुस्थान सरकारने हुकुमशाही राष्ट्रांशी लढण्यास हिंदुस्थानात युद्धप्रयत्नाविषयी संपूर्ण व हार्दिक उत्साह निर्माण करण्यास योग्य प्रयत्न केले नाहीत. " ही सूचना नियमग्राह्य नव्हती पण तिला संरक्षण खात्याच्या सेक्रेटरीने हरकत घेतल्यामुळे असेंब्लीतील निदान २५ सभासदांची तरी हा ठराव चर्चीला जाण्यास संमति पाहिजे होती ती न मिळाल्यामुळे सूचना चर्चेला येऊ शकली नाही. ह्यावेळेस मी कोणत्याही पार्टीचा सभासद नव्हतो. पण गम्मत अशी की जे विषय ह्या कामतहकुबीच्या चर्चेत निघाले असते ते सर्व त्याच दिवशी **फाईनान्स मेम्बर सर रायसमन** ह्यांनी जे **फाईनान्स बिल नं २** असेंब्ली समोर सादर केले त्या वरील चर्चेत लोकपक्षातर्फे मांडले गेले. हिंदुस्थानातील त्या वेळची परिस्थिती ' अंधेर नगरी, बेभूत राजा । टका शेर भाजी टकाशेर खाजा ' ह्या म्हणीतल्या प्रमाणे झाली होती. बिलावरील चर्चेत कांग्रेसच्या सभासदांनी व इतरांनीही **डिफेन्स ऑफ इंडियाच्या** नियमाखाली कसे चमत्कारिक अन्याय मूलक खटले भरले जातात ह्याचा पाढा वाचला, **पंडित जवाहरलाल नेहरू** ह्यांना भाषण करण्याबद्दल ४ वर्षांची सक्तमंजूरीची शिक्षा देण्यात आली तिचा प्रामुख्याने उल्लेख केला गेला, लढाईच्या फंडाकरिता पैसा कसा फसवणुकीने किंवा जबरदस्तीने वा मोह पाडून गोळा करण्यात येतो हे सांगितल्या गेले. राष्ट्रीय सरकारच्या व कॉन्स्टिटयुएंट (Constituent) असेंब्लीचा कांग्रेसवाल्यांनी उल्लेख केला. स्वातंत्र्याची मागणी बहुतेकांनी केली व निदानच कानडाप्रमाणे डोमिनियनस्टेट्सच सरकार द्या हे ही काही जणानी म्हटले. ह्या मुद्याशिवाय **श्री. एन्. एम्. जोशी** ह्यांनी मजुरासंबंधी व मी शेतकऱ्यांच्या हितासंबंधी, सैन्य भरतीतील अन्यायासंबंधी व साऊथ आफ्रिका व इस्ट आफ्रिका इथे हिंदी लोकांविरूद्ध चाललेल्या चळवळी व कायद्यासंबंधी बोललो. देशात देशाबाहेर असे प्रकार चालले असताना युद्धाला हार्दिक मदत कशी मिळू शकेल असा सभासदांच्या बोलण्याचा रोख होता. मुस्लीम लीगने सरकारवर त्याचप्रमाणे कांग्रेसवर ताशेरे झाडले.

पाकिस्तानच्या मागणीचा उच्चार केला. लढाईच्या कामात मदत जरी नाही तरी अडथळा करायचा नाही असा लीगचा ठराव म्हणून सांगितल. ह्या फायनान्स बिलावरील मतदानाच्या वेळेस मुस्लीम लोग तटस्थ राहिली. तिन मतदानात भाग घेतला नाही. फाईनान्स बिल फेटाळल्या गेल. कांग्रेस व मुस्लीम लीग व इंडीपेंडंट कांग्रेसपक्ष ह्यांनी राष्ट्र सरकारच्या माग नाही हे जगास दाखऊन दिल.

लढाईच्या कामात मदत जरी नाहीं तरी अडयळा करायचा नाही ह्या लीगचा ठराव मुत्सद्देगिरीचा होता हे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आले असेलच. सरकारशी असहकार करायचा नाही, सरकारच्या राज्ययंत्राला अडथळा करायचा नाही, कडक टीका तेवढी करायचं', अस करता करता जे पदरात पडेल ते पचवायच पण तेवढयान आम्ही संतुष्ट राहणारे नाही हे स्पष्ट शब्दात सांगायच, अधिकात अधिक मागणी करायचं', अधिकात अधिक मागणी करायची, सरकारशी सहकार वा तटस्थपणा हा तारतम्य बुद्धिन ठरवायचा, कायदेभंगाची चळवळ हाती घ्यायची नाही, अस मुस्लीम लीगच धोरण मि. जिनांनी ठरवून टाकल होत आणि म्हणूनच त्यांच्या मुस्लीम लीग पार्टीत सरकारी पद्वीधरांनाही स्थान होत.

## डिफेन्स ऑफ इंडिया अॅक्टखाली बायकोचा ताबा

फायनान्स बिल नं. २ वर झालेल्या चर्चेत अनेक सभासदांनी सरकारन देशात कसा अंधार माजवला आहे, देशात कशी बेबंदशाही माजली आहे, सरकार आपल्या नोकरांमार्फत पैसा कशा कशा क्लृप्तिन मिळवते ह्यासंबंधी व डिफेन्स आफ इंडोया अॅक्टच्या नियमाखाली कसे अनन्वित व अन्यायी प्रकार घडवून आणते ह्यासंबंधी पुष्कळ उदाहरणे दिली. त्यापैकी एका उदाहरणासंबंधी लिहिण्याचा मोह आवरणे कठिण आहे. हे उदाहरण सरदार संतसिंग वकील–असेंब्लीचे सभासद ह्यांनी सांगितल. उदाहरण अगदी सुलतानी नमुन्याच–

विक्षिप्तपणची कमाल ज्यात आहे असे हासवायलाही लावील व चीडही उत्पन्न करील असे.

एक दिवस एक हिंदी शिपाई आपल्या वरिष्ठ युरोपियन ऑफीसरकडे गेला व गावी जाण्यास त्याला रजा मागू लागला. साहेब म्हणाला: "ये लढाईके दिन हैं. रजा नहीं मिल सकती. रजा किस लिये चाहिये?" तोः- "मेरे गांवसे चिठ्ठी आई है. मेरे वालीद ने लिखा है की मेरे औरतका बाप कई चिठ्ठी लिखने पर मेरी औरत को भेजता नहीं. औरतको गांवको लानेके लिये छुट्टी चाहिये." साहेबः- उसके लिये छुटी की कोई जरूरत नहीं. हम बन्दोबस्त करेगा." असे म्हणून त्याने शिपायाला त्याचे गाव कोणत्या जिल्ह्यात आहे म्हणून विचारले व तिथल्या डेप्युटी कमिश्नरला लिहून पाठवले "ह्या शिपायाची बायको याच्या बापाकडे पाठवा." डेप्युटि कमिश्नरने डिफेन्स ऑफ इंडीया ॲक्ट खाली वॉरंट देऊन एका पोलीस कॉन्स्टेबलला शिपायाच्या सासऱ्याकडे पाठवले. पाठवतांना सांगितले 'शिपायाच्या बायकोला तिच्या सासऱ्याकडे पाठवले तर ठीकच नाहीतर त्या मनुष्याला माझ्या-कडे हातकड्या टाकून आण." कॉन्स्टेबल शिपायाच्या सासरी गेला. सासऱ्याला त्याने सर्व हाल कळविला. सासऱ्याने मुलीला शिपायाच्या बापाकडे पाठवून दिले. डेप्युटी कमिश्नरने हे वर्तमान शिपायाच्या युरोपियन ऑफिसरला कळवले-बायकोचा कबजा इतक्या लवकर, तडका-फडकीने कोणत्या दिवाणी कायद्याने मिळाला असता ? व कोणत्या कोर्टात मिळाला असता ? शिपायाची बायको शिपायाच्या घरी न पाठवण्यात War effort मधे (युद्ध प्रयत्नात) असे कोणते अडथळे बायकोच्या बापाने उत्पन्न केले होते की डिफेन्स ऑफ इंडोया ॲक्ट खाली डेप्युटी कमिश्नरला वॉरंट काढता येत होता ? पण असे नाना सुलतानी प्रकार त्या युद्ध कालात चालत होते. कायद्याला आढ्यावर बसवून सत्ता नंगा नाच करीत होती.

## संघटित, दणकट व जागरूक लोकमत पाहिजे

लोकमत जागरूक नसेल, सरकारचा रागरंग पाहून वागणारे सरकारने 'बैल गाभणा' म्हणताच होकारार्थी मान हालवून तेरवा महिना म्हणणारे जिथे कार्यकर्ते असतील, लोकहिताकरिता सरकारशी डोळा भिडवून दोन हात करणाऱ्या पुढाऱ्यांचा जिथे अभाव, किंवा पुढारी म्हटले गेलेले जिथे या ना त्या कारणास्तव झोपी गेले असतील तिथे सुलतानी अम्मल असला तर नवल काय ! जिथे संघटित दणकट व जागरूक लोकमत असेल तिथेच अनियंत्रित, अन्यायी, अप्रामाणिक, पक्षपाती, लाचखाऊ व वशिलेबाजीचा सुळसुळाट झालेल्या सरकारी सत्तेला व स्वार्थी पुढाऱ्यालाही पायबंद घालता येतो. खऱ्या लोकशाहीचा आनंद लुटायचा असेल तर अशाच लोक मताची गरज आहे. म्हटल आहे, 'Eternal vigilance is the price of liberty' सतत जागरूकता ही स्वातंत्र्याची किम्मत आहे. श्री **समर्थांनी राजकारणाचा प्रपंच करणाऱ्यांना 'अखंड सावधानता' असा उपदेश केला आहे.** ती किंमत जर जनता देणार नसेल तर मग स्वातंत्र्य कोठल ? लोकशाहीतूनही, लोकमत संघटित, दणकट व जागरूक नसेल तर हुकूमशाही उत्पन्न होते. आणि मग अशा हुकूमशाही बद्दल ओरडण्यांत काय अर्थ ! तिच्याबद्दल जनताच जबाबदार आहे. तिने आळस केला, ती झोपी गेली म्हणूनच तिने निवडून दिलेल्या लोकशाही सरकारचा राज्यकारभार त्या वळणावर गेला. कोणत्याहि कामांत आळस उपयोगी नाही. म्हणूनच म्हटल आहे. Awake, arise or be for ever fallen. जागे व्हा, उठा (कामाला लागा) नाहीतर नेहमी करिताच खिचपत पडले रहा.

रत्नमंजुषा ३ री

# फिरून आघाडीवर

प्रश्नांची फैर–सरकार मुसलमानाना किती लाडावणार ? ये बाबू लोक क्या लढेंगे ?–सत्य बोलण्याला मर्यादा पाहिजे का ?–क्रांतिकारक 'हिंदु म्यारिएज डीसएबिलिटीज रिमूव्हल' बिल-वर्णाश्रम स्वराज्य संघाचा माझा सामना-आम्ही धर्म सोडू–पिछेसे चलते आई-माझं बिल सिलेक्ट कमिटीकडे—गोपाळन बिल पास करून घेतल–मनुस्मृतित गोपालस्मृतिन झालेले फरक–आन्तर प्रांतियात लग्न होणं इष्ट आहे का ?– 'महाराष्ट्रीयानो आपल्या मुली सांभाळा गरिबीन होरपळलेल्या कुटुंबाला संभाळणाऱ्या मुली धन्य. है ! महाराज धन्य है !!–कापूस शेतकऱ्याची दाद घ्या–वस्तूंच्या नियंत्रणाला प्रांतिक सरकारच जबाबदार–शेतकऱ्यांचा विश्वासघात करणाऱ्या प्रतिनिधींचा समाचार असा घ्या– कापसाच्या किंमतीच्या बाबतीत सरकारचा पिच्छा पुरवला-जशास तसे-युनायटेड नेशन्सच डिक्लेरेशन पाहिजे–च्यांग काय शेक कडून अपेक्षा बुढ्या पेचान मात केली !–

---

मी असेंबली बहिष्कार काही काळ पाळला. नंतर हा बहिष्कार पाळण इष्ट नाही, देशाच व समाजाच तो सुरू ठेवण्यांत नुकसान आहे अस मनान घेतल्यानंतर फिरून असेंबलीच्या युद्धाच्या आघाडीवर हजर झालों व सरकारच्या नीति (Policies) विरुद्ध लढा सुरू केला.

## प्रश्नांची फैर

सन १९४० च्या नोव्हेंबर सेशनमधे 'हिंदी लष्कर,' आरमार' व विमानदल' ह्या संबंधी प्रश्न विचारलेत. त्या पैकी बहुतेक 'हितवादच्या' १९४० च्या दिसेंबरच्या १५ तारखेच्या अंकात "मिलिटरी ट्रेनिंग इन

कॅालेजेस' गव्हर्नमेंट नॉट प्रिपेअरड टु ऑल्टर" ह्या शीर्षकाखाली दिले आहेत. त्या प्रश्नात 'रायफल क्लब्स' बद्दल, 'यु. टी. सी. चे रूपांतर ब्रिटीश युनिव्हर्सिटीज मधील 'ओ. टी. सी' सारखे करण्या बद्दल, 'क्याडेट कम्पनी' संबंधी, इमर्जन्सी कमीशन' संबंधी, 'फील्ड आर्टीलरी-तोफ खान्यांत भरती' संबंधी व 'नाविकदल' ह्या संबंधी माहिती आहे. मुम्बई, व मध्यप्रांत व वऱ्हाड यातून नाविक दलात भरती झालेल्यांची संख्या किती हे ही आहे. सर्व प्रांतात नाविकदल मधे पंजाबमधून जास्त भरती ! आहे की नाही आश्चर्यकारक गोष्ट ! ज्या प्रांताला समुद्र किनारा नाही, ज्या प्रांताला दर्यावर्दीपणाची परंपरा नाही, ज्या प्रांतातील लोकांनी समुद्रसुद्धा पाहिला नसेल तिथून नाविकदलात भरती; समुद्राला लागून असलेल्या आंग्र्यांच्या आरमाराची इज्जत राखणारा, दर्यावर्दीपणाची परंपरा सुरू ठेवणारा मुम्बई प्रांत राहिला बोंबलत !

## सरकार मुसलमानांना किती लाडावणार

सरकारची ही पक्षपातीपणाची मनोवृत्ति लोकांच्या स्पष्टपणे नजरेस आणून देण्याकरिता 'महाराष्ट्रातून ता. २९ दिसेंबरच्या अंकात "रंगरूट भरतीत हिंदुना अन्याय ! सरकार मुसलमानांना किती लाडावणार" हा माझा लेख प्रसिद्ध केला. १९३९ च्या सप्तेंबरच्या १८ तारखे पासून १९४० च्या सप्तेंबरच्या ३० तारखे पावेतो— म्हणजे माझ्या तात्पुरत्या बहिष्काराच्या कालात-मुम्बई, मध्यप्रांत व वऱ्हाड ह्या प्रांतांतून रिक्रूट झालेल्यांची संख्या, त्याच प्रमाणे ह्या प्रांतातून भरती झालेल्यांचे, त्या प्रांतातील लोकसंख्येशी प्रमाण व हिंदु व मुसलमान भरती झालेल्यांचे प्रमाण हे आकडे देऊन सरकार अझूनही मुसलमानांना व पंजाब प्रांताला कसे लाडावते हे स्पष्ट केले आहे. हिंदूना त्यांचे न्याय्य गौरव पद प्राप्त करून देण्याकरिता, मुम्बई, मध्यप्रांत व वऱ्हाड इत्यादि प्रांताच्या सर-

कारांनी डोळे उघडून तातडीने प्रयत्न केले पाहिजेत अशी आग्रहाची सूचना केली आहे.

## ये बाबू लोक क्या लढेंगे ?

असेंब्लीत ह्या सेशनमधे गेल्यानंतर काही दिवसांनी मी ' इंडीपेंडंट कांग्रेस पार्टी ' चा सभासद झालो. माझ्या पक्षा तर्फे असेंब्लीत माझी ' **डिफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटी** ' वर निवडणुक झाली. ह्या कमिटीन पहिली भेट ' अंबाल्याला ' दिली. मिलिटरी ऑफिसरन ' चहाच्या ' प्रसंगाच्या निमित्तान कांही मिलिटरी युरोपियन ऑफीसर्स व काही पेनशन घेतलेल्या कमिशन्ड ऑफीसर्स ह्यांच्या भेटीचा योग जुळवून आणला. एक पंजाबी मुसलमान, व्हॉईसरॉय कमिशन्ड ऑफीसर, माझ्याजवळ आला व लढाईच्या संबंधी थोड्या औपचारिक गोष्टी केल्यानंतर मला म्हणाला:- आप कहांसे आते हो ? " मी म्हणालो " नागपूर मध्यप्रांत " तो:— " आप मरठ्ठे लढ सकते है, सीख लढ सकते है. हम पंजाबी मुसलमान लढ सकते है. लेकीन ये बाबू लोक क्या लढेंगे ! "

शिकलेल्या माणसांना हिणवणारे शब्द आहेत हे नाही का ? पण त्यान अस का म्हणाव ? बाबू म्हणजे अशक्त, साधारण शिकलेला, टेबल खुर्चीवाला, बेहिमती मनुष्य असा ह्या लोकांचा ग्रह होण्याला तरी आम्हीच कारण ना ! प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शारीरीक व सैनिकी शिक्षणावर शिक्षणाधिकाऱ्यांनी व सरकारने जास्त जोर का देऊ नये ? हे शिक्षण सक्तीच का करू नये ? उठल्या बसल्या तरूण पिढीवर राष्ट्राची भिस्त आहे अस प्रत्येकान म्हणाव—म्हणत सुटाव-तरूण पिढीला तोंड चोपड्या गोष्टी सागांव्या, हरभऱ्याच्या झाडावर चढवाव पण तरुण पिढीच्या आंगी आवश्यक लागणारे गुण उत्पन्न करण्याकडे मात्र दुर्लक्ष ( Criminal Negligence ) ! येऊन जाऊन काय तर बेकारी उत्पन्न करणारे शिक्षण ! असा हा प्रकार चालला आहे. ज्या भावी मोहक राष्ट्राची कल्पना आम्ही आपल्या समोर ठेवतो ते आम्ही ह्या अशक्त, निरूत्साही बेहिमती व बेकार तरुण पिढीच्या भरवशावर उभ

करणार !' वारे आम्ही ! तारीफ करावी तितकी थोडीच ! आता पर्यन्त जी चळवळ केली तिचा इष्ट परिणाम संरक्षणाच्या निरनिराळ्या खात्यांत रिक्रूट भर्ती करण्यात व इमर्जन्सी कमिशनचे लोक निवडण्यात झाला. पण ह्यांची संख्या वाढणे म्हणजे संरक्षण खात्याची माहिती होणे किंवा राष्ट्राचे उद्दिष्ट सिद्धीस नेणे नव्हे. त्या करिता इतरही फार महत्वाच्या गोष्टींची आवश्यकता होती. त्याहि घडवुन आणल्या. त्याचा इतिहास क्रमाक्रमाने यथावकाश येईलच. तूर्त सामाजिक विषयाकडे वळू.

## सत्य बोलण्याला मर्यादा पाहिजे का ?

'सत्यमूलानि सर्वाणि सत्यान्नास्ति परं पदम्" असं सुभाषित आहे. मग सर्व प्रसंगी खर बोलायला पाहिजे का ? ज्यात स्वार्थ नाही, परमार्थ आहे, समाजाच हित आहे, देशाच हित आहे अशा प्रसंगीहि खोट बोलू नये का ? नेहमी सत्य बोलण्याचा नियम त्रिकालाबाधित आहे का ? पळून जाणाऱ्या गाईच्या माग लागलेल्या हातात सुरा असलेल्या खाटकाच उदाहरण प्रसिद्धच आहे. ज्यान गाय पळून जाताना पाहिली त्यान ता कोणीकडे पळाली अस त्याला खाटकान विचारल्या नंतर ती कोणीकडे पळाली ती दिशा किंवा कोठे लपली ती जागा दाखवावी का ? अशावेळी जर खोट बोलण चालू शकते तरी मी म्हणतो ज्यात स्वार्थ नाही, परमार्थ आहे अशा प्रसंगीही खोट बोलण का चालू नये ? हे विचार सुचायला कारण आमच्या मित्रान एकदां सांगितलेला लग्न प्रसंग. लग्न प्रसंगाला हजर राहण्यासाठी बरेचदा जाव लागत तेव्हां त्या गोष्टीची आठवण होते. स्मरणशक्तीला उजाळा मिळतो.

सन् १९१६।१७ सालची गोष्ट. मी एका माध्यंदिन शाखेच्या ब्राम्हण गृहस्थाच्या लग्न प्रसंगाला हजर राहण्याला गेलो. तिथे माझे स्नेही, नागपुरातील राष्ट्रीय मंडळा' च्या सभासदांचे चांगलेच परिचयाचे गृहस्थ केशवरावजी आंबेकर हजर होते. गृहस्थ 'स्वदेशीचे' जाडे अभि-

मानी, साखरेचा व्यापार करीत. ते कानपुरला जाऊन आपल्या समक्ष साखरेच्या कारखान्यात तयार झालेली साखर स्वतःच्या देखरेखी खाली पोत्यात भरून नागपुरला आणीत. त्यांची ही अशी साखर 'चक्षुर्वै सत्यं म्हणून प्रसिद्ध होती. हे डॅा. मुंजे व धुंडीराजपंत ठेंगडी इंजीनीयर यांचे स्नेही. लग्नप्रसंगा लग्न जुळवायला काय अडचणी येतात ह्या संबंधी ते माझ्याजवळ बोलत होते. एका प्रसंगाच त्यांनी वर्णन केल. एका श्रीमंत माध्यंदिन गृहस्थाची मुलगी. हातापायानी ठीक, नाकाडोळ्यानी नीटस, प्रौढ व थोडी सुशिक्षित. लग्नात पत्रिका वगैरे तर जुळल्या पाहिजेतच पण सर्वात कठीण गोत्र जुळग. माध्यंदिनामधे तिन गोत्री काम. नुसत मुलीकडच व मुलाकडच गोत्र जमून भागत नाही. तेवढ इतर शाखात चालत. पण माध्यंदिनात मामाचही गोत्र जुळल पाहिजे. केशवरावनी त्या श्रीमंत गृहस्थाच्या मुलीच लग्न एका चांगल्या सुशिक्षित होतकरू पण आर्थिक स्थिति हलाखीचा अशा माध्यंदिन शाखेच्याच मुलाशी जुळवल. मुलीच्या बापाची मुलीच्या लग्नाची काळजी नाहीशी होणार होती व मुलाचा आर्थिक अडचणही. लग्नप्रसंगातले बहुतेक विधी आटोपून मुलगी व मुलगा बोहोल्यावर चढ़ले. पाटावर बसले. उपाध्यान काही प्रश्न विचारता विचारता मामाच गोत्र काय म्हणून त्या मुलाला विचारल. त्यान सांगितल. सांगितल्याबरोबर बोहल्याजवळच्या सर्व ब्राम्हणांनी कल्ला केला 'लग्न मोडल ! लग्न मोडल !!' लग्न मोडल अशी जिकडे तिकडे बोंबाबोंब मचली. मांडवातील निमंत्रित मडंळी समोर ही बोंब !! मुलीच्या बापाची मनःस्थिती काय झाली असेल ह्याचा अंदाज करू शकता. हा कल्ला झाला त्या वेळेला केशवरावजी बोहल्यापासून थोडया दूर अंतरावर होते. ते बोहल्याजवळ धावत गेले व त्यांनी काय झाल म्हणून विचारल. त्यांना ब्राम्हणानी सांगितल मामाच गोत्र जुळत नाही. केशवराव म्हणाले "कस जुळत नाही ? लग्न जुळवणारा मी. मी सांगतो तुम्हाला त्यच्या मामाचं गोत्र. मुलगा कॅालेजमधे जाणारा. त्याला काय कळते गोत्र बित्र' आणि जे गोत्र जुळण्यासारख होत ते गोत्र सांगून दिल. लग्न समारंभ पार

पडला. आता प्रश्न उत्पन्न होतो तो असा की केशवरावजीचं असत्य भाषण करण योग्य होत का ?

लग्न जुळवण सोप काम नाही. किती यातायात आहे हे पोरीचा बापच सांगू शकतो. लग्न जुळवण्याच्या बाबतीतल्या वर्ण, रूप, शिक्षण, गोत्र, हुंडा ह्या अडचणी लक्षात घ्या व मग केशवरावजीन खोट बोलल्याच पाप केल का पुण्य केल हे ठरवा. बर अस करण्यान त्यान आपला स्वतःचा फायदा असा काहीच केला नाही. तर मुलीच्या बापाची काळजी नाहीशी केली व मुलाची आर्थिक परिस्थिति सुधरवली. माध्यंदिन शाखेतील व्यक्तीला आणखी कोणत्याहि शाखेतील व्यक्तीशी लग्न संबंध जुळवता आला तर मग त्यांना ही जी तीन तिरपटची अडचण उत्पन्न होते ती नाहीशी होणार होती. खोट बोलण्याचे प्रसंग टळणार होते. म्हणून त्या उद्योगाला लागलो.

मी आंतरशाखीय विवाह व्हावेत ह्या संबंधी 'महाराष्ट्रातून थोड्याच दिवसानंतर लिहू लागलो. योग्य वधू व वर पहाण्याला क्षेत्र विस्तृत होईल व त्यामुळे हुंड्याची मागणीही इतकी तीव्र राहणार नाही असा व्यवहारीक विचारहि त्या लिखाणातून मांडला. त्याला 'महाराष्ट्रांतून एकान उत्तर दिल 'मग आम्ही शिकाव कशा करिता ?' त्याच शिकण हे त्याच्या मानसिक विकासाकरिता नव्हत, तर तो शिकला म्हणजे त्याला स्वशाखेतील मुलीच्या बापाजवळून भक्कम हुंडा मागता येईल म्हणून ! त्याच्या शाखेत ज्या मानान शिकलेले त्या मानान ह्याची हुंड्याची मागणी. कमी व्यक्ति शिकलेल्या असतील तर ह्यांची हुंड्याची मागणी जास्त. पण तेच आंतरशाखेतील विवाह रूढ झाले म्हणजे चढाओढीन ह्याला मागणीचा संभव कमी व म्हणून हुंडा नाही किंवा फारच थोडा मिळण्याचा संभव. तेव्हा त्यान 'महाराष्ट्रात' तस लिहण त्याच्या दृष्टिन योग्यच. त्याची स्पष्टवक्तेपणाबद्दल तारीफच करायला पाहिजे ही वर्तमानपत्रातली चळवळ थांबली. नतर १९२६ साली 'अखिल कण्व परिषद' भरली. तेव्हा आंतरशाखीय विवाहा संबंधी मी आपले विचार माझ्या अध्यक्षाच्या भाषणातून मांडले. त्याला अनुसरून ठराव पास झाला. नंतर 'आकोला'

येथील अखिल ब्राम्हण परिषदेतहि हा ठराव पास झाला. ह्या दोन्ही परिषदांचा इतिहास थोडक्यात दुसऱ्या करण्डकात दिला आहे. त्या नंतर धर्मनिर्णायक मंडळान हिंदु विवाहाचे बाकीचे निर्बंध कायम ठेऊन—ह्यात सपिंडाचाही निर्बंध आलाच—सगोत्र विवाह करण्यास हरकत नाही अस आपल मत दिल. त्या नतर मला मध्यवर्ति असेंब्लीत जाण्याचा प्रसंग आला. त्याचा फायदा घेऊन मी एक बिल आणल.

## क्रांतिकारक हिंदुम्यारिएज डिसॲबिलिटिज रिमुव्हल बिल

हिंदुच्या विवाहाबाबद हिंदु कायद्यातील कायदेशीर अडचणी दूर करण्याबाबतचे बिल-गोत्राच्या व शाखेच्या ( उपजातीच्या ) अडचणी नाहीशा व्हाव्यात म्हणून —१९४१ च्या बजेट सेशनमधे फेब्रुवारी महिन्यात आणल. ह्या बिलाच पर्यवसान हिंदुसंघटनात होणार होत. हे बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवण्यात याव असा ठराव मांडला. त्याला सर रेजिनाल्ड म्याक्सवेल, होम मेम्बर, ह्यांनी उपसूचना आणली की ते बिल लोकमत अजमवण्याकरिता पाठविण्यात याव. ह्या उपसूचनेला लोकनायक बापुजी अणे-त्या वेळेला एक्झिक्युटीव्ह कौन्सीलर व लीडर ऑफ दी हाऊस—ह्यांनी दुजोरा दिला व आपल्या भाषणांत हे बिल मत अजमवण्याकरिता निव्वळ वकील, डॉक्टर वगैरे मूठभर सुशिक्षिताकडेच न पाठविता मठाधिपतिकडेही पाठविण्यात याव अस म्हटल. गोत्र प्रवर फक्त द्विजानांच लागू व ते समजणारे माणस कमीच. तेव्हा हा फार थोडया माणसाचा प्रश्न आहे. पण कोणत्याहि जातीच्या उप जातीत विवाह होण्यासंबंधी जे कलम आहे त्याचा लोक कितपत स्वीकार करतील हे सांगण कठीण आहे. तेव्हा विस्तृत प्रमाणावर लोकमत अजमावण्यात याव; ह्या आशयाच त्यांच भाषण होत. ह्या बिलाला बहुतेक वर्तमान पत्रांनी दुजोरा दिला. बार असोसिएशन्स नही पाठिंबा दिला. पण विरोध केला शंकराचार्यांनी व वर्णाश्रम स्वराज्य संघ वाल्यानी. शंकराचार्यानी. सगोत्र विवाह होण्यास तर विरोध

केलाच पण आन्तरशाखीय विवाहासही केला. आन्तरशाखीय विवाहाच्या विरोधाच कारण त्यानी 'बीज शुद्धि राहणार नाही' हे दिल.

## वर्णाश्रम स्वराज्य संघाचा व माझा सामना

माझ्या बिलाला संघटीत रीतीन विरोध केला वर्णाश्रमस्वराज्य संघवाल्यानी. वर्णाश्रमस्वराज्यसंघातर्फे **रा. ब. परांडे पेन्शनर,** माजी ॲडीशनल डिस्ट्रीक्ट जज्ज, ह्यांनी लेख लिहिले— ह्या बिलासंबंधी आम्हा दोघांतील चर्चा 'हितवाद' व 'महाराष्ट्र' ह्या नागपुरातील वर्तमानपत्रातून व दिल्लीच्या 'ऑब्झरव्हर मधून काही महिने चालली. 'भारतधर्म महामंडळ' ह्यान धर्म बुडतो आहे अशी आरोळी मारायला सुरवात केली. हे वाग्युद्ध चालू असतानाच वे. शा. सं. विद्वद्रत्न केशव लक्ष्मण दप्तरी, महामहोपाध्याय वे. शा. सं. कृष्णशास्त्री घुले व वे. शा. सं. दिवेकर शास्त्री ह्यांनीही ह्या चर्चेत भाग घेतला. त्यांनी 'महाराष्ट्र' वर्तमानपत्रातून माझ्या लिखाणाला मदत करणारे व वर्णाश्रम स्वराज्य संघाचे म्हणणे खोडून काढणारे शास्त्राच्या आधारे काही लेख लिहिलेत. अशा रीतीन धर्म व व्यवहार ह्या दोन्ही बाजून बिलाची चर्चा झाली व ती वर्तमानपत्रातील लेखामुळ आम जनतेस कळली. त्यांचे ह्या बिलाच्या निकालाकडे लक्ष लागले.

## आम्ही धर्म सोडू

सिलेक्ट कमिटीकडे माझ बिल पाठवाव ह्या सूचनेला सर रेजीनाल्ड म्याक्सवेल ह्यांनी जी उपसूचना आणली तीजवर असेंब्लीत खूप चर्चा झाली. ती वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होत गेली. धर्माच्या त्याचप्रमाणे सुप्रजाजनन शास्त्राच्याहि दृष्टिन चर्चा होत गेली. अर्थातच ती बऱ्याच जणांच्या वाचण्यात अली. त्यात **कलकत्याचे काही ग्याझेटेड ऑफिसर्सहि** होते अस दिसत. त्यांच्या वतीन माझ्याकडे एक खाजगी पत्र आल. त्यातील छोटासा उतारा देतो " We do not admit it ( such

marriage ) is against Eugenic principle. This brings us to the whole question of inbreeding about which our Knowledge has increassed so much recently. If the stock is free from this ( undesirable excessives ) inbreeding has no bad effects whatsoever ( The Control of Development nor J. R. Baker Zoology Department Oxford university ) × × × one Pandit, and unfortunately one of some reputation, told me the other day that according to Hindu Shashtras no Hindu of North Bengal can marry a Hindu of East Bengal" हिंदुसमाज जातिभेदान तर असोच पण कितीतरी अन्य तऱ्हेन विभागला गेला हे वरील उताऱ्यात दाखवल आहे. " एका चांगल्या पंडितान सांगितल की उत्तर बंगालमधील हिंदु ह्याला पुर्वबंगाल हिंदुशी लग्न करता येत नाही. तस करण हिंदुशास्त्राच्या विरूद्ध आहे. " हे पंडित **'अरण्य पंडित'** च असले पाहिजेत ! कोणत्या शास्त्रात सांगितल आहे ? असही ह्या सज्जन ऑफीसर्सनी विचारल नाही. त्या पंडिताचा, ते म्हणतात त्याप्रमाणे, दुर्दैवान जो नाव लौकिक होता त्याच्याखाली ते दडपल्या गेले.

अनेक खुळ्या कारणान हिंदुसमाजाचे जर तुकडे तुकडे झालेत व तो समाज दुसऱ्या समाजाच्या आहारी गेला नव्हे आम्ही घालवला तर आश्चर्य आहे काय ? हे किती सहज आहे ते ह्याच पत्रातील आणखी एका लहानशा उताऱ्यावरून दिसून येईलः— We consider such Sagotra marriages legal × × If however the Bill is not passed on the ground that Sagotra marriage is illegal, we shall be obliged to renounce our religion as you can easily realize that nobody will like to accept his marriage as illegal and

children as illegitimate " कित्येक हिंदु ग्याझेटेड आफीसँनी चांगल्या सुशिक्षित ब्राय शी सगोत्र विवाह कायदेशीर आहे अशा समजुतीन लग्न केल. ते म्हणतात जर असे विवाह बेकायदेशीर आहेत अस ठरल तर मग आम्हाला आमचा धर्म सोडून द्यावा लागेल. कारण आमच लग्न बेकायदेशीर आहे व मुलबाळ ( Illegitimate) दासीपुत्र आहेत हे ठरलेल आम्हाला आवडणार नाही." आहे की नाही परधर्माकडे हाकलण्याचा मार्ग. आणि कोण भाग पाडत त्यांना ह्या मार्गान जायला ? आमच्या हिंदुच्या खुळ्या चाली-धर्माच्या नावाखाली ! मी त्या गृहस्थांना कळवलः—बिल पास होण्याची वाट पहा. कदाचित पास होईल. नापास होईल ह्या भीतीन धर्म सोडू नका. रजिस्टर्ड लग्न करा. ज्यांना मुलबाळ झाली असतील त्यांनी त्यांच्या नावान बक्षीस किंवा मृत्युपत्र कराव. कारण कोणी उगीच फुकाफुकी कोणाच लग्न रद्द ठरविण्याच्या खटाटोपात पडत नाही. मुलांना बेवारस ठरवून किंवा लग्न बेकायदेशीर टरवून मृताच्या पाठीमागे जर इस्टेट मिळणार असेल तरच ते त्या उठाठेवी करतात येरवी नाही. त्यांनी धर्मांतर करू नये. हिंदुच रहाव. "

## पिछेसे चलती आई

समाजात धर्मभोळ्या कल्पना कशा चमत्कारिक रीतीन उत्पन्न होण्याचा संभव असतो व मी आता ज्या मुस्लीम काजी संबंधान सांगणार आहे तसा जर चौकस मनुष्य नसला तर ती कल्पना धर्माच्या नावाखाली धर्मानुयायाकडून कशी पाळली जाते ह्यासंबंधी एक गोष्ट सांगतो. एका मोठ्या गांवी एका शुक्रवारी नमाजाच्या वेळेस बरेच मुसलमान लोक एका मशिदीत प्रार्थना करण्यास जमले. प्रार्थनेच्या वेळेस एका रांगेत एका मागे एक असे उभे राहिले. प्रार्थना करण्याच्या वेळेस प्रत्येक व्यक्तिस शरीराच्या इतक्या Poses-Attitudes घ्यावयाच्या असतात. उभ राहण, नंतर गुडघ्यावर हात टेकण, नंतर जमिनीवर गुडघे टेकण, नंतर जमिनीला डोक टेकण. ह्या प्रत्येक Attitude मधे प्रार्थना म्हटल्याजात असताना थोडा थोडा वेळ जातो. प्रार्थना करणारे सर्वच एकाच वेळेल

सामुदायिक कवाईतीप्रमाणे त्या त्या attitude घेतात. काय झाल की जमिनिला डोक टेकता टेकता अगदी अखरेच्या रांगेतल्या एका मुसलमानाचा थोडा झोक जाऊन त्याच्यापुढे असलेल्या मुसलमानाच्या वृषणास हाताचा धक्का लागला. ज्या गृहस्थाच्या वृषणाला धक्का लागला त्या गृहस्थाला वाटल हा धक्का नमाज पढण्याच्याच क्रियेपैकी एक भाग असेल. तेव्हा त्यान आपल्या पुढच्या मुसलमानाच्या वृषणास हात लावला अशा रीतीन प्रत्येकान वृषणास हात लावण हा नमाजपैकीच भाग असेल अस समजून त्याप्रमाणे केल. होता होता काजीच्या मागच्या गृहस्थान काजीच्या वृषणास हात लावला त्या सरशी काजी खवळला. काजीची मस्करी ! नमाजाच्या वेळेस !! काजीच्या हैवान सैतान अशा तुफानी शिव्यान तो चळचळा कापू लागला. त्यान काजीला हात जोडून अजीजीच्या साथ सांगितल की काजीची चेष्टा करण्याचा त्याचा मुळीच उद्देश नव्हता. त्याच्याशी त्याच्या मागच्या मनुष्यान ज्याप्रमाणे वर्ताव केला त्याचप्रमाणे त्यांन काजीशी केला. त्यान जे काही केल ते तो नमाजाच्या प्रकारापैंकीच एक प्रकार समजला व म्हणून तो काजीशी त्याप्रमाणे वागला. त्याच्या मागच्या मनुष्याचे त्याच्याशी चेष्टा करण्यासारखे संबंध नव्हते. सबब जो काही प्रकार घडला तो धार्मिकच अस तो समजला. ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन काजीन माफी द्यावी. काजीन त्या गृहस्थाच्या मागच्या गृहस्थाजवळ चौकशी केली. त्यान ही सांगितल 'पिछेसे चलते आई, आगे चला दीई'. तो ही त्या प्रकाराला प्रार्थनेचाच प्रकार समजला अस त्यान सांगितल. होता होता काजीन अगदी शेवटच्या माणसाला विचारल. तेव्हां तो म्हणाला माझी झोप चांगली उघडली नव्हती मला डुलकी आली असावी व तशा स्थितीत माझ्या समोरच्या मनुष्याच्या वृषणास धक्का लागला असावा. एकंदरीत काय ह्या झोपाळू नमाज पढणाऱ्याच्या व काजीच्या दरम्यानचे सर्व लोक गतानुगतीक होते. काजी जर छेडा न लावता, चिकित्सक नसता तर वर सांगितलेल्या मूर्खपणाच्या हास्यस्पद प्रकाराला धार्मिक आचाराच्या परंपरेच स्वरूप आल असत.

उत्तर बंगाल व दक्षिण बंगाल मधल्या व्यक्तिवर लग्ना संबंधीचे जे निर्बंध घातल्याचा उल्लेख आहे ते अशाच अंधानुकरणा पैकी. त्यांचा उगम कसा झाला वगैरे संबंधी चौकशी करतो कोण ?

मला पत्र लिहिलेल्या कोणत्याही ग्याझेटेड ऑफीसरन त्या अरण्य पंडिताला 'हिंदु शास्त्र' दाखव अस काही म्हटल अस त्यांच्या पत्रावरून दिसत नाही. त्या अरण्य पंडितान सांगितल 'हिंदुशास्त्र' अस म्हणते व ते त्यानी मान्य केल कारण लोकात त्या पंडिताची मानमान्यता होती. रूढ असलेला आचार असेल पण तो शास्त्र नव्हे. रूढी अशी का पडली ह्याचाही कोणी विचार केला नाही. 'पिछेसे चलते आई' आपणही कराव. चौकशीची दगदग कशाला पाहिजे हाच ज्याचा त्याचा विचार. बऱ्याचशा धार्मिक गणलेल्या आचारांची उत्पत्ति अशी लागण्याचा संभव आहे. मात्र चौकसबुद्धिचा एखादा काजी सारखा संशोधक पाहिजे.

## माझ बिल सिलेक्ट कमिटीकडे

ह्या बिलाला सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याचे बरेच प्रयत्न मी केलेत. निदान तीनदा तरी. प्रत्येक वेळेला चर्चा खूप होई. पण ते सिलेक्ट कमिटीकडे जाण्याचा संभव कमी. काय त्रास पडत होते सिलेक्ट कमिटीची सुचना पास करून घेताना ! सनातनी लोकाशी झगडा. त्यांना मदत करणाऱ्या सरकारशी झगडा व सरकाच्या हाताला हात लावणाऱ्या बायाशी झगडा. आणि ही ह्या त्रिकुटांची युति निरनिराळ्या कारणाकरिता. सनातनी म्हणत होते बिल शास्त्राविरूद्ध. सरकार सामाजिक चाली रीतीत फेरफार करण्याच्या विरूद्ध. बाया तुरळक तुरळक सुधारणा नको; एकदम हिंदु कोड पाहिजे म्हणून विरूद्ध. म्हणून मी दर वेळेला ती. सूचना वापस घेत असे—बिल कायमच – अखेरीस होता होता एकदा १९४५ च्या मार्चमधे, त्या असेंब्लीत सेशनमधे कांग्रेसचे असेंब्ली सभासद हजर असताना माझ बिल सिलेक्ट कमिटीकडे जाण्याची सूचना पास झाली. ह्या सिलेक्ट कमिटीकडे पाठवि-

ण्याच्या सूचनेवर जी चर्चा झाली ती वाचण्यासारखी आहे. हिंदु सभासदांची निरनिराळी मत तर वाचावयास मिळतीलच पण कांग्रेस असेंब्ली सभासदातही दोन तट पडलेत त्यामुळे चर्चा वाचनीय झाली आहे. कांग्रेस वाल्यातही सनातनी व सुधारक असे तट पडले. वर्णाश्रम संघाच्या **सनातनी बजोरिया** शेटजीला, श्री अनंतशयनम् आयगांर (हल्लीचे डेप्युटी स्पिकर ) ह्या विद्वान गृहस्थान व वकीलान व इतर हिंदु सभासदांनी साथ दिली. साथ देणाऱ्यात **बॅ. जमनादासही** होते. त्यांच भाषण चालल असताना, **श्री. श्रीप्रकाश** व **माझा भाऊ गोपाळ** ह्यांनी प्रश्नांची (Interruptions ची ) अशी सरबत्ती चालवली को अध्यक्षाला ( President ला ) बिलाला विरोध करणाऱ्याच्या मदतीला धावून जाव लागल. सिलेक्ट कमिटीच्या सूचनेवर **श्री. भुलाभाई देसाई कां. अ. प. नेते** ह्यांच सर्व दृष्टिन–कायद्याच्या, व्यवहाराच्या समाजाच्या संघटनेच्या दृष्टिन – सर्वोत्कृष्ट भाषण झाल. ह्या बिलाच्या योगाने हिंदूच्या अनेक जाति उपजाति नाहीशा होण्यास व फक्त चार वर्णच कायम राखण्यास मदत होईल असही ते आपल्या भाषणात म्हणाले. ते त्यांच असेंब्लीतील शेवटचच भाषण. त्यानांही वाटल नसेल ते शेवटचच होईल म्हणून ! पण कांग्रेस हायकमांडच्या नीतिमुळे त्यांच मूळच स्थान गेल. असो. माझ हे बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याची सूचना मंजूर झाली. पण नंतर १९४५ मधे असेंब्ली बरखास्त करण्यात आली. अर्थातच हे बिल बारगळल. नंतरच्या असेंब्ली करीता कांग्रेसन मला उमेदवार न निवडता श्री. साळवे ह्या इंडीयन ख्रिश्चन गृहस्थाची निवड केली. तेव्हा अर्थातच ह्या बिलाच्या बाबतीत माझ्या हातून पुढे काही कारवाई होऊ शकली नाही.

## गोपाळन बिल पास करून घेतल

मी असेंब्लीत नाही तेव्हा माझ्या बिलाची आता भीति राहिली नाही, आपण बेफिकीर झालो अस सनातनी वर्णाश्रम स्वराज्यसंघवाले ह्याना वाटल असेल. बिलाचे जे विरोधी असतील त्यांना आनंद झाला



डॉ. जी. व्ही. देशमुख, एम्. डी., एफ्. आर्. सी. एस्.
माजी मेयर, बॉम्बे कॉरपोरेशन
गोपाळस्मृतिकार.

असेल. पण तो फार वेळ टिकू शकला नाही. माझा भाऊ गोपाळ ह्यान त्यांचा निराशा केली. त्यान तेच बिल, अगदी अक्षरशः तेच बिल, असेंब्लीत आणल आणि ईश्वरी नेमानेम असा की ते पास होण्यासारखी परिस्थिती घडून आली. कांग्रेसन मध्यवर्ति असेंब्लीत अधिकारग्रहण केला होता. ती बहुमतात होती. गोपाळ एक वजनदार सभासद होता. त्याला Lobbing ची ( सभासदांचे मत मिळविण्याची ) कला साधलेली होती. त्यान आपली बुद्धि व युक्ति खर्च करून ते बिल १९४६ च्या बजेट सेशनमधे पास करून घेतल. त्याहि वेळेला कांग्रेस सभासदात दोन तट पडले होते. त्या बिलाला कित्येक उपसूचनाहि होत्या. पण अखेरीस ते बिल जसच्या तसच पास झाल.

## मनुस्मृतित गोपाळस्मृतिन झालेले फरक

परिस्थितीला अनुसरून हिंदुकायद्यामधे बदल करण्याकरिता माझा भाऊ गोपाळ ह्यान मी असेंब्लीत जाण्यापूर्वी जी बिल आणली त्या संबंधी उल्लेख करण अप्रासंगिक होणार नाही. मी असेंब्लीत जाण्यापूर्वी त्यान ' हिंदु वुईमेन्स राईट टु प्रापर्टी ' बिल आणल व ते पास करून घेतल ते ' देशमुख ॲक्ट ' ह्या नांवानही प्रसिद्ध आहे. मी असेंब्लीत गेल्यानंतर सन १९३८ च्या दिसेंबर महिन्यात हिंदु स्त्रियांना **' घटस्फोटाचा हक्क ' देणार** बिल त्यान आणल व ते लोकमत अजमावण्याकरिता पाठविण्यातहि आल. ते पुढ ढकलल्या गेल. सन १९३९ च्या एप्रिलमधे ' स्त्रियांना विवक्षित परिस्थितीत अलग राहण्याचा व अन्नवस्त्राचा हक्क ' देणार बिल आणल. ही दोन्ही बिल कांग्रेसन १९३९ च्या सप्टेंबरमधे असेंब्लीवर बहिष्कार टाकल्यामुळे बारगळली. त्यान फिरून १९४० च्या नोव्हेंबरमधे ' घटस्फोटाच्या ' व ' विवक्षित परिस्थितीत हिंदु विवाहित स्त्रीला अलग राहण्याचा व उपजीविकेचा हक्क ' देणाऱ्या बिलाला व ' स्पेशियल म्यारीएज ॲक्टच्या अमेंडमेंट' बिलाला चालना दिली. ही फिरून १९४३ च्या पूर्वी बारगळल्यामुळे-कांग्रेसच्या

असेंब्ली बहिष्काराचा परिणाम—त्यान ' हिंदुविवाहित स्त्रीच्या अलग राहण्याच्या व अन्नवस्त्र संबंधीच्या बिलाला व स्पेशीएल म्यारिएज ॲक्ट अमेंडमेंट' बिलाला १९४३ च्या बजेट सेशनमधे चालना दिली. १९४५ मध्ये असेंब्ली बरखास्त झाल्यानंतर गोपाळ १९४५ च्या नवीन असेंब्ली करिता मुंबई तर्फे निवडून आला व त्यान हिंदु स्त्रीच्या अलग राहण्या संबंधीच व हिंदु म्यारियज डीसएबिलीटीज रिमूव्हल बिल ही दोन बिल १९४६ च्या फेब्रुवारी चर्चेला आणून पास करून घेतली. माझ बिल माझ्याहातून पास न होऊ देण्यात जसा काही ईश्वरी संकेतच होता की हिंदुसमाजा संबंधीचे सामाजिक कायदे गोपाळच्याच हातून पास व्हावेत ! मनुस्मृतित गोपाळ स्मृतिन अशी सुधारणा घडून आली. स्त्रियांच्या हक्काच्या बाबतीत त्यान जी सुधारणा घडवून आणली ती जर घडून आली नसती तर अजूनही कित्येक वर्षे स्त्रियाना त्या सुधारणाची वाटच पहावी लागली असती. ' हिंदुकोड ' बिल–ज्यावर स्त्रियानी आपली भिस्त १९४४ सालापासून ठेवली ते अजून चर्चेसही आले नाही. आणि ते ही ज्या कांग्रेसवर त्यांची एवढी निष्टा ती अधिकारारूढ असताना ! 'हिंदुकोड' पास होईपर्यंत तरी गोपाळन स्त्रियावर उपकारच करून ठेवलेत असं म्हटल पाहिजे–स्त्रियाना हक्क मिळवून देण्याकरिता त्यान जी चळवळ (Crusade ) केली त्या बद्दल त्यानी कृतज्ञ असाव अशी ती आहे. आता त्याना स्वाभिमानान, समाधानान व सुखान राहता येणार आहे.

## आन्तर प्रांतीयात लग्न होण इष्ट आहे का ?

'हिंदूच्या विवाहाबाबद हिंदू कायद्यातील कायदेशीर अडचणी दूर कराव्या' म्हणून माझ बिल आणल्याचा उल्लेख वर केला आहे, ते लोक-मत अजमाविण्याकरिता गेले असताना व सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याच्या सूचनेवर असेंब्लीत चर्चा चालू असताना मला अनेक गृहस्थ भेटायला येत. ते वर्तमानपत्रातील बिलाच्या चर्चेवरील रिपोर्टसंबंधी खुलासा विचारीत व चर्चाहि करीत. त्या गृहस्थात एक दिल्ली येथील रंगविक्रिच्या दुकानात काम करीत असलेले महाराष्ट्रीय गृहस्थहि १९४३ साली आले होते. त्याच नाव त्याच प्रमाणे त्यानी ज्या व्यक्तिसंबंधी माहिती दिली

अनुक्रम ९८७४ दा ७७९८ ६७१२

त्यांच नांव किंवा धंदा सांगण योग्य होणार नाही. त्यानी सांगितलेली गोष्ट सर्वस्वी खरी आहे एवढच मात्र सांगतो. जे गृहस्थ मला भेटायला आले म्हणून सांगीतल त्यांच नाव 'क' त्यांच्याकरिता मी चहा बोलावेला. तो घेत असताना माझ्या बिलासंबंधी त्यानी चर्चा केली व ती होत असतानाच उदाहरणासह काही मुद्दे माझ्या समोर मांडले. त्या संबंधी आम्हा दोघात जे संभाषण झाले त्याचा सारांश देत आहे.

कः—आन्तर प्रांतियांत म्हणजे भिन्न भिन्न प्रांतांतील हिंदुमधे विवाह व्हावेत अशा मताचे आपण आहा का ?

मीः—हो-का होऊ नयेत ? माझ्या बिलान ज्या प्रमाणे जातीजातीच संघटन होणार, त्याप्रमाणे आन्तरप्रांतियांत विवाह झाले म्हणजे दोन्ही प्रांतातले लोक जवळ येण्यास मदत होईल.

कः—मी एका उदाहरणान माझे विचार स्पष्ट करू इच्छितो. इकडेच असलेल्या एका सुविद्य महाराष्ट्रीय बाईन एका चांगल्या सुशिक्षित धंदेवाईक पंजाबी गृहस्थाबरोबर लग्न केल. त्याचा परिणाम असा झाला की ते दोघेही आप आपल्या समाजाकडून वाळत टाकल्या गेले.

मीः—ते कस काय ? जरा खुलासा करा.

कः—सांगतो अगदी सविस्तर. ही महाराष्ट्रीय बाई सासरच्या मंडळीकडे राहावयाला गेली तर तिला चार दिवस तिथे राहाव अस काही वाटेना. सासरच्या मंडळीची राहणी, त्यांचे आचार विचार हिच्या खरकट्या बिरकटयाचा व स्वच्छतेच्या कल्पना निराळया व सासरच्या मंडळीच्या निरनिराळया. त्यामुळे तिथे राहणे तिला कठीण जाई. काही सुख वाटेना. शिवाय सासरच्या बायांना वाटे ही परकी बाई आपल्या इथे नको. ह्या परक्या बाईन आपल्यात येऊन आपल्यावर व आपल्या समाजावर आक्रमण केल. आणि ह्या त्यांच्या विचाराच प्रतिबिंब त्यांच्या आचरणात दिसून येई. सर्वजण तिच्याशी तुसडेपणान वागत. पंजाबी राहणीमुळे व त्या बायाच्या आचार बिचारामुळे व वर्तणुकीमुळे ह्या

बाईला त्या बायांत स्वत: संबंधी आपुलकी निर्माण करता आली नाही. ते तिकडे नस झाल व ही व हीचा नवरा जिथे राहत होते तिथे महाराष्ट्रीय बाया निराळ्याच तऱ्हेन वागू लागल्या. त्यांना वाटल ही बाई आपल्यातून गेली. त्यामुळे त्यांनी तिच्याशी संबंध तोडला. तिळसंक्रांतीच्या सणाला व चैत्र मासातील हळदीकुंकवाच्या समारंभाला सुद्धा तिला त्या महाराष्ट्रीय बाया बोलाविनाशा झाल्या. आणि ती मग एकटी पडली. काय कराव तिन अशा परिस्थितीत ? म्हणून मला वाटते भिन्न प्रांतियात लग्न नकोत.

मी: —आपण दिलेल्या उदाहरणावरून मी असा निष्कर्ष काढतो की भिन्न भाषियांच्या, भिन्न आचार विचारांच्या व संस्कृतिच्या कुटुंबातील व्यक्तित होणारे विवाह त्या कुटुंबात राहणाऱ्या व्यक्तिंना सुखावह होणार नाही. पण त्या वरून भिन्न प्रांतातल्या समान आचार विचार राहणी व संस्कृति त्याच प्रमाणे भाषाहि ज्यांची आहे अशा कुटुंबातील व्यक्तित विवाह होऊ नयेत अस म्हणण योग्य होणार नाही. आणि ज्या व्यक्तिंना विवाहानंतर निराळा संसार थाटावयाचा असतो त्यांच्या बाबतीत तर आपल म्हणण मुळीच लागू पडणार नाही. त्याना त्यांचा विवाह सुखावह होण्याकरिता परस्परांचे विचार व्यक्त करण्याकरिता समान भाषा, समान आचार विचार व एकच संस्कृति असली म्हणजे पुरे आहे. मध्यप्रांत वऱ्हाड व मुंबई प्रांत हे भिन्न प्रांत आहेत. ह्या भिन्न प्रांतातील महाराष्ट्रीय कुटुंबातील व्यक्तित विवाह होऊ नये अस आपण म्हणणार नाही !

क: — नाही

मी:— आपण ज्या प्रमाणे आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ पंजाबी व महाराष्ट्रीयन व्यक्तिच्या विवाहाच उदाहरण दिल त्याच प्रमाणे माझ्या म्हणण्याला दुजोरा देण्याकरिता माझ्या अनुभवातील काही उदाहरण देतो. माझ्या पहाण्यात एका आय. सी. एस बंगाली गृहस्थाच्या व त्याच्या सुशिक्षित बंगाली पत्निच्या एअर फोर्समधील मुलान एका

सुशिक्षित विलायतेवरून आलेल्या महाराष्ट्रीयन गृहस्थाच्या कॉलेजमधे शिकलेल्या मुलींशी लग्न केल. त्यांच ठीक चालल आहे. तसच विलायतेत शिक्षण घेतलेल्या एका मद्रासी कुटुंबातील सैन्यात असलेल्या सुशिक्षित मुलाच लग्न कॉलेजमधे शिकलेल्या बंगाली मुलीशी झाल. त्यांचही ठीक चालल आहे. एका महाराष्ट्रीयन आय. सी. एसच्या सुशिक्षित मुलीच लग्न एका बंगाली आय. सी. एस शी झाल. त्यांचही ठीक चालल आहे. त्यांच्या परस्पराविषयी किंवा कुटुंबातील व्यक्ति विषयी आपण सांगितल्या तशा तक्रारी नाहीत. आपण दिलेल्या उदाहरणावरूनही ज्या पंजाबी गृहस्थाबरोबर त्या महाराष्ट्रीयन बाईन लग्न केल त्याच्या विरूद्ध तिच काही म्हणण दिसत नाही. तिच म्हणण आहे त्याच्या कुटुंबातील मंडळी विरुद्ध ते दोघेही आधुनिक शिक्षण घेतलेले, इंग्रजी भाषा बोलणारे, एकाच राहणीचे-मग पाश्चिमात्य का असेना-एकाच संस्कृतिचे आचार विचारांचे तेव्हा त्या दोघात तेढ नाही. जमत नाही ते त्यांच्या कुटुंबातील किंवा समाजातील मंडळीशी. आपण अलग टाकल्या गेलो आहोत अस वाटू नये म्हणून त्यांच्या सारख्या आधुनिक राहणाच्या व विचाराच्या ज्या व्यक्ति असतील किंवा त्यांचा क्लब असेल तिथ त्यांनी जाव म्हणजे एकटेपणा वाटणार नाही. आणि आता तर नोकरी चाकरीच्या निमित्तान कुटुंबातील मंडळी पासून दूर प्रांतांत जाण्या येण्याचे व राहण्याचे प्रसंग विवाहित व्यक्तिना येत आहेत व पुढे येतीलही. एक प्रश्न विचारावासा वाटतो.

कः—विचारा

मीः—आपण म्हणालात ह्या महाराष्ट्रीयन बाईला जिथे ती राहते व आपला डॉक्टरकीचा धंदा करते तिथल्या महाराष्ट्रीयन बाया तिळसंक्रांतीला किंवा चैत्र मासांतील गौरीच्या समारंभाला बोलावित नाही. त्यांचा समज झाला की ही बाई आपल्यातून गेली. मी विचारतो ह्या बाईन कधी त्या बायांना आपल्या घरी तिळसंक्रांतीच्या निमित्तान ह्या चैत्रगौरीचा समारंभ करून बोलावण केल आहे का ?

कः—नाही.

मीः – का नाही ? ही बाई जर आपल्या समाजाकरिता आसुसलेली होती तर तिन असा समारंभ घडवून आणून त्या बायाना दाखवून द्यायला पाहिजे होत की त्यांचा गैर समज झालेला आहे. मला वाटत ह्या बाईनच घर बसल्या आपली चुकीची समज करून घेतली आहे. Inferiority comple चा ही हा परिणाम असेल. तस म्हटल तर ही बाई डॉक्टरीण व त्या बायाना हिची गरज केव्हाना केव्हा लागेलच म्हणून त्या हिच्याशी संबंध ठेवण्यास नेहमी उत्सुकच राहतील अस मला वाटत.

कः - आपण म्हणता तस करायला सांगतो त्या बाईला. बर नमस्कार "अस म्हणून ते गेले.

## महाराष्ट्रीयानो आपल्या मुली संभाळा !

भिन्न प्रांतातील-भिन्नसंस्कृतितील-व्यक्तिशी महाराष्ट्रीयन मुलीनी लग्न केल्यामुळे व ही प्रवृत्ति वाढत आहे असे दिसल्यामुळे काही वर्तमान पत्रांतून व मासिकांतून महाराष्ट्रीयाना जशी काही धोक्याची सूचना म्हणून सांगण्यात येत आहे की महाराष्ट्रीयानो आपल्या मुली संभाळा. पण ह्याला जबाबदार कोण ? ही परिस्थिती उतन्न कशामुळे झाली ह्याचा नको का विचार करावयाला ? महाराष्ट्रीय सुशिक्षित तरूण किंवा त्यांचे पालक सुस्वरूप व सुशिक्षित मुलीच्या बाबतीतही केव्हा केव्हा दोघही, भक्कम हुन्डा मागतात व तसा देण मुलीच्या बापाला अशक्य झाल म्हणजे मग त्या मुली किंवा त्यांचे वडील दुसऱ्या प्रांतांत किंवा दुसऱ्या जातीत शिक्षण वगैरे सर्वच दृष्टिन अनुरूप असलेला वर पहातात. सुशिक्षित तरूण पुरूषांची—महाराष्ट्रीय पुरुषांची किंवा त्यांच्या पालकांची जोपर्यंत लग्नाकडे पहाण्याची ही आर्थिक दृष्टि कायम आहे तो पर्यंत सुशिक्षित, कर्तबगार व धडाडी असलेल्या मुलीची अनुरूप अशा महाराष्ट्रीयेतर मुलाबरोबर लग्न करण्याची वृत्ति बळावत जाईल. आपल्या प्रांताबाहेरच्या पुरूषाशी लग्न करण्याबद्दल ह्या मुलीना दोष देता येत नाही. प्रांताबद्दल अभिमान असला तरी स्वतःच्या जीवनात ( Security in life ) स्वास्थ्यता व सुरक्षितता लाभण्याच्या दृष्टिन

त्यानी तस करण साहजिक आहे. महाराष्ट्रीय 'समाजातील सुशिक्षित तरुणांना जिथे स्वार्थापलीकडे कांही दिसत नाही तिथ अबलांना दोष देऊन काय उपयोग ? आज प्रत्येक व्यक्तीच लक्ष स्वतःपुरत पहाण्याच आहे समाजाच हित पहाण्याच नाही. तोंडान लंब्याचवड्या गोष्टी कराव्या पण कृतीत त्या आणू नयेत हा प्रकार तर सर्वत्र बोकाळला आहे. मामुली मनुष्यापासून तो गांधीभक्त म्हणविणाऱ्या पर्यंत.

जो पर्यंत स्वशाखेत ( उपजातीत ) लग्न केल पाहिजे व भिन्न गोत्रातच लग्न केल पाहिजे असे निर्बंध होते तो पर्यंत वधूला अनुरूप वर मिळण कठीण झाल होत व वराला भलतीशी किंमत आली होती. हे निर्बंध निघून गेल्यामुळे हुंड्याला उतार येण्यासारखी परिस्थिती उत्पन्न झाली. आता परप्रांतीयाशी लग्न करण्याच्याहि बाबतीतले अडथळे शिक्षणादिमुळे नाहीसे झाल्याने त्याच प्रांतातल्या वराच्या हुंड्यास आणखी गळती लागली. एवंच ह्या महाराष्ट्रीय सुशिक्षित, सुंदर, कर्तबगार, घर कामात दक्ष व काटकसरीन राहणाऱ्या मुलींवर आपल्या स्वशाखेच्याच बाहेर तर काय पण प्रांताबाहेरच्या पुरुषाबरोबर लग्न करण्याचा, प्रसंग हुंडयामुळें आला.

* ह्या राक्षसी हुंडयमुळे सध्याच नाही पण काही वर्षांनी *
| जर महाराष्ट्रीय समाजात सुंदर, सुशिक्षित, कर्तबगार |
| व धाडशी मुलींची वाण भासू लागली |
| व त्याचा परिणाम महाराष्ट्रातील पुढील पिढीवर |
| ती कर्तृत्वशून्य होण्यात झाला तर त्याचा दोष त्या |
| समाजातील मुलीकडे नाही. अशी परिस्थिती उत्पन्न |
* झाल्यास जबाबदार महाराष्ट्रातील पुरुष वर्गच. *

## गरीबीन होरपळलेल्या कुटुंबाला सांभाळणाऱ्या मुली

सामाजिक परिस्थितीकडे दुर्लक्ष करून ज्या प्रमाणे काही लोकांना ' महाराष्ट्रीयांनो आपल्या मुली संभाळा ' असा सावधगिरीचा इषारा

दिला त्याच प्रमाणे परिस्थितीकडे डोळे झांक करून सनातनी लोकांनी काहूर उठवल 'मुली घराबाहेर पडू लागल्या' अर्थात हे ठीक नव्हे त्यांच्या मतान. पण मुलींच हे घराबाहेर पडण स्वच्छंदाच लक्षण आहे, बेछुट पणाच आहे की परिस्थितीन त्याना भाग पाडल आहे ह्याचा विचार करायला पाहिजे की नाही ?

सन १९४३ साली असेंब्लीच्या बजेट सेशन नंतर मी दिल्लीहून ग्यांडट्रंकन नागपुरास येत होतो. गाडी इटारसीला सकाळी ९॥। १० ला आली. त्या वेळेस माझ्या सेकंड क्लासच्या डब्यात फक्त एक बर्थ रिकामी होती. मी, मुस्लीम लीगचा एक सभासद, दोघ आर्यसमाजिस्ट इतरयांनी बाकीच्या बर्थ रिझर्व्ह केलेल्या होत्या. इटारसी स्टेशनावर गाडी थांबल्या-नंतर थोड्याच वेळान एक एंग्लोइंडियन मुलगी WACI ( व्याकाय ) डब्याजवळ आली, उभी राहिली. तिन डोक आत घालून इकडे तिकडे पाहिल व वापस गेली. मी समजलो ती परत गेली तेव्हां आता काही येणार नाही. पण तो दोन तीन मिनिटाच्या आतच परत आली आणि आली ती आपल्याबरोबर दोघी हिंदु मुलींना घेऊन. मुली २०।२२ वर्षांच्या अंदाजात असतील. वर्णान शाम होत्या. कपाळाला चांगल मोठ जुन्या चालीच कुंकु होत. लुगड नेसल्या होत्या पण विकच्छ. त्या एंग्लोइंडीयन मुलीन त्या मुलीना रिकामी बर्थ दाखवून दिली. बसायला सांगितल. आपण जाऊन त्यांच सामान एका हमालाच्या डोक्यावर देऊन घेऊन आली. आणि 'टाटा' करून निघून गेली. गाडी सुरू झाल्याबरोबर एका मुलीन आपली न्यापस्याक (सैनिक वापरतात तशी लहानशी खाकी रंगाची कनव्हासची पिशवी) काढली व आपल्या बहिणीला ( तिच्याबोलण्यावरून त्या दोघींच नात उघड झाल ) मराठीत म्हणाली "आता आपण फराळ करू" व तस म्हणून तिन त्या काळसर झालेल्या न्यापस्याक मधून पळ-साचे पान काढले व त्यावर न्यापस्याकमधल्या दशम्या व कांद्याचा झुणका ठेऊन खायला सुरवात केली. त्यांची व माझी बर्थ एकमेकाला लागूनच ( at right angles ) होती तेव्हा मी भाषणाला सुरवात केली.

मीः – तुम्हाला जी ऍंग्लोइंडियन पोरगी घेऊन आली तिचा व तुमचा संबंध कसा ?

**मोठी मुलगीः**—ती व आम्ही दोघी बहिणी जबलपुरला एकाच ठिकाणी एम्युनिशन डेपोमधे काम करतो.

मीः—तुम्ही दोघी व्याकाय आहात का ? (कारण त्यांच्या अंगावर 'ब्याज' नव्हती किंवा त्या युनिफॉर्ममधे नव्हत्या ).

**मोठी मुलगीः**—होय.

मीः—तुम्हाला वडील असतीलच ? काय करतात ते ?

**मोठी मुलगीः**— पुर्वी शिक्षक होते. आता पेनशन मिळते.

मीः—तुम्ही नोकरी करिता हे त्यांना पसंत आहे का ? समाज काय म्हणेल ह्याचा त्यानी विचार केला का ?

**मो. मुः**— परिस्थितिच अशी आहे की आम्ही करतो ते चांगल आहे की नाही ह्याचा विचार करण्याच्या मनःस्थितीतच ते राहू शकत नाहीत. आम्ही नोकरी केली ती कोणत्या परिस्थितीत ? वडिलांना पेनशन मिळते फक्त २० रूपये. घरी पोसायचे जीव वृद्ध वडील, थकलेली आजारी म्हातारी आई, आम्ही दोघी मुली व तिघे लहान भाऊ. कस निभाव आमच २० रूपयात ? समजू शकता तुम्ही. जर लोक काय म्हणतील, समाज काय म्हणेल—आणि तो काय म्हणेल हे आजपर्यंतच्या सनातनी वृत्ती वरून कळतच आहे—ह्याची भीति बाळगून घराच्या बाहेर नोकरी करिता पडलो नसतो तर मग आम्हाला उघडया डोळ्यांनी कुटुंबाचा नाश पाहावा लागला असता. जो समाज बोलघेवडेपणाच्या पलीकडे जाऊ इच्छित नाही, आपल्या समाजातील व्यक्तिच्या हिताची काळजी वाहत नाही त्या समाजाची तमा आम्ही काय म्हणून बाळगावी व आपल्यावर संकट ओढून घ्यावेत ? ज्यांनी आमची चिंता वाहिली व लहानाच मोठ केल त्या आई व वडिलांच हित पहाण हेच आमच कर्तव्य आहे अस आम्ही समजतो.

**मीः**—तुमच दोघींच शिक्षण झाल ?

**मोठी मुलगीः**—मी म्याट्रीक आहे व ही माझी बहिण प्रिम्याट्रीक

**मीः**—तुम्हाला पगार काय मिळतो ?

**मोठी मुलगी:**—मला व हिलाही दर महिन्याला रू. ७५ पगार मिळतो शिवाय सरकार आम्हाला कामावर 'बस' मधून नेण्याचा व काम संपल्यानंतर 'बस' मधून घरी पोंचवण्याचा बंदोबस्त करते. त्याचप्रमाणे रेशनच्याबाबतीतही सवलती मिळतात. रू. १५० आम्ही आपल्या वडोलाच्या स्वाधीन करतों. वडीलाची पेनशन रु. २० व आमचे रू. १५० हयातून कस तरी हया लढाईच्या दिवसात कुटुंबाच पोषण होत. आम्ही कसा तरी जिवंत राहण्याचा प्रयत्न करतो.

**मी:** –आपल्या भावांच्या शिक्षणाच कस काय ?

**मोठी मुलगीः**—तिघ भाऊ आहेत म्हणून जे आपणाला सांगितलना ते तिघेही भाऊ आमच्या पेक्षा लहान. त्यांच्यातला जो थोरला १६ वर्षाचा आहे त्याच शिक्षण कस तरी रडत खडत चालल आहे. कारण दोन तीन वर्षान नोकरी करून तो कुटुंबाला मदत करील अस वाटतना. बाकीच्या दोघा भावांच शिक्षण तूर्त बंद. घरीच बाबा जे काय शिकवतील ते शिक्षण. कुठून आणता पैसे फी व पुस्तकाकरिता ? गरीबी ही अशी आहे. होरपळून निघालो आम्ही. सर्व. समाज काय म्हणेल ह्याचा विचार करत बसलो तर आटपलाच ग्रंथ. भाषणाला थोडी कलाटणी देण्याच्या उद्देशान, त्या मुलीला म्हणालो 'तुमची न्यापस्याक पहा. जरा घाणेरडी दिसते. तिला ते तेलकट डाग. व्याकायकडून स्वच्छतेची, टापटीपीची अपेक्षा केली जाते. ऍंग्लोइंडीयन मुली हया बाबतीत विशेष लक्ष देतात'

**मोठी मुलगीः**—आम्ही त्या न्यापस्याकला वाशिंग सोड्याच्या पाण्यात टाकली होती. स्वच्छ झाली नाही हे खर पण धोब्याकडून धुवून आणण्याकरिता पैसे पाहिजेत ना. ते कोठून आणता ? सगळे खेळ पैशाचे. जो काय उद्योग करायचा तो केल्यावाचून आम्ही राहत नाही पण पैशाच्या अभावी

सगळच लंगड पडत. सगळी सोंग आणता येतात पण पैशाच सोंग आणता येत नाही.

फिरून भाषणाला कलाटणी देण्याच्या उद्देशान मी म्हणालो 'तुम्ही जे हैदराबादला जायला निघाला ते कुणाकडे ?' मो. मु:-आजोळी - सरासरी १२ वर्षांनंतरची ही माझी फेरी' ह्या नंतर पुढे मी त्यांच्याशी बोललो नाही.

वरील भाषणावर कांही भाष्यकरायला पाहिजे अस वाटत नाही. 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' अस म्हणतात. स्त्रिया घराबाहेर नोकरी करिता पडू लागल्या म्हणून जे सनातनी अब्रम्हण्यं म्हणून ओरडतात त्यांनी नोकरी करणाऱ्या बायांच्या परिस्थितीची जाणीव करून घ्यावी त्या परिस्थितीत आपण कसे वागलो असतो ह्याचा विचार करावा व जर त्यांचे प्रश्न सोडवण्याकरिता मदत करता येत असेल तर ती करावी व मार्गदर्शन करता येत असेल तर कराव नाही तर स्वस्थ बसाव,

## धन्य है ! महाराज, धन्य है !

सनातनी मताच्या माणसांच्या विचारांना धक्का देणारी आणखी एक गोष्ट घडली. सन १९४६ च्या फेब्रुवारी महिन्यात मी दिल्लीला गेलो. त्या वेळेस मी असेंब्लीचा सभासद नव्हतो तरी ' ऑल इंडीया शुगरकेन कमिटी ' चा सभासद म्हणून दिल्लीच्या त्या कमिटीच्या मिटींगला जाणे जरूर होते. तिथे काही दिवस राहिल्यानंतर मी लखनौला जाऊन वापस कानपुरच्या शुगरकेन कमिटीच्या एका मिटींगला हजर राहण्याच्या इरा ग्याने दिल्लीहून निघालो. दिल्लीलाच सेकंड क्लासच्या डब्यात लखनौ करिता मी आपली बर्थ रिझर्व्ह केली. कानपुरला गाडी आल्यानंतर मी डब्या बाहेर वर्तमानपत्र विकत घेण्यास गेलो. तिकडून आलो. डब्यात बसल्यानंतर माझ्या समोरच्या एका उतारूने आपल्या शेजारच्या माणसाला माझ्याकडे डोळ्यान इशारा केला. गाडी सुरू झाली. ह्या उतारून आपले दोन्ही हात कोपरापासून जोडून मला नमस्कार केला व म्हटल " धन्य है, महाराज, धन्य है !! आप हमारे उपर खूप उपकार कर

रहे हो !! आपने स्त्रियों के बारे मे सब कुछ किया " व नंतर स्वतःच्या डोक्यावर दोन्ही हात ठेऊन म्हणाला "अब हमारे सिरपर बैठाव उनको !" आणि स्त्रियांच्या बिलासंबंधी उल्लेख केला. विवक्षित परिस्थितीत हिंदु विवाहित स्त्रियांच्या अलग राहण्याचा व पोटगी संबंधीचा विचार ज्या बिलात केला त्या संबंधीचा उल्लेख होता तो. त्याच व माझ बोलण सुरू झाल.

वास्तविक हे बिल माझ्या भावाच गोपाळच. हा पहिलाच प्रसंग की ज्या वेळेला गोपाळच बिल ते माझ बिल समजण्यात आल. समजण्यात आल तर आल. चार स्तुतिपर शब्द ऐकण्यास मिळाले असते तर त्यांतल्या त्यात बर झाल असत. पण झाल उलटच. ते माझ बिल अशी त्याची समजूत कायम ठेऊनच मी बोलू लागलो. त्यात एक प्रकारची मजा आली. अगदी सनातनी मताच्या माणसाचे विचार कळले. त्या गृहस्थाच व माझ संभाषण चालल असतांना एका बंगाली सवाष्ण व सुशिक्षित बाईन चर्चेत भाग घेतला. तिच्या जवळच तिचा नवरा बसला होता. ती जे काही बोलत होती ते त्याच्या सम्मतिनच असल पाहिजे. कारण तिच्या त्या बोलण्यापासून त्याला आनंद होत होता. त्या बाईन आमच्याशी ज्या हिंदी गृहस्थान वाद मांडला होता त्याला हिंदीत म्हटल—कारण आमची चर्चा ह्या गृहस्थाशी हिंदीतच चालली होती—"क्यों आपकी बिबी भाग जायगी ये आपको डर है क्या " त्या बाईची ही रामबाण मात्रा अशी लागू पडली की पुढे त्या गृहस्थाच्या तोंडातून शब्दच निघाला नाही. ह्या बोलण्यान तिन त्याचीच दाढ बंद केली अस नाही तर श्री रामान ज्या प्रमाणे एका बाणान सात छेदून टाकले अस पुराणांतरी आहे त्या प्रमाणे तिन त्याच शब्दांनी डब्यातील सर्व माणसांची तोंड बंद केली.

हिंदुसमाजावर परिणाम करणारे—काही काही बाबतीत क्रांति घडवून आणणारे कायदे कोणते झालेत ते विषयाला धरून संगतवार ह्या भागात सांगितले आहेत. ह्या भागात घडलेल्या घटना निरनिराळ्या

वेळी घडलेल्या आहेत. दरम्यानच्या काळात आणखीही घटना घडल्या त्या विषयाला अनुसरून न सांगता कालानुक्रमाला धरुन सांगण्यात येईल. व म्हणूनच मागे १९४१ सालाकडे जाव लागेल व तिथून सुरवात करावी लागेल.

## कापूस शेतकऱ्याची दाद घ्या

सन १९४१ च्या बजेट सेशनमधे फेब्रुवारी महिन्यात मी आणलेल्या ‘ हिंदु म्यारिएज डिसएब्लिटीज रिमुव्हल बिल ’ चा इतिहास वर दिला आहे. त्याच बजेट सेशनमधे मार्च महिन्यात कापूस पिकविणारांना मदत करण्यासाठी मी एक ठराव आणला. त्या वेळेला कापसाची किंमत चाळीस (४०)रुपये खंडी प्रमाणे होती व कापसाच पिकही ६ (सहा) आणे ( ८ ) आण्याच्या वर नसे. शेतकरी बुडण्याच्या पंथास लागला होता. अशा ह्या बिकट प्रसंगी त्याला हात देण्याकरिता ‘ मध्यवर्ति कापूस समितीन जानेवारी १९४१ मधे केलेल्या शिफारशी अमलात आणाव्या अशा आशयाचा तो ठराव होता. ह्या ठरावातील भाषणात मध्यप्रांतातील व इतर प्रांतातील शेतकऱ्यांच्या मोर्च्यांचे व इतर चळवळीचे वर्णन करुन मी म्हटले आहे “ १९२९ ते १९३९ पर्यंत लागोपाठ शेतकरी बुडत आला असता त्याला कोणीही मदतीचा हात दिला नाही. उलट सरकारी नोकर, पेनशनर, कारखानदार व कामगारांचे पुढारी इत्यादि सर्व शहरवासीयांनी धान्यादि शेतमालांच्या किंमती वाढत आहेत अशी ओरड सुरु केली व त्यामुळे सरकार किंमतींचे नियंत्रण करण्यास प्रवृत्त झाले. कारखान्यात तयार झालेल्या वस्तुंच्या किंमतीचे नियत्रंण केले

* असते तर त्याबद्दल माझे काही म्हणणे नव्हते. *

| सरकार आपल्या करिता काही करीत नाही असा जर |
| शेतकरी वर्गाचा समज झाला तर त्याच्याकडूनहि |
| सहायाचा हात पुढे न झाल्यास मला आश्चर्य वाटणार |
| नाही. शिवाय उपासमार होणारे लोक लढाई करण्याला |
* समर्थ तरी कसे होणार ? *

## वस्तूंच्या भावाच्या नियत्रंणाला प्रांतिक सरकारच जबाबदार

व्यापारमंत्री सर रामस्वामी मुदलियार हे उत्तर देताना म्हणाले 'भाव नियंत्रित करण्यात आले ते प्रांतिक सरकारच्या विनंतिवरून होय. पण हे नियंत्रण कापसाला लागू नव्हते. ते फक्त धान्यालाच लागू होते. किंमतीत मामुली वाढ होण्यालाहि प्रतिबंध करणे हा सरकारचा केव्हांच उद्देश नव्हता. इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांना थोडा बहुत बाजार भाव वाढीचा फायदा मिळाला तर कोणी तक्रार करू नये असेंच सरकारने म्हटले होते. **सरकार आणखी किंमती घसरू नयेत म्हणून स्वतः कापूस खरेदी करण्याची योजना आखीत आहे.** कापसाचा प्रश्न नाजुक व बिकट झाला तर गिरणी मालक व कापूस पिकविणारे यांच्या प्रतिनिधींची एक परिषद भरवून त्यांच्या विचाराने तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल असे आश्वासन देतो."

## शेतकऱ्यांचा विश्वासघात करणाऱ्या प्रतिनिधींचा समाचार असा घ्या

एकंदरीत काय की शेतकऱ्यांच्या बाबतीत धान्यादि शेतीच्या मालाचे भाव निजवण्यात प्रांतिक सरकार सर्वस्वी दोषी होत व प्रांतिक सरकार बनल होत लोकांच्या प्रतिनिधींच. तेव्हां लोकांचे प्रतिनिधीच जबाबदार. लोकांचे बरेचसे प्रतिनिधी खेड्यातील मतदारांनी निवडून दिलेले. काय उत्तम रीतीन बहुजनांच म्हणजे खेडयातील लोकांच हित संभाळल ह्या प्रतिनिधींनी ! ह्यांच्या सारखे विश्वासघात करणारे हेच ! निवडणुकीच्या वेळी खेडयापाडयातल्या मतदारांना त्याची मत मिळवण्यास गेले की त्यांच्याच हिताच्या गप्पा ! निवडून आल्यानंतर दिलेल्या आश्वासनांचा विसर पडला. ह्या झोपी गेलेल्यांना खेडयांतील मतदार-अशिक्षित, असंघटित व गरीब-जाग करण्याकरिता कोठे व कसे जाणार ? बर ! ह्या प्रतिनिधीला त्यान झोप काढली म्हणून जाग तरी कस करणार ? त्यांच्या हातात त्या प्रतिनिधीच प्रतिनिधीत्व काढून घेण्यास काही उपाय आहे का ? नाही. फेर निवडणुकीच्या वेळी ह्यांच्याच पैकी कोणी उभे राहिले

तर म्हणतात की आमच्या चुकांकडे दुर्लक्ष करा. आहे ही 'निवडणुक महात्मा गांधीची आहे' त्यांच नाव ठेवा. 'कांग्रेसची इज्जत राखा'. खेडुत भावनावश होऊन निवडून देतो. पण परिणाम काय ? महात्मा गांधीन वारंवार घोषणा केलेल 'रामराज्य' ह्यांना मिळत का ? नाही. उलट त्यांची ह्या प्रतिनिधीसंबंधान खूप बोंब. तो एकदा निवडून आल्यानंतर त्याच मतदार काहीही वाकडे करू शकत नाही ही आहे त्याची

* असहाय स्थिती ! ह्याला तोड एकच. प्रत्येक प्रतिनि- *
| धीला आपल्या मतदारांना वर्षांतून एकदां तरी भेटण |
| आवश्यक केल पाहिजे व अशा रीतीन मतदारांना |
| त्याचा समाचार घेण्याची संधि दिली पाहिजे. त्याच |
| प्रमाणे ह्या प्रतिनिधीच्या Constitueney मतदार |
| संघातल्या मतदारांनी बहुमतान अविश्वासाचा ठराव पास |
| केल्यास प्रतिनिधीच प्रतिनिधीत्व रद्द झाल पाहिजे. |
* अस घडून येण्यास मतदारांच्या संघटित संस्था ठिक *

ठिकाणी खेडयात स्थापणे आवश्यक आहे.

## कापसाच्या किंमतीच्या बाबतीत सरकारचा पिच्छा पुरवला

सर रामस्वामी मुदलियारं ह्यांनी आश्वासन दिल्यानंतरही परिस्थिति निवळली तर नाहीच पण उलट बिकट झाली-नव्हे दिवसें दिवस होत आहे अस पाहून १९४१ च्या आक्टोंबरमधे कापूस पिकवणाऱ्या शेत-कऱ्यांना विशेषतः आखुडधाग्यांचा कापुस उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्याना तात्काळ पुरेशी मदत करण्याबाबतच्या माझ्या कामतहकुबीच्या सुचनेवर चर्चा झाली. व्यापारमंत्रि सर ए. स्वामी मुदलियार यांनी आपल्या भाष-णात हिंदी शेतकऱ्यांच्या हिताचा प्रश्न सरकारच्या डोळ्यापुढे सतत असतो असे सांगितले ह्यानंतरही कापूस शेतकऱ्याच्या हिताच्या दृष्टिने अनेक कामतहकुबीच्या सुचना आणण्याचे, प्रश्न टाकण्याचे व वर्तमान-पत्रातून 'कापूस शेतकऱ्याची वाट काय ?' इत्यादि लेख लिहिण्याचे काम सुरूच ठेवले. अशा रीतीन सरकारला मी एक मोठा न्युसन्स

Nuisance वाटू लागलो. सर रामस्वामी मुदलियार म्हणाले सुद्धां की शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलणारा असा असेंब्लीत मीच एक आहे व मी मोठ कडू bitter भाषण करतो. ह्याच सेशनमध्ये सरकारला त्यांनी कापुस खरेदी करण्याकरिता काय रक्कम खर्च केली वगैरे प्रश्न मी विचारले.

अशा रीतीन दुर्दैवी व मेटाकुटीस पोंचलेल्या शेतकऱ्यांचा प्रश्न एक सारखा सरकारपुढे ठेवत गेलो. एकामागून एक नापिकेचे चटके बसून होरपळलेल्या व सरकारच्या व सावकाराच्या तगाद्यामुळे झोप उडालेल्या दोन शेतकऱ्यांचे हाल माझ्या चांगल्याच परिचयाचे झाले होते. त्यांच्यावर अस्मानी व सुलतानी कहर गुदरला होता. अशा ह्या प्रसंगातून त्यांची सुटका करण्याकरता सतत प्रयत्न करण्याची गरज होती. तस करण्यास मी चुकलो नाही.

## जशास तसे

ह्या लढाईच्या कालात ज्याप्रमाणे हिंदुस्थानातल्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीची काळजी घेतली त्याचप्रमाणे हिंदुस्थानाबाहेरच्या हिंदी लोकांचीही काळजी घेतली त्यांना विसरलो नाहीं. मध्यवर्ति असेंब्लीवर एक वर्ष बहिष्कार टाकल्यामुळे जे 'जशास तसे' बिल बारगळले होते ते मी फिरून १९४१ च्या नोव्हेंबरच्या असेंब्लीच्या बैठकीत सादर केले. ते सादर करण्यापूर्वी मी प्रश्न टाकून हे दाखवून दिले की १९२१ साली भरलेल्या इम्पेरीयल कॉन्फरन्समधे युनियन गव्हर्नमेंटन (साऊथ आफ्रिकन सरकारन) हिंदुस्थानी लोकांना नागरीकाचे पूर्ण हक्क देण्यास नाखुशी दाखविली व १९२७ सालचा 'केप टाऊनचा' करारही पाळला नाही हा केपटाऊनचा करार अगदी गोलगोल मिळमिळीत व फोल होता. आफ्रिकेत राहणाऱ्या हिंदुस्थानी लोकांना पूर्ण संधि देऊन त्यांची शक्य आहे तितकी उन्नति करण्यासंबंधी होता. ह्या ठरावांत नागरीकाच्या हक्कासंबंधी काहीही म्हटलेल नाही.

माझ ' जशास तसे ' बिल ग्रेट ब्रिटन, तिच्या वसाहती—क्राऊन किंवा डोमिनीयन स्टेटस्‌वाल्या—ब्रिटीश पझेशन्सला लागू होणार अस होत. ह्या सुमारास सिलोन व ब्रर्मा ह्या दोन्ही देशात हिंदुस्थानला—म्हणजे हिंदुस्थानी लोकांना वाईट रीतीन वागविण्यात येत असे. ब्रर्मामधे तर ब्ररमीज लोकांनी ह्यांच्या विरूद्ध बंडाच निशाणच उभारल होत. विशेषेंकरुन मद्रासकडील हिंदु रेड्डी सावकार लोक व ब्ररमीज बायाशी लग्न करणारे मुसलमान व्यापारी लोक ह्यांच्या विरुद्ध दंगे झाले होते व ब्ररमीज सरकारच वर्तनहि पक्षपाती होत.

' जशास तसे ' बिल सादर केल्यानंतर आणखी जे प्रश्न रुपान किंवा कामतहकुब्रीच्या काळ्या विरुद्ध गोऱ्यांचा द्वेष व पक्षपात (Discriminatory treatment) नाहीसे करण्याकरिता प्रयत्न केलेत त्यात एक महत्वाची कामतहकुब्रीची सूचना होती.

## युनायटेड नेशन्सच डीक्लेरेशन पाहिजे

१९४२ च्या फेब्रुवारी महिन्यात गोऱ्या व काळ्या लोकांना सारखेच राजकीय व सामाजिक हक्क आहेत अस दोस्त राष्ट्रांच्या (allied nations च ) हे एकंदर २६ होते-कडून वदवून घ्याव ही कामतहकुब्रीची सुचना मी पाठविली. पण गव्हर्नर जनरलन ह्या सूचनेवर चर्चा होऊ देण जनतेच्या हिताच नाही अस अध्यक्षाला कळवून चर्चा होऊ दिली नाही. मी आणलेली सूचना जर मंजूर झाली असती तर साऊथ आफ्रिका, ऑस्ट्रेलिया वगैरे देशाना ते जी Disctiminatory treatment देत होते ती ब्रंद करावी लागली असतीना ! लढाईचा समय होता व हिंदुस्थानच्या मदतीची ह्या राष्ट्रांना गरज होती व म्हणून ठरावाप्रमाणे वागण भाग पडल असत. चर्चेला माझा ठराव आला असता तर तो पासच्च झाला असता. कारण काळ्या गोऱ्यांना समान वागणूक द्यावयाची नाही अस कोणत्या तोंडान आमच सरकार म्हणू शकत होत.

## च्यांगकाय शेक कडून अपेक्षा

वरच्या कामतहकुबीची तशी वासलात लागल्यानंतर आणखी एक संधि आली तिथही डाव टाकून पाहिला. ह्याच सेशनच्या वेळेस 'च्यांग काय शेक' व 'म्याडम च्यांग काय शेक' हिंदुस्थानात आले. त्या वेळेस जगभर त्यांचा उदो उदो चालला होता. हिंदुस्थान सरकारन त्यांचा सत्कार करण्याकरिता अनेक प्रसंग घडवून आणलेत. त्यापैकीच एक असेंब्लीतर्फे प्रसंग घडवून आणावा असा त्यांनी इरादा केला. "च्यांग-काय शेक व म्याडम च्यांग काय शेक" ह्यांनी चायना व जगाला हुकुमशाही राष्ट्राशी लढण्यास जी मदत केली त्या बद्दलची पसंती दर्शविणारा ठराव आणायच ठरवल. ह्याच परिस्थितीचा फायदा घेऊन मी एक बांब गोळा टाकला. ह्या ठरावाला एक( amendment) उपसूचना पाठविली ती अशी 'X X आणि असेंब्ली अशी आशा करिते की 'गोऱ्याची काळ्यावर जी हुकुमशाही आहे ती नाहीशी करुन काळ्यागोऱ्या लोकांची समता equality of treatment racial equaliti स्थापन करण्यास ते मदत करतील.' ही सूचना पाठवतांना माझ्या मनांत जपान ह्या एशियाटीक स्वतंत्र राष्ट्रान पहिली जागतिक लढाई संपल्यानंतर व्हर्सैलच्या तहाचे वेळी Racial equality ( इक्वालीटी ) चा प्रश्न मांडला होता ही गोष्ट होती. त्या वेळेला जपान इंग्लडंचा ally दोस्त होता. मि. ह्युजेस ( Huges ) ह्या ऑस्ट्रेलियन मिनिस्टरन त्या वेळेला ह्या ठरावाला हरकत घेतली होती व ती मंजूर झाली होती. आता चायना हे एशियाटीक राष्ट्र इंग्लडच दोस्त Ally होत व इंग्लंड, अमेरिका वगैरे दोस्त राष्ट्रान 'च्यांग काय शेकला डोक्यावर घेऊन नाचायला सुरवात केली होती. तेव्हां हिंदुस्थानकडून असेंब्ली ठरावाच्या रूपान ' च्यांग काय शेक ' वर एक जबाबदारी टाकावी असा विचार केला व वर दिलेली उपसूचना पाठविली.

## सरकारच्या काळजान ठाव सोडला

ही अनपेक्षित उपसुचना गेल्याबरोबर धावपळ मचली सरकारी मेम्बर्सची. उपसूचना अशी नव्हती की अध्यक्ष नियमबाह्य ठरवू

शकता गव्हर्नर जनरलला तर नियमबाह्य ठरविण्याचा अधिकारच नव्हता जर बेकायदा असती तर अध्यक्षालाच तेवढी हरकत घेता आली असती. मग प्रश्न पडला सरकारला काय करावं ? चर्चा कशी टाळता येणार ? ह्या उपसुचनेवर चर्चा सुरु झाली म्हणजे equal treatment नको म्हणणारा कोण लेकाचा होता? इंग्रज सभासदालाहि तेच म्हणणं भाग होतं. मग त्याच्या पोटात काही का असेना. उपसुचनेसुद्धां ठराव पास झाला असता व असा पास झालेला ठराव च्यांग काय शेक कडे गेला असता म्हणजे त्याला सरकारच्या दृष्टिने संकटांतच टाकण्या सारखं झालं असतं. सरकारला स्वतः काही करावयाचं नाही. आम्हाला दुसऱ्याकडून करवून घेऊ देणं नाही. विषय पडला बाका व खटखटीचा. मी उद्योग करत होतो माझ्या Racial Discrimination काळ्या गोऱ्यांच्या बाबतीत जो भेद होता तो घालवून देण्याच्या कामात Allies स्नेही मिळवण्याचा. पुर्वी २६ नेशन्स राष्ट्रांची मदत घेऊ देण्याचा माझा ठराव गव्हर्नर जनरलने चर्चेस घेता येत नाहीं म्हणून अध्यक्षास सांगून पाठवलं. पण आता ही सूचना-, हे भूत बोकांडी बसणार होतं. सरकार कैचीत सांपडलं. मी उपसूचना मांडणारच असं जेजे सरकारी बिनसरकारी सभासद माझ्याकडे आले होते त्यांना सांगितलं. असेंब्लीत गभीर वातावरण उत्पन्न झालं. अखेरीस मुस्लीम लीग पक्षाचे असेंब्लीचे सभासद डॉ. सर झियाऊद्दीन अहमद-आग्रा युनिव्हर्सिटीचे' व्हाईस च्यान्सेलर माझ्याकडे आलेत. माझ्या दाढीला हात लावून ते म्हणाले 'अरे भाई उस बिचारे बुढे के पिछे क्यों लगा मान जा' च्यांगकाय शेक बद्दलचा ठराव मांडणार होते बापूजी अणे-लीडर आफ धी हाऊस, बापुजी अणे व तो, बापुजी एक्सिक्युटीव्ह कौन्सीलर होण्यापुर्वी बरेच वर्षं पावेतो 'इंडीयन्स ओव्हरसीज' स्टयांडींग कमिटीचे सभासद होते. त्यामुळे म्हणा किंवा त्यांच्याबद्दल एरवीही आदर असल्यामुळें म्हणा हा वृद्ध व संभावित गृहस्थ माझ्याकडे येऊन मी माझी उपसूचना न मांडण्यासंबंधी विनवणी करू लागला. इथे एवढे सांगणे जरूर आहे की स्वतः बापुजींनी मला ठरावाची उपसूचना काढून

घेण्यासंबंधी एक अक्षरही केव्हां म्हटल नाही. माझा स्वभाव ह्या बाब-तीत मोठा हट्टी आहे हे सर्वांनाच ठाऊक होत. मी भीड कोणाचीच ठेवत नव्हतो. भीडमुर्वत कोणाची ठेवायची नाही म्हणूनच मी सरकारी सभासदांच्या इथे चहाला किंवा त्यांच्या सन्मानार्थ असलेल्या समारंभाला जात नव्हतो. असो. मी डॉक्टरच्या विनंतीला मान दिला नाही. तेव्हां थोड त्रासून, थोड चिडून ते म्हणाले 'अरे यार तू भी अजब अदमी-अदमी नहीं बला है. किसके उपर क्या बुरा वखत लायेगा कह नहीं सकते. भाई खुदाके लिये मान जा. इनसान भी तो कोई चीज होती है." मी डॉक्टरला म्हणालो 'उपसुचना मांडणार नाही एका शर्तीवर. मला मुख्य ठरावावर बोलू दिल पाहिजे. असेल कबूल तुम्हाला व बापूजीला तर पहा. मला बोलायला संधि द्यायला पाहिजे. झाल, तर मग उपसुचना हाऊस समोर येणार नाही. मला तडजोडीचा हाच एक मार्ग दिसतो." उपसूचना हाऊस समोर मांडून तिच्यावर चर्चा, नंतर मत मोजणीन जे काम होणार होत ते माझ्या भाषणान तितक्या प्रमाणात होणार नव्हत हे मी समजत होतो. पण बोलायला संधि मिळाल्यानंतर माझ्या भाषणाला वर्तमानपत्रातून प्रसिद्धि मिळाली असती व ह्या संबंधी खळबळही मचली असती व ती च्यांग काय शेकच्या लक्ष्यात आली असती. Racial Discrimination संबंधी स्पष्टपणे व उघड उघड त्याच्या नजरेला सर्व काही आणून देऊन, होणाऱ्या सत्काराबरोबरच त्याच कर्तव्य काय हे मी सांगणार होतो. डॉ. सर झ्याऊद्दीन मला म्हणाले 'ये हो सकता है' व लोकनायक बापुजी अणे कडे घेउन गेले. माझी अट त्यांना सांगण्यात आली. त्यानींही मला ठरावावर बोलता येईल अस सांगितल. मी म्हणालो, "अशी सवलत जर मला मिळणार असेल तर मी उपसूचना मांडणार नाही."

## बुढ्या पेचान मात केली !!

च्यांगकाय शेकचा ठराव मांडल्या गेल्यानंतर मला अध्यक्षान सर अब्दुल रहीम ह्यांनी विचारल, "उपसूचना मांडावयाची आहे का ?" ह्या

चेअरला मी म्हणालो 'उपसूचना मांडावयाची नाही पण बोलावयाच आहे.' अध्यक्ष म्हणाला 'बोलण्याची बाब निराळी आहे. तूर्त उपसूचना मांडावयाची आहे का हे सांगा–' मी 'मांडावयाची नाहीं' अस म्हणालो. एक दोघांची भाषण झाल्यावर मी आपल्या जागी उभा राहिलो व म्हणालो 'ह्या ठरावावर मला बोलायच आहे.' अध्यक्ष बुद्धा म्हणाला "प्रघात असा आहे की अशा ठरावावर पार्टी लीडर्सनीच बोलाव. आपणाला बोलता येत नाही." ह्या रूलींगनतर बोलण अशक्य झाल. Racial Discrimination रेशीयल डासक्रीमेनिशन उडवून देण्याचा माझा बार हा असा हुकला. धोका खाण्याची ही माझी पहिलीच वेळ-चाट बनलो.

अशा रीतीन सरकारला पेचात पकडण्याचे दोन बाके (Strategic स्ट्र्याटेजीक) प्रसंग हातचे गेलेत पण येवढ्यान काही संपल नव्हत. ह्या पुढेही हिंदुस्थान बाहेरच्या लोकांच हीत पहाण्याच्या बाबतीत माझ्या कामतहकुबीच्या सूचनांनी सरकारशी सामना होतच गेला. मी सरकारचा पिच्छा पुरवतच गेलो.

## रत्नमंजुषा ४ थी

# युद्धाच्या आघाडीवरील चकमकी

नशीब कस अकल्पित रीतीन खुलल!–हुजुरपागेजवळ सैनिकी शिपायांची गैरवर्तणुक–क्रिप्स आले व हात हालवत गेले–बहुढंगी राजाजीची हिंदुस्थानच्या फाळणीची योजना–जारे मारबत Quit India बंडखोर म्हणून ट्रान्सफ्युजन ऑफ ब्लड नही-बादशहाशी हस्तांदोलन केलेला बेकार मुलगा-गांधीजीचा उपवास–सांगा आम्ही कस वागाव-एका इंग्रजान मागितलेली तऱ्हेवाईक माफी-जशास तसे-शेतीच्या कायम घडी बसविण्याचे प्रयत्न–अहो असेंब्ली सेशन आल की ताप भरतो–All thc girls are in love with you-पेनशनराना नोकरीत घेतल्यान सार्वजनिक नुकसान–हिंदुसभेन बोलाविलेल्या शेतकी परिषदेच अध्यक्ष होण्याच नाकारू नका–संत पाचलेगावकरांनी केलेले माझ अपूर्व स्वागत.

—:[▭]:—

लढाईच्या दिवसात ठिकठिकाणी सैन्यातील शिपायाकडून त्यातहि गोऱ्या व त्यांच्या ऑफीसराकडून–जनतेला अनेक प्रकारे त्रास पोंचू लागला होता. सरकारच वर्तनहि 'डीफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट मुळे अरेरावी बनल होत. ह्यांची दखल घेण जरूरच होत ते करित असतांना व इतरही बाबीत सरकारच्या व माझ्या कित्येक चकमकी झाल्या त्या पैकी प्रमुख ह्या मंजुषेत देण्याच योजल आहे.

## नशीब कस अकल्पित रीतीन खुलल !

अपमानच पर्यवसान मानांत व्हाव ! आश्चर्यच !! अघटित घटना म्हटली पाहिजे, तशी ती झाली खरी. १९४२ च्या जानेवारी महिन्यात

श्री त्रिवेदी आय्. सी. एस्. त्या वेळचे मध्यप्रांत सरकारचे चीफ सेक्रेटरी हे आपल्या एका नातेवाईकाला रेल्वेच्या सेकंड क्लासच्या डब्यात बसवण्याकरिता घेऊन गेले. त्या डब्यांत फोर्ब्स नामक एक गोरा सोजीर होता. त्यान त्यांच्याशी ( त्रिवेदीशी ) उद्धटपणान वागून आत येण्यास विरोध केला. ही बातमी मी वर्तमानपत्रात वाचल्यानंतर मला वाईट वाटले. गृहस्थ आनंदी व खेळकर वृत्तीचा. त्याचा माझा संबंध आला तो डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज व मी स्वराजिष्ट सभासद असताना. हा पहिला प्रसंग. दुसरा सायमन कमिशनवर बहिष्कार टाकल्यानंतर सायमन कमिशन नागपुरला आले त्यावेळी. त्यांचा अपमान झाला तेव्हां त्याच उट्ट काढण्याकरिता व गोऱ्या शिपायांना व गोऱ्या लोकांना धडा मिळावा म्हणून मी लगेच असेंब्लीत प्रश्न टाकला. त्या वेळेला श्री बेवूर आय्. सी. एस्. हे ही मध्यप्रांतांतीलच सेक्रेटरी होते. त्यानी सांगितल फोर्ब्स साहेबानी त्रिवेदींची माफी मागतली. ह्या माफिचही एक गौड बंगालच आहे ! खरच जर माफी मागितली होती आणि फोर्ब्सची व त्रिवेदी ह्यांची दिलजमाई झाली होती तर ज्या उतारूबद्दल हे सर्व प्रकरण उपस्थित झाल होत त्याला निराळ्या डब्यांत बसण का भाग पडल ? फोर्ब्सला उशीरान का होईना जर शहाणपण सुचल होत किंवा सुचवल्या गेल होत तर फोर्ब्सनहि त्या उतारूला त्याच्या डब्यात बसवा म्हटल नाही व त्रिवेदी ह्यांनीहि स्वतःच्या इभ्रतीचा प्रश्न म्हणून त्या प्यासेंजरला बसवल नाही. बर असो.

ह्याच घटनेवरून रेल्वे मेम्बरला प्रश्न केला की फोर्ब्स नामक उतारून आपल्या डब्यात एका उतारूला येण्यास अडथळा केला (Resist केल ) तर ह्या त्याच्या कृत्याबद्दल रेल्वे ॲक्टच्या सेकशन १०९ खाली त्याच्यावर फोजदारी मुकर्दमा करणार आहा का ? रेल्वेमेम्बरन फोर्ब्सचा गैरसमज झाला होता. त्याला परिस्थिति सांगितल्यानंतर त्यान माफी मागितली आणि शेवटी ह्या मेम्बरन मला म्हटल श्री. त्रिवेदी ह्यांच उदाहरण मी गिरवाव व जास्त खटखट ह्या बाबीत करू नये. ह्या माझ्या उठाठेविचा परिणाम काय झाला ? श्री. त्रिवेदी ह्यांना चांगुलपणाच

सर्टिफिकेट मिळाल. व तेवढ्यावरच त्याची संभावना झाली अस नाही तर श्री त्रिवेदी ह्यांची हिंदुस्थान सरकारच्या दळणवळण खात्यात ( Transpor t) ॲडिशनल सेक्रेटरी म्हणून नेमणूक करण्यात आली. म्हणजे माझ्या ह्या प्रश्नान श्री. त्रिवेदी ह्यांना प्रसिद्धी मिळाली व श्री. त्रिवेदी लख्ख प्रकाशात आले ( Limelight ) व त्यांना गुणाबरोबरच चांगलेपणाच्या-भलमणसाईच्या-सर्टिफिकीटामुळे बढती मिळाली किंवा अपमानाची ( Cons olation prize मिळाल ) भरपाई झाली अस म्हणता येण्यास जागा झाली. कस ते पहा. अपमान प्रकरण जानेवारीतील. मी लगेच ह्या संबंधी प्रश्न पाठविला. असेब्लीत आला तो २३-२ ४ २ ला व तीनच दिवसांनी २६-२-४२ ला श्री. त्रिवेदी ह्यांची हिंदुस्थान सरकारच्या दळणवळण खात्यामधे ( Transport ) ॲडीशनल सेक्रेटरी म्हणून नेमणूक करण्यात आली.

## हुजुर पागेजवळ सैनिकी शिपायांची गैरवर्तणुक

सैनिकी शिपायांच्या गैरवर्तणुकीबद्दल तक्रार करण्याचे अनेक प्रसंग येत. पण जरा गंभीर स्वरूपाचा प्रकार घडला पुण्यास हुजुरपागेजवळ. ह्या विषयाची चर्चा व्हावी म्हणून मी कामतहकुबची सूचना आणली. ती नियमबाह्य नव्हती. पण तिची चर्चा होण्यास सरकारचा विरोध होता. तेव्हां तिची चर्चा व्हावी म्हणून कमीत कमी २५ सभासदांची सम्मति पाहिजे होती ती न मिळाल्यामुळे सुचना चर्चेस येऊ शकली नाही. शिपायांच्या गैरवर्तणूकीबद्दल चर्चा होऊ देण्याच्या बाबतीत सरकार फार ( touchy ) टची होते. हर हिकमतीन चर्चा टाळीत होते व कांग्रेसच्या गैरहजरीत ते नेहमीच बहुमतात असे. तेव्हां व्हायचा तोच परिणाम झाला.

## क्रिप्स आले व हात हालवत गेले

ह्याच लढाईच्या वातावरणात लढाईकरण्याकरिता हिंदुस्थानान स्वखुशीन जास्त मदत करावी म्हणून सर स्टॅफोर्ड क्रिप्स

ता. २३-३-१९४२ रोजी ब्रिटीश वॉर क्याबिनेटचे हिंदुस्थानला जास्त राजकीय हक्क देण्यासंबंधी एक (Proposal) योजना घेऊन आलेत. ह्या वेळेला कांग्रेसचा असेंब्ली बहिष्कार कायम होता; व सरकार युद्ध संबंधी जे प्रयत्न करत होते त्या बाबतीत कांग्रेस सहकार करीत नव्हत. तेव्हां काही थोडेबहुत राजकीय हक्क देऊन, कसही करून कांग्रेसच मन पालटेल अस त्यांना करावयाच होत. त्या प्रपोजलची चर्चा—तिच स्वरूप व तिजबद्दलच असेंब्लीच मतप्रदर्शन व्हावी म्हणून मी 'हिंदुस्थान संबंधी वॉर क्याबिनेटची जी योजना तिज संबंधी चर्चा व्हावी' म्हणून काम तहकुबीची सूचना आणली. ती नियमबाह्य नसताहि सरकारन त्या चर्चेस विरोध केला व मग कमीत कमी २५ सभासदांची तशी चर्चा होण्यास सम्मति मिळाली नाही म्हणून ही सूचना बारगळली. क्रिप्स साहेबास राजकीय पुढाऱ्याशी खासगी चर्चा करूनहि जेव्हां काही फायदा दिसेना तेव्हां ते आले तसे गेले. त्या फेरीत निष्पन्न अस काहीच झाल नाही.

## बहुढंगी राजाजींची हिंदुस्थानच्या फाळणीची योजना

क्रिप्स साहेब हिरमुसले होऊन गेल्यानंतर महिन्या दीड महिन्यात राजाजीन आपली योजना–'हिंदुस्थानच्या फाळणीचा पुरस्कार करणारी' ऑल इंडीया कांग्रेस कमिटीच्या मे महिन्याच्या अधिवेशनात मांडली. राजाजीन आपली बाजू मांडण्यात आपल्या वादविवाद करण्याच्या शक्तीची परमावधी केली. हरहुन्नरी पडला राजाजी! 'पंजाबात बहुसंख्य मुसलमान असूनहि तेथील इतर समाज अद्यापी जिवंत आहेतच की नाही! ते त्याना तोंड देऊन पुरून उरले आहेतच की नाहीत!' ह्याचा अर्थ असा की जिनांना त्यांच पाकिस्तान देण्यापासून इतर अल्पसंख्याकांच काही नुकसान होणार नाही. ते मुसलमानाना पुरून उरतील. इथे पाहण्यासारखी आणखी एक गोष्ट आहे. राजाजी मुसलमानांच्या भलेपणाला सर्टिफिकेट देत नाहीत. मुसलमान बहुसंख्य असताही इतर समाज त्याना तोंड देऊन पुरून उरले आहेतच. म्हणजे इतर समाज अल्पसंख्येत असताही बहुसंख्य मुसलमानानांच्या प्रांतात तग धरून आहेत ते आपल्या शक्तिच्या जोरावर!

अल्पसंख्याकांच्या धैर्याला, शूरत्वाला सर्टीफिकेट! राजाजींनी सभेस हजर असलेल्यांच्या डोळ्यात धूळ टाकण्याचा प्रयत्न केला. कसही करून बाजी जिंकावी हा राजाजीचा उद्देश. ' खरच काहो राजाजी, इतर अल्पसंख्य समाज बहुसंख्य मुसलमानाला तोंड देऊन पुरून उरलेत ? राजाजी त्या वेळेला अल्पसंख्यांक असलेले लोक जीवन-शांततेच व सुखाच-जगत होते ते हिंदुस्थान सरकारच्या-इंग्रजांच्या भरवशावर-त्यांच्या सैनिकांच्या दहशतीन. इंग्रज देशांत शांतता ठेवण्याकरिता वाटेल ते उपाय योजील ह्या दहशतीन. मग उगच फसवा फसवीच अरग्युमेंट कशाला ?

राजाजी अल्पसंख्य लोकांच्या धैर्याची सबब पुढे करूनच थांबले नाहीत. राजाजीन आपल्या गारूडयाच्या पोतडींतून सभासदांसमोर असाही एक मुद्दा मांडला की पाकीस्तान देतो म्हटल तर मुसलमानच नको म्हणतील! पाकीस्तान नको अस मुसलमान म्हणतील !! वा ! मेरे राजाजी. ह्या मुद्यापलीकडे आणखी कोणता मुद्दा पाहिजे होता, ऑल इंडीया कांग्रेस कमिटीच मन पाकीस्तान मुसलमानास देण्याकरिता ? ह्या मुद्याला जर आ. इं. कां. कमिटीचे सभासद बळी पडते व ते फाळणीला सम्मति देते व मु. लीग पाकीस्तान द्या अस म्हणते तर मग राजाजी काय म्हणते ? चुकलो मी. माझो हिमालयन मिस्टेक झाली ! पण मुस्लीम लीगची पाकीस्तानची फाळणोची मागणी सहजा सहजी तिच्या पदरात पडती त्याचो वाट काय ? श्री. सन्तानम ह्यांनीही राजाजीच्या म्हणण्याची री ओढली. पण राजाजीची ही सर्व मसलत फसली. आ. इं. कांग्रेस कमिटीच्या सभासदांचा विश्वास राजाजीच्या शहाणपणावर बसला नाही. आणि तो कसा बसावा ? मिस्टर जिनांचा व मुस्लीम लीगचा पाकीस्तानचा आग्रह हा काय त्यांना मुसलमानांची सम्मति नसताहि केल्या जात होता ? जिनांच्या मागे मुसलमान कसे होते, ते त्यांना साथ कसे देत होते—मग त्यांच आर्थिक नुकसान कितीहि कां होईना—हे पुर्वी सांगितलेल्या झांजीबार लवंगी प्रकर्णावरून दिसून आलच असेल. मुसलमान पाकीस्तान नको म्हणतील हे कळायला काय

८५५८.


राजाजीजवळ मनकवडा होता व त्याच्या भरोशावर ते तस सांगत होते ? वास्तविक वस्तुस्थिती निराळी होती.

राजाजीचा मात्रा चालली नाही म्हणून राजाजींचा धीर खचला म्हणता काय ? कशाला नाव घेता. त्या सात्विक मनुष्यान-सत्य व अहिंसेच्या ब्रीद वाल्यान-ह्या सभासदांना दमदाटी दिली. ते म्हणाले " फाळणीचा ठराव मान्य न झाल्यास—अर्थात आ. इं. का. कमिटीला-मद्रास फुटून निघेल. " राजाजी सारख्या थंड डोक्याच्या मनुष्यान अशी जालीम व गरम मात्रा दिली तरी–आ. इं. कां. कमिटी ' थंडा बरफ'. तिच मन कांही वितळच नाही व तीन राजाजीच्या ह्या धमकोची योग्य तीच वासलात लाविली. मद्रासहि जिथच्या तिथच राहिला. फुटून बाहेर गेला नाही. राजाजीला स्वतःच्या प्रांताच मन कळल नाही व सबंध मुस्लीम जात काय करील ह्याची वाच्यता ते करीत होते !!

## जारे मारवत–Quit India

राजाजींची मसलत फसल्यानंतर २।३ महिन्यातच म्हणजे ता. ७ आगष्ट रोजी आ. इ. कां. कमिटीन मुंबईला ' Quit India हिंदुस्थान सोडा' असा आदेश ब्रिटिश सरकारला दिला. सर्व इंग्रजांना हा इषारा महात्माजीन दिला नाही. ते म्हणत मी इंग्रजांचा द्वेष्टा नाही. मला हे सरकार नको आहे. त्या पुर्वी जुलै महिन्यात वर्धा येथील कॉंग्रेस वर्कींग कमिटीच्या बैठकींत "हिंदुस्थानातील सत्ता सोडा" असा सरकारला उद्देशून ठराव गांधीजींनी मांडलाच होता. ह्या 'Quit India क्विट इंडीयाच्या' ठरावानंतर पुढाऱ्यांची धरपकड सुरू झाली. मध्यप्रांतात चिमूर, आष्टी वगैरे ठिकाणी कहर गुदरला. नागपूरलाही बेजबाबदारपणे गोळीबार केल्या गेला व इतर ठिकाणचे तर माहित नाही पण डॉ. परांजपे यांचे दवाखान्यात एक दिवस गोळीबारामुळे एकामागून एक येणारे असे कितीतरी निरूपद्रवी जखमी माणस मी पाहिली. कोणी सडकेन जाणारे होते, तर कोणी आपल्या घरच्या माडीवरील गच्चीवरुन तमाशा पहाणारे. सरकारन शहर टेरराईझ करून (लोकांना भयंकर घाबरवून सोडून) सात दिवसात जिकडे तिकडे शांतता स्थापित केली.

## गोळ्या खाणारे बंडखोर म्हणून त्यांना नाकारलं

### Blood Transfusion

इथा नागपुर येथील गोळीबारान जखमी झालेल्या व दिल्ली येथे जखमी झालेल्या माणसा संबंधी मी प्रश्न विचारले. जाता जाता इथे एक गोष्ट सांगाविशी वाटते. माझे प्रश्न मी असेंब्लीत मेम्बरन उत्तर देण्याच्या तारखेपुर्वी सरासरी एक महिनातरी आधी पाठवत असे. श्री. त्रिवेदी डिफेन्स सेक्रेटरी ह्यांनी नागपुरच्या जखमी झालेल्या माणसा-संबंधी मुत्सद्दी उत्तर दिलं 'लवकर माहिती मिळण्या सारखी नाही' प्रश्न उत्तराच्या पुर्वी सरासरी एक महिना. जखमी झालेल्या माणसांनी सरकारी दवाखान्यातून किंवा खासगी दवाखान्यातून उपचार करून घेतले असले पाहिजेत. तेवढीही माहिती श्री. त्रिवेदीना मध्यप्रांत सरकारकडून मिळवता आली नाही म्हणजे आश्चर्यच ! पण ते तसे सुटले नाहीत. दिल्लीच्या गोळीबारातल्या माणसासंबंधी उत्तर देतांना त्यांची बोबडी वळली व बरीच जिरली.

दिल्लीच्या गोळीबारात जखमी झालेल्यांच्या उपचारासंबंधी त्यांनी टोलवाटोलवीचे उत्तर द्यायला सुरवात केली. पण के. सी. नियोगी-माजी रिहॅबिलिटेशन मिनिस्टर-यांच्या पुरवणी प्रश्नावरून असं दिसून आलं की इरवीन हॉस्पिटलमधे 'बंडखोर' असा त्यांच्यावर आरोप करून त्यांच्या अंगात ब्लड ट्रॅन्सफ्यूजन करण्याचं नाकारलं व त्या वेळेस एक्सिक्युटीव्ह कौन्सिलचे काही मेम्बर्स हजर होते. ह्यावर आणखी उपप्रश्न (Supplementaries) झाले असते पण अशा अडचणीच्या प्रसंगी सरकारी मेम्बरच्या मदतीस अध्यक्ष धावून येतो. तो 'पुढचा प्रश्न' असं म्हणून उत्तर देण्यास अडचण जाणाऱ्या सरकारी मेम्बरची सोड-वणूक करतो.

बंडखोरांस, शत्रूंकडील जखमी झालेल्या पण आपल्या कैदेत असलेल्या सैनिकास वैद्यकीय मदत केली पाहिजे की नाही ? सर्वत्र

केली जाते पण आमची सरकारी हॉस्पिटल मधली मंडळी किंवा सरकार ह्यांची नीति काही निराळी दिसते. सूड घेऊ आहे. शत्रू जरी असला तरी तो कैदी झाल्यानंतर माणुसकी दाखवली पाहिजे की नाही ?

## बादशाहाशी हस्तांदोलन केलेला बेकार मुलगा.

१९४२ चे आगष्ट महिन्याचे सुमारास मुंबईहून मला एका गृहस्थान अगदी काकुळतीस येऊन पत्र लिहिल 'X X' माझा मुलगा बेव्हीन बॉय' म्हणून विलायतेस गेला. काम शिकला. बादशहान त्याच्याशी हस्तांदोलनही केल. तो परत आला. पण त्याला नोकरी नाही. अगदी बेकार आहे. कोणतीहि कमी दर्जाची व कमी वेतनाची नोकरी करण्यात त्याला कमीपणा वाटतो. बादशहान ज्याच्याशी हस्तांदोलन केल त्याला त्याच्या प्रतिष्ठेप्रमाणे नोकरी मिळाली पाहिजे. अशी नोकरी मिळाली नाही म्हणून तो घरी बसला आहे. काही तरी खटपट करा." म्हातारा बिचारा मेटाकूटीस आल्यासारखा दिसला.

पण कोणत्याहि व्यक्तिच काम करायच नाही, एखाद्या वर्गाच काम करायच, त्याच्या तक्रारीच्या बुडाशी काही तत्व असेल तर त्या करिता भांडायच असा माझा नियम असल्यामुळे एक सर्व साधारण प्रश्न टाकला. माझ्या प्रश्नाला सरकारी मेम्बरन उत्तर दिल: 'काहीना सरकारन नोकरी दिली. खासगी कारखानदार ह्या बेव्हीन बॉईजची परीक्षा घेऊ चहातात. सरकारच्या म्हणण्यावर त्यांचा विश्वास नाही." ह्या बेव्हीनबॉइजची— हिंदुस्थानातील तरुणांना यांत्रिक शिक्षण द्यायची विलायतच्या बेव्हीन मंत्र्याची एक योजना Scheme होती.— ह्या मुलाच केवढ कौतुक विलायतेत झाल. बादशहान ह्यांच्याशी हस्तांदोलन केल होत. काहीना वाटल आपण केवढे मोठे आहोत ! काय मान मरातब ! जस 'साहेबान खुर्ची दिली' म्हणणारे समजता त्या प्रमाणे. आणि नेमक्या ह्या अशा खोट्या अभिमानाने काही बेव्हीन बॉईज पेचात सापडले. खोटा अभिमान त्यांच्या

निर्वाहाच्या आड आला. गुणी मनुष्य सुद्धा Prestige च्या भावनेन केंव्हां केंव्हां मोठ्या गोत्यात येतो. एका फिल्म निर्मात्यान सांगितलेली गोष्ट. मुलतानी नावाचे एक फिल्म निर्माते मला १९४३-४४ साली दिल्लीस भेटले. त्यांनी मला ती गोष्ट सांगितली. ते म्हणाले ' एका श्रीमंत मारवाडी निर्मात्याजवळ ( Producer ) एक दक्षिणी फोटोग्राफर होता. हा फोटोग्राफर आपल्या कामात दक्ष पण जरा टेटरच होता. आपल्या फोटोग्राफीच्या शिवाय कोणतही दुसर काम आपल्या धन्याच तो ऐकेना. एक दिवस त्या पुंजीपति निर्मात्यान त्या दक्षिणी फोटोग्राफरला बोलावल व म्हणाला ' तू आमच्या कंपनीत बऱ्याच वर्षापासून नोकर आहेस. मी तुला आजपावेतो कधी प्रमोशन दिल नाही की तुझा दर्जा वाढवला नाही. माझ्या मनातून तुझा पगारहि वाढवावयाचा आहे व दर्जाहि. ' व त्या प्रमाणे त्या निर्मात्यान लगेच केल. दर्जा वाढवला व पगारहि दुप्पट केला ( ४०० चे ८०० शे केले ) ह्या फोटोग्राफरन त्या वाढलेल्या पगारावर नेमतेम दोन महिने काम केल असेल. एक दिवस त्या मालकान—निर्मात्यान–त्या फोटोग्राफरला बोलावल व तू आम्हाला नको म्हणून सांगितल व एक महिन्याची त्याला नोटीस दिली–ह्या पुंजीपतिन आपल्या येथील नोकरीवरून त्याला दूर केला एवढाच त्याच्यावर सूड उगवला अस नाही तर दुसऱ्याकडेहि नोकरी मिळण त्याला अशक्य करून सोडल. कस ते पहा–तो दुसऱ्या कोणत्याहि कंपनीकडे गेला म्हणजे ती त्याच्या पुर्वीच्या कंपनीतील दर्जाची व पगाराची चौकशी करीत व हा पगार आम्ही देऊ शकत नाही म्हणून साफ सांगत बर ह्यालाहि मी कमी पगार घ्यायला तयार आहे अस म्हणता येईना. आपली लाचारी दिसून पडेल ही भीति व त्याहि पेक्षा त्या लाचारीचा फायदा घेऊन भारीच कमी पगार सांगतील ही दुसरी भीति–अशा रीतीन त्या फोटोग्राफर वर बेकार राहण्याचा प्रसंग ओढवला. त्या पुंजीपतीन ह्या फोटोग्राफरला दोन महिन्याकरिता मोठेपणा देऊन व दोन महिन्याच्या पगाराची झीज सोसून जन्माचा बेकार केला. काय सफाईन त्या फोटोग्राफरचा गळा कापला !

## गांधीजींचा उपवास

लोक युद्ध परिस्थितीमुळे त्रस्त असतानाच गांधीजींनी १९४३ च्या फेब्रुवारीत उपवास सुरू केला. त्या वेळेला मी दिल्लीला होतो. उपवासाला कारण झाल होत ते हे. १९४२ च्या कांग्रेसच्या 'क्वीट इंडीया' रिझोल्युशन नंतर देशात बंडाळी माजली. कोठे तारा तोडण्यात आल्या, कोठे गाडीचे रूळ उखडण्यात आले, तर कोठे सरकारी ऑफीसेस जाळण्यात आली. एका ठिकाणी तर डाकबंगल्याला आगही लावून दिली व त्यामुळे तिथे जो सरकारी ऑफीसर होता त्याच्या जीवावर बेतली. असे नानातऱ्हेचे प्रकार घडले. आणि हे सर्व प्रकार होत असताना जमावातील माणसांनी व हे काम करणाऱ्यांनी '**महात्मा गांधीकी जय**' '**महात्मा गांधीकी जय**' असा घोष करावा. सरकारने ह्या सर्व जाळपोळीची जबाबदारी कांग्रेसवर टाकली. त्या बाबतच एक चोपड प्रसिद्ध केल. त्याला उत्तर द्यायच आहे म्हणून मला वर्किंग कमिटीच्या मेम्बर्सना भेटण्याची परवानगी द्या अस महात्मा गांधींनी सरकारला म्हटल. सरकारने परवानगी नाकारली. म्हणून महात्मा गांधींनी उपवास केला.

ह्या उपवासाची प्रतिक्रिया झाली. काही पुरूषांनी व बायांनी असेंब्ली हाऊसवर व एक्सिक्युटीव्ह कौन्सिलर्सच्या बंगल्यावर पिकेटींगला सुरवात केली. बायांच्या-सेविकांच्या-पिकेटींगमुळे प्रश्न फारच बिकट झाला. पण तो युरोपियन व मुसलमान सभासद व एक्झिक्युटीव्ह कौन्सिलर्स ह्यांच्या बाबतीत नाही तर इतरांच्या. कारण काहीही असो-आपली मात्रा तिथे चालणार नाही हे ते जाणून होते म्हणा किंवा तिथे गेल्यास पोलीसाकडून योग्य ती कारवाई करण्यात येईल ह्या भीतीने म्हणा-युरोपियन व मुसलमान ह्यांना त्रास झाला नाही. इकडे अस हे पिकेटींग सुरू असतानाच तिकडे दिवसे दिवस गांधीजींची प्रकृति क्षीण होत चालली. गांधीजींच्या सुटकेचाही संभव दिसेना. तेव्हा लोकनायक श्री अणे, सर होमी मोदी व सर नलिनीरंजन सरकार ह्यांनी आपल्या जागांचे राजीनामे दिले व आपआपल्या गावाकडे जाण्यास निघाले. फक्त श्री ज्वालाप्रसाद श्रीवास्तव

हे गृहस्थ आपल्या एक्झिक्युटीव्ह कौन्सिलरशिपला चिकटून राहिले. खरखोट कोणाला माहित पण त्या वेळेला दिल्लीत ह्यांच्या बाबतीत एक वदंता दाट पसरली होती. म्हणे ह्यांना दे. सावरकरानीच सांगितल होत की तुम्ही एक्झिक्युटीव्ह कौन्सिलरशिपचा राजीनामा देऊ नका.

## सांगा आम्ही कस वागाव

श्री. लोकनायक बापुजी अणे दिल्लीहून यवतमाळला जाण्यास निघाले. ते नागपुरला उतरले. ते नंतर गावी जाण्यास नागपुर स्टेशनवर आले. रेल्वे गाडीत काही लष्करी लोकांकडून त्यांचा अपमान होण्यासारखा प्रकार घडला. तो मी वर्तमानपत्रात वाचला. लगेच एक काम तहकुबीची सूचना आणली. त्यावर युद्धवाहतुक मंत्री सर बेंथाल ह्यांनी ही बातमी सर्वस्वी चुकीची आहे. तस काही एक झाल नाही. उलट एका नॉन-कमिशन्ड ऑफीसरने त्यांना जागा देऊ केली व अणे ह्यांनी त्याचे आभार मानले वगैरे लांब लचक स्टेटमेंट केल व ही चुकीची बातमी पसरविली त्यांच्यावर कारवाई करण्याची सरकारचा विचार आहे असही सांगितल श्री. बापुजी अणे ह्यांनी लष्करी ऑफीसर्सचे आभार मानले अस सांगितल्यावर तहकुबीची सूचना माग घेण भागच पडल मात्र ज्यांनी ही बातमी पसरविली त्यांच्यावर कारवाई करण्याचा सरकारचा विचार जागच्या जागीच जिरला. कारण काय कारवाई केली हे कधी वाचण्यात आल नाही व ऐकण्यातही आल नाही श्री बेंथाल ह्यांची तो पोकळ धमकी ( Bluff ) होती झाल.

मी बजेट सेशन संपवून नागपुरास आलो. स्टेशनवर उतरलो. त्याच वेळेस स्टेशनवरील टिकीट कलेक्टर्सनी सांगितल की वर्तमानपत्रात बापुजी संबंधाने जो अहवाल प्रसिद्ध झालेला होता तो खरा होता व माझी कामतहकुबीची सूचना भक्कम पायावर आधारलेली होती. एवढ म्हणून त्यांनी आपली भीति व्यक्त केली. ते म्हणाले " आम्ही वागाव तरी कस? आम्ही आपली ड्युटी ( Duty ) करावयाला जाव तर हे मोठे माणस आपली भलमाणसाई कायम राखण्याकरिता आमची बाजू लंगडी

पाडतात व जर डयुटी बरोबर केली नाही, तर डयुटी केली नाही हा तर एक आरोप येतोच पण त्या बरोबरच्च लोक आमच्यावर भीतिचा आरोप करतात व आम्ही आपल्या माणसांची कदर करत नाही असहि म्हणतात" त्यांच्या समोरचा पेंच मी कसा सोडवणार ! त्या शिष्टांचा खुलासा खोटा आहे असं का म्हणणार ते जाहीर रीतीन ! बर अशा बाणीच्या प्रसंगी डयुटी न केली तर लोक त्यांना म्हणणारच इग्रजाला घाबरले म्हणून !! "भित्रे बेटे !!" मी मात्र मला आणखी एका शिष्टाचा असाच अनुभव आल्यानंतर ह्या शिष्ट लोकासंबंधी काहीही करावयाचे नाही असे ठरविले. कोणी त्यांचा कसाहि अपमान केला तरी त्यांचा मानभंग होत नाही तर मग आपण तरी ही उठाठेव करा कशाला. ज्या एका शिष्टाच्या प्रसंगाचा मी उल्लेख केला आहे तो असा.

## एका इंग्रजान मागितलेली तऱ्हेवाईक माफी

श्री. लोकनायक बापुजी अणे प्रकरणानंतर काही दिवसाची गोष्ट. सर रामस्वामी मुदलियार, एक्सिक्युटीव्ह कौन्सीलर यांचे बंधु डॉ. ए. लक्ष्मणस्वामी मुदलियार, व्हाईस च्यान्सेलर मद्रास युनिव्हर्सिटी, हे मद्रास स्टेशनवर त्यांच्याकरिता आगगाडीच्या डब्यात रिझर्व्ह केलेल्या सीटवर बसण्याकरिता जात असता एका युरोपियन प्यासेंजरन त्यांना मज्जाव ( Resist ) केला. ह्या युरोपियनवर खटला करण्याच कर्तव्य रेल्वेन केल नाही म्हणून काम तहकुबीची सूचना मी आणली-तर काय आश्चर्य ! रेल्वेमेम्बरन सांगितल की पुढच्या स्टेशनवर त्या मनुष्यान माफी मागितली ! फिरून तहकुबीच्या सूचनेचा बार हुकला. ह्या युरोपियनांना, मग ते लष्करी असोत वा बिनलष्करी आमच्या लोकांना चार चौघांत त्यांचा अपमान करण्याची हुक्की कशी येते कोण जाणे व मग एकांतात माफी मागण्याची उपरति कशी होते कोणास ठाऊक ? हे कोणालाहि गौडबंगालच वाटेल. मी कामतहकुबीची सूचना आणे पावेतो तरी ही माफी कोठेहि प्रसिद्ध झाली नव्हती ! श्री. त्रिवेदी, श्री. लोकनायक अणे व डॉ. ए. मुदलियार ह्या सरकारी व बिनसरकारी सद्‌गृहस्थांचा असा अनुभव आल्यानंतर व मलाच म्हणजे एका अर्थान जबाबदार वर्तमानपत्रांना खोट

पाडल्यानंतर मी कानाला खडा लावला, कोठून झक मारली व ह्या फंदांत पडलो असं वाटलं. ह्या भल्या माणसांच्या कोणी लकतऱ्या तोडल्या तरी आपण काही करू नये असा निश्चय केला.

## Reciprocity Bill

## जशास तसे

माझं ' जशास तसे ' हे बिलही ह्याच बजेट सेशनमध्ये पास झालं. सर गिरजाशंकर बाजपेयी हे सरकारचे ' एज्युकेशन, हेल्थ एण्ड ल्याण्डस व इंडीयन्स ओव्हर सीज ' त्या खात्याचे सेक्रेटरी असतांना साऊथ आफ्रिकेतील हिंदी लोकांना जी वागणूक मिळाली होती तिजबद्दल आणलेल्या ,माझ्या एका काम तहकुबीच्या सूचनेला उत्तर देतांना म्हणाले होते काय करावं आम्हाला म्हणजे हिंदुस्थान सरकारला निव्वळ ( Negotiations ) वाटाघाटीचाच तेवढा एक मार्ग आहे. दुसरं साधन नाही. त्यांनी अशी लाचारी व्यक्त केल्यानंतर हिंदुस्थान सरकारला मी हे दुसरं साधन दिलं. वाट पहात बसलो हिंदुस्थान सरकार काय उजेड पाडते ते. कारण साऊथ आफ्रिकेचं सरकार आपली काळ्या विरूद्धची दुष्ट नीति आमच्या नुसत्या कायदा पास होण्यानं थोडंच सुधरवणार होतं. ते आपल्या नीतिस अनुसरून वागणार. मग आमचं हे सरकार आमच्या असेंब्लीच्या कायद्याचा कसा काय उपयोग करते ते पहावयाचं होतं.

## शेतीची कायमची, भरभराटीची, घडी बसविण्याचा प्रयत्न

मी अशा ह्या अनेक खटाटोपात पडलो होतो तरी शेतकऱ्यांना विसरलो नव्हतो. शेतकऱ्यांना सन १९४३ च्या सुरवाती पासूनच, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रीतीने सरकारकडून त्रास होऊ लागला होता. वऱ्हाड व नागपूर व वर्धा जिल्ह्यात नापिकी झाली होती. अशा ह्या त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी माझ्या अध्यक्षतेखाली 'शाम' टाकीज मधे ' मध्यप्रांत व वऱ्हाडची एक शेतकी परिषद ( ह्या असेंब्ली अधिवेशनाचे थोडे दिवसच पुर्वी ) भरविली होती. ह्या परिषदेचा रिपोर्ट महाराष्ट्रातून प्रसिद्ध

झाला होता. सरकारच्या लेव्हीच्या व धान्य प्रोक्युअरमेंटच्या नीति विरुद्ध शेतकऱ्यांच्या तक्रारी होत्या त्याचप्रमाणे सरकारी नोकर वॉर बॉन्डस् व वॉर लोन्स् शेतकऱ्यांनी घेण्याकरिता ज्या हिकमती लढवत होते त्याचाहि पाढा तेथे वाचल्या गेला होता. सर्व तऱ्हेने शेतकरी त्रस्त झाला होता. शेतकऱ्यांच्या ह्या तक्रारी प्रश्न टाकून सरकारच्या नजरेस आणल्या. ही परिस्थिती बदलावी म्हणून ह्या बजेट सेशनमधेच सरकारला प्रश्न टाकले. पिकांच्या किमान किमती संबंधी सरकार काय करणार ? 'बाजारपेठा शोधण्यासंबंधी सरकार काही करणार आहे की नाही ?' 'लढाई नंतर मंदी येऊन शेतकऱ्यांच नुकसान होऊ नये म्हणून सरकार काय करणार व त्यांना कोणत्या रीतीन मदत करणार ? इत्यादी प्रश्नांना सरकारच एकच उत्तर 'रिकन्स्ट्रकशन कमिटीची एग्रिकल्चरल सबकमिटी-पुनर्विधायक समितीची शेतकी विषयक उपसमिति विचार करून राहिली आहे.'

## अहो असेंब्ली सेशन आल की ताप भरतो

'अहो असेंब्ली सेशन आल की ताप भरतो' हे शब्द एका भल्या सरकारी नोकरान माझ्या पुढे काढलेत. तस म्हटल तर कोणत्याहि सरकारी नोकरान माझी कधी भेट घेतली नाही. मी एकलकोंडा, सरकारी नोकराशी फटकून वागणारा, तसाच हट्टी, असा माझ्याबद्दल सरकारी नोकरात समज. तेव्हां त्यांचा व माझा हुक्कापाणी बंद होता. पण ह्या गृहस्थाची भेट एका चमत्कारीक रीतीन झाली व त्या प्रसंगी त्यान हे शब्द मजसमोर काढले. तो प्रसंग असा.

असेंब्लीतील सेशनमधे एक दिवस मुस्लीम लीगच्या सभासदांनी पुराण वस्तुसंशोधन खात्यासंबंधी प्रश्न विचारून डायरेक्टर जनरलची लांडगेतोड चालविली. प्रश्नहि अशा तऱ्हेचे होते की सरदार संतसिंग असेंब्ली सभासद ह्यांनी संतापून जाऊन अस म्हटल की डीपार्टमेंटच्या फाईल्स ऑफीस मधून बाहेर गेल्या वाचून व मुस्लीम लीगच्या सभासदांना दाखवल्यावाचून असे प्रश्न त्यांना टाकताच आले नसते.

वातावरण अस संतप्त झाल्यामुळे ह्या प्रश्नांच्या मुळाशी जातीयतेचा संबंध आहे अस समजून मी पूरक पण सूचक (Leading questions) असे प्रश्न टाकायला सुरवात केली. मुस्लीम लीगच्या प्रश्नांना उत्तर देणाऱ्या मेम्बरला मी उत्तर सुचवण्याचा प्रयत्न करीत होतो. सरकारी मेम्बर मोठ्या सावधगिरीने व नाखुशीने त्या सुचनांचा स्वीकार करित होता. आणि अशा रीतीन ह्या डायरेक्टरची बाजू थोडी बहुत सांभाळल्या गेली.

त्याच दिवशी संध्याकाळी मी श्री. भाऊसाहेब काळीकर, नागपुरहून कौन्सिल ऑफ स्टेटचे निवडून आलेले सभासद व तत्पुर्वी माझ्याबरोबर प्रांताच्या स्वराजिस्ट कौन्सिल मधे काम केलेले गृहस्थ व स्नेही, ह्यांच्याकडे गेलो व नंतर ते व मी मिळून फिरावयास गेलो. आमच्या त्या सहलीत त्या दिवशी असेंब्लीत घडलेल्या प्रसंगाची भूगर्भ व पुराणवस्तु संशोधन खात्याच्या डायरेक्टर जनरलची-मुस्लीम सभासदांनी चालविलेल्या लांडगेतोडीची-हकीकत सांगितली व सरकारी नोकरांचा बचाव करावयाचा नाही, त्यांच्या मानापमानाच्या व हितानहिताच्या बाबतीत लक्ष घालावयाचे नाही असा माझा नियम असताहि माझ्याच्याने स्वस्थ कस बसवल्या गेल नाही हा वृत्तांत सांगितला व श्री. काळीकरांच्या घरी वापस आलो. त्यांच्या ड्रॉइंगरूममधे पाय टाकताक्षणीच मला एक महाराष्ट्रीय गृहस्थ व एक महाराष्ट्रीयन बाई असे दोघे बसलेले दिसले.

मी ड्रॉईंगरूममधे गेल्याबरोबर पण श्री. काळीकर आत येण्याच्या पुर्वीच बाई ड्रॉईंगरूमच्या बाहेर गेल्या. दोन मिनिटात त्या बाई व श्री काळीकर ड्रॉईंगरूममधे आलेत. आल्याबरोबर श्री. काळीकरांनी त्या गृहस्थाला म्हटल-माझ्याकडे हात करून-"हे तुमच्या परिचयाचे नाहीत. अहो दीक्षित हे माझे स्नेही. आज असेंब्लीत काय प्रकार घडला तो त्यांनी मला सांगितला. कांही अडचणीचा प्रसंग असला तर तुम्ही ह्यांना खुशाल भेटत जा" व मला म्हणाले "भाऊजी हे भूगर्भ व पुराण

वस्तुसंशोन खात्याचे डायरेक्टर रा. ब दीक्षित" ह्यानंतर दीक्षितानी आपली कथा सांगायला सुरवात केली. ते म्हणाले "ह्या मुसलमानांशी कस वागाव हे कळत नाही. काही केल तरी ह्यांचा माझ्या मागचा त्रास चुकत नाही. इथे असेंब्ली सेशनच्या वेळेला हजर असलो तर म्हणतात 'हे इथे का ? ह्यांना काही कामधिम नाही वाटते. रिकामे बसून दिल्लीत काय करतात ? निरनिराळ्या ठिकाणी ही इतकी काम पडली आहेत आणि हे इथेच !' बर बाहेर पहाणी करण्याकरिता जाव तर म्हणतात 'असेंब्ली सेशन सुरू असताना हे बाहेर का जातात ? असेंब्लीत आम्हाला जी माहिती पाहिजे असते ती मिळत नाही. त्यांनी इथेच राहिले पाहीजे व सरकारी मेम्बरला उत्तर देण्याच्या कामात मदत केली पाहिजे' हे झाल इथ राहण्या-संबंधान. आता माझ्या खात्यातील मुसलमानांच्या भरती संबंधाने व बढती संबंधान सांगतो कारण तिथही असाच ताप होतो-माझ्या खात्यात मुसलमा-नांना भरती करण्यासंबंधी जो सर्व साधारण नियम आहे-⅓ चा, तो पाळण्यात येत नाही, अमक्याला बढतीच दिली नाही वगैरे आरोप करतात. माझ धोरण पक्षपाती आहे म्हणतात. अशी ही टीका सतत चालली असते. सळो का पळो करून सोडतात. हे त्यांचे अपवाद वारंवार येऊ नयेत म्हणून मी काही जागा मुद्दाम उत्पन्न करतो व मुस्लीमांना नोकरी देतो. बढतीचा सवाल हा मनुष्याच्या पात्रतेचा आहे. पात्रतेच्या नावान बोंब. तेव्हा ती किटकिट कायमच असते. तेव्हां काय कराव नी कस वागाव काही समजत नाही. असेंब्ली सेशन आल की मला खरोखर ताप चढतो, बेचैन होतो मी." मी त्यांची त्यांना बेचैन करणारी कहाणी स्वस्थ चित्तान काहीही न बोलता ऐकत होतों. त्यांच बोलण संपल्यानंतर त्यांच्या बरोबर असलेल्या बाईनी सौ. दीक्षित ह्यांनी श्री. भाऊसाहेब ह्यांना व मला जेवायला बोलावल. आम्ही सांगितल्या दिवशी त्यांचेकडे जेवायला गेलो.

रा. ब. दीक्षित ह्यांच्या संबंधी जास्त माहिती देण्याची आवश्यकता आहे अस वाटत नाही. ते विद्वान, संस्कृतज्ञ, संस्कृत ग्रंथांचा व देशाच्या

प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचा चांगलाच परिचय असलेले संशोधक बुद्धीचे महाराष्ट्रीयन गृहस्थ. सुसंस्कृत पण भीरू वृत्तीचा. हे येथे नमूद करावेसे वाटते की श्री. दीक्षित माझ्याकडे आपल्या कामाकरिता नंतरही कधी आले नाहीत. मला वाटत त्यांना माझ्या स्वभावाची माहिती मिळाली असावी. असेंब्लीच्या किंवा कौन्सिल आफ स्टेटच्या सभासदांना भेटून स्वतःच्या सुखदुःखाची कहाणी सांगण हा सरकारी नोकराचाही प्रघात होता अस दिसते. शीख व मुसलमान सभासद आपआपल्या जातीच्या सरकारी नोकरांना मदत करतात. शीख हिंदु सरकारी नोकरांना मदत करतात नाही अस नाही.

**All the girls are in love with yoy**

सरकारशी, एक्सिक्युटीव्ह कौन्सिलर्शी, व सरकारी नोकराशी जरी मी छटून वागत होतो–असहकार केला होता तरी मामुली मनुष्याला मला भेटण्याची केव्हांही आडकाठी नव्हती. कोणीही येऊ शकत असे व आपल सुखदुःख सांगू शके. एकदा अस झाल की एक गरीब म्हातारा पार्शी गृहस्थ दिल्लीला असेंब्ली सेशन सुरू असताना माझ्या घरी आला. त्याची मुलगी 'इरवीन' हॅास्पीटल मधे नर्स होती. तिच्या तक्रारीसंबंधी पाढा वाचला व मला दोन तीन कागदाचे क्वारटर शीट्स देऊन म्हणाला 'हे प्रश्न विचारा' मी त्याला सांगितल 'मी हे प्रश्न टाकणार नाही.' तो डोळ्यात अश्रु आणून गयावया करू लागला त्या वेळेला मी सांगितल "प्रश्न विचारण्याची माझी तऱ्हा वेगळी आहे. दुसऱ्यान दिलेले प्रश्न मी टाकत नाही. प्रश्न टाकणाऱ्यावर एक प्रकारची जबाबदारी असते ती मी नेहमी बाळगतो व म्हणून ज्या कोणाला काही स्वतःच्या सुखदुःखा-संबंधी बोलावयाचे असेल त्याने माझी प्रत्यक्ष भेट घ्यावी लागते. त्याला प्रश्न विचारून खोद खोदून माहिती काढून माझी खात्री झाल्यास मी प्रश्न टाकतो एरव्ही नाही. दुसरी एक गोष्ट तुम्हाला सांगतो. तक्रार करणाऱ्या व्यक्तिच्या स्वतःच्याच सुखदुखाचा प्रश्न असेल तर मी त्या बाबतीत हात घालत नाही. पण जर काही सर्वसाधारण तत्त्व सुखदुःखाच्या

कहाणीत गोवलं असेल तरच मी तो प्रश्न हाती घेतो. तेव्हा असं करा तुम्ही आपल्या मुलीला, त्या नर्सला, माझ्याकडे घेऊन या. येतांना तिला भाऊ असल्यास भावानं, नसल्यास तुम्ही तिच्या बरोबर यावं. असं जमत असेल तर या. उगीच कोणाचं सांत्वन करण्याकरिता मला प्रश्न टाकावयाचे नसतात. कोणतही काम करायचं तर मी मन घालून करतो आणि तसं ते करण्याच्या बुद्धीनं सरकारनं उत्तर दिल्यानंतर पुरवणी प्रश्न विचारता आले पाहिजेत अशी तयारी करतो. म्हणून ज्या विषयासंबंधी प्रश्न विचारावयाचे त्या विषयाचा मी पूर्ण अभ्यास करतो. तेव्हां मी सांगितल्याप्रमाणे तुमच्या मुलीला, नर्सला, तुम्ही माझ्याकडे घेऊन या. मला तिच्या जवळूनच ( First hand information ) माहिती पाहिजे आहे. तेव्हां एखाद्या रविवारी दुपारी ३।४ तीन चार वाजता तीन चार तास तिला व तुम्हाला किंवा तुमच्या मुलाला घालवावे लागतील असं समजून त्या तयारीनं या." चार पाच दिवसांनी ती नर्स व तिचा मोठा भाऊ माझ्याकडे आलेत. तिच्याकडून मी सर्व हकीकत ऐकली व त्या हॉस्पीटलच्या मेट्रन ( Inefficient partisan and corrupt ) मधे कार्यक्षमता नाही, ती पक्षपाती आहे. त्याचप्रमाणे अप्रामाणिकही आहे हे दाखविणारे प्रश्न पाठवले. नर्सेस व सिस्टर्सला अनुलक्षून ते प्रश्न होते. प्रश्नांची उत्तर गोलमोल आल्यास पुरवणी प्रश्नाची सरबत्ती माझ्या जवळ तयारच होती. प्रश्न Starred questions पाठवले व त्या प्रश्नांचा नंबर खूप वर लागावा व तोंडी उत्तर देणं भाग पडावं म्हणून व सरकारला चौकशी करण्यास बराच वेळ मिळावा—वेळेच्या अभावी माहिती मिळवू शकलो नाही असं सरकारला म्हणता येऊ नये—म्हणून प्रश्न पाठवल्यानंतर तीन आठवड्यांनी उत्तर देण्याचा प्रसंग सरकारवर यावा अशा रीतीची तारीख शोधली.

सरकारनं माझ्या ह्या प्रश्नांची उत्तर देण्याच्या दिवशी मी असेंब्लींत सरासरी साडेदहा पावणे अकराच्या सुमारास गेलो व आपल्या जागेवर बसलो. माझ्या जागेजवळ ले. कर्नल गिडने ह्या नावाच्या इंडियन मेडीकल सर्व्हीस मधल्या गृहस्थाची जागा होती. हा गृहस्थ अँग्लो

इंडीयन व त्या कम्युनिटीचा पुढारी. हा असेंब्लीच्या कामाला सुरवात होण्यापुर्वी १०।१५ मिनिटे आला व आपल्या जागेवर बसला. इकडे तिकडे ग्यालरीकडे पाहून मला म्हणाला 'मिस्टर देशमुख ह्या लेडीज व्हीजीटर्सच्या ग्यालरीत बघ कशी गर्दी आहे ती' व पब्लीक ग्यालरीमधल्या एका भागाकडे बोट दाखवून म्हणाला 'ह्या इकडेही पहा'. मी पाहयल व म्हणालो 'हो गर्दी दिसते खरी'. तोः-'ह्याच कारण माहित आहे?' मीः-'नाही' तोः-'तुझे आजचे प्रश्न. तुझ्या प्रश्नान इरविन हॉस्पाटलमधे खूपच गडबड उडवून दिली खूप Excitement एक्साईटमेंट. तुझे प्रश्न असे आहेत की त्या मेट्रनन नर्सेसना विचारल ही माहिती हॉस्पीटलच्या बाहेर गेली कशी? ही माहिती तुला कोणी दिली? प्रश्न असे तसे नाहीत. मेट्रनवर शितोडा उडवणारे. ती आहे फिकरीत व नर्सेस आहेत आनंदात. अन् त्या आल्या आहेत इथे कशी काय गम्मत होते व Excitement उत्पन्न होते ती बघण्याकरिता" व नंतर Ladies gallery लेडीज ग्यालरीकडे बोट दाखवून म्हणाला "ती मुलगी दिसते ना. ती माझी Cousin कझीन आहे. इरवीन हॉस्पीटलमधे होती." ह्या गृहस्थाचा स्वभाव फार छटेल व आनंदी. तो मला म्हणाला Deshmukh, all the girls are in love with you" मी हासलो व त्याला म्हणालो. "Thank you for this good news. What a nice Zenana I will have–a garden of roses–Envy of Nababs and Kings. Tell them I have a place in my heart for every one of them and oblige" ह्यानंतर मी माझ्या प्रश्नाची एकसारखी वाट पहात राहलो. अखेरीस माझ्या प्रश्नाच उत्तर दिल्या गेल. ते सर्वस्वी निराशाजनकच. उत्तर होत 'अझून माहिती मिळाली नाही.' मी पुरवणी प्रश्न टाकला 'दवाखाना दिल्लीतला, वेळ चांगला १५।२० दिवस होता आणि अझून माहिती मिळाली नाही म्हणजे काय?" त्यावर सरकारच उत्तरः-आम्ही तुमचे प्रश्न 'तावडतोब' Immediate हा शेरा मारून पाठविले. पण माहिती आली नाही. सबब उत्तर देऊ शकत नाही." मीः-हॉस्पीटल मधल्या

अधिकाऱ्यांनी उत्तर देण्याकरिता वेळ मागितला का ?" सरकारी मेम्बर:-" वेळ मागितला नाही; पण उत्तरहि पाठवले नाही." अर्थातच माझा मालमसाला माझ्या जवळच राहयला. असेम्ब्लीत फटाके उडवू शकलो नाही. ले. क. गिडनेही आपल्या कझीनला व तिच्या मैत्रिणीला तो जो काय चमत्कार दाखवण्याच्या इराद्यान झाला असेल तो जागच्या जागीच राहयला. नर्सेसला व सिस्टर्सला जरी आतषबाजी व फटाके उडालेले ( Fire works )दिसले नाहीत तरी मेट्रनची बरीच घाबरगुंडी उडालेली पाहून त्यांना आनंद झाला असला पाहिजे. १५।२० दिवसाचा वेळ मिळूनही प्रश्नाच उत्तर नाही हे ऐकून त्या नर्सेसना मजा वाटली असेल—बरी जिरली मेट्रनची ! पण तिला पाठीशी घालणारा तिचा बचाव करणारा कोण होता ? सर्व तऱ्हेन त्रस्त झालेल्या नर्सेसकडून समाधानकारक काम कस होणार ? कोणत्याहि सरकारी खात्याचा अधिकारी आपल्या हाताखालील अपराधी नोकराचा कैवार घेऊ लागला की शिस्त बिघडते, सावळा गोंधळ उत्पन्न होतो व खात्याची कार्यक्षमता नष्ट होते.

## पेनशरांना नोकरीत घेतल्यान वैयक्तिक व सार्वजनिक नुकसान

इरविन हॉस्पीटल मधल्या एका नर्सच्या वैयक्तिक गाऱ्हाण्यांवरून ज्या प्रमाणे इरविन हॉस्पीटल मधल्या गैरव्यवस्थेसंबंधी, मेट्रनच्या नालायकी संबंधी, तिच्या ' डेडयुटी ' ' नाइट डयुटी ' च्या पक्षपातीपणासंबधी प्रश्न उत्पन्न करून नर्सेसना बिचाऱ्यांना कसा त्रास होतो, प्रश्न उत्पन्न केलेत त्याचप्रमाणे एका व्यक्तिला त्याला व्यक्तिशः झालेल्या अन्यायावरून जनतेच्या सुरक्षिततेचा प्रश्न कसा उत्पन्न केला हे पुढील उदाहरणावरून दिसून येईल.

वऱ्हाडातील आकोल्या जवळच्या बोरगाव स्टेशनजवळ उतारूच्या रेल्वेला झालेल्या भयंकर अपघातानंतरची काही दिवसाची गोष्ट. अपघातात बऱ्याच जणांना भयंकर जखमा झाल्या होत्या. उतारूंना पुरेशी

Medical help मिळाली नाही गाडीबरोबर 'फर्स्टएडचं' (सुश्रुषा करण्याच) पुरेस सामान नव्हत म्हणून मी कामतहकुबीची सुचना आणली. तिची चर्चा खूप झाली व ती पासहि झाली. मात्र अपघाताच कारण काय ? ह्या मुद्याला हात लावला नाही कारण ते प्रकरण कोर्टात गेल होत. त्यानंतरची म्हणजे कामतहकुबीच्या सूचनेच्या चर्चेनंतरची, ५।६ महिन्यानंतरची आता सांगणार आहे ती गोष्ट आहे.

मी नागपूरहून दिल्लीस ग्रँडट्रंकन जात असताना 'आमला स्टेशनवर एक ऍंग्लो इंडीयन गार्ड माझ्या सेकंड क्लासच्या डब्यात आला व त्यान आपल सामान–एक मोठी पेटी कंदील व होल्डऑल–आणल. गाडी सुरू झाल्यानंतर मामुली औपचारिक भाषण झाल व त्यानंतर त्याच्यात व माझ्यात संभाषण सुरू झाल.

**तो:**– रेल्वे मेम्बरन माझ नुकसान केल. वरच्या जागेवर माझा हक्क असताना त्यान ती जागा मला न देता एका निवृत्त मनुष्याला दिली. आपण माझ्याकरिता काही खटपट करा.

**मी:**– कोणत्याहि एखाद्या व्यक्तिची बाजू घेऊन मी सरकारशी भांडत नाही. तेव्हां तुझ जे नुकसान झाल व तुला जो अन्याय झाला अस तु म्हणतोस त्याबद्दल मी काही करू शकत नाही. हा प्रश्न तु ले. कर्नल गिडने–तुमच्या असोसिएशनचे अध्यक्ष त्यांच्यापुढे मांड. ते तुमच्या कम्युनिटीच्या माणसांचे वैयक्तिक प्रश्नही असेंब्लीत आणतात.

**तो:**– मी जो प्रश्न आपणापुढे मांडला त्याच्याकडे एका व्यक्तिचा प्रश्न किंवा ॲंग्लोइंडीयन कम्युनिटीचा प्रश्न ह्या दृष्टिन पाहिजे तर नका पाहू. पण त्याला जी दुसरी बाजू आहे ती तरी पहा. सरकारन जर मोठ्या प्रमाणावर हा प्रघात पाडला तर हिंदु, पारशी, मुसलमान सर्वच गार्डांच नुकसान होणार आहे. निवृत्त झालेले गृहस्थ फिरून नोकरीत आले म्हणजे ज्या गृहस्थांची बढती होऊन ते वरच्या जागेवर गेले असते त्यांना तिथल्या तिथच सडत पडाव लागत. त्यांच्या खालच्या

माणसांचही मग प्रमोशन बंद पडत. ते त्या जागेवर सडत पडतात. काम करण्याचा उत्साह नाहीसा होतो

मीः-सर्वांच्याच म्हणजे सर्व जातीच्या माणसांचा हा जरी प्रश्न असला व तू म्हणतोस तस जरी आर्थिक नुकसान होत असल तरी तो प्रश्न वैयक्तिकच-हितानहिताचा आहे. व तो प्रत्येकान आपआपल्यापरी रेल्वे खात्याकडून किंवा युनियन मार्फत सोडवून घ्यावा. सरकार हल्ली निवृत्त माणसांना नोकरीवर घेत ह्यापासून जनतेच काय नुकसान होत ते मला पाहिजे. तस जर काही असल तरच मग मी हा प्रश्न-निवृत्त झाले या माणसांना नोकरीवर घेण्याचा प्रश्न-हाती घेऊन काही करीन.

तोः—ह्या वयातीत निवृत्त झालेल्या माणसांना नोकरीवर घेतल्या-नंतर रेल्वेचे अपघात होण्याचा संभव व ते वाढण्याचा संभव आहे. कस ते सांगतो. आता हा बोरगावचा झालेला अपघातच घ्याना. असे अपघात टाळता येण शक्य आहे व वाढण्याचाही संभव आहे. रेल्वेच्या मार्गावर काही कारणान मालगाडी थांबली तिला पुढ जाण अशक्य अस आपण समजू. ही गाडी थांबल्याबरोबर गार्डन काय करावयाला पाहिजे? ज्या-ठिकाणी गाडी थांबली असेल तिथून सरासरी एक मैल गाडीच्या माग रूळावर 'डीटोनेटर्स' लावायला पाहिजे.

मीः –'डीटोनेटर्स' कसे असतात ?

तोः —दाखवतो.

अस म्हणून त्यान आपली लॉकडाची मोठी पेटी उघडली व तिज-मधून काही डीटोनेटर्स काढून मला दाखवले व ते रूळावर कसे लावण्यात येतात हे दाखवल.

तोः—हे डीटोनेटर्स काही तरी कारणान थांबलेल्या मालगाडीच्या मागे रूळावर काही काही अंतरावर लावले म्हणजे मागून येणारी प्यासेंजर गाडी ह्या डीटोनेटर्सवरून जाताना हे डिटोनेटर्स फुटून आवाज होतो. म्हणजे प्यासेंजर गाडीला ह्या उभ्या असलेल्या गाडीपासून एक मैला-

पासून धोक्याची सूचना मिळायला सुरवात होते. प्यासेंजर गाडीचा ड्रायव्हर एक दोन डिटोनेटर्स फुटले की हुशार होतो व काहीतरी धोका आहे असं समजून गाडी थांबवतो. पण घटकाभर असं समजा की मालगाडीचा गार्ड म्हातारा मनुष्य आहे. रात्रीच्या वेळी व ते ही पावसाळ्यात तो मलभर जाणं पसंत करणार नाही व स्टेशन मालगाडीला अपघात झालेल्या जागेपासून जवळच आहे तेव्हां तिथे लवकर जाऊन पोंचू व तिथून मालगाडीला अपघात झाला असं स्टेशनवरून मागच्या स्टेशनला कळवू असा विचार करून माग न जाता स्टेशनकडे जातो. ह्या गार्डच्या पुढील स्टेशनवरून मागच्या स्टेशनला बातमी पोंचण्यापूर्वीच त्या स्टेशनवरून प्यासेंजर गाडी सुटलेली आहे. मग ती गाडी ह्या मालगाडीवर आदळल्या वाचून कशी राहील? मग अपघात होणार व मनुष्य हानिहि होणारच. मनुष्यहानि बरोबर वित्तहानिही. तेव्हा उतारूच्या दृष्टिनं जनतेच्या संरक्षणाच्या दृष्टिन उतार वयाचे निवृत्त गार्ड न घेतलेले बरे.

मी इटारसीला त्याला चहा दिला व म्हणालो तू दिलेल्या माहिती-बद्दल मी तुझे आभार मानतो. जनतेच्या संरक्षणाच्या दृष्टिनं निवृत्त झालेले गार्ड नोकरीत घेऊ नयेत ह्याबद्दल मी असेंब्लीत चळवळ करीन तुझा अनायासे फायदा झाला तर बरच आहे' मी असेंब्लीत प्रश्न टाकलेत रेल्वे मेम्बरनं सांगितलं गार्डची नूट होती म्हणून ह्या निवृत्त माणसांना नोकरीत घेतलं. आता भरती करणार नाही.

## हिंदुसभेनं बोलावलेल्या शेतकी परिषदेचा अध्यक्ष होण्याचं नाकारू नका.

दिल्लीचं बजेट सेशन संपवून नागपुरास येतो की नाही तर माझ्या मुलीनं कु. मालतीनं माझ्या नावानं खामगावाहून, मी येण्यापूर्वी एक दोन दिवसच आधी आलेला तार माझ्या स्वाधीन केला. तारेत लिहिलं होतं "बुलढाणा जिल्हा शेतकी परिषद खामगावला भरणार आहे. आपण अध्यक्ष होण्याचं कबूल करावं. ही परिषद हिंदुसभावाल्यांनी

घोलाचिली आहे म्हणून नाही म्हणू नका ". शेतकऱ्यांच्या बाबतीत हिंदुमुसलमान, स्पृश्य, अस्पृश्य, ब्राम्हण, ब्राम्हणेतर असा भेदच कसा होऊ शकतो ? सर्वांची सुखदुःख एक सारखी असतात. निसर्ग व सरकार ह्या सर्वांना सारखीच वागणूक देते— भली बुरी कोणतीही मग त्यांचा कैवारी कोणीही व्हाव. कांग्रेस व हिंदुसभा असा भेद असू नये. माझ्या मनात न जाण्याचा क्षणैक विचार आला पण तो निराळ्याच कारणान. दिल्लीहून आलो होतो ते अगदी थकून. अन् दोनच दिवसांनी होती. परिषद. एकदा मनात आले ' नाही येत ' म्हणून सांगाव त्याना. कडक उन्हाळ्यान आपल स्वरूप दाखवायला सुरवात केली होती व मी दिल्लीहून आलो होतो कामाच्या दगदगीमुळे अगदी थकून भागून. शिवाय दोन महिन्यापूर्वीच नागपूरात माझ्या अध्यक्षतेखाली शाम टाकीजमधे मध्यप्रांत व वऱ्हाडची शेतकी परिषद भरली होती व तीत शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे सर्वच विषय–नापिकीमुळे उत्पन्न झालेली हलाखीची परिस्थिति सरकारने धान्य गोळा करण्याकरिता केलेली ' लेव्ही ' ची पद्धति, वॉर बॉण्डस् व वॉरलोन्स शेतकऱ्यांना घेण्यास लावण्याच्या Persuasive मन वळवण्याच्या पद्धति–इत्यादि चर्चिल्या गेल्या होत्या व महाराष्ट्रात रिपोर्ट व ठराव प्रसिद्ध केल्यामुळे सरकारच्या नजरेस या गोष्टी आल्या असल्या पाहिजेत असे धरून चालायला काही हरकत नव्हती तेव्हां सहजच मनात विचार आला सांगुन टाकाव नाही येत म्हणून. पण हा विचार टिकू शकला नाही. ' मी नाही येत " ' अस म्हटल असत तर ही शेतकी परिषद हिंदुसभावाल्यानी भरवली म्हणून मी येत नाही असा जबरदस्त समज झाला असता. म्हणून दिल्लीहून आलो त्याचदिवशी काही तासानी खामगांवला जाण्याकरिता नागपूरहून निघालो. व संध्याकाळी जाऊन पोचलो. दुसऱ्या दिवशी दुपारी परिषद्. उद्घाटन समारंभ श्री. भाऊसाहेब काळीकर, कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद व नागपूर प्रांतिक हिंदुमहासभेचे अध्यक्ष यांचे हातून होणार असे कळले. मंडळीला खात्री होती ते येतील म्हणून. पण झाली निराशा. त्यांचा तार आला " मी एकाएकी बिमार पडलो म्हणून येऊ शकत नाही

असा. मग उद्‌घाटन समारंभ हिंदुसंघटनेचे पुरस्कर्ते संत पाचलेगावकर महाराज ह्यांच्याकडून व्हावा असं मंडळीनं ठरवलं.

परिषद एका थिएटरमधे होती. गर्दी अगदी चिकार ! मेहकर सारख्या ४०।५० मैलाच्या लांबच्या ठिकाणाहून सुद्धा लोक रेंगी बैलानं आले होते. काय दांडगा उत्साह लोकांचा ! मला वाटलं बरं झालं मी आलो. माझ्या मनाला खूप आनंद झाला. आलो नसतो तर ह्या गरीब शेतकऱ्यांची केवढी निराशा झाली असती !! हिंदुमहासभावाले श्री. काळीकर नाहीत व कांग्रेसवाला मीहि नाही. कौन्सील ऑफ स्टेटचे हिंदुसभावाले सभासद व मध्यवर्ति असेंब्लीचे कांग्रेसचे सभासद येणार म्हणून केवढ्या उत्साहाने लोक आले होते. त्यांच्या काही अपेक्षाहि असतील आमच्यासंबंधी नाही कोण म्हणावं. व आम्ही दोघही गैरहजर. सर्व उत्साहावर विरजण पडलं असतं. परिषदेला रंग भरण्यासारख्या अनेक गोष्टी. पण मुख्य म्हणजे बुलढाण्याच्या डी. सी. च्या नाकावर टिच्चून ही परिषद भरविल्या जात होती. डी. सी. होते सुब्रम्हण्यम ! चिमूरच्या हत्याकांडामुळे प्रसिद्धिस आलेले. त्यांनी बुलढाण्याकडे ही आपला प्रताप गाजवायला सुरवात केली होती. वातावरण खूप तंग असलं पाहिजे असं मला तिथे गेल्यावर जी परिस्थिती कळली तिच्या वरून वाटले. बाकीच्यांची म्हणजे अडाणी शेतकऱ्यांची गोष्ट तर राहूच द्या, वकील लोकांच्या नाकातही साहेब मजकुरानं दम आणला होता. साहेब मजकुरानी वकील लोकांना–जे वॉर बॉन्डस्‌ व वॉर लोन्स्‌ लोकांना घेऊ नका असा उपदेश करत होते त्यांना–ताळ्यावर आणण्याचा एक अजब मार्ग काढला होता. मुकर्दमे दौऱ्यावर ठेवायचे, वकील मुकर्दम्याकरिता आले व मुकर्दम्याची पैरवी सुरू होणार तोच साहेब बहादुरांनी वकीलाला वॉर बॉन्ड घेतले का ? वॉर लोन्स्‌ घेतले का ? असे प्रश्न करावे व घेतले नसल्यास पक्षकारांच्या व इतर लोकांच्या समक्ष घ्यावयास लावावे. नाही म्हणण्याची त्या वकीलाची काय छाती होती ? साहेब नाराज झाला तर प्रॅक्टीसवर गदा येणार ! साहेबाची नाराजी आहे असं लोकांना कळल्यावर ते थोडेच यांना वकील पत्र देणार ! तेव्हां त्या

वकीलाला चार चौघा समक्ष वॉर बॉन्डस् व वॉर लोन्स् घेण भागच होत. आणि मग हे वकील साहेब कोणत्या तोंडान दुसऱ्या लोकांना वॉर बॉन्डस् घेऊ नका, वॉर लोन्स् घेऊ नका म्हणणार होते-साहेब बहादुरांनी अशा रीतीन वकीलाची नाचवकी करावी. शेतकरी ! शेतकऱ्यांवर बिचाऱ्यावर तर आभाळच कोसळल होत. शेतीची नापिकी, प्रोक्युअरमेंट व लेव्ही, वॉर बॉन्डस् व वॉर लोन्स् ह्यांच्या सपाट्यात सांपडले होते, ते लोक चिंतातुर होऊन आले होते ते चिंतातुर होऊन आले असतील पण त्या बरोबरच श्री. भाऊसाहेब व मी येणार म्हणून उराशी काही आशाहि बाळगून आले असले पाहिजेत. थिएटरमधे अशा शेतकऱ्यांची गर्दी तर होतीच होती पण माझ्या भाषणाच्या नोटस् घेण्याकरिता नागपूरहून शॉर्टहॅन्ड नोटस् घेणारे लघु लेखक, बुलढाणा जिल्ह्यांतील इ. ए. सी. एक्स्ट्रा असिस्टंट कमिश्नर तहसीलदार व सर्कल इन्स्पेक्टर इत्यादिंचीहि गर्दी होती. पाचलेगावकर महाराजांच उद्घाटन करणार भाषण व माझ अध्यक्षाच भाषण झाल त्याचा रिपोर्ट 'महाराष्ट्र' त प्रसिद्ध झाला आहे. माझ्या ह्या अध्यक्षीय भाषणात लेव्ही वॉर बॉन्डस्, वॉर लोन्स् वगैरे विषयासंबंधी तर मी बोललोच पण विशेष म्हणजे येथील कांग्रेसवाल्यांना चार कटु

* शब्द बोललो होतो. जिथे लोकांच्या सुखदुःखाचा प्रश्न, *
| जिवंत राहण्याची व मरण्याची वेळ अशाहि प्रसंगी |
| राजकीय मत आडवी आणावीत, कठोर अंतःकरणाने |
| त्यांना दुःखात लोळताना पाहून, त्यांचे हाल होत |
| असताना पाहून आनंद मानावा ह्या सारखा नीचपणा |
* दुसरा कोणता असू शकणार ?" नंतर विषय नियामक *

कमिटीच्या वेळेस तिथले काही कांग्रेसवाले आलेत व खुल्या अधिवेशनात ठरावावर बोललेतही. कांग्रेसवाल्यासंबंधी खर सांगायच म्हणजे ह्या वेळेस ह्या धामधुमीच्या काळात ते 'हरी, हरी' करित बसले होते. मध्यप्रांत असो वा वऱ्हाड, येथील कांग्रेस अधिकारी वा मामुली कांग्रेसमन सर्वच मूग गिळून बसले होते.

माझ अध्यक्षीय भाषण संपल्यावर दुसरे दिवशी सकाळी विषय नियामक कमिटीची सभा भरणार होती. मी श्री. भडंग वकील ह्यांचे घरी—तिथेच उतरलो होतो—सकाळी ७ वाजता चहापित असताना दोघ तिघ गृहस्थ आलेत व मला सांगायला लागले की "पोलीस ऑफीसर्स, इ. ए. सी. वगैरे म्हणतात की ते विषय नियामक कमिटीचे बैठकीस हजर राहणार. आम्ही त्याना सांगितल की ते हजर राहू शकत नाहीत. तरी पण त्यांचा आग्रह आहे की ते हजर राहणार" हे गृहस्थ आणखी म्हणाले "आम्ही त्यांना सांगितल की ते Under Protest राहू शकतात". मी त्या गृहस्थावर एकदम चवताळलो व म्हणालो "ही तुमची under protest ची कल्पना विलक्षण दिसते. विषय नियामक कमिटीत कोण कोणतेविषय निघतील, कोण काय बोलेल ह्याची विषयनियामक कमिटीच्या सभासदाशिवाय दुसऱ्यास माहिती मिळू नये हा तर तिच खासगी स्वरूप ठेवण्याचा उद्देश. लढाईचे दिवस आहेत, लोक त्रस्त आहेत तेव्हा त्यांना मोकळेपणान आपल सुखदुःख ह्यानी निवडून दिलेल्या परिषदेच्या सभासदामार्फत सांगता याव हा उद्देश कसा साधणार ? तुमचा मार्ग शहाणपणाचा नाही". मी मनात समजलो हे Under prodest काय प्रकरण आहे ते. जिल्ह्यातल्या राजकारभारान मंडळी घाबरली होती व जिल्ह्याधिकाऱ्याच्या हस्तकांच्या विरूद्ध जाण्याची त्यांना हिम्मत होत नव्हती. मला त्यांना जे काय बोलायच होत ते बोलल्यानंतर मी ताडकन थिएटरकडे निघालो. थिएटरमधे गेल्यानंतर बघतो तो पुढच्या रांगेत बऱ्याच मध्यमवर्गातील सुशिक्षित स्त्रिया. त्यांच्या मागच्या रांगेत सरकारी ऑफीसर्स व इतर मंडळी. विषयनियामक कमिटीचे पंचेविसक सभासदही हजर होते. मी प्रथम स्त्रियांना हात जोडून म्हणालो "मी जे काय आता बोलणार आहे त्याबद्दल आपण मला माफी दिली पाहिजे. ही विषयनियामक कमिटीची सभा आहे. त्या कमिटीच्या सभासदाशिवाय इतरांना येथे बसता येत नाही. आपणाला दुपारी खुल्या अधिवेशनात येऊन निरनिराळ्या ठरावावर निरनिराळ्या वक्त्यांची भाषणे ऐकावयास मुभा आहे. त्या खुल्या अधिवेशनाला आपण या, जरूर या. अशी माझी

आग्रहाची विनंति आहे. मात्र ह्या वेळेला आपण हजर राहू शकत नाही." स्त्रिया उठून गेल्या. इतक मी पाहिल्याबरोबर 'व्हालंटीअस' म्हणून जोरान पुकारा केला. दोघतीघ माझ्याजवळ आल्याबरोबर मी त्यांना म्हणालो, "थिएटर खाली करा. एकदम खाली करा. इथे कोणा-लाहि राहता येत नाही. सर्वांना बाहेर घालवून द्या व नंतर जे विषय नियामक कमिटीचे सभासद असतील त्यांनाच फक्त आत सोडा" इ. ए. सी. तहसीलदार वगैरे बाहेर गेले पण एका दारा जवळउभे राहून पहात होते की स्त्रिया व इतर मंडळी थिएटरच्या बाहेर गेलेत की नाही की तिथेच घोटाळताहेत. पण त्यांनी जेव्हां पाहिल की सर्व मंडळी बाहेर गेली तेव्हां ही ही मंडळी चालती झाली. दुपारच्या अधिवेशनात ठरावा-वर खेडुतांची खूप जोरदार व निर्भीड भाषण झाली. इतका निर्भीडपणा का एका वक्त्यान एका मनुष्याला झाडाशी बांधून त्याच्याजवळून लेव्ही कशी घेतली, वॉर बॉन्डस् कसे घ्यावयास लाविले वगैरे सांगितल. ह्या परिषदेला आल्याबद्दल मला खरोखरच खूप आनंद झाला परिषद खूप गाजली.

## संत पाचलेगावकरांनी माझ केलेल विलक्षण ( अपूर्व ) स्वागत

संत पांचलेगांवकर परिषदेच्या उद्घाटनाच भाषण करून थिएटरमधून जाताना मला सांगून गेले होते की परिषद आटोपल्यावर मी त्यांच्या आश्रमास भेट द्यावी. सबब परिषद आटोपली त्या रात्री ७।८ वाजता मी काही जणांना बरोबर घेऊन त्यांची भेट घेण्याकरिता त्यांच्या आश्रमात गेलो. ते बसले होते पेशवाई थाटाच्या बैठकीवर— गादी तक्याची बैठक होती तो-जवळ ५।५० मंडळी बसली होती. मी गेल्याबरोबर महाराजांनी माझा हात धरून मला भितीशी लागून असलेल्या लोडाशी बसवल. जमलेल्या मंडळीशी बसल्या बसल्या गोष्टी करायला मी सुरवात केली. काही वेळान माझ्या मानेला वळवळ करणार अस काही म्हणून बघतो तो खुन्टीला थोडी शेपटी गुंडाळून लोंबत असलेला मला मोठा साप माझ्या मानेला चाटतो आहे— माझ स्वागत करायचा त्यांचा तो प्रकार अस मी समजलो. त्याच अनुकरण करायच म्हणूनच की काय दुसऱ्या

खुन्टीचा साप झेप टाकून माझ्यापर्यंत पोंचण्याचा प्रयत्न करीत होता. महाराज हजर असले म्हणजे साप अगदी गोगलगाई सारखे वागतात, त्याचप्रमाणे डसले तर महाराज ते विष उतरवतात असं वाचल्य मुळे मी निर्धास्त होतो. शिवाय महाराजांनी आम्हाला बोलावले तेव्हां अशा ह्या स्वागतात धोका नसायचाच असं घेऊन चाललो व काहीस बेडर वृत्तीने संभाषणात भाग घेत होतो. महाराजानी आमच्या समोर पानाच तबक ठेवल व मी पान घेत असताना ते म्हणाले "XX (नाव विसरलो) संस्थानच्या महाराजांनी आम्हाला उत्तमसा नजराणा पाठविला आहे. बघता का ?" संताला संस्थानिकान पाठविलेला नजराणा मग तो पाहण्यासारखाच असला पाहिजे असा मनात विचार आला—चांदी सोन्याचा एखादा उत्तम नक्षीदार काम केलेला किंवा जड जवाहिराचा नजराणा पहाण्याचा योग वाया का घालवा असं मनाला वाटल. मी संत पाचलेगावकराना म्हणालो " संस्थानिकान पाठविलेला नजराणा. तेव्हा तो पहावा असच वाटत." संत आपल्या शिष्याला म्हणाले " जारे, त्या पेटीतला महाराजाकडून आलेला नवीन नजराणा घेऊन ये !" काही वेळान शिष्य एक चांगली नक्षीदार टोपली घेऊन आला व त्यान ती गादीच्या अगदी कडेवर ठेवली- आम्ही होतो तिथून ४।५ हातावर. त्याला संत म्हणाले " काढ टोपलीच झाकण." काढल्याबरोबर काय सांगू तुम्हाला—तो नजराणा—ती भेट आमच्याकडे चालत यायला लागली. माझ्यापाशी बसलेली मंडळी व आजूबाजूची बैठकीवरील मंडळी उभी राहिली. मी पाहिल की एक मोठा पण सुंदर साप माझ्याकडे येतो आहे. ते पाहिल्याबरोबर मी संतांना म्हणालो "नजराणा पण नजराणा आहे. त्याला आम्हा सर्वांची नजर लागेल. आणि तस झाल तर मला फार वाईट वाटेल. तेव्हां त्याला आमची दृष्ट न लागावी म्हणून नजरे आड केलेल बर -" संतानी शिष्याला सांगितल " घेऊन जारे आपला नजराणा." नंतर संताचा आशीर्वाद घेऊन श्री भडंग वकील यांचे घरी आलो व दुसरे दिवशी नागपूर जवळ केल.

## सार्वजनिक कामाची हौस असलेले दामुअण्णा

माझा लहान बंधु दामु ह्यालाहि सार्वजनिक कामात भाग घेण्याची भारी हौस. नागपूरला विद्यार्थी दशेत त्याचप्रमाणे मुंबईकडे १९१३ ते १९१८ अखेर पावेतो तिकडच्या अनेक राजकीय व सामाजिक चळवळीत त्यान भाग घेतला. त्यामुळे तो तिकडे दामुअण्णा ह्या नावान प्रसिद्ध आहे. इकडे आल्यानंतरहि



त्यान शैक्षणिक चळवळीत व राजकीय घडामोडीत भाग घेतला. (का. स. र. करण्डक १ ला पान १४६) इकडेही तो दामुअण्णा ह्या नावानेच प्रसिद्ध आहे. कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या चळवळीतही त्यान आपल लक्ष घातल होत. त्याची श्री. रुईकर ह्या कामगारांच्या पुढाऱ्याशी मैत्री होती. तो शेतकऱ्यांच्या ज्या परिषदा भरत त्यातही भाग घेत होता. त्या निमित्तान त्यांचा व चेरूळच्या श्री. निळकंठराव देशमुख ह्यांचा दाट परिचय झाला होता. मी ह्या मंजुषेत ज्या-वेळच्या घटना लिहितो आहे त्या वेळेला दामुअण्णा ' नागपूर डीस्ट्रीक्ट कौन्सील ' च्या ' मार्केट कमिटी ' चे अध्यक्ष होते. त्यांना जिल्ह्यांतील निरनिराळ्या खेड्यातून बाजाराची, व रस्त्यांची पहाणी करावी लागे व खेडूतांच्या त्या बाबतीत असलेल्या अडचणी नाहीशा करण्याचे प्रयत्न करावे लागत. मी असेंब्लीच्या अधिवेशनात काम करीत असतांना त्यांनी

नागपूर जिल्हयातील काही भागातील संत्र्याच्या बागाईतदारांची, खरेदीदारांची व दलालांची अडचण लिहून कळविली व ती नाहीशी करण्याचा प्रयत्न करा असं सुचवलं. काय होतं असे की नागपूरी संत्र्याचा बाजार फक्त नागपूरलाच भरत असे. त्यामुळें दूरदूरच्या खेड्याहून संत्र्याच्या गाडया नागपूरास येत. काटोल, कळमेश्वर येथून संत्र्याच्या गाडया नागपूरला येत. गाड्या आणण्याचा त्रास, मोडणारा वेळ व सर्व ठिकाणच्या गाड्यांची विलक्षण गर्दी ह्यामुळे ह्या लांब लांबून येणाऱ्या गाड्यांची कोणीच दाद घेईना. मग त्यांनी कसा बसा तोटा सोसून आपली सुटका करुन घ्यावी. ह्यावर तोड म्हणून 'मार्केट कमिटीनं' दामुअण्णा अध्यक्ष असतांना संत्र्याचा बाजार 'कोहळी' हया गावी भरवण्याचं ठरवलं. 'कोहळी' हे गाव कळमेश्वर व काटोल हया ड ग्रँट्रंकच्या स्टेशनांच्या दरम्यान आहे. असं करण्यानं हया भागातील संत्र्याच्या बागाईतदारांची बरीच सोय झाली. त्यांची दगदग वाचली, व वेळेची आणि पैशाची बचत झाली. पण तिथं बाजार भरवण्याचं ठरवलं तरी खरेदीदार व्यापारी व दलाल हयांना तिथे गैरसोयीमुळे येणं जर परवडलं नाही तर बाजार भरवून न भरवून सारखंच त्यांना तिथे म्हणजे 'कोहळी'ला येणं सुलभ करण्याचा एकच मार्ग. आणि तो म्हणजे 'कोहळी' हया गावी ग्रँड ट्रंक थोडातरी वेळ थांबेल अशी व्यवस्था करणं. त्याकरिता दामुअण्णांनी मला लिहिलं व ती गोष्ट मी रेल्वेमेंबरकडून घडवून आणली. ग्रँड ट्रंक 'कोहळी' हया स्टेशनवर काही मिनीटं थांबू लागली दामुअण्णांनी इतर ठिकाणीही अशाच रीतीनं अन्य बाजारांची व तिथे माल नेण्याकरिता सोईस्कर मार्गाची व्यवस्था केली.

नं. १०१५४५
८८५
दि. १५।१२।५

रत्नमंजुषा ५ वी

# मध्यपूर्वेकडील युद्धक्षेत्रांना भेट

सीलेनन मध्यपूर्वेकडे उड्डाण--महाऽराज्या! महाऽऽराज्या!!--लोकीकास साजेशी कृति केली पाहीजे--मराठ्यांनी आपल नाव राखल--मराठ्यांनो दुसऱ्यांना स्वातंत्र्य मिळवून देता? स्वतःच मिळवा--माझ्या भोवती सैनिकांचा गराडा--हिंदुस्थान, आव जाव घर तुम्हारा--लॉर्ड कर्झनची आठवण झाली--एकांकी एक प्रवेश नाटक--बॉम्बरच्या कॉकपिटमधला अनुभव--कैरोमधला फोटो--मिस्टर देशमुख परदेशातल्या तुमच्या मित्राच्या मुलासंबंधी तुमच कर्तव्य कोणत? प्रेसिडेंटला दोन्ही हातांनी घंटा बडवावी लागली

## सीलेनन मध्यपूर्वेकडे उड्डाण

हिंदुस्थानातून जे हिंदी ऑफीसर्स व हिंदी शिपाई इटालियन व जर्मन शिपायाशी युद्ध करण्याकरिता मध्यपूर्वेत गेले होते त्यांच्या ख्याली खुशालीची चौकशी करण्याकरिता आम्ही म्हणजे 'डीफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटीचे काही सभासद तिकडे गेलो. ह्याच कामाकरिता आमच्या पुर्वी कोणी गेले नव्हते अस नाही. राजे महाराजे सोडून दिल्यास सर शिकंदर हयातखान, पंजाबमधील 'युनायटेड पार्टी गव्हर्नमेंटचा प्रधान मंत्रि, हा गेला होता. शिपायांना उत्तेजनपर बोलून आला होता, आश्वासनं दिली होती; सर फेरोजखान नून-हिंदुस्थान सरकारचा एक्झिक्युटीव्ह कौन्सिलर हा ही जाऊन आला होता. ह्या लोकांजवळ शिपायांनी आपली गाऱ्हाणी सांगितली होती अस मला दिसून आल. तर शिकंदर हयातखान व सर फेरोजखान ह्यांनी त्यांच्या सर्व तक्रारी दूर करण्याच्या बाता मारल्या, खूप लंबेचवडे आश्वासनं दिले पण इकडे आल्यानंतर दोघेही आपापल्या वचनास जागले नाहीत. ह्यांनी 'ऑल वेल' चा जरी प्रोपेगंडा केला तरी लोकांचे प्रतिनिधी काही ह्यांच्या व्याख्यान बाजीवर संतुष्ट नव्हते. म्हणूनच

सरकारने आम्हाला तिकडे पाठविण्याचा मनसुबा केला. मध्यपूर्वेला ही माझी दुसरी भेट. १९०६ साली विलायतेस गेलो ती माझी पहिली भेट. पण तेव्हां गेलो 'P & O' 'पी ॲण्ड ओ' च्या स्टीमरने. आता जाणार होतो सीप्लेनने. एकदा पाण्यावरून तर आता हवेतून. केवढा फरक ! विज्ञानाचा पराक्रम हा ! हवेतून जाण सहज झाल होत. पुर्वी हे अगदी अशक्य वाटत होत.

१९४३ च्या मे महिन्याच्या ४ तारखेस कराचीहून सीप्लेनने निघालो. विमान जमिनीवर उतरत. सीप्लेन समुद्रावर किंवा खूप मोठया औरस चौरस तलावावर. असे दोन तलाव हिंदुस्थानात आहेत. विमानाला खाली चाक असतात. सीप्लेनला चाकाऐवजी खाली होडया असतात. हा मोठा ठळक फरक. आम्ही जे मे महिन्याच्या ४ तारखेला गेलो ते मेच्या २६ तारखेला हिंदुस्थानात परत आलो. दरम्यानच्या काळात ' कायरो ', ' अलेक्झांड्रीया', ' ट्रीपोली ' ' सायप्रस ' ' बिरुट ' ' इस्मालिया ' ' जीनेफा ' ही शहरे व देश पाहिलेत व 'एल अलामिन', ' सीडी बिरानी ' ' टोब्रुक ', ' एलगोबी ', ' फामागुस्ता ' ' ग्याम्बट ', ' एल अडेन वेनगाझी ', ' आसमारा ' व ' केरेन ' हया लढाया झालेल्या जागा व लष्कराची ठाणी असलेल्या जागा पाहिल्या. हया सर्वांची वर्णने हया चिमुकल्या करण्डकात देणे शक्य नाही. त्याचप्रमाणे हया 'मिडल-इस्ट' मधल्या घडलेल्या सर्वच घटनांची वर्णन देण शक्य नाही. तथापि काही घटना संबंधी सांगून हा 'मिडल इस्ट'च्या दौऱ्याचा भाग संपवावा असा इरादा आहे.

## " महाऽराज्या, महाऽऽराज्या ! (मी महाराजा बनलो)" !!

कैरोस ' आमची उतरण्याची सोय 'शेफर्ड होटेल' म्हणून एक खूप प्रसिद्ध होटेल आहे तिथे करण्यात आली. 'मिडलइस्ट'ला जाणाऱ्या सभासदात सर फरेडरीक जेम्स, श्री जमनादास मेथा, मी, कॅप्टन दलपतसिंग, ऑनरेबल कुंझरू व ऑनरेबल सरदार बुटासिंग एवढेच पहिले चार असेंब्लीन निवडलेले व शेवटचे दोन 'कौन्सिल ऑफ स्टेटन.'

'कैरो' ला गेल्यानंतर दोनतीन दिवसांनी आम्ही सर्व मंडळी, लष्करने आम्हाला दिलेल्या मोटारीतून इजिप्तचे राजे फरूक' ह्यांच्या राजवाडी गेलो. व तिथे Kings Book किंग्स बुकमधे व एअर अपॅरंट प्रिंस महमदअली ह्यांचे बुक हयांत आम्ही आपली नावे लिहिली. नाव लिहिल म्हणजे भेटीला बोलावण्याचा संभव असतो. आपल्याकडे व्हॉईसराय किंवा गव्हरनर ह्यांच्या बुकांत आपल नाव लिहिण्यासारखाच प्रकार व तोच परिणाम. आमच्यापैकी सर फरेडर्रक जेम्स व श्री कुंझरू साहेबी पोषाखात—हॅट, खाकी शॉर्टस वगैरे मधे. सरदार बुटासिंग शीख पूर्ण खाकी पोषाखात, पण डोक्याला सफेद फेटा-कॅप्टन दलपतसिंग—नखशिखांत खाकी पोषाखात—फेटा खाकी व कोटाला मिलीटरी सर्व्हिसच्या रिबन्स. श्री. जम्नादास मेथा सुखा व अचकन व डोक्याला लंबी टोपी. मी ग्रे सूटमधे पण लाँग कोट व डोक्याला जरीचा फेटा. हिंदुस्थानातून तिकडे जाताना विचार केला होता आपण तिकडे जातो आहो तर आपला National head dress डोक्याला घालण्याचा राष्ट्रीय पोषाख घेऊन जाव-कोठे जाण्याचा प्रसंग कोणालाहि आला तर आपण हिंदुस्थानी आहो अस वाटल पाहिजे ह्या विचारान तो फेटा घेऊन गेलो होतो व त्या दिवशी राजवाड्यात जाताना तोच बांधून गेलो होतो. आम्ही पुस्तकात नाव लिहिल्यानंतर आम्हाला राजवाड्याच्या एका खोलीत बसवल व एका लहान चिनीच्या कपात पेय देण्यात आल. ह्या पेयाला दालचिनीचा वास होता. कदाचित कलमीचा म्हणजे दालचिनीचा दाट काढाही असेल. त्यात दूध नव्हत. साखर मात्र होती. ते पेय घेतल्यानंतर आम्ही राजवाड्यातून आमच्या म्हणजे लष्करने दिलेल्या मोटारीकडे जायला निघालो. सर फरेडरीक जेम्स वगैरे मंडळी माझ्या बरोबर आजूबाजूस होती. ही सर्व मंडळी माझ्या तैनातीतली असली पाहिजे असा तिथल्या मंडळीचा समज झाला असावा कारण एक पॅलेस अटेंडन्ट (राजवाड्यातील नोकर) महाऽराज्या, महाऽऽराज्या,' म्हणत व सलाम करत पुढे पुढे चालला होता. मी ज्या मोटारकडे जात होतो त्या मोटारकडे जाऊन त्यान मोटारच दार उघडल व अदबीच्या साथ

तिथेच उभा राहिला. मी आत बसल्याबरोबर त्यान फिरून 'महाऽराज्या, महाऽऽराज्या' म्हणून सलाम ठोकला व दार लावल व सलाम करून तसाच उभा राहिला. महाऽराज्याला महाराज्यासारख वागण मग भागच पडल. नाहीतर आपल्या महाराजे लोकांनी हिंदुस्थानात क्रिकेटपटु, मल्ल विद्येंत निपुण असे पहेलवान गायन विद्येत निष्णात असे गायक, व पट्टीचे बजवय्ये ह्याना उदार आश्रय देऊन त्या कलांचा विकास करण्यात मिळविलेल्या कीर्तिस व तिकडे ऐश्वर्याबद्दल व दातृत्वाबद्दल मिळविलेल्या लौकिकास बट्टा लागला असता. तेव्हां तसा तो बट्टा न लागावा म्हणून मला माझ्या खिशाला चट्टा लावण भागच होत. दीड पौंडाची इजिपशीयन नाणीं होती ती महाराजे' लोकांची इभ्रत कायम ठेवण्याकरिता त्याला बक्षीस दिली. 'महाराज्या' म्हटल्यान ऐश्वर्य आल नाही पण जवळच मात्र गेल. मलाच हा नोकर 'महाऽराज्या' का म्हणत होता हे वाचकांच्या लक्षात बहुत करून आल असेल अस मी समजतो. त्या लष्करी मोटारी, माझ्याबरोबर असलेल्या खाकी पोषाखातील आणि म्हणूनच लष्करी समजलो गेलेली मंडळी, माझ्या भोवतीच Grouping ग्रुपींग(संगतिमुळे) व माझा जरीचा फेटा ह्यांनी मी 'महाराज्या' व मंडळी माझ्या सैन्यांतील ऑफीसर्स अस स्वरूप आल होत. जरीचा फेटा नसता तर माझा खिसा रिकामा होता ना. हे महाऽराज्याच सोंग जरी आगंतुक होत तरी त्याची बातावणी करण जरूर होत.

## पुर्वापार चालत आलेल्या लौकिकास साजेशी कृति केली पाहिजे

परदेशात हिंदुस्थानातल्या राजेलोकांची इभ्रत कायम ठेवण हे मी माझ कर्तव्य समजलो. व मग ते कर्तव्य पार पाडण्याकरिता त्या वेळेला

* मी जे काम करू शकलो ते केल. एखादा समाज किंवा *
| एखादी संस्था सन्मानाच स्थान मिळवते, प्रतिष्ठा |
| संपादन करते अनेक व्यक्तिच्या स्वार्थत्यागान व आद- |
| रणीय कृतीन. ते तिच स्थान ढळतं समाजाच्या किंवा |

| संस्थेच्या एखाद्या सभासदाच्या लाजिरवाण्या कृतीन. |
| म्हणून प्रत्येक व्यक्तिन आपली कृति आदरणीय व |
| संस्थेच्या नावालौकीकास शोभेशी ठेवण त्याच कर्तव्य |
* ठरत. मी म्हणतो त्याला कांग्रेस सारखी संस्था सुद्धा *

अपवाद राहू शकत नाही. प्रत्येक कांग्रेसवाल्यान कांग्रेसची प्रतिष्ठा राखण्या-करिता आपली वर्तणूक निःस्वार्थी, परोपकारी, सन्माननीय अशी ठेवली पाहिजे. आपल्या हातुन स्वार्थी व लाजिरवाणी कृति घडणार नाही, अ क व्यक्तिनो हाल अपेष्ठा सोसून कांग्रेसची जी इभ्रत वाढवली तिला काळीमा लागण्यासारखी कोणतोही गोष्ट होणार नाही हे पाहयल पाहिजे आणि हे ध्येय मी आपल्या समोर नेहमी ठेवत आलो. माझ्या कुळाला, समाजाला, कांग्रेसला व देशाला बट्टा लागेल अस माझ्या हातून कोणतही कृत्य होऊ दिल नाही. माझ्या घराण्याचा, माझ्या 'मराठा' ह्या प्रांतीयतेचा व देशाचा अभिमान उज्वल राखण्याचा मी सतत प्रयत्न केला. 'डीफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटी'च्या हिंदुस्थानातील दौऱ्यात अटीनटीचा प्रसंग आला म्हणजे श्री. भाऊसाहेब काळीकर 'कौन्सिल ऑफ स्टेट'चे व 'डीफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटी' चे सभासद ह्यांनी मला म्हणाव "भाऊजी, मराठ्यांच नाव राखल पाहिजे." आणि तस ते राखत गेलो मी—हिंदुस्थानात व मध्यपूर्वेत सुद्धा.

मराठे लोक शूर, धीट, लढाऊ, प्रामाणिक व चिव्वट ही त्यांची ख्याति. हिला साजेस माझ्या हातून घडून येण्याकरिता परमेश्वरान मला जी शक्ति व बुद्धि दिली व जे सद्गुण लाभलेत त्याबद्दल मी त्याचा आभारी आहे व ती शक्ति, बुद्धी व ते सद्गुण वाढीला लावण्याला माझ्या माता पित्यांनी व चुलत्यान जे उत्तेजन दिल त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

## मराठ्यांनी आपल नाव राखल

ग्याम्बट, ओमार, एल-अदम बक्ष, बेनगाझी, जेबल, केरेन, आसमारा वगैरे ठिकाणी हिंदी सैन्यान उत्तम मर्दुमकी गाजविली. पण येलगोची

ह्या ठिकाणी दाखवलेल शौर्य वाखाणण्यासारख होत. धुरळ्याच्या गाढ गर्दीत जीव कासावीस होईल अशा गर्दीत-'मराठे' व 'कॅमेरान' ह्यांनी इटालीयनाशी खूप तुमुल युद्ध करून त्यांना लोळवल. 'मराठा' म्हटल की त्याच्या संबंधी आजपर्यंतच्या त्याच्या लौकीकावरून काही कल्पना ठरलेल्या असतात. तो लढाऊ, मर्द असलाच पाहिजे. अंबाल्याला एका पंजाबी मुसलमान व्हाईसराय कमीशन्ड पेनशनरन मला म्हटल होत. 'आप मराठे हो. आप लढ सकते. शीख लढ सकते, हम लढ सकते. ये बाबू लोक क्या लढेंगे'. मराठे लोकासंबंधी काय अपेक्षा आहेत एवढ्याचकरिता मी त्याच म्हणण देतो आहे. नाहीतर सुशिक्षित बंगाली बाबू व मद्रासी बाबूहि लढू शकतो एवढच तर काय पण आताच्या लढाईत स्त्रीयाहि लढतात हे त्याला जरी नाही तरी मला माहित होत. आता लढाई पुर्वीची राहिली नाही. लढाईची आताची साधन निराळी व पुर्वीची निराळी. आताच्या टॅकटीक्स व स्ट्रॅटेजीही निराळी. ते सर्व जरी असल तरी 'मराठा' ह्याच्याबद्दल लढणाऱ्या माणसाच काय मत असत हे दिसून येईल. त्याला काळीमा लागणार

* नाही हे पहाण प्रत्येकाच कर्तव्य ठरत. समाजाच्या किंवा *
| संस्थेच्या नावावर आपली प्रतिष्ठा वाढवण्यापेक्षा |
| आपल्या कृतीन समाजाची किंवा संस्थेची प्रतिष्ठा वाढ- |
| वण हेच आनंददायक, अभिमानास्पद आहे व आपल्या |
* स्वार्थीकृतिन, लाजीरवाण्याकृतिन समाजाची किंवा *

संस्थेची बदनामी होते हे लक्षात ठेवायला पाहिजे. आणि म्हणून प्रत्येक 'मराठ्या'ला-हा शब्द प्रत्येक 'महाराष्ट्रीयन्' ला ह्या अर्थी वापरला आहे-धैर्य, शौर्य, प्रामाणिकपणा, दिलदारपणा, व देशभक्ति ह्याला अनुरूप अशी कृति करायला पाहिजे. आपल्या समाजाची चाड पाहिजे. मी 'मिडलइस्ट' वरून ज्या वेळेस कराचीस वापस आलो त्या वेळेस काही सिंधी हिंदु व मुस्लीम सिंधी ह्यांना भेटण्याचे प्रसंग आले. मराठ्यांच्या निस्पृहपणाविषयी, न्यायनिष्ठुरतेसंबंधी व प्रामाणिकपणा



बॅ. जी. व्ही. देशमुख
मराठे सैनिकांना उद्देशून भाषण करीत आहेत.

संबंधी फार उच्च दर्जाच मत दिसून आल. पर प्रांतात व परदेशात मराठे लोकांविषयी जो आदर आहे तो कमी न होता वृद्धिंगत होईल अशा रीतीन वागण्याची जबाबदारी प्रत्येक मराठ्यावर आहे. ती तो योग्य रीतीन पार पाडेल अशी मी अपेक्षा करतो.

## मराठ्यांनो दुसऱ्यांना स्वातंत्र्य मिळवून देता! स्वत:च मिळवा.

किंग फारूकच्या कैरोतील राजवाड्याला दिलेल्या भेटीनंतर निरनिराळ्या ठिकाणी जात येत असतांना सिरीयामध्ये एका ठिकाणी मराठे लोकाच सैन्य होत त्या शिबिरास भेट देण्यास सैनिक अधिकारी आम्हा कमिटीच्या सभासदांस घेऊन गेले. शिबिराची एकंदर व्यवस्था पाहून झाल्य नंतर 'मराठे' सैनिकांना उद्देशून मराठीत भाषण करण्यास मला इंग्लिश मिलिटरी ऑफीसरन सांगितल. मी भाषण केल ते अशा आशयाच. "तुम्ही इकडे आला आहात ते दुसऱ्यांच्या देशाच संरक्षण करण्यास. त्याच स्वातंत्र्य कायम राखण्यास. पवित्र काम आहे हे. ज्या लोकांच स्वातंत्र्य कायम राखण्याकरिता तुम्ही आपल रक्त सांडवता, प्राण खर्ची घालता ते लोक आपल्या देशाची गुलामगिरीतून मुक्तता करण्याकरिता, परकीयांनी त्यांच्या देशावर आक्रमण करून त्यांच स्वातंत्र्य हिरावून घेतल त्या मगरमिठीतून सुटण्याकरिता आपल्या रक्ताचे पाट कसे वाहवतात हे तुम्ही पहाता आहा. परकीयांच्या सत्तेपासून आपल्या देशाची मुक्तता करण्याचे धडे तुम्ही ह्यांच्याजवळून शिका. तुम्हाला जे काय शिकता येईल ते शिका. शिवाजी महाराजांनी परकीय सत्तेपासून आपणास सोडवल होत, स्वराज्य स्थापन केल होत हा इतिहास तुम्हास माहीत असेलच. तुम्ही निधड्या छातीन जे लोक आपल गेलेल स्वातंत्र्य मिळविण्याकरिता जीवाच रान करतात त्यांच्या खांद्याशी खांदा लावून लढा. तुम्ही इथे या पवित्र रणक्षेत्रावर मिळविलेल ज्ञान तुम्हाला तुमच स्वराज्य स्थापन करण्यास व त्याच संरक्षण करण्यास उपयोगी पडो अशी माझी इच्छा आहे".

माझं हे भाषण झाल्यानंतर सरदार बुटासिंग म्हणाले: 'मिस्टर देशमुख तुम्हाला फिरून हे लोक शिपायांना उद्देशून भाषण करण्यास सांगणार नाहीत. तुम्ही तर आपल्या भाषणात 'शिवाजी' 'स्वराज्य' 'स्वातंत्र्य' हे शब्द उपयोगात आणलेत व भाषणही तिखटच जोरदार केलं.' कॅप्टन दलपतसिंग पंजाबकडील गृहस्थ, जातीनं जाट म्हणाले, 'देशमुख मला मराठी समजत. मी परतवाडयाकडे वऱ्हाडात सैनिकी शिपायाचं काम बरेच वर्ष केलं. भाषण कडकच झालं' एका इंग्लिश मिलटरी ऑफीसरनं मला इंग्रजीत म्हटलं "मिस्टर देशमुख तुमचं भाषण लहानसं पण फार जोरदार ( Very spirited ) झालं" मला नंतर सैनिकांना उद्देशून भाषण करण्यास कोणीही सांगितलं नाही. ते काम नंतर कॅ. दलपतसिंग, सरदार बुटासिंग व श्री. कुंझरू हेच करीत असत. पण असं जरी झालं व कोणत्याहि मिलीटरी ऑफीसरनं नंतर मला भाषण करण्यास सांगितलं नाही तरी योगा योग काही विलक्षणच. भाषण करण्याचा प्रसंग माझ्यावर ओढवलाच. ऑफिसर्सची व माझी इच्छा नसताहि हा प्रसंग अनपेक्षितपणे आला.

## माझ्या भोवती सैनिकांचा गराडा

आम्ही 'डीफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटी' चे सभासद अशाच आणखी एका सैनिकी शिबिराला भेट देण्याला गेलो. शेडयुलप्रमाणे एका मागून दुसऱ्या, दुसऱ्या मागून तिसऱ्या अशा रीतिने ठिकठिकाणी जात असता मी एका मिलिटरी ऑफीसरशी बोलत असता श्री. कुंझरू कोठे तरी निघून गेले व सर फरेडरीक जेम्स व सरदार बुटासिंग माझ्या पासून दूर काही अंतरावर दुसऱ्या एका मिलिटरी ऑफीसरशी बोलत राहिले. माझ्या बरोबरचा मिलिटरी ऑफीसर जिकडे श्री. कुंझरू गेले होते तिकडे जाण्याची मला घाई करू लागला. त्याच्या म्हणण्याप्रमाणे मी चालावयास लागलो. इतक्यात तिसराच एक मिलिटरी ऑफीसर आला व मला म्हणाला " ह्या (Desert) डेझर्ट मधे माझा एकटयाचा तेवढा ( Mobile ) मोबाईल—फिरता-सिनेमा आहे की जो ह्या सैनिकाच

मनोरंजन करतो तर त्यांना उद्देशून चार शब्द बोला. बोलायचा केव्हाही प्रसंग आला तर कुंझरू किंवा मी. कुंझरू तर तिथे नव्हते. निघून गेले होते. मी मरळ्यांना बोलल्या नंतर माझ भाषण होण बंदच झाल होत. पण मला बोलण्याचा असा हा अचानक प्रसंग आला. मी त्या मोबाईल सिनेमावाल्याला नाखुष करण चहात नव्हतो. आणि किती काकुळतीन म्हटल होत त्यान मला: मी त्याला म्हणालो ' बर बोलतो.' मंडळी काय असतील ५।७५ त्या वेळेला. पण मी त्यांना उद्देशून बोलायला सुरवात केल्याबरोबर त्या ठिकाणी भराभर माणस जमू लागली. माझ्या भोवती सरासरी दोन, तिनशें माणसांचा गराडा पडला व त्यांनी मला नाना प्रश्न विचारायला सुरवात केली. मी उत्तर देऊ लागलो. काही अंतरावर सर फरेडरीक व सरदार बुटासिंग व मिलिटरी ऑफीसर्स उभे होते. त्यांच्या पैकी एक ऑफीसर मजजवळ आला व म्हणाला "तुम्ही शेडयुलच्या बरेच माग आहा. लौकर चाला" ते खरही असेल नाही अस नाही. पण हे ही संभवतीन होत की सर फरेडरीक ह्यांनी त्या मंडळीपासून माझी सुटका करण्याकरिता त्या मिलिटरी ऑफीसरला पाटवल असेल. मी त्याला म्हणालो " हया लोकांशी मला बोलू दे. हयांना पुष्कळ बोलायच आहे अस दिसत. त्यांच्याशी बोलण्यास मला भरपूर वेळ पाहिजे" तो परत गेला व काहि वेळान फिरून परत आला व म्हणाला "किती वेळ तुम्ही उभे राहणार ? तुमच्याकरिता ही खुर्ची आणली आहे. हया खुर्चीवर बसून बोला" मी म्हणालो "मला खुर्ची नको. वापस घेऊन जा. मला तासचे तास उभ राहण्याची व बोलण्याची सवय आहे" तो माझ्या भोवतालच्या मंडळी समक्षच खुर्ची वापस घेऊन गेला. ही पहिलीच वेळा असेल हया सैनिकांची एखाद्या त्यांच्याशी बोलायला आलेल्या व्हीजीटरन खुर्ची नाकारलेली पहाण्याची व उभ राहून बोलणारा पहाण्याची. प्रश्न विचारून विचारून मला भंडावून सोडल होत. माझ्या खुर्ची नाकारण्यान व उभ राहून आणखी बोलण्याची इच्छा प्रदर्शित केल्यान वातावरण जरास अनुकुल झाल्यासारख दिसत होत. कारण कोण्या एखाद्यान एखादा

प्रश्न टाकला तर त्यांच्यापैकीच एखादा म्हणायचा 'ये पूछनेमे कोई जान नही. महाराजने इसका जबाब दे दिया है' तरीही एकान म्हटल "आप लोक आते काहेके वास्ते ? आप लोक क्योंव आते हो ?" त्याच वेळेला दुसऱ्या एकान म्हटल "आप लोक आते हो. हमसे बाते करते हो, हमें विश्वास दिलाते हो हमारे लिये यवं करेंगे त्यवं करेंगे और करते कुछबी नहीं. आतेही काहेके लिये ?" आणखी कोणी तरी म्हटल "राजे महा-राजे आये, सर शिकंदर हयातखान आये, सर फेरोझखान नून आये सब आये. सब लोगोने बहोत मिठी बाते की लेकीन किया तो कुछ भी नही. आप आतेही क्यों हमें नही समझता ?" अशी एका पाठीमागून एक प्रश्नांची सरबत्ती ह्या निराशा झाल्यामुळे चिडलेल्या, संतापलेल्या माणसांची सुरु झाली. प्रत्येकाच्या प्रश्नाच उत्तर न देता सर्वांचे प्रश्न काय आहेत ते स्वस्थपणे ऐकून घ्यावेत व मग जे काय उत्तर द्यावयाच असेल ते भाषणाच्या रूपान द्याव अस मी मनाशी ठरवल होत. त्याप्रमाणे त्यांच प्रश्न विचारण संपल्यानंतर मी म्हणालो. "मै एक मामुली आदमी हूं. मै राजामहाराजा नही, ( ह्यावेळेला मी टोपीच घालून गेलो होतो ) या आपने जीन बडे आदमीयों का नाम लिया उनके माफीक खुर्चीपर बैठनेवाला सरकारी बडाभारी नोकर भी नही. वे सब सरकार जमा आदमी थे. मै तो आपके माफीक एक मामुली आदमी. मुझे आप-सरीखे मामुली लोकोने असेंब्लीमे भेजा. असेंब्लीके लिये चुनाव हुवा जिनका ऐसे अदमीयोने याने असेंब्लीके मेम्बरोने मुझे इधर आने के लिये कहा. मै साफ कह देना चाहता हूँ की मेरे हातमे आपको कुछ लेने देने की ताकत नही ना मै आपको कोई विश्वास दिलावूंगा. मै लोकोने चुनाहुवा असेंब्लीका एक प्रतिनिधी एक वचन देता हूँ. जितनी आपकी शिकायते है उतनी आप मुझे बतायिए तो मै असें-ब्लीके सामने रखने की कोशीस करुंगा. हिंदुस्थानमेके आम लोगोको आपके दुखकी कहानी सुनाऊँगा. आप अगर मुनासीब समझते हो तो मुझे कहो किस बातका आपको दुःख है." नंतर कोणी एखाद्यान एखादी तक्रार सांगावी, तर दुसऱ्यान दुसरी एखादी तक्रार सांगावी,

केव्हां सांगितलेल्या तक्रारीची दुरूस्तीहि व्हावी असं चालल असतांना मी त्या तक्रारीची नोंद करीत होतो. हे सर्व आटोपल्यावर त्यांना सलाम करून जिथे सर फ्रेडरीक वगैरे मंडळी उभी होती तिथे गेलो व तिथून 'शेफर्ड' होटेल मधे गेलो. जेवणाच्या वेळेस सर फ्रेडरीक जेम्स ह्यांनी ह्या प्रसंगाच वर्णन केल ते अस "Deshmukh was regularly mobbed"

## हिंदुस्थान, आव जाव घर तुम्हारा

कैरोत असतानांच आमच्या इथा 'शेफर्ड' होटेलमधे हैदराबादच्या सैन्याचा कमांडर 'एल एड्रुस' व ग्वालेरच्या सैन्याचा कमांडर 'राणे' असे दोघे गृहस्थ हिंदुस्थानांतून आलेत. एका मोठया इंग्लीश मिलिटरी ऑफीसरने त्यांची मला ओळख करून दिली आणि त्याच्या पश्चात मला एल एड्रुस' संबंधी म्हणाला "ह्याच मिशन (Mission) मिलिटरी व पोलीटीकल आहे". दुसऱ्याच दिवशी तिसरे प्रहरी मी 'शेफर्ड' होटेलच्या उघड्या कॅफेमधे बसलो असताना एल. एड्रुसला हातात पार्सल घेऊन येताना व एका टेबलाजवळ बसताना पाहयल. मी लगेच आपल्या जागेवरून उठून त्याच्या टेबलाजवळ गेलो. वेटरला बोलावून सँडविचेस, केक्स व चहा मागविला. थोड औपचारिक बोलून व त्याला सैन्यात का जावस वाटल, शिक्षण कोठे झाल, कितपत झाल वगैरे विचारून त्याला म्हणालो "मला मिलिटरी ऑफीसर्सनी सांगितल आहे की तुझ इकडे येण्याच मिशन मिलीटरी तसच पोलिटिकलही आहे. तर पोलिटीकल ते कोणच?" अस म्हणून मी त्याच्याकरिता एका कपांत चहा ओतला व सँडविचेस व केक्स त्याच्या समोर केल्या. मी ही आपल्या कपांत चहा ओतला व सँडविचेस खायला सुरवात केली.

एल एड्रुसन चहा घेत घेत बोलायला सुरवात केली. " 'सिंगापूर' पडल्यापासून अरबस्थानांतून अरब लोक जे पुर्वी तिकडे जात होते म्हणजे ' मलाया ' कडे जात होते ते आता हैदराबाद स्टेटमधे येऊ लागले आहेत. ते येणारे अरब जवळ जवळ सर्वच दरिद्री असतात व

साहसीही. हे लोक स्टेटमधे आल्यानंतर खेडयापाडयात चोऱ्या करतात, दगोडे घालतात, डाके मारतात. आधीच त्या स्टेटमधे जे अरब आहेत त्यांच्यापासून लोकांना त्रास होतो व स्टेटला त्या लोकांचा-अरबांचा बंदोबस्त करण्याकरिता एक शीख पलटण ठेवावी लागते. आता आणखी नवीन अरबांच्या टोळधाडी येत आहेत त्यामुळे ह्या अरबांचा बंदोबस्त करण मोठ कठीण जाणार आहे. म्हणून मी अरबस्थानांत जाऊन आमच्याकडे आम्ही सांगू तितकेच अरब, त्यांची सांपत्तिक स्थिती साधारण बरी असेल तर येऊ द्यावेत इतराना येऊ देऊ नये असा बंदोबस्त करण्यास जाणार आहे. ".

मीः— " तुम्ही हिंदुस्थान सरकारकडे ह्या बाबत ( रिप्रेझेंटेशन ) करून-आपली बाजू मांडून-त्यांच्याकडून बंदोबस्त का करविला नाही ? '

तोः— आम्ही रिप्रेझेंटेशन केल होत. पण हिंदुस्थान सरकारन सांगितल आम्ही कोणत्याहि राष्ट्रांतील मनुष्याला इथे येण्यास, बंधन करीत नाही. म्हणूनच हैद्राबाद स्टेटन मला हेही मिशन सांगितल आहे"

क्यंव, आहे की नाही मजा ! हलवायाच्या घरावर तुळशी पत्र ! का निर्बंध घालतील बिचारे कोणत्याहि राष्ट्रावर ! कोणही याव त्याला मज्जाव नाही. आणि त्यांच्या दृष्टिन हीच पॉलीसी सोयीस्कर. येण्याला मज्जाव करायला नियम करावे लागतील ते असणार जनरल (General) सर्वसामान्य—अमुकच एका राष्ट्राला मज्जाव करता येण ठीक दिसणार नाही. घोटाळे उत्पन्न होणार. बर नियम सर्वसामान्य करावेत तर मग ते युरोपमधल्या, ब्रिटीश कॉमनवेल्थ मधल्या—द. आफ्रिका ऑस्ट्रेलिया, केनीया, सीलोन, बर्मा—राष्ट्रांनाहि लागू होणार ! अमेरिकन्सना सुद्धा. मग ब्रिटीश बहादूरांना ह्या राष्ट्रांजवळून सवलती कशा मिळणार ? म्हणून तर कोणत्याच राष्ट्रांवर निर्बंध नाही. कॉमनवेल्थमधल्या राष्ट्रांनी हिंदुस्थानवर निर्बंध घातले तर चालते. ' जशास तसे ' ह्या नात्यान त्यांच्यावर निर्बंध का नसावे ? पण हिंदुस्थान सरकार हे करणार कस ? ते ब्रिटीश सरकारच्या ' पायाची दासी ' ना ! आव जाव घर तुम्हारा

हे हिंदुस्थानच्याच बाबतीत का ? फुकाफुकी इंग्रजांना, हिंदुस्थान परतंत्र आहे म्हणून, भलमानसाई मिळवता येते. हिंदुस्थान सर्वांना मोकळा. कोणही याव व त्याला लुटून न्याव. रहायला मोकळीक, व्यापाराला मोकळीक, खिस्तीधर्म प्रचाराला मोकळीक व ते करणाऱ्यांना विशेष सवलती ! आणि वर नागरीकाचे हक्क ही !! आमच्या लोकांना मात्र इतर देशात नागरीकाचे हक्क तर राहूच द्या, पण साध्या माणूसकीनहि वागवण्यात येत नाही; व त्याच उट्ट काढाव म्हटल तर संधि नाही. आम्ही उदार अंतःकरणान त्यांच स्वागतच केल पाहिजे. अशा रीतीन म्हणे त्यांचा हृदयपालट होईल. किती झाला ते दिसतच आहे. ब्रिटीशवसाहतीन तर आमची अशी वृत्ति असता हि जास्त निर्बंध घालण्याचा सपाटा चालविला आहे. कव्हां व कसा थांबणार देव जाणे ! हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यावांचून व त्यान ह्या उदार अंतःकरणाच्या

> * नीतिला मर्यादा घातल्यावांचून त्याला बरे दिवस येतील *
> | अस दिसत नाही. हिंदुस्थानच भवितव्य स्वातन्त्र्य |
> | मिळवून ' जशास तसे ' ही नीति अनुसरण्यावरच |
> * अवलंबून आहे. *

## लॉर्ड कर्झनची आठवण झाली

' कैरोत ' असताना एका ठिकाणी मिलिटरी हॉस्पीटलमधे जखमी शिपायांना भेट देण्याकरिता गेलो. बरोबर सर्वच मंडळी-कमिटीचे सभासद होते. आमच्यापैकी कुंझरूची दृष्टि नेहमी आर्थिक-कोणत्या हे वस्तूची किंमत काय वगैरे. ते तें काम अगदी बारकाईने करीत. सर फरेडरीक हे युरोपियन सैनिकासंबंधी व काही ओळखीच्या मिलिटरी लोकासंबंधी चौकशी करीत. कप्टन दलपतसिंग-मामुली शिपायाच्या रँक पासून वर चढलेला मनुष्य—मामुली शिपायांची चौकशी करी. सरदार बुटासिंग हा खरोखरच सरदार. सुखवस्तू शीख गृहस्थ. श्रीमंत-खूप-श्रीमंत व नाजनी. शीखांचा करारीपणा, स्वाभिमान वगैरे सद्गुण

त्याच्यात होते. पण शिपायीपणा, कडवेपणा त्याच्यात नव्हता. तो विशेष खोलपाण्यात केव्हांच पडत नसे. शीख शिपायी किंवा ऑफीसर कोठे भेटले तर त्यांच्याशी बोले. इथे हे सांगायला पाहिजे की श्री. जम्नादास हे कैरोला आल्यानंतर थोडयाच दिवसांनी हिंदुस्थानास परत गेले पुढे एक गोष्ट सांगणार आहे तीही कदाचित जाण्यास कारण झाली असेल. असो. हॉस्पीटलला भेट दिली त्या वेळेस श्री. जम्नादास नव्हते.



डॉ. जी. व्ही. देशमुख
एम. डी. (लंडन) एफ. आर. सी. एस. (इंग्लंड)

या हॉस्पीटलमधे आमच्यापैकी निरनिराळे सभासद निरनिराळ्या माणसांशी बोलण्यात गुंतले. असताना मी एका सर्जनशी बोलू लागलो. हा इंग्रज होता. भाऊ गोपाळ डॉक्टर. तो पहिल्या जागतिक लढाईत मुंबईच्या 'लेडी हार्डीज' वॉर हॉस्पीटलमधे ऑनररी सर्जन होता. त्याच्याबरोबर तीनचारदा जाऊन तिथले सर्जिकल वार्डस् व त्यान केलेले काही आपरेशन्स ही मी पाहिले होते. ह्यामुळे वॉर हॉस्पीटलची कल्पना मला चांगली होती. तेव्हा ह्या हॉस्पीटल संबंधी चौकशी करणे मला फारच सोप गेल.

मी त्या सर्जनला विचारलः स्टाफवर सीनीयर, ज्युनियर सर्जनस कोण आहेत ? त्यांचे क्वॉलीफीकेशन्स काय आहेत ? एक्विपमेंट कोणकोणती आहे ? बेडस् किती आहेत ? नर्सेस किती आहेत वगैरे. नंतर

व्होकेशनल थिरॅपीची व्यवस्था आहे काय हे ही विचारल. आहे अस म्हटल्यावर बरोबरच्या डॉक्टर व नर्सेसना माग टाकून मी जखमी लोकांच्या बेडस्कडे गेलो व एका शिपायाच्या डोक्या शेजारी एका टेबलावर कापडावरील नक्षीच काम–झाडाच चित्र होत ते–पाहून त्याला म्हणालो "ये काम क्या आपने किया है?"

तोः– "नहीजी. ये तो मेमसाहबने किया है." तो अस म्हणतो आहे तर लगेच मेट्रन तिथे आली. मी तिला इंग्रजीत म्हणालो "हे काम पाहिल्यावर मी ह्याला विचारल हे तू केलस का! तर हा म्हणतो नाही. मेमसाहेबन केल." तिन त्या शिपायाला हिंदीत जोरान–जरा दाटूनच का म्हणाना–म्हटल "ये काम हमने तुमको सिखाया है, लेकीन बनाया तो तुमने ही ना?" तो लाचारीन "हां जो" म्हणाला. मला हसू आल व लॉर्ड कर्झनची आठवण झाली.



बॅ. जी. व्ही. देशमुख

(फेटाबांधलेले.)

१८९७–९८ सालांतील गोष्ट. नागपुरास प्रथमच प्लेग आला त्यावेळची

त्याच वेळेस व्हाइसरॉय लार्ड कर्झन यावयाचा होता. तेव्हा प्लेग झाले-ल्यांना 'अलग ठेवण्याकरिता (Segregate) एका प्लेग कॅम्पची उत्तम मांडणी केली होती. झोंपडयाना सफेदी झोंपडयांच्या मधून उंच झाड, रस्ते, रस्त्याच्या आजुबाजुन झाडांच्या कुंडया मोठी झाड वगैरे. एकंदर त्या प्लेग कॅम्पची शान काही और होती. कॅम्प ते औट करणारे 'रे' नावाचे बंगाली गृहस्थ होतें अस वाटत. कॅम्पचा एकंदर थाटमाट पाहून व्हाईसरॉय खूष झालेत. पण त्यांनी एका झाडाला हात लावून वर उचलल. झाड जमिनीच्या बाहेर आल सगळ भंड फुटल. हा सर्व देखावा आहे हे चटकन लक्षात आल. लॉर्ड कर्झनला बोलण्याची गरजच नव्हती. प्रेसिडेंट, सेक्रेटरी वगैरे मंडळींची तोंड पहाण्यासारखी होती. अशी ही फसवाफसवी का ? खोट सर्टिफिकेट मिळवण्याचे प्रयत्न का ? केव्हा केव्हां चालून जातात म्हणून ! व मग त्या सर्टिफिकेटावर बढती पदवी मिळते म्हणूनच की नाही ? अशी फसवेगिरी उघडकीस आली नाही तर मग बिचाऱ्या रोग्यांच नुकसान होत ते गेल कोणीकडे. खोट सर्टिफिकेट मिळवायला निघालेली मंडळी विश्वासघातच करत नाही का ? मग ते सरकारी खात कोणतही असो. हे लोक जबाबदारी ओळखतील व कर्तव्यास जागतील तर बर होईल. निव्वळ स्वार्थच साधायचा का ? आणि अगदी वरची मंडळी मोठ्या हुद्यावरची मंडळी जर अस करू लागली तर मग ग्रंथच आटोपला म्हणायचा. ह्यांच्या जिम्मे असलेल्या लोकांच हित मग कोण पहाणार ?

## एकांकी एक प्रवेशी नाटक

कैरोत असताना एका सुशिक्षित व सेक्रेटरीएटमध्ये नोकर असलेल्या इजिप्शीयन क्लार्कची व माझी ओळख झाली. मला वाटते त्याची ह्या 'शेफर्ड' होटेल मधल्या काफेमधे फेरी टाकण्याचा प्रघातच असला पाहिजे. एक दिवस मी त्या कॅफेमधे कॉफी घेत असताना रस्त्यान जाणाऱ्या येणाऱ्याकडे पहात होतो. मला वाटते हा गृहस्थ कॅफेत आला त्या वेळेस मी कोणत्यातरी निमित्तान जरीचाच फेटा बांधला असला

पाहिजे. तस म्हटल तर जरीचा फेटा डोक्याला बांधण्याच्या कामी माझ्यावर 'महाऽराज्याचा' प्रसंग ओढवल्यापासून मी फार काळजी घेत असे. मी जरीचा फेटा बांधला असला पाहिजे अस म्हणतो याच कारण शे दीडशे माणसांच्या घोळक्यात तो नेमका माझ्याच टेबलाजवळ आला. मला 'गुड इव्हनिंग' करून बसला. ह्याला थोड बहुत इंग्रजी येत होत. पण फ्रेंच चांगल. इजिप्ट हा देश राजकीय दृष्ट्या इंग्रजांच्या 'स्फीअर ऑफ इन्फ्लूएन्स' खाली. पण संस्कृतिच्या बाबतींत फ्रेंचांचीच छाप दिसली. भाषा, स्त्रियांच्या कपड्याची फॅशन, वगैरे बाबतींत फ्रेंचा-चेंच अनुकरण. प्रोफेसर्सही फ्रेंचच. मात्र ह्या दुसऱ्या जागतिक लढाईत तिथे अमेरिकन्स पुष्कळ आल्यामुळे व पैसे खर्च करण्याच्या बाबतीत ते मागे पुढे पहाणारे नसल्यामुळे व्यापाराच्या दृष्टीन काही सुशिक्षित इजिप्शीयन इंग्रजीही शिकले होते. अशाच पैकी माझ्या टेबलाजवळ आलेला इजिप्शीयन इंग्रजीही शिकले होते. अशाच पैकी माझ्या टेबलाजवळ आलेला इजिप्शीयन. याचा माझा परिचय झाल्यानंतर तो रोज संध्याकाळी येत असे, माझ्याबरोबर कॉफी घेत असे व मी त्याच्या बरोबर 'कैरोचा' व आसपासचा बराचसा भाग पहात असे. अर्थात पैसा मी खर्च करत गेले व ते ही माझ्या जरीच्या फेटयाच्या इभ्रतीस शोभेल अशा रीतीन. आणि हे जरीचा फेटा घातला नाही तरी ही. कारण त्यान एकदा मला फेटयात पहिल्यानंतर मी कोणी तरी राजा किंवा बडा अमलदार असलो पाहिजे असच वाटत गेल. एकदा छाप बसली ती बसली. मी बहुतेक वेळां ग्रे कापडाची टोपीच घालत होतो तरी एकदा जो छाप लागला तो लागला. म्हणूनच मनुष्याच्या पहिल्या भेटीच महत्व म्हटल आहे. It's the first impression that counts. पहिल्या भेटीलाच जी छाप पडली—बरी वाईट—तीचच महत्व, तीच बहुतकरून मूळ धरून बसते, ती सहसा मिटल्या जात नाही. एकदा 'कानफाटया' नाव पडल की तो नेहमी करिता 'कानफाटया' च. एक दिवस मी ह्या इजिप्शीयन गृहस्थाला म्हणालो मला इजिपशीयन (जन्त्री) वरच्या दर्जाचे

लोक दिसतील अशा एका चांगल्या नाटकगृहात जावयाच आहे. तर उत्तमात उत्तम नाटकगृह असेल तिथे जाऊ व चांगल वरच्या दर्जाच टिकीट घेऊ. तो व मी एका नाटकगृहात गेलो. तिथे फारच उंची पोषाख केलेले गृहस्थ व स्त्रिया होत्या स्त्रियांचे कपडे व पोषाख करण्याची तऱ्हा पाश्चिमात्य ( European ) पद्धतीची. नाटकही उत्तम होत. एका ड्रगीस्टच—औषधी विकणाऱ्याच–दुकान हा सीन (Scene). दुकानदार हा मुख्य नट. काऊंटर जवळ उभा. औषध विकत घेण्याला येणारे व नंतर जाणारे ही पात्र. संबंध नाटक संपे पावेतो (Scene) सीन काही बदलला नाही. ह्या मुख्य नटाच ह्या पात्राशी—स्त्री व पुरुष पात्रांशी अस काही संभाषण चाले की नाटकाला आलेल्या मंडळाच्या हासण्याच्या एका पाठीमागून एक लहरीवर लहरी उठत. भाषण अर्थातच इजिपशियन भाषेत होत ह्या नाटकात हीरॉइन नव्हती व प्रेम प्रसंगही नव्हते. पण Dialogue डायलॉगमधे भारी विनोद व तो ही सहज व मोकळ्या तऱ्हेचा. मला तो इजिपशियन गृहस्थ म्हणाला हा नट युरोपमधे प्रसिद्ध नट गणल्या गेला आहे. नाटक सरासरी दोन तास

* चालल असेल. आपल्या कडल्या नाटककर्त्यांनी असे *
| एका अंकी एक प्रवेशी नाटक लिहायला पाहिजेत. व |
| ती करणारे कसलेले नट पाहिजेत. नाटकात जर |
| डायलॉग उत्तम असले तर नाटकान नाटक |
| पहाणाऱ्यांच्या मनाची पकड घेतलीच पाहिजे अस |
| वाटत व मग अशी नाटक सिनेमाशी टक्कर देऊन |
* नाटक कंपन्याना जिवंत ठेवतील अस वाटत *

आपल्याकडे नाटक म्हटल की हिरॉईन पाहिजेच व प्रेमप्रसंगही पाहिजेच अस नाटकाच शास्त्र बनून गेल आहे. तसच सिनेमाचही. आणि सिनेमातल्या प्रेम प्रसंगाला असा काही बहर येतो की लोक म्हणू लागले आहेत तरुण पिढीची नीति बिघडेल—सेन्सॉरन आपल काम जास्त कसोशिन केल पाहिजे.

## बॉम्बरच्या कॉकपीटमधला अनुभव

एकदा 'कैरोहून' 'मी सायप्रस' ला गेलो होतो. त्या वेळेस श्री. जमनादास खेरीज आम्ही सर्व कन्सल्टेटीव्ह कमिटीचे सभासद 'बॉम्बर' मधून गेलो होतो. सायप्रस हे लढाईच्या दृष्टिन महत्वाच ठिकाण. बेटातली प्रेक्षणीय स्थळे पाहिल्यानंतर आम्ही कैरोस परत जाण्याच्या तयारीस लागलो. आमच्या 'बॉम्बर' चा पायलाट ( Pilot ) ऑस्ट्रेलियन होता. त्याला व त्याच्या सोबत्याला-को पायलॅाटला-मी तेथल्या एका खूप चांगल्या हॅाटेलमधे नेऊन लंच (Lunch) दिल व लंच (दुपारच जेवण) घेताना म्हणालो "कॅाकपोट मधे बसल म्हणजे बसणाऱ्याला काय वाटत, त्याच्या मनांत काय विचार येतात हे मला अनुभवावस वाटत." तो म्हणाला 'ठीक आहे. आता आपण थोडया वेळान निघणारच आहो. प्रवास सुरू झाला म्हणजे मी तुला कॅाकपीटमधे बसायला बोलावतो" आम्ही सर्व सभासद व एक पब्लिसीटी ऑफीसर बॅाम्बरमधे बसून उड्डाण करून कैरोकडे निघालो. थोडया वेळान पायलॅाटन कोपायलॅाटला माझ्याकडे पाठवल मो कॅाकपीटकडे गेलो व कोपायलॅाट माझ्या जागी बसला. मी तिथे बसल्यानंतर इकडे तिकडे पाहून म्हणालो "पक्षी दिसत नाहीत" तोः 'आपण चवदाहजार फूट उंची वरून चाललो आहो. इतक्या उंचावर पक्षीं उडू शकत नाही. Eagleइगल सारखा पक्षी-जास्तीतजास्त उडणारा पक्षी-४००० चार हजार फुटापेक्षा जास्त उंच उडू शकत नाही" आम्ही मेघांच्यावरून चाललो होतो. नंतर त्यान मला कॅाकपीट मधल्या मेकॅ-निझमची माहिती दिली व म्हणाला "मोटार चालवणेवाल्याला एरोप्लेन चालवण (Steer करण) कठीण नाही. दोन्ही पंख एका हॅारीझॅान्टल लाईनमधे ठेवण्याचा एक सारखा प्रयत्न केला म्हणजे झाल. तू चाल-वना मी जवळच आहे" मी म्हणालो "एरोप्लेन चालवण कठीण नाही. दोन्ही पंख हॅारीझॅान्टल लाईनमधे ठेवल म्हणजे झाल हया तुझ्या म्हण-ण्यान पोहण्यासंबंधान जे एका जणान म्हटल त्याची आठवण झाली. पोहण काही कठीण नाही. डोक पाण्याच्या वर ठेवत गेल म्हणजे झाल" तो हासला व मला म्हणाला "चालव. मी तुझ्या जवळच आहे एक दोन

मिनीट हा ही अनुभव घेऊन पहा." ते बॉम्बर दोन चार मिनिट चाल-वण्यापेक्षां जास्त वेळ चालवण्याच रिस्क ( Risk ) मी घेतल नाही. मी बॉम्बर चालवतो हे जर माझ्या सोबत्यांना कळून आल तर त्या पाय-लॅाटला व मला दोघांनाही त्यांची खूप बोलणी खावी लागतील, न जाणो कदाचित Accident झाला तर भयंकर हानि पोचेल वगैरे विचार मनात आले व मी त्याला म्हणालो "तूच आपल हे बॅाम्बर (Monkey बंदर ) आटोप." तिथे आणखी काही वेळ बसून इकडे तिकडे काय काय दिसते हे पहात होतो. काय दिसणार ! जिकडे तिकडे मेघच मेघ खाली मेघ वर गेलो तरी मेघ. काही वेळान पायलॅाट कोपायलॅाट कडे पाहू लागला. मी म्हणालो "काय झाल ? तुला तुझ्या कोपायलॅाटची गरज भासते काय?" तो: "होय. हवा बदलली आहे." मी: " तर मग तुझ्या कोपायलॅाटला मी पाठवून देतो" अस म्हणून मी आपल्या जागे-वर जाऊन बसलो. कोपायलॅाटला कॅाकपीटमधे जायला सांगितल.

## कैरो मधला ग्रोटो

कैरोमधे पहाण्यासारख्या नव्या जुन्या गोष्टी बऱ्याच आहेत. जुन्या मशिदी, अलाझार युनिव्हर्सिटी वगैरे. पिऱ्यामिडची वर्णन तर बहुतेकानी वाचलं च असतील. आमच्या मंडळीपैकी मीच तेवढा सर्वात उंच पिऱ्यामिड गाईड बरोबर चढून गेलो. बाकी मंडळी पायथ्याशीच राहिली व म्हणाली तू जाऊन ये व आम्हाला सांग. त्या प्रमाणे मी केल. पिऱ्या-मिडस ग्रॅंड आहेत. काळया दगडाचे ठोकळयावर ठोकळे. वर जाण्याचा रस्ता अगदी अरूंद. एक मनुष्य जाईल इतकाच रूंद. मी वर गेलो त्याच्या पुर्वी कोणीतरी राजे गेले होते अस गाईड म्हणाला. कारण त्या वर जाण्याच्या प्यासेजमधे खाल पासून वर जाण्याकरिता विजेच्या दिव्याचा बंदोबस्त केलेला दिसला. वर गेल्यानंतर एक रिकामा vault व्हॅाल्ट दिसला. पण पिऱ्यामिडमधे चित्ताकर्षक अस काहीच नव्हत. मला सर्वात चांगल, चित्ताकर्षक व नाविन्य वाटल अस स्थळ तिथला "ग्रोटो". माझ्या बरोबर असलेल्या सेक्रेटरीएट मधल्या इजिपशीयन मनुष्यान मला



डावीकडून उजवीकडे पहिली रांग – हृदयनाथ कुंझरु, बॅ. जम्नादास मेथा, बॅ जी. व्ही. देशमुख, ब्रिटीश अम्बॅसडर लॉर्ड किलार्न, कॅप्टन दलपतसींग, सरदार बूटासींग,
दुसऱ्या ओळींत सर फ्रेडरीक जेम्स आणि इतर मंडळींत मिड्ल ईस्टमधील कमांडर–इन–चीफ, एअर मार्शल व एडमिरल आहेत.

सांगितल 'ग्रोटो' काही शतकापुर्वी इटालियन लोकांनी बांधला. ग्रोटो बारीक रेती व दुसऱ्या कित्येक वस्तू ह्यांच्या मिश्रणांनी बांधलेला आहे. ग्रोटोची उंची ५० पन्नास फूट तरीअसेलच. ह्या ग्रोटोतून फिरताना आपण एखाद्या गुहेतून निरनिराळ्या रस्त्यांनी फिरतो तस वाटत. ग्रोटो-मधील रस्त्यांच्या दोन्ही बाजूला ठिकठिकाणी मोठे मोठे मासे पाण्यात विहार करतांना दिसतात. त्या पाण्यांत उजेड येण्याची व्यवस्थाही दिसली. ह्या ग्रोटोला पाहिजे तर अक्वेरीयम म्हणाना. ग्रोटोवर चढून गेल म्हणजे एक सपाट गच्ची लागते. ही गच्ची सबंध ग्रोटोवर आहे. त्या गच्चीवर Season flowers सीझन फ्लॅावर्सची छोटीशी बाग. तिथे वाटल्यास मंडळी ( Picnic ) पिकनीक करिता जातात. पिकनीकला जाणारी मंडळी जिथे पिकनीक करितात ती जागा परत जाताना अगदी स्वच्छ करून ठेवतात. आपणाला ज्या प्रमाणे पिकनीक करिता स्वच्छ जागा मिळाली तशी ती दुसऱ्यालाहि मिळावी अशी ते खबरदारी घेतात. आपल काम झाल आता आपण कशाला दुसऱ्याची फिकीर करावी अशी वृत्ति ठेवत नाहीत. स्वतःची सोय करून घेताना दुसऱ्याचीहि सोय पाहिली

* पाहिजे. ज्या गोष्टीचा फायदा आपणाला मिळाला *
| त्याच गोष्टीचा फायदा आपल्याप्रमाणे इतरांनाही |
* मिळेल ही दक्षता घ्यावयाला पाहिजे. आपल्याकडील *

बहुतेक मंडळी रेल्वेतून प्रवास करताना किंवा सार्वजनिक ठिकाणी उदाहरणार्थ बागबगीच्यांतून 'इद'च्या दिवशीं आपली सोय करून घेतात पण जातांना ती जागा ह्यांना ज्याप्रमाणे स्वच्छ परिस्थितीत मिळाली तशी ती ठेवण्याची काळजी घेत नाहीत. जिकडे तिकडे केरकचरा, गिदाडा करून ठेवतात. ह्यांच्या पाठीमागून त्या ठिकाणी येणाऱ्या इतर मंडळींना त्या पासून गैरसोय होईल, ते ह्यांना जंगली वगैरे शिव्या देतील ह्याची त्याना लाज नसते.

काही उतारू रेल्वेन प्रवास करताना डब्यात येणाऱ्या किंवा आत असलेल्या लोकांच्या सोयी गैरसोयीकडे, डब्यांतील स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात ह्याच एक उत्तम उदाहरण एका माजी कांग्रेस मिनिस्टरच

देतो. मी सन १९४७ सालच्या सुरवातीस नागपुरहून कलकत्त्यास डाक गाडीने जात होतो. प्रवास सेकंड क्लासने करत होतो. सरासरी मध्यरात्रीच्या सुमारास एक उतारू डब्यात आला. मी एका वरच्या बर्थवर होतो. बाकीच्या बर्थस् रिकाम्याच होत्या. त्यान आपला बिस्तारा एका खालच्या बर्थवर टाकला. नंतर सकाळी ५ च्या सुमारास तो वॉटर क्लोझेटमधे गेला व तिथून सरासरी अर्ध्या तासान बाहेर आला. नंतर मी वॉटर क्लोझेटमधे जाण्यास निघालो. वॉटरक्लोझेट जवळ जाऊन पहातो तो जिकडे तिकडे पाणीच पाणी. मी ह्या गृहस्थाला विचारल 'आप न्हाये क्या ? तो म्हणाला 'हो ' ह्या गृहस्थान काय केल की वॉशबेसीनमधे पाणी भरून त्याचो गंगाळासारखी व कमोडच्या लिडची पाटासारखी योजना करून स्नान केल होत. हे पाणी निघून जाण्यास मार्ग नसल्यामुळे तिथे असलेल स्नान केल्यानंतरच पाणी गाडीच्या हेलकाव्यामुळे वॉटर क्लोझेटच्या बाहेर डब्यात येत होत. ह्या गृहस्थान इतर उतारूंची काय गैरसोय होईल ह्याचा काही विचार केला होता का ? आपल काम झाल, झ ल. कोण पर्वा करतो इतरांच्या सोयी गैरसोयीची ? स्नानानंतर ह्या गृहस्थान आपला फराळाचा डबा काढला व फराळ केला. त्याचा फराळ झाल्यानंतर मी त्याला म्हणालो ' आप कहां जाते ? ' तो म्हणाला ' कलकत्ता ' ' आप किस प्रांतके ? ' मी म्हणालो कारण गाडी ओरीसा व बिहारमधून जाते, तो म्हणाला ' ओरीसा '. त्याचे खादीचे कपडे होते म्हणून मी ' आप कांग्रेसवाले हो ? ' तोः ' हॉं. मैं ओरिसामे एक्समिनीस्टर था. ' मी : ' कोनसा पोर्टफोलीओ ? ' तो: ' हेल्थ '. ह्या घटनेवर काही मल्लीनाथी करायला पाहिजे का ? ह्याच डब्यातल्या एखाद्या परदेशातल्या उतारून काय मत बनवल असत ? मिस मेयोन काय म्हटल असत ? आणि एक दोन प्रसंगानच, शितावरून भाताची परिक्षा करण्याचा जो साधारण नियम आहे, त्यान हिंदुस्थानच्या लोकासंबंधी जर जंगली म्हणून मत बनवल तर त्याला दोष देता येईल का ? पण एवढा दूरवर विचार कांग्रेस एक्समिनिस्टर करील तर तो कांग्रेसवाला ( माणूस ) कसला ? कांग्रेसवाल्यांनाहि वाटत आपण आपली सोय पाहिली म्हणजे झाल. हे

करताना सदाचारास सभ्यतेस फाटा मिळाला तरी हरकत नाही. नव्हे असे करणे हे आवश्यकच आहे. सदाचार, शिष्टाचार ही सर्व Fuedal बंधनं आहेत. सरंजामशाहीचा नाश करावयाचा तर ह्याही बंधनांना फाटा मिळाला पाहिजे. १९४७ साली बंगाल नागपूर रेल्वेने कलकत्त्यास जाण्याचे काही प्रसंग आले. तेव्हा रिफ्रेशमेंटकारचा म्यानेजर सांगत होता ' काय सांगावं, पांढरी टोपी घातलेले खादी वस्त्र परिधान केलेले माणस कारमधे ( Dining car मधे ) येतात, खुर्चीवर बसतात व समोरच्या जेवणाच्या टेबलवर दोन्ही पाय ठेवून रेलतात. त्यांना बोलण्याची चोरी. न जाणो त्यांच्यापैकी एखादा मिनिस्टर निघायचा किंवा त्याच्या ओळखी पाळखीचा एखादा कांग्रेसवाला निघायचा व मग निरर्थक कटकट उत्पन्न व्हायची ". नंतर मलाहि एकदा हा देखावा पहावयास मिळाला. त्यांना शहाणपणा शिकवावा कोणी ? मी काही म्यानेजर नव्हतो. त्याना नीट रीतीने वागा म्हणणारा मी कोण ! मला काय अधिकार. व ज्याला अधिकार तो म्यानेजर तर बोलायला घाबरत होता.

| जर दुसऱ्याच्या सोयी गैरसोयीची, अडीअडचणींची, |
| सुखदुःखाची काळजी वाहण्याची सवय लावून घेतली |
| ( Civic sense ) सिव्हीक सेन्स अंगी बाणून घेतला |
| तर बरं होईल. असं करताना स्वतःची थोडी गैर सोय |
| होईल, थोडे श्रम पडतील, थोडी झीज सोसावी |
| लागेल पण ती इष्ट समजून सोसायला पाहिजे. त्या |
| वाचून समाजसेवा, देशसेवा होऊ शकत नाही. निव्वळ |
| टोकळ गोष्टी सांगण्यात राम नाही. त्या कोणालाहि |
* सांगता येतात. *

## मिस्टर देशमुख परदेशांतल्या तुमच्या मित्राच्या मुलासंबंधी तुमचं कर्तव्य कोणतं ? "

'मोबाईल सिनेमा' च्या लोकांना चार शब्द सांगत असताना माझ्या भोंवती जी भराभर २००।३०० मंडळी जमा झाली व ज्यांनी एकच

गिल्ला केला 'तुम क्यों आते हो' असा, त्यांना मी वचन दिल होत की मी तुमच्या सुख दुःखाची कहाणी ( Grievances ) लोकांच्या कानावर घालीन ते पाळण्याचा पहिला प्रसंग मला कैरोत असतानाच आला. कैरोतील प्रसिद्धी खात्यातील इंडीयन आर्मी पब्लिक रिलेशन्स ( ओव्हरसीज डीरेक्टोरेट ) एक हिंदुस्थानी गृहस्थ माझ्याकडे आला व मला म्हणाला तुम्ही इजिपशियन ब्रॉडकास्टींग कॉरपोरेशन' मधून हिंदुस्थानी शिपायांना उत्तेजनपर अस व शिपायांना कशी उत्तम वागणूक मिळते हे स्पष्ट करणार एक भाषण करा. सर फ्रेडरीक, श्री. कुंझरू व इतर सभासदांकडे गेलो होतो ते ब्रॉडकास्टींग करण्यास तयार आहेत' मीः- 'मी भाषण करीन पण एका अटीवर. बर वाईट जे कांही मला दिसून आल ते सर्व सांगीन" तोः-मिस्टर देशमुख, समजा तुमचा एक स्नेही आहे. त्याचा मुलगा लांबच्या परदेशात आहे. इंग्लड वगैरे सारख्या ठिकाणी. तुम्ही त्या देशात गेलात व तुम्हाला चौकशी अंती अस आढळून आल की तो फार बिमार आहे. तर तुम्ही आपल्या स्नेह्याला त्याचा मुलगा फार बिमार आहे अस कळवाल का? तस कळवल तर तो चिंतेन बेजार नाही का होणार ?"

मीः—जर मी खरा स्नेही असेन तर तस त्याला कळवल्यावांचून राहणार नाही. वेळीच त्याला कळवल तर त्याला त्याच्या मुलाच्या औषधपाण्याची योग्य ती तरतूद करता येईल. आणि न कळवता जर काही करता काही झाल-समजा तो मेला-तर माझी सद्सद्विवेक बुद्धि मला खाईल आणि जर मित्राला कळल की मुलगा मरणापुर्वी त्याची व माझी भेट झाली होती तर तो मला म्हणेल तुझ्या स्नेहाची चांगली परिक्षा झाली. मित्र म्हणवतोस आणि अशा रीतीन वागला. तू आपल खूप कर्तव्य बजावल !"

तो—तर मग देशमुख कृपा करा व तुम्ही ब्रॉडकास्टींग करू नका"

मीः—मला ब्रॉडकास्टींग करायची हौस नाही व नव्हती. तुम्हीच माझ्याकडे ब्रॉडकास्टींग करा म्हणून म्हणायला आलात" अस म्हणून मी त्याला वाटेला लावल आणि म्हणूनच त्या वेळच्या ब्रॉडकास्ट

झालेल्या भाषणात कमिटीच्या बाकीच्या सभासदांच भाषण होत पण माझ नव्हत. खोट सर्टिफिकेट घेण्याची प्रत्येकाला हौस ! ब्रॉडकास्टींग करा म्हणून म्हणायला आलेल्या सरकारी नोकराला पाहिजे होत शिपायांना फार चांगल वागवतात वगैरे आम्ही म्हणाव म्हणजे घरच्या माणसांना काळजी राहणार नाही, व रिक्रूटींगला जोर येईल. हिंदुस्थान सरकारची वाहवा होईल. पण अशी जर सरकारची इच्छा तर त्यांनी खरोखरच तशी चांगली व्यवस्था का ठेऊ नये ? आणि अस जर खोट सर्टिफिकेट दिल तर त्या गरीब शिपायांच्या रास्त तक्रारी मिटणार तरी कशा ? आणि म्हणून तर शिपायी खवळले होते आणि म्हणत होते ' आप आते ही क्यों ' सर शिकंदर ह्यातखान, सर फेरोजखान नून व राजे महाराजे ह्यांनी खूप गप्पा झोडल्या, ब्रॉडकास्टींग केल 'सबखैरियत'–जिकडे तिकडे अबादानीच अबादानी आणि म्हणूनच ही मंडळी दुसऱ्यांदा काही गेली नाही. नाहीतर शिपायांनी आगपाखडली असती ह्यांच्यावर ! चांगले लचकेच तोडले असते ! मी भाषण करण्याच नाकारल. का नाकारल हे सर फरेडरीकन मला विचारल तेव्हा मी त्याला कारण सांगितल त्या नंतर त्या सभासदांनी गोलमोलच स्टेटमेंट केल माझ वचन खर करून दाखविण्याची ही संधि गेली तरी हिंदुस्थानात आल्यानंतर दोनदा अशा संधि आल्या व मी त्या वाया जाऊ दिल्या नाहीत. त्यांचा उल्लेख पुढे करण्यात येईल.

## प्रेसिडेंटला दोन्ही हातांनी घंटा बडवावी लागली

ह्याच वेळेस इजिपशियन असेंब्लीचे अधिवेशन चालू होत. ते बघण्यास मी व सरदार बुटासिंग दोघेजण गेलो. तेथली थोडी चर्चाही ऐकली. त्या दिवशीच चर्चेच वातावरण गरमच होत. सरकारकडच्या कोणीतरी सभासदान जमिनीच्या बाबतीत गैरकायदेशीर फायदा उचलला होता. वशिलेबाजीचा परिणाम. त्यावर खडाजंगी उडाली होती. चर्चा चालत असतानाच सरकार विरोधी गट असेंब्ली बाहेर गेला

(Walkout) पण त्या गटापैकीच काही मंडळी फिरून आत आली व सरकारपक्षाच्या सभासदांची जी जागा असते त्या ठिकाणी उभे राहून सरकारी पक्षाला विरोध करू लागली.

* जिथे विरोधी-पक्षच नसतो अशा ठिकाणी सरकारच्या वाटेल त्या अनैतिक गोष्टी–लांचखाऊपणा, वशिलेबाजी इत्यादि पचून जातात. पण जागृत विरोधी पक्ष असतो तिथे सरकारवर दडपण येऊ शकत. निदान गोष्टी चव्हाट्यावर तरी येतात. त्यामुळे सरकारची इभ्रत कमी होऊन विरोधी पक्षाला स्वतः सरकार स्थापून राज्ययंत्र चालविण्याची संधि मिळते. जिथे विरोधी पक्ष नाही, लोकमत जागृत नाही तिथे 'आंधळा दळतो व कुत्रं पिठ खाते' पैकी स्थिती उत्पन्न होते. *

ह्या असेंब्लीतील सरकार व सरकारी पक्षाविरूद्ध विरोधी पक्ष ह्यांच्यामधील झगडा खूप जोराचा होता पण तो शांततेने किंवा व्यवस्थेशीर होत नव्हता. विरोधी गटाने सरकारला खूप सतावण्याचा निश्चयच केला होता असे दिसले. घटकेत बाहेर जायचे, घटकेत बाहेरून आत यायचे. त्यांच्यापैकी काही विरोधी गटाच्या जागेवर तर काही सरकारच्या सभासदांकरिता नेमलेल्या जागेवर. दोन्ही कडून आरडा ओरडा. असा हा गोंधळ चालला होता. प्रेसिडेंटच्या 'ऑरडर' 'ऑरडर'ला कोणी जुमानीत नव्हता. अखेरीस अध्यक्षाने टेबलाजवळच असलेली एक पितळेची मोठी घंटा दोन्ही हातात धरून वाजवायला सुरवात केली. आम्ही तो गोंधळ पाहून आपल्या मुक्कामावर आलो. मला वाटले आमच्याहि अध्यक्षावर कधी असा प्रसंग येईल का ?

## मंजुषा ६ वी

# युद्धाच्या आघाडीवर सामसूम

हा कोण आला तिस्मारखां--सैनिकाच्या तक्रारीचा ठराव काढून घेणार नाही--बगर फेरने वालेको भला समशेर क्या कर सकती है--कोंबडीला जितके पिसऽतितके ह्या सरकारला मिसांऽ--तू माझा भाऊ नव्हेस--आदरातिथ्याच्या बाबतीत अमेरिकनला हार जाणार नव्हतो--गव्हर्नर कॅसी संबंधीच्या काम तहकुबीच्या सुचनेला गव्हरनर जनरलचा विरोध--सैनिकी बायकांच बंड--प्रो-रंगावर बाजु उलटली--हिंदुस्थानीयांची फुकटा फाकटी नसती उठाठेव--अंग्रेज रहते तो वे ऐसा करते क्या ?--मायला बडवल--जयप्रकाश नारायण व डॉ. लोहिया--साऊथ आफ्रिका व इस्ट आफ्रिका--युद्धोत्तर सरकारच धोरण काय राहिल ? अधिकार ग्रहणाकडे राजाजीची आढ--किती जणाच्या रक्तावर तुम्ही आपल्या तुंबड्या भरणार ? संस्मरणीय अस १९४५ साल--हैद्राबादमधे सत्याग्रह करूं नका--कीर्ति करून नाही मेले ते उगेच आले आणि गेले.

## "हा कोण आला तिस्मारखां"

'मिडलइस्ट' मधून हिंदुस्थानात परत आल्यावर मी आमच्या 'मिडलइस्ट'ला दिलेल्या भेटीसंबंधी एक रिपोर्ट **सर अचिन्लेक-कमांडर-इन-चीफ** व आमच्या **डिफेन्स कन्सलटेटिव्ह कमेटीचे** अध्यक्ष यांचेकडे पाठविला त्यात 'मिडलइस्ट' मधल्या हिंदुस्थानी शिपायांची सर्व गाऱ्हाणी लिहिली व त्याबरोबरच आमच्या प्रवासात उत्पन्न झालेल्या रूसवा फुगवीच्या एका महत्वाच्या प्रसंगाचा उल्लेख केला.

काय होत असे की आमच्या बरोबर असलेल्या मिलिटरी पब्लिसिटी ऑफीसर मिडलइस्ट मधल्या कोणत्याहि मिलिटरी ऑफीसरला किंवा सीव्हीलियन (मुल्की) ऑफीसरला किंवा एखाद्या मोठ्या गृहस्थाला आमचा

परिचय करून देण्याच्या प्रसंगी प्रथम श्री. कुन्झरू-'सर्व्हंट ऑफ' इंडीया सोसायटीचे अध्यक्ष व 'कौन्सिल ऑफ स्टेट'चे सभासद-ह्यांचा परिचय करून देत असे, व मग श्री. जम्नादास व इतरांचा. श्री जम्नादास ह्यांनी प्रथम परिचय करून देण्याचा मान आपला आहे, श्री कुन्झरूचा नाही. असा वाद मिलिटरी ऑफीसर बरोबर मांडला. त्याचे म्हणणे असे की, आपण लोकांच्या असेम्बलीचे सभासद आहोत. लोकांच्या असेम्बलीला मान जास्तच. कारण ती बहुलोकाची प्रतिनिधिक सभा, व 'कौन्सिल ऑफ स्टेट' ही बडया धेंडाची, मूठभर मिरासदाराची व तिचे हे प्रतिनिधि आहेत. तेव्हा पॉप्युलर असेम्बलीला व तिच्या सभासदांना जास्त मान द्यावयाला पाहिजे. व म्हणून कोणालाहि आमचा परिचय करून द्यावयाचा तर त्याला त्याच्यापासून सुरुवात करायला पाहिजे. श्री. कुन्झरू यांचा नंबर त्यांच्या नंतर यावा. Priority अग्रेसरत्वाचा मान जम्नादासचा, तेव्हा तो त्याना देण्यात यावा असा त्यानी आग्रह धरला व त्या पब्लिसिटी ऑफीसरवर रागावलेहि. तेव्हा कैरोतील इंग्रज मिलिटरी ऑफीसर ले. कर्नल स्टीव्हन्स मला म्हणाला "मिस्टर देशमुख, हा अग्रेसरत्वाचा प्रश्न तुम्हीच आधी सोडवायला पाहिजे होता." मी म्हणालो: "असा प्रश्न निघेल असं माझ्या स्वप्नातहि नव्हतं. हिंदी शिपायांच्या सुखसोयी कशा काय आहेत, शिपायांना कसं वागवण्यात येतं, हिंदी ऑफीसर्सच्याहि काही तक्रारी आहेत की काय, हे पहावयाला आलेली माणसं आम्ही. मी देखील असेंब्लीचा सभासद आहे; पण सरदार बुटासींग किंवा श्री. कुन्झरू यांच्यापूर्वी माझा परिचय व्हायला पाहिजे, नाही तर मोठी मानहानी होते असं मला कधी वाटलंच नाही. माझ्या मनाला तो विचार कधी शिवलाच नाही." पण

| ज्याअर्थी आम्ही फिरुन कोठे बाहेर गेलो तर हा प्रश्न |
| उत्पन्न होण्याचा संभव होता त्याअर्थी हा 'प्रायॉरिटीचा |
| अग्रेसरत्वाचाहि प्रश्न मी आपल्या रिपोर्टांत घातला. व |
| बाकीच्या प्रश्नापूर्वी ह्या प्रश्नाला मी प्रायॉरिटी दिली. |

| तो अध्यक्षानी म्हणजे कमांडर-इन-चीफनी निकालात |
| काढावा ह्मणजे फिरून कमिटी हिंदुस्थानाबाहेर गेली |
| तर सभासदात गरमागरमी किंवा रूसवारुसवी |
| व्हावयाला नको व परकीयाना तो तमाशाही दिसायला |

* नको. ह्या रिपोर्टांत असेहि लिहिले की, व्हाईसरॉय * कमिशन्ड ऑफीसराची गोष्ट तर दूरच राहो, पण इंडियन कमिशन्ड ऑफिसरांना देखील वंशीय भेदाभेद–Racial discrimination–दृष्टिनं वागवतात.

त्या नंतर थोडयाच दिवसांनी ' डिफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटी ' ची सभा भरली. तेव्हा रिपोर्टांत लिहिलेल्या प्रश्नांचा उहापोह झाला. सभासदांच्या ' प्रॉयॉरिटी ' चा प्रश्न सोडून सर अचिनलेक ह्यांनी सहानुभूति पूर्वक कांही प्रश्न सोडविण्याचे लगेच आश्वासान दिले व त्या प्रमाणे त्यांनी नंतर तसें केलेही.

## सैनिकाच्या तक्रारी संबंधाचा ठराव मी काढून घेणार नाही

ह्या सभेंतली चर्चा संपल्यानंतर व सभेचे सर्व काम संपल्यावर मी ज्या वेळेस सभा भरलेल्या खोलीच्या बाहेर जाऊं लागलो तेव्हा युरोपियन सेक्रेटरीच्या सूचनेवरून मि. त्रिवेदी मला ह्मणाले, "मि. देशमुख तुह्मी असेंब्लीत ह्याच गाऱ्हाण्यासंबंधी ज्या ठरावाची नोटीस दिली आहे तो ठराव काढून घ्या– " मला इथे हे सांगायला पाहिजे की ' डिफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटी' च्या कडे मी मिडलइस्ट संबंधी रिपोर्ट केला तेंव्हाच सैनिकांच्या तक्रारी दूर करण्यासंबंधी असेंब्लीत एका ठरावाची सूचना दिली होती. मी म्हणालो " आता दिलेले आश्वासन तुम्ही मला भर असेंब्लीत द्यायला पाहिजे; त्या वाचून तुम्ही ह्मणजे सर अचिनलेक जे म्हणाले तस घडून येईलच ह्याची मला खात्री नाही. मी ठराव काढून घेणार नाही" अस म्हणण्यांत माझा दुसराहि एक उद्देश होता. आमच्या ह्या खासगी

सभेत काय झाल हे फक्त सभासदांना माहित. बाहेरच्या लोकांना काय माहित. मिडल इस्ट मधल्या हिंदी सैनिकांना व हिंदी ऑफीसराना मी त्यांना वचन दिल्याप्रमाणे वागत आहे हे कळाव हाही माझा उद्देश होता. असेंब्लीत झालेली चर्चा वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होते तेव्हा हा ठराव चर्चिला गेला तर त्यांना मी त्यांच्या करिता काय केल हे वर्तमानपत्रावरून कळणार होत, आणि मी दिलेली आश्वासन मी पाळली हे त्यांना उघडपणे समजणार होत. असेंब्लीची बैठक संपेपर्यंत माझा ठराव म्हणजे सरकारच्या डोक्यावर टांगलेली एक तलवारच होती. पण ह्या सरकारी ऑफीसर्सच नशीब शिकंदर. कारण जरी ठरावांना वर्तमानपत्रांतून प्रसिद्धि मिळाली तरी ही बैठक लहान, बिनसरकारी ठरावासाठी एक किंवा दोन दिवस तेव्हा हा ठराव त्या बैठकीमधे चर्चेस येऊ शकला नाही. पण सर क्लॉड अचिनलेकला धन्यवाद दिले पाहिजेत की त्यांनी शिपायाच्या बऱ्याचशा अडचणी तात्काळ दूर केल्या.

## बगर फेरने वाले के, भला, समशेर क्या कर सकती है

दरम्यानच्या कालात दक्षिण आफ्रिकेत हिंदुस्थानी लोकांची नवीन कायद्यान (पेगींग ॲक्टन) परिस्थिति अधिकच बिकट करून सोडली. मी जुलैच्या सेशनमधे माझी काम तहकुबीची सूचना अधिवेशनाच्या सुरवातीसच यावी म्हणून 'मिडल इस्ट' वरून आल्याबरोबर पाठविली. हिंदुस्थानांत जे आफ्रिकन ( अर्थात् श्वेतवर्णी ) लोक आहेत त्यांना 'जशास तसे' ह्या कायद्याखाली लागू करणारे नियम केले नाहीत" म्हणून ही काम तहकुबीची निंदाव्यंजक सूचना होती. मी असेंब्लीत गेली तेव्हापासून दक्षिण आफ्रिकेमधे हिंदुस्थानी लोकांना वाईट रीतीने वागण्यात येत म्हणून हिंदुस्थान सरकारन 'युनियन' सरकारला–साऊथ आफ्रिकन सरकारला–धडा देण्यासारख काही तरी कराव म्हणून एक सारखे प्रश्न टाकून व तहकुबीच्या सूचना आणून हिंदुस्थान सरकारला सतावत होतो. सर गिरीजाशंकर बाजपै हे 'इंडीयन्स ओव्हरसीज' ह्या खात्याचे सेक्रेटरी-सरकारी मेंम्बर असताना माझ्या काम तहकुबीच्या (Adjournment

Motions) सूचनांना उत्तर देतांना एकदा म्हणाले होते "सरकारला एकच मार्ग उपलब्ध आहे आणि तो म्हणजे Negotiations चा--वाटाघाटी तेवढ्या आम्ही करतो" अर्थात त्या धुडकावून लावल्या तर हिंदुस्थान सरकारला दुसर काही करता येत नाही हे त्यांना अशा रीतीन सुचवायच होत. तेव्हा हिंदुस्थान सरकारला साऊथ आफ्रिकेला ताळ्यावर आणण्याकरिता दुसरा एखादा मार्ग उपलब्ध करून द्यावा म्हणून मी 'रेसीप्रेसिटी-जशासतसे' बिल आणून त्याचे कायद्यांत रूपान्तर करून घेतल. पण तो पास झाला तरी अमलांत आणण्याची सरकारची हिम्मतच होत नव्हती. मग नुसता कायदा पास करून काय होणार होत ? ह्या वरून मला लहानपणी माझ्या गावच्या भाऊजी कान्नव ह्या वयोवृद्ध गृहस्थान सांगितलेल्या गोष्टीची आठवण होते. ह्या गृहस्थान आम्हा मुलाना प्रसंगोपात ज्या गोष्टी सागाव्या त्या सर्व हैदराबादच्या-संबंधी. त्यानी गोष्ट सांगितली ती अशी.

"हैदराबादला एक नबाब होते. त्याना लोकांच्या तोंडून ऐकून ऐकून माहित झाल होत की तरवारीच्या भरवशावर मोठ मोठे विजय संपादन करता येतात. बस झाल. त्यांनी ठरवल की तरवारी कितीहि किमतीच्या असल्या तरी खरेदी करायच्या. शंभर दोनशे रूपयांच्या तरवारी पासून दहापंधरा हजारापर्यंतच्या तरवारीपर्यंत तरवारी खरेदी करण्याचा त्यांनी सपाटा लावला. नबाब साहेबांना तरवारीचा भारी शोक आहे अस समजून त्यांच्या स्नेहयांनी त्याना उत्तम उत्तम, भारी भारी किंमतीच्या तरवारी नजर केल्या. नबाब साहेबांनी ह्या सर्व तरवारी एका शस्त्रागारात ठेऊन दिल्या. काही दिवसांनी नबाब साहेबाच्या घरी रात्री डाका पडला. डाकेवाल्यानी खूप धामधूम मांडल्यामुळे नबाबसाहेब खडबडून जागे झाले व जोरजोराने म्हणू लागले 'शंभर रूपये वाली तरवार उठ, पाचशेवाळी तरवार उठ' तरी डाकेवाल्याची हालचाल कायमच. होता होता त्यांनी सर्वच तरवारीना 'उठ' म्हणून हुकुम फर्मावला. तरीहि डाकेवाल्यांची धामधूम

काही कमी झाली नाही की ते पळून गेले नाहीत. त्यांनी नबाब साहेबाचे घर धुवून काढल्यावरच ते गेले. नबाब साहेबाच्या घरच्या डाक्याची हकीकत गावभर झाली. नबाब साहेबाचे एक स्नेही त्यांच्या भेटीस आले त्यांच्या जवळ नबाब साहेबानी प्रस्ताव केला " रातको डाकू आये. धन ले गये. हमने कई समशेरी किंमत किंमतवाली, छोटी बडी पैदा की थी. लेकीन कोई काम न आई. सब जगेके जगेके परही बैठी रही. नबाबाचा स्नेही म्हणाला " अरे तो भाई समशेर तो आपने बहोतसे पैदा की लेकीन उसे फेरनेवाला भी तो होना. बगर फेरनेवालोके, भला, समशेर क्या कर सकती है ! " ही गोष्ट भाऊजींनी आम्हाला 'पुस्तक किंवा शस्त्र जवळ बाळगून निभत नाही. त्यांचा अभ्यास व उपयोग करायला शिकल पाहिजे हे मनावर ठसवण्याकरिता सांगितली होती. सांगितलेली गोष्ट असभवनीय असही समजू नका. आपल्या जवळ बंदूक आहे अस लोकांना कळल्यावर आपणास धोका राहणार नाही ह्या समजुतीन हिंदुमुसलमानांच्या दंग्याच्या वेळेला किती तरी जणानी बंदुकीचे लायसेन्स काढले होते पण उडवण शिकले नव्हते. वऱ्हाडातील एका सीनीयर वकीलान असच बंदुकीच लायसेन्स काढल होत. त्या वकील साहेबाच्या गावी डाके पडू लागले. घराजवळच काही अंतरावर डाका पडणार अशी अफवा पसरली. वकील साहेब खांद्यावर बंदुक टाकून घराबाहेर पडले व रस्त्यान चालू लागले. त्यांना एक गृहस्थ समोरून येताना भेटले. त्या गृहस्थान विचारल 'रावसाहेब, खांद्यावर बंदुक ? " रावसाहेब, " हो, डाका पडणार आहे आमच्या घराजवळ' तो: 'डाका' घराजवळ पडणार आहे म्हणता, तुम्ही चाललात विरुद्ध दिशेला.' वकील साहेब " मी बंदुक उडवणेवाल्याच्या शोधार्थ जातो आहे. " त्याचा स्नेही त्यांना नमस्कार करून चालता झाला व वकील साहेब बंदुक उडवणाऱ्याच्या शोधार्थ गेले. असो.

माझ्या सांगण्याचा मतलब असा की जवळ शस्त्र असून भागत नाही ते वापरता आल पाहिजे. एखादा बंदुक असली तर तो फुकून देईन ह्या समजुतीन त्याच्या म्हणजे बंदुकवाल्याच्या वाटी जणार नाही पण

अस क्वचित घडणार. अनुभव असा आहे की शस्त्र वापरता आल तरच त्याचा उपयोग होऊ शकतो. नुसत्या धोकडीन काम भागत नाही. मी आमच्या नवाबी हिंदुस्थान सरकारला 'जशास तसे' हा कायदा दिला. पण आफ्रिकेतले श्वेतवर्णी डाकू हिंदुस्थानी लोकांना नागवतच होते. ते हिंदुस्थान सरकारजवळ हा कायदा आहे, आपल्यावर ह्याचा उपयोग केला जाईल ह्या भीतीन गांगरून गेले नाहीत. त्यांनी आपल काम सुरूच ठेवल. हिंदुस्थान सरकारच पाणी काय आ हेहे जाणून घेण्याचे त्यानी अनेक प्रसंग आफ्रिकेतील हिंदुस्थानी लोकावर आणले. 'जशास तसे' हे शस्त्र काय करणार ? ते फेरणारे सरकार कोठ होत ? व म्हणून हिंदुस्थान सरकारला मी नजर केलेली तरवार जागच्या जाग्यावरच राहिली. रडत राऊत घोड्यावर स्वार त्याला कोण काय करणार?

## कोंबडीला जितके पिसऽ, तितके ह्या सरकारला मिसऽ"

दक्षिण आफ्रिकेतील श्वेतवर्णी लोक तिथल्या हिंदुस्थानी लोकांच्या गळ्याभोवती पाश टाकून घट्ट आवळीत होते तरीही हिंदुस्थान सरकार ' रेसीप्रोकल ट्रीटमेंट ' म्हणजे ' जशास तसे ' ह्या न्यायाने दक्षिण आफ्रिकेतील श्वेतवर्णी लोकांना हिंदुस्थानात वागवत नव्हते, म्हणून मी आणलेल्या व वर निर्देष्ट केलेल्या कामतहकुबीच्या सूचनेला उत्तर देताना सरकार म्हणाले, ' आम्ही त्यांना कडक शिक्षा देण्याकरिता, तो कायदा जास्त परिणाम कारक करण्याकरिता त्या कायद्यात दुरूस्ती करणार आहो" डॉ. खरे सरकारी मेम्बर ह्यानी ह्या बैठकीत 'रेसीप्रोसिटि अॅक्ट अमेंडमेंट ' बिल आणून पास करून घेतल. ते सरकारन लवकर अमलात आणाव म्हणून अमलात आणण्याची मर्यादा घालून देणारी उपसूचना मी आणली व ती पास झाली. आणि हे सर्व झाल्यावरही आमच सरकार दक्षिण आफ्रिकन सरकारवर हात उचलेना ' येरे माझ्या मागल्या ' पैकीच काम ' मिथ्या टयरके टयेर ' पण मी ढोसण्या देण थांबवल नाही. पुढच्याच बैठकीच्या वेळी 'रेसीप्रोसिटी अॅक्ट अमलात आणण्याच्या कामी सरकार चालढकल करते म्हणून निंदाव्यंजक ठराव कामाच्या तहकुबीची

सूचनेच्या स्वरूपात मला आणावी लागली व 'रेसिप्रोसिटी ॲक्ट' खाली आवश्यक ते नियम केलेत काय व Economic sanctions एकॉनॉमिक सँक्शन्स लावण्याकरिता नियम केले काय ह्या माझ्या प्रश्नाला, Draft rules ड्राफ्ट रूल्स केलेत पण ते केव्हा वसाहती विरुद्ध लावण्यात येतील हे सांगता येत नाही असे उत्तर मिळाले. म्हणजे काय की साऊथ आफ्रिकन सरकारचे नाव घेतले की आमच्या सरकारने नांगी खाली टाकलीच ! तेच हिंदी लोकावर वाटेल तो निर्बंध लादण्यास व दडपशाही करण्यास तयार !! पहिलवान लोकात एक म्हण आहे 'घरमे शेर मैदान का ××' तशा पैकी आमच सरकार.

## तूं माझा भाऊ नव्हेस

### I will disown you as my brother

त्याच वर्षीच्या नोव्हेंबरच्या बैठकीत माझा भाऊ गोपाळ दिल्लीस आला. तेव्हाही माझ्या कांही महत्वाच्या कामतहकुबीच्या सूचना मी मांडल्या होत्या. ग्रेट ब्रिटन व युनायटेड स्टेटस येथे पाठविलेल्या नॉन ऑफिशियल डेलीगेशन संबंधी निंदाव्यंजक कामतहकुबीची सूचना कांग्रेस, मुस्लीमलीग व इंडिपेंडंट कांग्रेस पक्षांच्या साह्याने पास करून घेतली होती. हे डेलिगेशन नॉन ऑफिशियल खर पण नॉमिनेटेड मेम्बर्सच व म्हणूनच करणार होत सरकारचा प्रचार (Propaganda)

एक दिवस सेसील होटेल मधल्या माझ्या खोलीत गोपाळ आला व मला म्हणाला "जयप्रकाश नारायण ह्याला वाईट रीतीने वागवण्यात येते तेव्हा तूं कामतहकुबीची सूचना आण" मी म्हणालो "ती नियमात बसत नाही. तेव्हा मी आणू शकत नाही. कशी आणणार ?" माझ नाव आधिच 'अडजर्नमेंटवाला' अस असेंब्लीतील युरोपियन गटान पाडल होत कारण माझ्याच अडजर्नमेंट मोशन्स दर बैठकीत पुष्कळ प्रमाणावर असायच्या व मी दुराग्रही (Irrecowciliable,) अस असेंब्ली मला समजत होती. दर बैठकीमधे ४।५ तरी माझ्या काम तहकुबीच्या सूचना असत. त्यामुळे अध्यक्ष, सरकारी सभासद व इतर

सभासदही नाराजच असत. कारण निवडून आलेल्या सभासदांपैकी काही जणांचे ठराव असत किंवा बिल असत. ज्या दिवशी अडजर्नमेंट मोशन (कामतहकुबीची सूचना) चर्चेला येत असे त्या दिवशीच त्यांच हे काम तसच राहून जाई. आधिच बिनसरकारी कामाकरिता दिवस असायचे कमी आणि ह्यांची काम बंद. तेव्हा ह्या अशा परिस्थितींत मी जयप्रकाश संबंधी कायद्यांत-नियमांत बसू न शकणारी-कामतहकुबीची सूचना आणण्यास नाखुष होतो व म्हणून मी गोपाळला म्हणालो होतो 'ती सूचना मी आणू शकत नाही,' पण माझ्या उत्तरान गोपाळच समाधान झाल नाही. गोपाळ म्हणाला "ते कांही नाही. नियम बियम तू पहात बस. तू तर बॅरिस्टर आहेस. कायदा शिकलास कायद्यांत बसव. नाहीतर मग बॅरिस्टर कशाला झालास ? जर तू जयप्रकाश संबंधी काम तहकुबीचा सूचना आणली नाही तर " I will disown you as my brother आय वुईल डीसओन यु ॲज माय ब्रदर " व सेसील होटेल मधल्या आपल्या खोलीकडे चालता झाला.

गोपाळन असा हा बॉम्बशेल माझ्यावर टाकल्यावर मी कोणत्याहि गोष्टीचा मुलाहिजा न ठेवता जयप्रकाश संबंधी कामतहकुबीची सूचना पाठविली-चर्चा जरी होणार नाही तरी प्रश्नोत्तर तरी होतील-असेंब्लींत ही बाब येऊन तिला थोडी तरी प्रसिद्धि मिळेल हा हेतु ठेवून तहकुबीची सूचना गोलमोलच पाठविली. तहकुबीची सूचना अशी "सरकारच्या प्रतिनिधीकडून ( Agents एजेंटस् ) त्यांच्या ताब्यांत ( Custody कस्टडी मधे ) असलेल्या जयप्रकाश नारायण ह्याना जे अमानुषपणे वागविले जाते ( Inhuman Treatment ) त्याची चर्चा होण्याकरिता असेंब्लीचे काम तहकूब व्हावे" ह्या सूचनेवर प्रश्नोत्तरे झाली ती खाली दिली आहेत,

**अध्यक्षः**—सरकारचे हे कोणचे प्रतिनिधी ? व कोणत्या सरकारचे ?

**मीः**—हिंदुस्थान सरकारच्या हुकमाने पकडण्यांत ( Arrest ) आले होते. सरकारचे प्रतिनिधी पोलीस त्याच प्रमाणे मिलिटरी ऑफीसर्स ज्यांच्या ताब्यांत जयप्रकाश आहेत ते.

**अध्यक्षः**—त्याना कोणत्या तऱ्हेच्या यातना सहन कराव्या लागतात ?

**मीः**—त्याना बर्फाच्या ठोकळ्यावर बराच वेळ बसवण्यांत येते, त्याना पाठनाही अशा खुर्चीवर बसवण्यांत येते व त्याना झोप घेऊ देत नाहीत, त्याना योग्य ते अन्न देण्यांत येत नाही इत्यादि.

**सर रेजिनाल्ड मॉक्सवेलः**- सन्माननीय सभासदाना ह्या गोष्टी कशा कळल्या ?

**मीः**- मला माहित आहे म्हणूनच बोलतो आहे. जशी तुमची सी. आय. डी. तशीच माझीही आहे.

**एन एम. जोशीः**- जयप्रकाश नारायण ह्याला हिंदुस्थान सरकारच्या हुकुमान्वये पकडण्यात आल होत का ? असे मी माननीय सभासदाना विचारु शकतो का ?

**सर-रे-म्याः** जयप्रकाश नारायण हा पंजाब सरकारचा कैदी आहे आणि ह्या कामतहकुबीच्या सूचनेचा रोख खरोखर पाहता त्या सरकार विरुद्ध आहे आणि मध्यवर्ति सरकार विरुद्ध नाही. ही बाब पंजाबच्या असेंब्लीत चर्चेला सुद्धां आली आहे असें वाटतें. आमचा ह्या गोष्टीशी कांहीहि संबंध नाही.

**जोशीः**- जयप्रकाश नारायण ह्याना जे पकडले ते हिंदुस्थान सरकारच्या वॉरंटावरून की पंजाब सरकारच्या ?

**सर-रे-म्याः**- त्याना जें पकडण्यांत आले ते फरारी आरोपी म्हणून.

**डॉ. देशमुखः**- न्याय व माणुसकी ह्याशी ह्या सरकारचा संबंध नाही का ?

**अध्यक्षः** ह्यांचा संबंध स्थानिक सरकारशीहि आहे. आणि ह्या गृहस्थाला अमानुष रीतीने वागण्यात येते किंवा यातना सहन कराव्या लागतात ह्या संबंधी कांहीहि पुरावा नाही म्हणून मी ही सूचना नियम-

ग्राह्य ठरवितो. "ह्या सूचनेची दखल काही वर्तमानपत्रांनी घेतली. मुंबईत तर बरीच खळबळ उडाली. काही वर्तमानपत्रांनी 'जयप्रकाश नारायणला बर्फाच्या ठोकळ्यावर उभे केले' ह्या शीर्षकाखाली ह्या सूचनेला प्रसिद्धी दिली. ह्याचा परिणाम 'जयप्रकाशनारायणची अटक' हा लोकचर्चेचा विषय बनून गेला आणि हाहि कमी फायदा नव्हता. आणि सगळयात जास्त फायदा म्हणजे मी गोपाळचा भाऊचा भाऊच राहिलो.

## आदरातिथ्याच्या बाबतींत अमेरिकनला हार जाणार नव्हतो

१९४३ च्या नोव्हेंबर सेशनमधल्या वर दिलेल्या प्रमुख घटनानंतर नागपुरास परत आलो व १९४४ च्या बजेट सेशनकरिता कामतहकुबीच्या सूचना व महत्वाचे ठराव व प्रश्न पाठवून दिले. नंतर दिल्लीच्या बजेट अधिवेशनाला हजर राहण्यास 'ग्रँडट्रंकने निघालो. एका फर्स्टक्लासच्या डब्यांत एक अमेरिकन जोडप होत त्या डब्यांत बसलो. वर्तमानपत्र व पुस्तक वाचण्यात संबंध दिवस घालवला. अधूनमधून रिफ्रेशमेंट कार मधून लंच, चहा व जेवण घेतल. रात्रीच्या जेवण्याच्या वेळेस दुसऱ्या दिवशी सकाळी चहा, बसण्याच्या डब्यांत घेऊन ये' अस वेटरला सांगितल. मी सकाळी चहा येण्यापूर्वी अर्धा तास उठलो व तोंड धुण्याकरितां व कपडे करण्याकरिता (W. c) वॉटर क्लोझेटमधे गेलो. कपडे वगैरे करून बाहेर येतो की नाही तोच डब्यातील अमेरिकन गृहस्थ मला म्हणाला "तो तिथं तुमचा चहा आहे." व चहाचा ट्रे ठेविला होता तिकडे बोट दाखवल.

**मी** : माझा चहा कसा ? मी तर एकाचाच चहा सांगितला होता आणि ट्रे मधे तर तीन चार कप दिसतात."

**तो** : 'सर्वांचाच चहा वेटरने एकाच ट्रे मधे आणला. तुम्ही आपला चहा घ्या. नंतर आम्ही घेऊ"

मी ट्रेकडे लक्ष दिल तर मला 'टी-पॉट ' एकच दिसल. दुधाच भांडहि एकच व साखरेचहि भांड एकच व टोस्ट ही एकाच प्लेटमधे

आदरातिथ्याच्या बाबतीत मी ह्या अमेरिकनांना हार जाणार नव्हतो. मी लगेच म्हणालो " छे. छे. अस कस होईल ? ( We have a lady in this compartment; and it's her privilege to play the part of a hostess ) ह्या डब्यांत बाई आहेत व होस्टेसचा पार्ट करण (घरमालकिणीचा पार्ट करण) ही त्यांच्या मानाची गोष्ट आहे. " मी अस म्हटल्यावर ती बाई आपल्या बसलेल्या जागेवरून चटकन उठली, तिन ट्रंक उघडली व त्या ट्रंकमधून लोणी, जॅम व चीज हे पदार्थ काढले. तिन तिघाकरिता चहा ओतला व आम्ही तिघानी मिळून चांगला थाटाचा चहा घेतला. पुढच्या स्टेशनवर वेटर दारात आल्याबरोबर मी सर्वांचे पैसे चुकते केले. अमेरिकन हासला व माझे आभार मानले.

आता समजा त्या अमेरिकन गृहस्थान ' तुम्ही चहा घ्या, आम्ही मग घेऊ ' अस म्हटल्याबरोबर मी चहा घेतला असता—अगदी मला जसा पाहिजे तसा व नंतर दूध व साखर किंवा साखर अगदी थोडी राहती एखाद्याच कप पुरती. म्हणजे काय की मी स्वतःचच हित पाहिल असत तर काय परिणाम झाला असता ? ह्या गृहस्थान माझ्या संबंधी काय कल्पना केली असती हे तर माझ्या डोळ्यासमोर होतच पण संबंध हिंदुस्थानी लोकासंबंधान त्यान काय मत बनवल असत हे हि लख्ख माझ्या डोळ्यासमोर उभ राहिल. त्यान म्हटल असत "हिंदुस्थानी लोक असेच आप्पलपोटे, स्वार्थी: कसले आलेत Hospitable आदरातिथ्य करणारे. त्यांना सभ्य आचार रीतीभाती मुळीच माहित नाहीत." आणि हे मत तो आपल्या जवळच न ठेवतां प्रसंगोपात इतराजवळहि बोलता. मग आम्ही लोक मोठे हॉस्पीटेबल आहोत हा जो लौकिक आमच्या पुर्वजानी मिळवला त्याला खार लागता की नाही ? बर म्हणा वाईट म्हणा. मनुष्य आपल्याला आलेल्या अनुभवावरूनच, मग तो कितीहि मर्यादित का असेना, एखाद्या समाजाविषयी, एखाद्या देशातल्या लोकाविषयी मत बनवत असतो. चूक असेल हे त्याच करण. पण हे अस होत खर. साधारण मनुष्याचा हा स्वभाव आहे. मग तो

युरोपियन असो, अमेरिकन असो वा हिंदुस्थानी असो. 'शितावरून

* भाताची परिक्षा' करण्यांत येते. तेव्हा आपल्या एकट्या- *
| च्या वागण्यावरून समाजाबद्दलच व देशासंबंधी मत |
| बनत ही जाणीव ठेऊन प्रत्येक व्यक्तीन आपल वर्तन |
सदाच्चारास व सभ्यतेस शोभेल अस ठेवल पाहिजे. ही |
| त्याच्यावर एक प्रकारची मोठी जबाबदारी आहे. एकाच |
| व्यक्तिच्या वागण्यान राष्ट्राला चांगल नाव मिळू शकत |
* किंवा जाऊहि शकत. *

## कॅसीला गव्हर्नर नेमल्यासंबंधीच्या माझ्या कामतहकुबीच्या सूचनेला गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सीलचा विरोध

ह्या सेशनमधे सुरवातीलाच कामतहकुबीच्या ज्या माझ्या सूचना होत्या त्यामधे खळबळ उडवून देणारी अशी एक कामतहकुबीची सूचना होती. ती ही: मिस्टर कॅसी ह्या ऑस्ट्रेलियन गृहस्थाची, बंगालचा गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली तिजविरुद्ध ह्या सरकारने निषेध करून ह्या असेंब्लीची इभ्रत कायम ठेवली नाही. (Failure to maintain the prestige of the Assembly) म्हणून चर्चा व्हावी.'

**अध्यक्षः**—ही सूचना असेंब्लीला वाचून दाखवून अध्यक्ष मला म्हणाले ही गव्हर्नर जनरलने नामंजूर केली आहे.

**मीः**—ह्या ठरावान असेंब्लीच्या प्रतिष्ठेचा प्रश्न मी उपस्थित करतो आहे. आपण एक अॅक्ट-रेसीप्रोसिटीअॅक्ट पास केला आणि ब्रिटीश सरकार एका Administrative act ने त्यावर कुरघोडी करू पहाते.

**अध्यक्षः**—ज्या विषयाचा खास संबंध गव्हर्नर जनरल-इन कौन्सिलशी नाही अशा विषया संबंधी ही सूचना आहे म्हणून गव्हर्नर जनरलने नामंजूर केली आहे.

## "सरकारला सळो की पळो केल्यावाचून कार्यभाग साधत नाही"

ह्याच असेंब्ली सेशनमध्ये पुण्याच्या 'महाराष्ट्र व्यायाम शाळेच्या' सैनिकी करण मंडळाला उपकरण ( Equipment ) मिळवून देण्या-संबंधी महत्वाचे प्रश्न इतर प्रश्नाबरोबरच विचारले.

पुण्याच्या 'सैनिकीकरण मंडळाला उपकरण मिळवून देण्यार्थी साग्र हकीकत पुस्तकाच्या दुसऱ्या करण्डकात पान वर २५६ दिली आहे. इथे एवढच सांगून टाकतो की ह्या मंडळाचे अध्यक्ष श्री. जमनादास मेथा त्या वेळचे मध्यवर्ति असेंब्लीचे सभासद—असूनही व राजे महाराजे यानी व सदर्न कमांडच्या प्रमुख लष्करी अधिकाऱ्याने ह्या संस्थेविषयी प्रशंसोद्गार काढूनही त्या मंडळाला Equipment उपकरण मिळाले नव्हते व ते मिळवून देण्याची मी प्रतिज्ञा केली व सरकारला Expose करणारे प्रश्न टाकून सिद्धिस नेली. हिंदुस्थान सरकार जवळून कोणतही सार्वजनिक काम—सरकारला अप्रिय असलेले पण जनहिताच करून घ्यावयाच असल तर गीतेच पारायण करणारे सर्व्हंट ऑफ इंडीया सोसायटीचे अध्यक्ष, युरोप, व आफ्रिका ह्या देशातील सरकारचा अनुभव घेऊन एरव्ही थंड डोक्याचे असलेले ऑनरेबल श्रीनिवास शास्त्री ह्यांनी हिंदुस्थानी याना उपदेश केला त्याप्रमाणे मी वागत गेलो. (उपदेश ह्याच करण्डकाच्या पान १४ वर आहे ) फरक एवढाच की त्यानी 'हिज मॅजेस्टीज गव्हर्नमेंट' बद्दल केला आहे. तशीच परिस्थिती 'गव्हर्नमेंट ऑफ इंडीया' ची झाली होती म्हणून मी त्याच उपदेशा-

* प्रमाणे वागत गेलो. महात्मा गांधीनीही ह्या सरकारला *
| त्रास देऊनच जे जे मिळवायच ते मिळवलना ! |
| 'हिंदुस्थान छोडों' ची चळवळ कशाची |
| द्योतक ? तिने तर परमावधी केली. आणि नेताजी बोस |
| ह्यानी शेवटी आपल्या 'आय. एन. ए.' न हिंदुस्थान |
| सरकारची घाबरगुंडी वळवली. ती तरी काय धडा देते. |

| सरकारला पेचात आणल्यावाचून काहीही मिळत नाही. |
* मात्र स्वतः निस्वार्थी व कार्य लोकहिताच असल पाहिजे. *

## सैनिकी वायकांच बंड

व्याकायच्या Wac (i) ज्युनिर ऑफीसर्सपैकी एक दूधाव्हधान कोरची बाई मजकडे आली. तिच्या सांगण्यावरून अस दिसल की ती व नागपुरच्या वुईमेन्स कॅालेजची पहिली प्रिन्सिपॅाल मिस रंगागव ह्या एकाच वेळेस कॅालेज मधे शिकत होत्या. तिचा मिसेस राधाबाई सुब्रायन (माजी मिनिस्टर डॅा सुब्रायन ह्यांच्या पत्नि) यांच्याशी परिचय होता.

* ती मला म्हणाली आम्हाला आमचा राष्ट्रीय पोषाख *
| पाहिजे. आम्हाला कुंकू लावायला, गळयात सोन्याच्या |
| सारवळीचे मंगळसूत्र घालायला मना करतात. हिंदु |
| लोकात तर ह्या गोष्टी विवाहित स्त्रीच्या बाबतीत |
* आवश्यक समजल्या जातात. युरोपियन, ऍंग्लोइंडियन *
स्त्रियांना वेडींग रिंग घालता येतात; मग हिंदु स्त्रीयांना ह्या गोष्टी का मना करतात ? त्याचप्रमाणे आम्हाला कानात ' इअरींग्ज किंवा बोटात मुद्या घालू देत नाहीत. आम्हाला साडीबरोबर बुश शर्ट ठीक दिसत नाही. आम्हाला आमच्यात आतापर्यंत चालत आलेला ब्लाऊझ घालू दिल पाहिजे. आम्हाला हिंदी संस्कृतिप्रमाणे पोशाख करता आला पाहिजे. कृपाकरून तुम्ही तशी खटपट करा".

मी :— "तुम्ही मजकडे येण्यापुर्वी स्वतः किंवा कोणामार्फत तुमच्या तकारी दूर करण्याकरिता काही प्रयत्न केलेत का ?"

ती :— "आम्ही रिप्रेझेंटेशन केल पण कोणी ऐकत नाही त्याचप्रमाणे काही असेंब्ली मेम्बर्सना भेटलो व कौन्सिल आफ स्टेटच्या सभासदानाही. पण त्यांनी आमच म्हणण मनावर घेतल नाही."

मी :— "विनोदाने म्हणालो "मलाहि त्यांचच उदाहरण गिरवल पाहिजे. 'महाजनो येनगतः सः पंथः' मला वाटते ते शास्त्राधाराने वागलेत. शास्त्रात सांगितल आहे ' स्त्रीबुद्धि प्रलयांगता ' He who follows a woman's advice acts according to her instructions brings trouble on himself.

ती :— "कोणत्या शास्त्रात सांगितल आहे ?"

मी :— "शास्त्राच नाव मला माहित नाही. पण सर्व म्हणतात अस शास्त्र आहे. खोट कशाला सांगतील ते ? "

ती :— "ते शास्त्र दक्षिणेत रूढ नाही. तेव्हां तुम्ही आमची विनंति आहे ती मान्य केलीच पाहिजे. "

मी :— "माझ नाव तुम्हाला कोणी सुचवल ते सांगा. त्याचप्रमाणे तुम्ही अधिकाऱ्याविरुद्ध जे हे बंड उभारल त्या बंडाचे पुढारी की एक बंडखोर. फक्त बंडखोर असाल तर मग मला तुमच्या बंडाच्या पुढाऱ्यांना येऊन भेटल पाहिजे. जबाबदार व्यक्तिजवळून मला जास्त चौकशी करावी लागेल."

ती:—"मला टी. टी. कृष्णमाचारीन मद्रासच्या असेंब्ली सभासदान तुम्हाला भेटायला सांगितल. मीच पुढारी आहे. काय माहिती पाहिजे तुम्हाला ?"

मी: "तुम्ही सर्वच हिंदी व्याकाम राष्ट्रीय पोषाखाची मागणी करत आहात ? की मेजारीटी ? बंड सिद्धिस जाण्याकरिता सर्वच हिंदी व्याकांची एक जुटीची मागणी पाहिजे. नाहीतर बंडाचे पुढारी तोंड घशी पडणार छे छे तस होउ देणार नाही-पण पुढारीणीचा प्रतिनिधी तोंडघशी पडणार व मग 'स्त्रीबुद्धी प्रलयंगता' असा माझ्यावर प्रसंग येणार."

ती: - "सर्वच हिंदी व्याकायची इच्छा आहे. घेडगुजरी पोषाखत्यात कोणीहि हिंदी स्त्री सुंदर दिसू शकत नाही कोणालाच नको आहे; व एक दोन तरी टळक दागिने कोणत्याहि स्त्रीला घालावेसेच वाटतात. "

मी:—"बर आपण जा." आणि त्यांना नमस्कार केला. त्या नमस्कार करून गेल्या. मला स्त्रियांच्या व्याकायच्या बंडाच कौतुक वाटल. स्त्रियांनी केलेले बंड म्हणून तर ते कौतुकास्पद होतच पण त्यांतही त्यांच्या त्या राष्ट्रीय भावना-आपली संस्कृति कायम राखण्याची तळमळ ह्याबाबतीत सरकारशी दोन हात करायच ठरवल व तो लढा देत असताना एक दीड महिन्यापुर्वी घडलेल्या एका गोष्टीचा फायदा घेण्याच ठरवल.

बेगम शहानवाज ह्या बाईची व्याकाय मधे रंगरूट भरती करण्याच्या कामावर हिंदुस्थान सरकारने नेमणूक केली होती. ही बाई पंजाबमधली. तिथल्या असेंब्लीची सभासद होती. ती मुसलमान असूनही पडदा पाळणाऱ्यापैकी नव्हती. तिचा पगार भक्कम, प्रवास भत्ताहि भक्कम. तेव्हां तिची कामगिरी तरी कोणत्या दर्जाची आहे हे पहाण्याकरिता मी असेंब्लीत प्रश्न अधून मधून टाकत होतो. एक दिवस रात्री वेस्टर्न कोर्ट होटेलमधे जेवणाच्या वेळी बऱ्याच गजबजलेल्या डायनींग हॉल मधून मी आपल्या डीनर टेबलकडे जात असतांना माझ्या डीनर टेबलजवळ असलेल्या एका डीनर टेबलपाशी एक बाई व पाच प्रौढ मुली बसल्या होत्या. त्यापैकी तरुण बाईने मला अगदी नाजुकसा सलाम केला. मी परत मामुली सलाम केला व माझ्या पलीकडे जवळच एक पाकिस्तानी डीनर टेबल होत तिथ गेलो व नागपुरचे नबाब सिदीकअली खान, असेंब्ली सभासद, होते त्यांना हळूच म्हणालो "क्यं नबाब साहाब वह लेडी कौन है ?" व ज्या बाईन मला सलाम केला होता तिच्याकडे खूण केली. शेठ म्हणून एक मद्रासचा मुस्लीमलीगर-लीग पार्टीचा सेक्रेटरी व पाकिस्तानी मला म्हणाला "वह तो बेगम शहानवाझ. मि. देशमुख तुम क्यों उसके पीछे लगे हो." आणि मला एकदम आठवण झाली त्याच दिवशी व्याकाय संबंधी विचारलेल्या प्रश्नांची. निरर्थक भक्कम पगार, भक्कम भत्ता, खूप प्रवास व व्याख्यानबाजी पण रंगरूट भरतीच्या नावान म्हणण्यासारखी प्रगति नाही. तेव्हा रंगरूट भरतीची वाढ होण्याच्या दृष्टिन राष्ट्रीय पोषाख असण जरूर आहे अशा रीतीन (पद्धतीन) बायकांच्या बंडाची बाजू सरकारपुढे मांडण्याचा मी निश्चय केला.

वॉर सेक्रेटरीला व्याकायच्या भरतीसंबंधी प्रश्न टाकून सूचना केली की व्याकायच्या भरतीला सुरवात करण्यापुर्वी केलेल्या नियमात पोषाखाच्या बाबतीत आता व्याकायची सल्ला घेऊन दुरूस्ती करावी तरच 'व्याकाय' मधे भरती होणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढेल एरव्ही नाही. अमेरिका, युरोप वगैरे देशात स्त्रियांचे पोषाख 'Smart झोकदार'

करण्याच्या बाबतीत विशेष लक्ष दिले जाते हे ठाऊक आहे ना ! 'न्यायाय'च्या विचाराने फेरफार करण्यात येतील असे बॉर सेक्रेटरीने सांगितले. ह्याप्रमाणे काय पोषाख घालावयाचा–जुन्या तऱ्हेन की नवीन तऱ्हेन हे त्यांच्या इच्छेवर ( Option ) ठेवल काही दिवसानीच पोषाख बदलला. बायकांच्या बंडाची जीत झाली.

## प्रो. रंगावर बाजू उलटली

ऑल इंडीया किसान परिषद बेझवाडा इथे १९४४ च्या बजेट सेशनच्या वेळेस भरणार होती. तिला हजर राहण्याकरिता जे शेतकरी जाणार होते त्यांना रेल्वेने प्रवास करण्याची मनाई करणारा हुकुम निघाला होता. त्या विरूद्ध मी कामतहकुबीची सूचना आणली. ह्या दिवसात मद्रास प्रांतात मिनिस्ट्री नव्हती. व राज्यकारभार सेक्शन ९३ खाली—( गव्हरमेंट ऑफ इंडीया ॲक्टच्या ) चालत होता. त्याच वेळेला बेझवाडा येथे शेतकी परिषद भरविण्याचा विचार शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यांनी ठरवला. परिषदेचा उद्देश अधिक धान्य पिकवण्याचा व युद्धप्रयत्नांत मदत करण्याचा होता. पण असं असताहि मद्रास सरकारन एक विक्षिप्त

* हुकुम काढून शेतकऱ्यांना बेझवाड्याला रेल्वेन जाण *
| मना केल. शेतकऱ्यांच्या सहकार्यावांचून हा जादा |
| अन्न उत्पादन करण्याचा प्रश्न कसा सुटणार होता. |
| देव जाणे ! जादा अन्न उत्पन्न करायच तर शेतकऱ्याच्या |
| अडचणी समजाऊन घेणे, योग्य असतील–त्यांना नडत |
| असतील त्या दूर करण, असंतोषाच मूळ असेल तो |
| प्रश्न सोडवण हे आवश्यक होत. पण सरकारची ही |
| अशी विपरीत करणी ! शेतकऱ्यांना एकत्र येऊन |
* विचार विनिमय करणच बंद केल. ह्या ठरावावरील *

चर्चेत भाग घेणाऱ्या **एन्. एम. जोशीन** म्हटल 'हा हुकुम व्यक्ति स्वातंत्र्याच्या आड येतो, **सरदार** संतसिंगन म्हटल "पंजाबच्या प्रॉव्हिनशीएल गव्हर्नमेंटन नानकाना साहेबाच्या यात्रेस शीख जाणार होते तर त्यांच तिथे जाण अशाच तऱ्हेन बंद केल' **टी. टी.**

**कृष्णमाचारीनं म्हटलं** "मद्रास गव्हर्नमेंटनं डीफेन्स ऑफ इंडीया ॲक्ट खाली अशा तऱ्हेचे तीनदा नियम काढले. सर्व बाबींसंबंधी त्या सरकारनं डीफेन्स आफ इंडीया ॲक्ट खाली हुकूम काढले. फक्त 'बर्थ कन्ट्रोल' संबंधीच तेवढा काढायचा राहिला." ह्या सूचनेच्या चर्चेत **वॉर ट्रान्सपोर्ट मेम्बर व होम मेम्बर** ह्यांनीहि भाग घेतला. ही सूचना कांही मतं विरूद्ध पडून फेटाळल्या गेली. कारण कांग्रेस गैरहाजर व युरोपियन ग्रुप व सरकारी सभासद नॉमिनेटेड सभासद **एन. एम. जोशी खेरीज**-सरकारकडूनच. एक गोष्ट वाचकांच्या लक्षांत आलीच असेल. ती ही की सरदार संतसिंग किंवा श्री टी. टी. कृष्णमाचारी ह्यांनी ह्या माझ्या तहकुबीच्या सूचनेवर बोलताना ज्या घटनासंबंधी उल्लेख केला त्या काही चळवळ करून-असेंब्लीत प्रश्न टाकून किंवा काम तहकुबीच्या सूचना आणून असेंब्लीच्या, हिंदुस्थान सरकारच्या किंवा देशातील लोकांच्या निदर्शनास आणल्या नव्हत्या. टी. टी. न तशा आणल्या असत्या तर बेझवाडा-परिषदेवर कदाचित बंदी हुकूम न येता. मी आणलेल्या तहकुबीच्या सूचनेनं त्यांनाहि आपलं गाऱ्हाणं वेशीवर टांगता आलं. हा हि काही लहान फायदा झाला नाहीं! तसा हुकुम फिरून निघाला नाही.

मी ही कामतहकुबीची सूचना आणल्यानंतर काही दिवसांनी पण सेशन चालू असतानाच प्रो. रंगा दिल्लीस आले व मला भेटले. ते म्हणाले अरे तू कशाला आणलीस ही कामतहकुबीची सूचना. ती परिषद कम्युनिस्ट लोकांची होती.' मी म्हणालो "व्यक्ति स्वातंत्र्यावर

* घाला म्हणून ती मी आणली. सरकारला वेळींच कान- *
| पिचक्या द्यायला पाहिजे. योग्यवेळीच जर सरकारच्या |
| निषेध केला नाही तर ती गोष्ट सरकारच्या आंगवळणी |
| पडून जाते. बाबारे 'म्हातारी मेल्याचं दुःख नाही पण |
| काळ सोकावतो' अशी म्हण आहे म्हणून योग्य वेळीच |
* बंदोबस्त करायला पाहिजे." *

प्रो. रंगाच्या बोलण्यावरून दिसून आल, त्यान तिकडे 'आंध्र-किसान सभा' नावाची एक ह्या उपरिनिर्दिष्ट संस्थेला विरोध करणारी स्वतःची पार्टी काढली होती. आणि म्हणूनच त्याला त्या विरुद्ध पार्टीच्या हालचाली बंद होण इष्टच होत. "पाहुण्याच्या हातून साप मारवण्याची" प्रो. रंगाची इच्छा होती. विरुद्ध पक्ष सरकारकडून येनकेन प्रकारेण नाहीसा झाला तर त्याला पाहिजेच होत. मग याच कार्य सुलभ रीतीन पुढे जात. वर तो पक्ष कायमच राहिला तर सरकार व तो पक्ष एक-मेकाना पाहून घेते. हा आपला नामानिराळा "गाव जळला हनुमान बाहेर"

प्रो. रंगा दिल्लीत काही दिवस राहिले व एक दिवस त्यांनी मला एक लिस्ट दिली व सांगितल "ह्या लिस्टमधले असेंब्लीतील सभासद हे 'असेंब्लीतील शेतकरी पक्षाचे' सभासद आहेत. ह्या पार्टीचा मी अध्यक्ष व तू सेक्रेटरी" **मी** म्हणालोः- "मी सेक्रेटरी कशाला? दुसरा कोणी तरी पहा-" **प्रो. रंगाः**- "तू एकटा असून कितीतरी शेतकऱ्या-करिता काम करतोस. तेव्हां दुसरा कोण पाहायचा?" **मी** म्हणालो "ह्या सभासदांनी-ह्यात काही मुस्लीम लीगचेहि होते म्हणून संशयाला जागा झाली-सभासद होण्याच कबूल केल आहे का?" **प्रो. रंगाः**- "होय" आणि प्रो. रंगा दिल्लीहून चालते झाले.

मी लिस्टमधील प्रत्येक सभासदाला विचारल तुम्ही शेतकरी पार्टीचे सभासद झाला आहात का?" प्रत्येकाच्या उत्तरावरून दिसून आल की त्यांना न विचारताच त्यांच नाव टाकल. ते सर्व ह्या पक्षाच्या बाबतीत उदास (Indifferent) दिसले. लौकरच-दोन तीन दिवसातच, मला वाटते, प्रो. रंगा ह्यांना सरकारन अटकेत टाकल. कम्युनिस्टाविरुद्ध सरकारन काढलेल्या हुकमाची तरफदारी करणारे रंगा स्वतःच अटकेत पडले. बाजू अंगावर आली. अध्यक्ष अटकेत. सभासद Indifferent उदास; तेव्हां असेंब्ली शेतकरी पार्टी ही फक्त सेक्रेटरीची राहिली म्हणजे फक्त मीच—प्रो. रंगा ह्याच्या अटकेसंबंधी मी प्रश्न विचारले.

उत्तरावरून दिसून आल की प्रो. रंगा ह्याच्या पार्टीत व दुसऱ्या म्हणजे कम्युनिस्ट पार्टीत भांडण होऊन शांतता भंग होईल असा सरकारला रंग दिसला म्हणून प्रो. रंगाना अटकेत टाकल.

## हिंदुस्थानीयांची फुकटाफाकटी नसती उठाठेव

१९४४ च्या आक्टोबरची 'डिफेन्स कन्सल्टेटिव्ह कमिटी' ची बैठक होती त्या वेळची गोष्ट. तिला हजर राहण्याकरिता मी नागपूरहून ग्रँड ट्रंकने निघालो. एका फर्स्टक्लासच्या डब्यात एक युरोपियन पद्धतीचा पोषाख केलेला मुसलमान गृहस्थ होता तेथेच मी बसलो. आमची गाडी इटार्सी स्टेशनवर सरासरी दुपारचे ५ वाजता थांबली. मग सरासरी ५ मिनिटाच्या. आत जवळच्या एका डब्याजवळ लोकांची गर्दी झालेली दिसली. तेव्हा तिथे काय गडबड आहे हे पाहण्याच्या हेतूने तिकडे गेलो. गर्दीतून रस्ता करून अगदी डब्याजवळ गेलो आणि पहातो तो मला अस दिसून आल की एका फर्स्टक्लास लेडीज कम्पार्टमेंट मध्ये दोन युरोपियन बाया व दोन अमेरिकन मिलिटरी ऑफीसर्स आहेत व एक उंच सडपातळ एंग्लोइंडियन गार्ड त्या अमेरिकन मिलिटरी ऑफीसर्सना लेडीज कम्पार्टमेंट मधून बाहेर येण्यास सांगत आहे, पण ते बाहेर येत नाहीत. मी तिथे गेल्यावर निरनिराळ्या व्यक्तीत संवाद झाला तो असा:

ज्या हिंदी गार्डने नागपूरहून गाडी आणली होती व या स्टेशनवर गाडीचा चार्ज ( charge ) दिला होता त्याला चार्ज घेणारा **एंग्लो इंडियन गार्ड** म्हणाला "नागपूरपासून ह्या डब्यात आम्ही प्रवास करीत करीत आहो अस हे लोक म्हणतात आणि तिथून गाडी निघताना तू काही ह्या लोकाना बायांच्या डब्यातून बाहेर काढल नाहीस ! तिथे ह्याना बाहेर काढण्यास तुला कितीतरी सर्व तऱ्हेची मदत मिळाली असती. ह्याना बाहेर काढण्याच कठीण काम तू ह्या लहान स्टेशनवर माझ्यावर आणलस ! काय म्हणाव तुला ?' या संवादाच्या वेळी ते दोघेही त्या कम्पार्टमेंटपासून थोड्या अंतरावर पण माझ्या जवळच उभे होते. इतक्यांत तिथे एक 'आर. टी. ओ.' आला. त्याच व ह्या

ऍंग्लोइंडियन गार्डच काहीतरी आपसात संभाषण झाल. त्यानंतर त्या 'आर. टी. ओ न त्या अमेरिकन मिलिटरी ऑफीसर्सला बायांच्या डब्यातून बाहेर येण्यास सांगितल. त्यांच्यापैकी एक म्हणाला "आम्ही ह्या डब्यात नागपूर पासून प्रवास करीत आहोत. ह्या डब्यातून प्रवास करण्यास आम्हास कोणीहि आडकाठी केली नाही. ह्या बायांचीहि, आम्ही ह्या डब्यातून प्रवास करण्याला हरकत नाही. तेव्हा आम्ही ह्या डब्यातून उतरत नाही" मग तो आर. टी. ओ. त्या गाडीतच मिलिटरी ऑफीसर्सचा श्रेष्ठ अधिकारी होता त्याच्याकडे गेला व त्याला त्या लेडीज कम्पार्टमेंट जवळ घेऊन आला. तो श्रेष्ठ अधिकारी त्या मिलिटरी ऑफीसर्सना म्हणाला "बायांच्या डब्यातून तुम्हाला प्रवास करता येत नाही; बाहेर या." त्या युरोपियन बाया म्हणाल्या "आमची हरकत नाही. करू द्या प्रवास आमच्या बरोबर" त्या युरोपियन बायानी अस म्हटल्यानंतर तो श्रेष्ठ मिलिटरी ऑफीसर आपल्या डब्याकडे चालता झाला. पण हा ऍंग्लोइंडियन गार्डहि जिद्दीस पेटला होता. तो त्या मिलिटरी ऑफीसर्सना म्हणाला "तुम्हाला डब्यातून बाहेर यावच लागेल."

ह्या डब्याजवळ असलेल्या गर्दीतील एक हिंदी गृहस्थ त्या ऍंग्लोइंडियन गार्डला उद्देशून म्हणाला "प्रवास करू दे त्यांना ! त्या बायांची हरकत नाही मग का उगीच टेक लावतोस ?" त्यांच्या म्हणण्याला आणखी कांहीजणानी साथ दिली. अशा रीतीने त्या गार्डवर सर्व तुटून पडलेले पाहून व त्यांच्याकडून त्याच्या कामांत होणारा अडथळा पाहून ह्या झगड्यांत गाड कडून पडण्याच मी ठरवल. मी त्या अमेरिकन ऑफीसर्सना व अडथळा करणाऱ्या तमासबिनाना ऐकू जाईल एवढ्या मोठ्या आवाजात गार्डला उद्देशून इंग्रजीत म्हणालो "बायांच्या डब्यांत शिरण हा सुद्धा रेल्वेॲक्ट खाली गुन्हा आहे, मग हे तर प्रवास करतात ! तेव्हा तू ह्याना Prosecute प्रॉसिक्युट करू शकतोस व हे जे त्या ऑफिसर्सना त्या डब्यांतून प्रवास करण्यास उत्तेजन देतात त्याना गुन्ह्यास उत्तेजन देणारे म्हणून त्यांच्यावरहि फौजदारी मुकर्दमा करू शकतोस." अस

म्हणून मी ह्या 'लेडीज कम्पार्टमेंट' चा नंबर घेतला व ऑफीसर्सना उत्तेजनपर भाषण करणारे जे होते त्यांच्या जवळ गेलो व नाव सांगण्याची मेहेरबानी करा असं म्हटल. तेव्हा ते कां कू करू लागले. मी म्हणालो "कां, नाव का सांगत नाही. ? तुम्हाला वाटत ना तुम्ही एक चांगल काम करता आहा म्हणून ! मग नाव द्यायला तुमची हरकत असू नये." काही जणांनी हळू हळू तिथून पाय काढला-जे तिथे राहिले होते त्यांना मी हिंदीत म्हणालो "तो गार्ड कायद्याला अनुसरून आपल काम करतो आहे. त्याला तुम्ही अडथळा करता. वास्तविक तुमचा काहीहि संबंध नाही. फुकटा फाकटी ह्या उपदेशाच्या गोष्टी सांगताना तुम्हाला काही वाटत नाही ! तुमच काहीही नुकसान न होता तुमच्याकडे भलमणसाई येते व तो गार्ड मूर्ख ठरतो ! तो गार्ड जे करू पहातो आहे ती त्याची Public duty पब्लिक ड्युटी आहे. तो स्वतःच्या गमती-करिता ते करत नाही आणि तुम्ही त्याच्या कामात आपल्या कृतीन अड-थळा आणता. अप्रत्यक्षपणे कायदा व शिस्त न पाळणाऱ्याला तुम्ही उत्तेजन देता. पुढच्याच हुशंगाबाद स्टेशनवर एखादी हिंदी बाई आली. तिला फर्स्ट क्लासन प्रवास करायचा आहे. तर मग ती ह्या डब्यांतून प्रवास कसा करणार ? इटारसी सारख्या स्टेशनवर जर हे लोक बाहेर येत नाहीत तर त्या लहानशा स्टेशनवर ते काय बाहेर येणार ? त्या ऑफीसराच्या हुल्लडबाजीची काही कल्पना करा की ! ह्या गार्डची काय जबाबदारी आहे ती तुम्ही ओळखत नाही. तेव्हा चूप बसाल व ह्या ठिकाणाहून आपआपल्या जागी जाल तर बर होईल" ते लोक गेल्यानंतर गार्ड त्या डब्यातील मिलीटरी ऑफीसर्सना म्हणाला "तुम्ही डब्यांतून बाहेर येई पावेतो गाडी जागची हालू देणार नाही. व गाडीला उशीर झाल्याचा जाब तुम्हाला द्यावा लागेल." व डब्याजवळ स्वस्थ उभा राहिला. दरम्यान तिथे दोन तीन रेल्वेपोलीसही आले. गार्ड जिद्दीस पेटलेला होताच. गाडी जिथच्या तिथेच. गाडीस उशीर होऊ लागला. अखेरीस ते ऑफीसर्स डब्या बाहेर आले. गार्डन शिटी दिली. झेंडा हालवला. गाडी चालू झाली. मी माझ्या डब्यांत येऊन बसलो. माझ्या डब्यांतला तो

मुसलमान गृहस्थ म्हणाला "ह्या गार्डला बक्षीस द्यायला पाहिजे. त्यान खूप धैर्य दाखवल" मी हि त्या गार्डची तारीफ केली. मी ह्या गृहस्थाला त्याच नाव, तो काय करतो व दिल्लीला कशाकरिता चालला हे प्रश्न विचारले. चौकशी करण्यात एक हेतु होता. नोव्हेंबरच्या सेशनमधे-म्हणजे एक महिन्यानेच-ह्या घडलेल्या प्रकारासंबंधी प्रश्न टाकण्याचा मी निश्चय केला होता. सरकारी उत्तराला पुरवणी प्रश्न टाकण्याचा प्रसंग आल्यास आपल्याजवळ सविस्तर माहिती असावी. मी विचारलेल्या प्रश्नाना त्यांनी जी उत्तर दिली त्यावरुन मिळालेली माहिती अशी. हा गृहस्थ हैदराबाद स्टेट मधील सरकारी ऑफीसर. त्याच्याकडे होम-डीपार्टमेंटचा पोर्टफोलिओ. त्याची हैदराबादस्टेट तर्फे 'डीफेन्स कौन्सिलवर' नेमणूक. तो डीफेन्स कौन्सिलच्या बैठकीस हजर राहण्यास चालला होता. त्याच शिक्षण आक्सफोर्डलला. झाल होत. त्यान नाव सांगितल होत काहीतरी '— यारजंग.' पण मी ते विसरलो. आता आठवत नाही. त्यान नंतर मला माझी माहिती विचारली व म्हणाला त्याच्या बरोबरहो ऑक्सफोर्डला एक डॉक्टर देशमुख होता.

नोव्हेंबरच्या सेशनमधे ह्या इटारसी स्टेशनवरील घटनेसंबंधीं मी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना रेल्वेमेम्बरन सांगितल "सगळ खर आहे. पण बक्षीस द्यायची गरज नाही, कारण गार्डन आपली 'ड्युटी' केली." मी पुरवणी प्रश्न टाकला की "एक्झिक्युटीव्ह कौन्सिलर्सना पदव्या मिळतात किंवा इतर हुद्यावरील लोकांना बढत्या मिळतात त्या काय ड्युटी न करण्याबद्दल ?" अर्थातच रेल्वेमेम्बरच्या तोंडाला कुलुप लागल. उत्तर मिळाल नाही.

'लेडीज कंपार्टमेंट' चा जो प्रसंग वर दिलेला आहे तो देण्यांत

* माझा एक मुख्यउद्देश आहे हिंदुलोकात 'अव्यापारेषु- *
| व्यापार' करण्याची, 'चमडी व दमडी' दोन्हीहि शाबूत |
| राखून फुकटाफाकटी चार वेदांताच्या, भलमाणसाई' |
| च्या गोष्टी सांगण्याची एक मोठी खोड आहे. मग |

| त्यामुळे दुसरा अडचणीत सापडला तरी त्यांना त्याच |
* काही वाटत नाही. तेच स्वतःशीज सोसण्याचा प्रसंग *

आला तर चार हात दूर राहतील. मग त्यांना निराळाच वेदांत सुचतो. नंग्या बरोबर नंगे होता का, कुत्र भुंकल म्हणून आपण भुंकाव का? अस म्हणतील. जिथे चमडीला चिमटा, आंच, व दमडीला खार लागणार असेल तिथून हे चार हात लांब! ह्या संबंधी अनेक उदाहरण माझ्या पहाण्यांत आली. त्यापैकी एक दोन देऊनच आटोपते घेतों व आशा करितो की त्यांची ही खोड लवकरच सुटेल.

गाडीतून फकीर भिकारी वगैरे टिकिटावाचून प्रवास करतात, त्यांना जर टिकीटकलेक्टरन किंवा एखाद्या उतारून हरकत घेतली तर हे फुकटा फाकट भलमणसाई मिळवणारे माणस म्हणतात.

'अरे जाऊ द्या हो बिचाऱ्याला. गाडींत इतके प्यासेंजर आहेत त्यांत हा हि एक झाला. भरल्या गाड्यास सुपाच ओझ थोडच होणार आहे? अन तुम्हाआम्हाला काही खांद्यावर बसवून न्याव लागत नाही" पण ह्याना हे दिसत नाही की, अशा रीतीने कितीतरी लोक प्रवास करतात च मग रेल्वेच्या उत्पन्नात घट येते. रेल्वे ह्या व्यक्तीच्या मालकीच्या नाही तेव्हा नुकसान झाले तर ते रेल्वेचे फार तर सरकारचे. येथपर्यंतच यांची

* नजर पोंचते. नुकसान सरकारच म्हणजे आपलच. *
| रेल्वेला कोणत्याहि तऱ्हेन नुकसान आल तर त्याचा |
| परिणाम रेल्वेच्या टिकीटाचे दर वाढवण्यांत होईल ही |
* लहानशी गोष्ट सुद्धा त्यांच्या ध्यानांत येत नाही. *

## अंग्रेज रहेता तो ये ऐसा करते क्या?

ज्याप्रमाणें मी 'डीफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटी'चा सभासद होतो, त्याचप्रमाणे 'फुड कमिटी'चाहि सभासद त्या साली होतो. त्या कमिटीची मिटींग दिल्लीला होती म्हणून तिला हजर राहण्यास नागपूरहून ग्रँडट्रंकने निघालो. मी एका सेकंडक्लासच्या डब्यांतून प्रवास करत होतो. त्या डब्यात एक गुजराथी, तीन प्रॉव्हिनशीयल सर्व्हिसची माणस,

मी व आणखी एक गृहस्थ इतके होतो. सर्वांच्या बर्थस रिझर्व्हड होत्या. बैतुलला गाडी पोचल्यानंतर माझ्या पुतण्याचे, श्री. आनंद दामोधर देशमुख हल्ली विलायतेत एअर सर्व्हिस मध्ये आहेत, याचे स्नेही मि. पुरूषे नावाचे इ. ए. सी. भेटायला येणार होते ते आलेत का हे पहाण्याकरिता मी डब्यातून खाली उतरलो व स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर दोन तीन चकरा केल्या. इतक्यात गाडीने शिटी दिली म्हणून मी परत डब्यात आलो. प्रॉव्हिनशीयल सर्व्हिसपैकी जी माणस दिल्लीस जात होती त्यांच्या पैकीं एक मला मराठींतच म्हणाला "देशमुख साहेब एक मिलिटरी मनुष्य आला व त्यान आमच्या सामानावर आम्ही 'नको, नको' म्हणत असताही आपल सामान टाकल. ऐकल नाही. काही बंदोबस्त केला पाहिजे." मी म्हटल "बरं. थोडा वेळ थांबा." गाडी सुरू झाली इतक्यात एक बलुची व्हाईसरॉय कमिशन्ड ऑफीसर सुभेदार व शीख जमादार आलेत. शीख गुजराथी गृहस्थाच्या बर्थवर बसला व तो बलुची माझ्या बर्थवर थोडीशी जागा रिकामी होती तिथे बसला. दिवसा बर्थ रिझर्व्हड नसतेच. ती असते फक्त रात्री करता म्हणून मी काही बोललो नाही. गाडी रात्रीचे ७ वाजता इटारसीच्या स्टेशनवर आली. मी माझ जेवण डब्यात मागवल होत ते घेऊन वेटर आला. तो बलुची माझ्या बर्थवरून उठून गेला. माझ जेवण आटोपल्यानंतर मी आपला बिछाना आपल्या बर्थवर पसरून दिला. गाडी थोड्या वेळान चालू झाली. गाडी चालता चालता तो बलुची ऑफीसर डब्यात आला व माझ्या बिछान्याच्या पायाकडचा थोडासा भाग गुंडाळून तिथे बसला. त्या सरशी मी म्हणालो "आपको यहांसे उठना पडेगा. बर्थ खाली करो. हमने बर्थ रिझर्व्ह की है" तो:- "मै नहीं उठूंगा" मी:- "आपको उठनाहि पडेगा. इसका नतीजा ठीक न होगा" तो:-"अच्छा देखेंगे" लगेच हुशंगाबाद स्टेशन आल. स्टेशन लहान गाडी फारच थोडा वेळ थांबते. शिवाय प्लॅटफॉर्म नाही. म्हणून गाडी थांबल्याबरोबर डब्यांतून उडी टाकून धांवत स्टेशन मास्तरच्या खोलीकडे गेलो. तिथेच गार्डहि आला होता. त्यांना मी इंग्रजीत म्हणालोः "मी माझी बर्थ रिझर्व्ह केली आहे. तिथे एक बलुची

सैनिक सुभेदार बसला आहे. त्याला मी माझी बर्थ खाली करुन दे म्हटल पण तो देत नाही. तुम्ही माझी बर्थ मला मिळवून दिली पाहिजे" गार्ड म्हणाला " इटार्सीलाच का नाही सांगितल मला. " मीः- 'तो गाडी चालू झाल्यावर डब्यात आला मग मी कस सांगणार ? " तोः- "आता इथे आर. टी. ओ. नाही. स्टेशन लहान. मी काय करणार ? " मीः- " तू Initiative घे-तू सुरवात कर. मी तुला मदत करतो. नाही तर मला सांग की तू खरोखरच काही करू शकत नाहीस. मग मला काय करायच ते मी करीन. तुला सांगितल्यावाचून मला काही करायच नव्हत. नाहीतर तू म्हणाला असतास की मी आपल्या हातात कायदा घेतला; तुला का नाही सांगितल. 'मी काही करू शकत नाही अस म्हण; मग मला माझा मार्ग मोकळा. " मी अस म्हटल्याबरोबर तो माझ्या बरोबर डब्याकडे आला. बरोबर स्टेशन मास्तर व एक रेल्वेपोलीस कॉन्स्टेबल. मी डब्यात आलो आणि पहातो तो त्या डब्यातली बर्थसच्या मधली रिकामी असलेली पोकळ जागा Floor फ्लोअर वर बसलेल्या उतारूंनी भरलेली. गार्ड, स्टेशन मास्तर व तो पोलीस कॉन्स्टेबल ही मंडळी डब्यात आली. मी गार्डला माझी बर्थ दाखवून दिली. गार्डन त्या बलुचीला सांगितल 'ती बर्थ ह्यानी ( म्ह. मा ) रिझर्व केली आहे. तुला खाली करून द्यावी लागेल.' तो करत नाही म्हणाला. तेव्हां स्टेशन मास्तरन त्याला म्हटल "आपका टिकट बताव ? " तो :- ' नही बताते " स्टे. मा. ' आपका नाम बताव ? " तोः-" नही बताते " स्टे. मा." आपके रेजिमेंटका नाम बताव ? " तोः- ' नही बताते. " ह्यावर गार्ड त्याला म्हणालाः " अच्छा हमको अब इटार्सीसे 'आर. टी. ओ.' को बुलाना पडेगा. गाडी यहांसे नही चलेगी." इतक म्हणून स्टे. मा. व गार्ड डब्यातून निघून गेले. गर्दीवरून खाली बसलेल्या मडळीपैकी एकजण त्या बलुचीकडे पाहुन म्हणाला " अगर कोई साहब रहता तो ये ऐसा करते क्या ? " व मग बाकीच्या मंडळीनी गार्ड व स्टे. मा. ह्यांच्या वर्तनासंबंधी चर्चा सुरू केली.

होता की नाही हा अव्यापारेषु व्यापार. बलुचो ना यांच्या गावचा ना सगा सोयरा. आणि त्याची बाजू घेऊन एका बेकायदेशीर क्रियेच समर्थन करत होते. त्याला आपली सहानुभुति दाखवून त्याच करण हे योग्य आहे अस त्याला दर्शवित होते. पण यांच्या या अशा दम भरण्यान गोष्ट निकालात निघणार नव्हती. कॉन्स्टेबल डब्यात होता. तो दोन तीन मिनिटानंतर त्या बलुचीला म्हणाला " कशाला ह्या झंजटमधे पडतोस. बर्थ खाली करून दे व ह्या इथे बैस " गुजराथी गृहस्थाच्या बर्थकडे बोट दाखवून म्हणाला. बलुची माझ्या बर्थ वरून उठला व गुजराथ्याच्या बर्थवर जाऊन बसला. इतक्यात टिकीट कलेक्टर आला व त्यान Floor फ्लोअर वर बसलेल्या घोळक्यांतील मंडळीला–१०–१२ तरी असतील– 'टिकोट बताव' अस म्हटल. एकजण सोडून बाकीचे बिन टिकोटवाले निघाले. टिकीटवाला उतारू टि. कलेक्टरला म्हणाला "साहाब उनको नजदोकही तो जाना है. जाने दो. दो ठेसनकी तो बात है. भला उसमे आपको क्या तकलीफ है. आपको तकलीफ भी नही; और नुकसानभी नही " **टिकोट कलेक्टर:** " वो हम कुछ नही जानते. इनको इटार्सीसे पैसे देना पडेगा. अगर पैसे नही देंगे तो मामला चलेगा. आपके पेटमे इनके लिये रहेम होगा तो आप इनके लिये पैसे दे सकते है. अगर आप इनके लिये पैसे देंगे तो हमे लेनेके लिये कोई उजूर नही. फेर आप देते हो इनके लिये ? देते होंगे तो दो. " हा गृहस्थ 'देतो' अस काही म्हणाला नाही. ह्याची त्या उतारू बद्दलची सहानुभूति जागच्या जागीच जिरली. फुकटा फाकट चार वेदाताच्या गोष्टी टिकीट कलेक्टरला सुनावल्या. त्याच्या पलीकडे काही त्याची मजल गेली नाही. टिकीट कलेक्टरन कॉन्स्टेबलला सांगितल ह्या उतारूंना स्टेशन मास्तरच्या खोलीत घेऊन जा मी येतोच. कॉन्स्टेबलन त्या सर्वांना आपल्या पुढे घालून स्टेशनकडे नेल. टिकीट कलेक्टर डब्यातून उतरला. गाडी चालू झाली.

* फुकाफुकीच्या उदारपणाच्या चार शब्दाचा परिणाम *

| हा असा झाला. ही साधी बाब झाली. पण धार्मिक |
| भावना ज्या माणसांत आहेत त्याचाहि स्वार्थाचा प्रश्न |

| आला की दयेचा उमाळा जागच्या जागीच जिरतो. |
| त्याचा वेदांत त्याच्याकरिता नसतो. तो असतो दुसऱ्या
* करिता. पुराणातली वांगी पुराणात पैकी गोष्ट *

## मायला बडवल

सरासरी चाळीस वर्षापूर्वीची गोष्ट. त्यावेळेस नागपुरात म्युनिसिपालीटीच्या रॉकेल तेलाच्या दिव्याचा उजेड असे. तोही अगदी मंद. जसा उजेड गैरसोईचा तसेच रस्तेही. रस्त्यावर जागजागी खळगे गद्दे चौरस्त्यावर गाईची बैठक-ती अदृश्यच असायची कारण उजेड असेल तेव्हाना ! अंधाऱ्या रात्री व तेहि बरसातीच्या दिवसात. सायकलीवरून इकडे तिकडे जाताना रस्ते दिसण मुष्कील. टांग्यान जांण सुद्धां मुष्कील तसेच मंद असायचे. कारण टांग्याचेही कंदील ह्या चौरस्त्यावर बसलेल्या गाईचा रस्त्यान येणाऱ्या जाणाऱ्यांना भारी त्रास. एकदा बॅ. अभ्यंकर व श्री धुन्ठीराजपंत ठेंगडी इंजीनीयर घोडयाच्या ट्रूपमधून रात्रीच्या प्रहरी श्री. निळकंठराव उर्फ दादासाहेब उधोजी ह्यांच्या शहरातील घरच्या राष्ट्रीय मंडळाच्या मिटींगला जाण्याकरिता धनतोलीहुन निघाले. जात असताना बर्डीवर चौरस्त्यावर गाई बसल्या होत्या तिथे ट्रूप उलटली. धुन्डीराजपंत पडले व त्याना जखमा अशा झाल्या की एक महिना दवाखान्यांत जाऊन डॉ. गद्रेकडून उपचार करून घ्यावे लागले.

धुंडीराजपंत ठेंगडी जमदग्निचा अवतार ! त्यानी त्यांच्या भेटीस जो मनुष्य जाईल त्यास सर्व हकीगत सांगावी व म्युन्सिपालिटीला, सभासदांना, व गाईच्या मालकांना सर्वांना ते आपले कर्तव्य बजावत नाही म्हणून संतापत अभद्र शिव्या द्याव्या. असे प्रसंग अनेकवार आलेत अन् मोटार सायकलवाल्यावर तर हटकून. इतरहि प्रकारचा त्रास भटक्या गाईमुळे व गाईच्या बैठकीमुळे पुष्कळाना झाला असेल.

धुन्डीराजपंताना झालेल्या ह्या अपघातानंतर एक दिवस सकाळी ९।१० च्या अंदाजात मी शहरात डॉक्टर मुंजे ह्यांच्याकडे टांग्यात बसून जात होतो. जात असताना महाल जवळील नगारखान्याच्या दरवाज्या

जवळ हातात दोर असलेल्या ५।६ माणसाना व दोन तीन म्युनिसिपल चपराश्याना रस्त्यावर बसलेल्या ८।१० गाई पैकी काही गाईना धरताना पाहयल. रस्त्यावरच्या धान्याच्या दुकानदारांनी ह्या माणमांना गाईना धरताना व नेताना पाहयल. त्यांनी अंदाज बांधला की गाई आता कोंडवाडयांत जाणार ! लगेच हिंदु दुकानदार धावले. काहीकांच्या हातात काठयाहि होत्या. त्यानी गाई सोडवल्या आणि गाई सोडवण्याकरिता मारपीट करायचाहि इरादा दिसून आला. त्या चपराशाना त्यांनी उपदेश केला "अरे भाई, तुम हिंदु हो की कौन हो ? गय्या तो अपनी मा. और उसको पकडके कांजीहौस में ले जाते हो ! वा भई वा !" पण थोडयाच वेळात एक चमत्कार घडून आला. ह्या सोडवलेल्या गाईपैकी एका गाईन एका दुकानदाराच्या धान्याच्या टोपलीत तोंड खुपसल व धान्य खायला सुरवात केली. दुकानदाराची सत्वपरिक्षा पाहावयाचो होती की काय तिला कोणास टाऊक ? दुकानदार धावला व हातातल्या काठीन त्या 'माय'ला खूप बडवलं.

* सांगायच काय की स्वार्थाची वेळ आली तेव्हा 'गाय आपुली माय' ही धार्मिक भावना बाजूला राहिली वेदांत बाजूला राहिला व स्वार्थ बळावला. 'परोपदेशे पांडित्यम्' फार सुचत. एखादाच सखीचा लाल 'बोले तैसा चाले' पैकी. व म्हणूनच 'त्यांची वंदावी पाऊले' असं सांगितल आहे. *

## जयप्रकाश नारायण व डॉ. लोहिया

जयप्रकाश नारायण आता सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत. ज्यानी निःस्वार्थीपणान आतापर्यंत आयुष्य कंठल व सार्वजनिक कार्यांकरिता हालअपेष्टा सोसल्या, जनतेच्या हिताची जे एकसारखी काळजी वाहतात व ती प्रत्यक्षांत आणतांना अनेक संकट भोगतात अशा प्रमुख महाभागापैकी एक. जयप्रकाश नारायण ह्याच्या संबंधी विशेष आपुलकी माझ्या भावाला गोपाळला होती अस दिसते. वाचकांना आठवतच असेल त्यानं

मला बजावले तेः– ' I will disown you as my brother ' मी जर जयप्रकाश नारायण संबंधी कामतहकुबीची सूचना आणली नाही तर.

१९४४ च्या नोव्हेंबर सेशनमधे कांग्रेस सभासद हजर होते. त्या वेळेला त्यान जयप्रकाश नारायण व डॉ. लोहिया ह्यांच्या संबंधी प्रश्न विचारले ते खाली दिले आहेत.

डॉ. देशमुख—जयप्रकाश नारायण ह्याची तुम्ही कोर्टातून चौकशी करणार आहात का ?

होम मेम्बरः—हो त्याचा विचार चालला आहे.

डॉ देशमुखः—केंव्हा पासून विचार चालला आहे ?

हो–मेंः—मला स्वतःलाच त्या गोष्टीची कल्पना नाही.

डॉ. देशमुखः—डॉ. लोहिया ह्याला त्याच्या नातेवाईकाना भेटू का देत नाही.

हो में :— सुरक्षितपणाच्या दृष्टीन.

डॉदे. :— डॉ. लोहीयाच्या वडीलाला सुद्धा भेट घेऊ देत नाही ते हि त्याच्या संरक्षणाच्या दृष्टीनच का ?

हो में :— सर्वांच्याच्र सरंक्षणाच्या दृष्टीन. सन्माननीय सभासदाच्या संरक्षणाच्या दृष्टीनहि.

डॉ. लोहिया हे ह्या वेळेस डेटेन्यू ( Detenue ) म्हणून तुरुंगात होते. सोशियालिस्ट कार्यकर्त्यांबद्दल माझ्या बंधुची सक्रिय सहानुभूति होती. हे बऱ्याच्र जणाना माहित होत. ते अंडरग्राऊंड–भूमिगताकरिता द्रव्य जमवून त्याना मदत करत होते.

## साऊथ आफ्रिका व इस्ट आफ्रिका

हिंदुस्थानात हिंदुस्थान सरकार डेटीन्युजना कस वागवत होते हे

श्री. जयप्रकाशनारायण व डॉ. लोहिया ह्याना जी वागणूक मिळत होती त्यावरून अंदाज करता येईलच. पण सरसकट सर्वच हिंदी लोकाना ह्याच काळात साऊथ आफ्रिकेमधे व ईस्ट आफ्रिकेमधे तिथले सरकार अत्यंत वाईट रीतीने वागवित होते. तिथे जी वागणूक ह्या लोकाना मिळत होती ती वर्णद्वेषावर आधारलेली होती. हिंदी लोकाना दिवसेंदिवस जी वाईट वागणूक मिळत होती, त्याचा जो छळ चालला होता त्यासंबंधी बरेचसे प्रश्न व कामतहकुबीच्या सूचना मी व इतर सभासदांनी दिल्या होत्या. त्याला उत्तर म्हणून **सरकारी मेम्बर डॉ खरे** ह्यानी असे सांगितल होत की हा प्रश्न उत्तम रीतीन चर्चेला जावा म्हणून ते एक ठरावच आणणार आहेत, व त्याप्रमाणे त्यानी तो एक ठराव आणला.

## साऊथ आफ्रिका व ईस्ट आफ्रिका इथे राहणाऱ्या हिंदी लोकांच्या परिस्थितीचा विचार करण्यांत यावा.

ह्या ठरावाला माझ्या भावान गोपाळन एक उपसूचना आणली ती " आणि सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर ह्या असेंब्लीच असे मत झाल आहे की गव्हर्नमेंट ऑफ ईंडीया न " रेसी प्रोसीटी ॲक्ट जे हिंदी नाहीत अशा साऊथ आफ्रीकन नागरीकाविरूद्ध एकदम अमलात आणावा व हिंदुस्थान तर्फे असलेल्या हायकमीश्नरला तिथून तात्काल बोलावून घ्याव " चर्चेत सर्वच पार्टीच्या सभासदांनी भाग घेतला होता. श्री. भुलाभाई देसाई व नबाब जादा लियाकत अलीखान हे पार्टी लिडर्सहि बोलले. ठराव उपसूचना सहीत पास झाला. पण त्याची अम्मलबजावणी कांहीं तशी झाली नाही.

## युद्धोत्तर सरकारच धोरण काय राहील

हिंदुस्थानांतील व हिंदुस्थाना बाहेरील हिंदी लोकांच्या वर्तमान कालांतील हिताच्या प्रश्नांचा विचार करत असतानाच भविष्यकालाचाहि विचार करण जरूरच होत. चालू युद्ध संपल्यानंतर—कारण ते केव्हातरी संपणारच होत-हिंदी सैनिकांच, शेतकऱ्यांच व्यपाऱ्यांच, व उद्योगधंद्या-वाल्यांच हित कशा तऱ्हेने रक्षण केल्या जाणार होत हे सरकार जवळून

समजायला पाहिजे होत. व्यापार व उद्योगधंदे ह्या संबंधी सरकारच धोरण काय राहील, ज्या सैनिकांना कमी करण्यात येईल (Demobilise) त्यांचा चरितार्थ चालावा म्हणून काय कार्यक्रम आखला आहे, युद्धोत्तर कोणत्या प्रकारची व काय साधनानी हिंदुस्थानची सुधारणा ( Reconstruction ) करणार आहा, शेतकऱ्यांची नेहमीची ददात मिटावी म्हणून ( Permanent rehabilitation ) काय योजना आखल्या आहेत हे महत्वाचे प्रश्न विचारले व अशा रीतीन हिंदी लोकांच—विशेषे करून सैनिकांच व शेतकऱ्यांच—हित माझ्या डोळयासमोर सतत ठेवत आलो.

## अधिकार ग्रहण करण्याकडे राजाजींची ओढ

ह्या समयास देशात अनेक घटना घडत होत्या. कांग्रेस श्रेष्टींच्या राजनैतिक ( Policy ) विचारात क्रांतीकारक फरक होत होता ही विशेष घटना. १९४४ साली मि. जिनाशी म्हणजे मुस्लीम लीगशी हात मिळवणी करण्याचा उपक्रम राजाजींनी केला. आतापर्यंत महात्माजींनी जिनाची मर्जी संपादन करण्याचे प्रयत्न केले होते ते निष्फळ झाले. आता राजाजींच्या सांगण्यावरून म्हणा किंवा स्वयंस्फूर्तिन म्हणा फिरून जिनांची भेट घेऊन मिळत घ्याव अस महात्मा गांधीनी ठरवल. न जाणो आतापर्यंत जरी जिनांचा हृदयपालट झाला नाही तरी कदाचित आता होईल काय नियम सांगावा. कडू कारल तूपात तळल, साखरेत घोळल तरी कडूच कडू किंवा कुत्र्याच शेपूट नळीत घातल तरी वाकडच्च वाकड ह्या म्हणीवर त्यांचा भरवसा नव्हता. व म्हणून ते जिनाना जाऊन भेटलेहि. गांधीजीना त्यानी आंगठा दाखवला. काहीच निष्पन्न झाल नाही. उलट हिंदुस्थान सरकार जवळ, ब्रिटीश सरकार जवळ जिनांचा भाव वाढत गेला. पंजाबच्या युनायटेड पक्षाच्या सरकारी प्रधानमंत्री सर शिकंदर हयात खान मि. जिनाला कोणत्या झाडाचा पाला अस समजत असे. त्यालाहि ह्या महात्माजीच्या जिनांच्याकडे खेटया घालण्यान कसंसच झाल. कारण महात्माजी म्हणजे कांग्रेस. महात्माजीनी जिनांची

मनधरणी करण म्हणजे कांग्रेस सारख्या बलवान राजकीय पक्षान मनधरणी करण. अर्थातच जिनाचा भाव वाढला व कांग्रेसन कित्येक वजनदार मुसलमान सार्वजनिक कार्यकर्त्यांना जिनाच्या पक्षात जाण भाग पाडल किंवा जिनाशी मिळत घ्यायला लावल. महात्माजी जिनाकडे गेले पण हात हालवित वापस आले. जिनाचा खाक्या कायमच. जिना वाकले नाहीत.

महात्माजीन जी ही जिनांची भेट घेण्याची यातायात केली तिला कारण राजाजीची अधिकार ग्रहण करण्याची तीव्र महत्वाकांक्षा होती-अस म्हणण्यास आधार आहे. त्यांनी १९४४ साली नोव्हेंबर २४ ला

* नागपूर युनिव्हर्सिटीच्या दीक्षान्त पदवीदान प्रसंगी *
केलेल्या भाषणात म्हटल "××× जी काय सत्ता
आपल्याला मिळाली आहे ती हाती न घेता असहकार
करून व तिजपासून अलिप्त राहून स्वातंत्र्य हिसकावून
घेणे या दोन्ही गोष्टी तुम्ही करू शकाल ही कल्पना
सोडून द्या. मिळेल ती सत्ता हाती घेऊन आपल्या
सामाजिक रोगावर उपचार करण्यास व स्वातंत्र्याच्या
मार्गावर पुढे पाऊल टाकण्यास आपण सज्ज असले
पाहिजे × वास्तविक राष्ट्राच्या पुनर्निर्मितीचे उत्तम
* साधन म्हणजे सरकारी राजयंत्र होय." मग *

आजपर्यंतचा असहकार योग मुर्खपणाचाच होता नाही का राजाजी ! कांग्रेसन असहकार असहकार म्हणत १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडीया ॲक्ट खाली १९३७ साली अधिकार ग्रहण केल्यानंतर व १९३९ च्या सप्टेंबरमधे कांग्रेसन प्रांतातील मिनिस्ट्रींना अधिकार संन्यास व सभासदाना बहिष्कार टाकण्यास भाग पाडण्याच्या दरम्यानच्या कालात आपणास अधिकाराची चटक लागली म्हणून आपण हे उद्गार काढले नसतीलच ? सरकारी राज्ययंत्र आपल्या काबूत घेण्याच्या उपयुक्ततेमुळेच आपण तस बोलले असाल. व आपण महात्माजीला हा उपदेश केलाहि

असेल. त्यांना सल्ला देणारा आपल्यापरता दुसरा कोण पोक्त, वयस्क व कांग्रेसमधला राजकारणी पुरुष उरला होता ?

राजाजीच्या ह्या भाषणानंतर १९४५ च्या बजेट सेशनला कांग्रेस पार्टी हजर राहिली. अनायासेच श्री भुलाभाई देसाई कांग्रेस पार्टीचे लिडर ह्यांना खान अब्दुल कायुमखान व्हाईस प्रेसिडेंट आफ धी पार्टी ह्यांच्या समवेत मुस्लीमलीगच्या नबाब लियाकतअली खानशीं सेशनच निमित्त होऊन बरेचदा भेटी गाठी घेता आल्या. लॉर्ड वॅव्हेल ह्यांच्याशीहि बिनबोभाट बोलण करता आल. हे सर्व महात्माजीच्या विश्वासु सल्लागारान राजाजीन महात्माजीला तसा उपदेश केल्यावांचून—सल्ला दिल्यावांचून व महात्माजीनी श्री भुलाभाई ह्यांना तस करण्याचा आदेश दिल्यावांचून भुलाभाई ह्यांनी केल अस कस म्हणता येईल ? महात्माजीच्या विरुद्ध जाण म्हणजे क्षणार्धांत मातीत मिसळून जाण हा अनुभव भुलाभाईला नव्हता अस कस म्हणता येईल ? ते डॉ. खरे, व नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांची वासलात का व कशी लागली हे विसरण शक्य होत का ? भुलाभाई उत्तम ॲडव्होकेट होते, विद्वान होते, श्रीमंत होते, बहुश्रुत होते, जाब प्रतिजाब देण्यात वाकबगार होते हे सर्व जस खर तसच हे ही तितकच खर की ते भित्रे होते. म्हणूनच मी म्हणतो कीं भुलाभाईजे ह्या सर्व वाटाघाटी करत होते ते महात्मा गांधीच्या आदेशानच. त्या नंतरचा इतिहास—कांग्रेस हायकमांडमधील कांग्रेसवाले सुटण्यात, कॅबिनेट मिशन येण्यात, मिशनने कांग्रेस व लीग ह्या पक्षांना प्रपोजल करण्यात, कांग्रेसवाल्यानी अधिकार ग्रहण करण्यात, कांग्रेस व लीग ह्यांच संमिश्र सरकार बनवण्यात, मुस्लीम लीगवाल्या मंत्र्याशी भानगडी करून राज्ययंत्रात घोटाळे उत्पन्न करण्यात—नबाब लियाकतअलीखान ह्यांच ह्या वेळच हिंदु पुंजीपतीना भेवडावणार बजेट प्रसिद्धच आहे—कसा झाला हा इतिहास अलिकडचा आहे व तो सर्वांना माहीतच आहे.

## किती जणांच्या रक्तावर तुम्ही आपल्या तुंबड्या भरणार ?

ह्याच वर्षी 'डीफेन्स कन्सल्टेटीव्ह कमिटी'च्या सभासदांनी बर्माला भेट द्यावी अस ठरल होत. सर्व सभासदांनी कलकत्याला जमायच होत व

तिथून वर्मा, मी नागपूरहून व श्री जमनादास मेथा मुंबईहून कलकत्यास पोचलो. मी श्री. निर्मलचंद्र सॉलीसीटर–असेंब्लीचे सभासद ह्यांच्याकडे व श्री. जम्नादास मेथा ग्रेट इस्टर्न होटेलमध्ये उतरलो. दुसरेच दिवशीं सकाळी माझ्याकडे तिथल्या मारवाडी तरुणांच्या समाजापैकी तीन चार गृहस्थ आले. त्यांनी मला म्हटल "जम्नादास मेथा ह्यानी व्याख्यान देण्याच कबूल केल आहे. आपणहि व्याख्यान द्या." श्री. जम्नादास मेथा कोण्यादिवशी, कोणत्यावेळी, व कोठे व्याख्यान देणार हे विचारल्यावर मी त्याना म्हणालो "माझ व्याख्यान जम्नादास मेथाच्या व्याख्यानाच्या दिवशीच ठेऊ नका. दुसऱ्या दिवशी ठेवा" ते लोक ह्या गोष्टीला 'हो' म्हणाले, मी व्याख्यान देण्याच कबूल केल. दुसऱ्या दिवशी सकाळी 'स्टेट्समन' पत्रात पहातो तो आमच दोघांचहि व्याख्यान एकाच दिवशी. एकाच ठिकाणी. त्याच वेळेला व त्याच मनुष्याच्या अध्यक्षतेखाली. मी व्याख्यानास तर गेलो. पण अध्यक्षास सांगितल "मि मेथा ह्यांच व्याख्यान झाल्यावर तुम्ही त्यांच्या व्याख्यानावर प्रश्न व्हावयाचे असतील तर तेही होऊ द्या. मेथाच्या व्याख्यानावर प्रश्नोत्तरे संपली व तुमचा समारोप झाला म्हणजे नंतर माझ व्याख्यान स्वतंत्र रीतीन होईल. त्या व्याख्यानाशी माझ्या व्याख्यानाचा कोणताहि संबंध नसावा. माझ व्याख्यान निराळ, प्रश्न निराळे व समारोप निराळा. नाहीतर उगीच गोंधळ माजेल. माझ व्याख्यान तुमच्याच अध्यक्षतेखाली असल तरी ते स्वतंत्र व्याख्यान समजण्यांत येऊन, प्रश्न व्हायचे असतील ते व्हावेत व तुम्ही माझ्या व्याख्यानाचा स्वतंत्र समारोप करावा."

श्री. जमनादास मेथा ह्यांनी व्याख्यान दिल, श्रोत्यांनी त्याना प्रश्न विचारून खूप सतावल व भडकावल. मेथा हे कांग्रेस विरूद्ध म्हणजे त्या वेळेची जी कांग्रेस हायकमांड होती तिच्या विरूद्ध होते. त्यांनी त्यांच्या विरूद्ध हायकमांडन काय काय कारवाया केल्या त्या सांगितल्या. हायकमांडन अगदी नीचपणाची कमाल केली होती अस त्यानी व्याख्यानात म्हटल, त्यामुळे त्यांच्या व्याख्यानांत श्रोत्याकडून खूप सरबत्ती झाली व वातावरण

खूप गरमागरमीच झाल. अध्यक्षांनी त्यांच्या व्याख्यानाचा असमाधान कारक समारोप केला. शेवटी बोलण्याचा अध्यक्षालाच अखत्यार तेव्हा जमनादासाना काही बोलता येईना.

श्री. जमनादास ह्यांच्या भाषणाचा अध्यक्षानी समारोप केल्यानंतर मी माझ्या भाषणाला सुरवात केली. विषय कोणता घेतला हे आता नक्की आठवत नाही. पण माझ्या भाषणातील मुद्यांपैकी एक मुद्दा असा होता की लढाई लौकर आटपली पाहिजे. अनेक कारण सांगितली का लढाई लौकर आटोपली पाहिजे ह्या संबंधी. ती आता बहुतेकांच्या परिचयाची झाली आहेत. श्रोत्यांनी मला एकहि प्रश्न विचारला नाही. पण अध्यक्ष महाशय-श्री खेटन असं कोणीतरी व्याख्यानानंतर सांगितल—आपल समारोपाच भाषण करताना म्हणाले Why is Mr. Deshmukh so apologetic ? we have just begun our industries etc" (मि. देशमुख असं 'अपॉलॉजेटीक' का बोलतात ? उद्योगधंदे तर आपण आताच काढले आहेत") म्हणजे काय की त्यांच्या मतान लढाई काही काल म्हणजे उद्योगधंद्याचा जम बसे पावेतो सुरूच राहिली पाहिजे. त्यासरशी अध्यक्षाच्या दुसऱ्या बाजूला बसलेले श्री. जमनादास मेथा माझ्याकडे पाहून मोठ्याने म्हणाले "At the cost of whose blood ? and how much ?" कोणाच रक्त व किती खर्ची घालणार ?' अर्थात मेथाच्या म्हणण्याचा आशय गरीब शिपायांच पुष्कळस रक्त सांडून हे उद्योगपति आपला धंदा भरभराटीस आणणार.

'कॅपिटलिझम' हा असा असतो. त्याला स्वतःच्या धंद्याच्या भरभराटी पलीकडे काही दिसत नाही. जनतेचे हाल झाले तरी पर्वा नाही. कितीकांच रक्त सांडल तरी पर्वा नाही. त्यांचा धंदा तेजीस आला ते श्रीमंत झालेत म्हणजे झाल. आणि त्याचे नवीन निघालेले धंदे भरभराटीस यावेत म्हणून लढाई सुरूच राहावी अशी जशी इच्छा करतात तशीच धंद्यात मंदी आली म्हणजे एखादी लढाई सुरू झाली तर बर होईल अशी इच्छा करणार ! जगांतील अशांततेच्या मुळाशी हेच लोक

असण्याचा संभव जास्त. आणि जेव्हां तसे नसतील तेव्हां निदान त्या परिस्थितीचा जास्तीत जास्त फायदा घेण्यास डोळयात तेल घालून बसणार, कधी चुकणार नाहीत, तशी परिस्थिति काही काल टिको अशी हे इच्छा करणार व लोकांच्या सांडलेल्या रक्तावर जळवासारखे पुष्ट होणार !

* देशाचे स्वातंत्र्य रक्षण करण्याकरिता रक्त सांडणे निराळे *
| त्याकरिता तर सर्वांनीच तयार असले पाहिजे नाहीतर |
| कोणाचेच स्वातंत्र्य टिकणार नाही. पण उद्योगधंदे वाढ- |
| विण्याकरिता, साम्राज्यतृष्णेकरिता, दुसऱ्याचे स्वातंत्र्य |
| हिरावून घेऊन त्यांना लुबाडण्याकरिता काय म्हणून |
* कोणीहि आपल्या रक्तानं भूमि लाल करावी ? *

## संस्मरणीय असे १९४५ साल

सन १९४५ च्या बजेट सेशनमधे मी नानाप्रकारची कामगिरी असेंब्लीत बजावली व म्हणून मला असेंब्लीने सरकारच्या अनेक खात्यांच्या समाचार घेण्याकरिता पुष्कळशा कमिटीवर निवडून दिले. ते सर्व सांगून जागा अडवू इच्छित नाही. ते त्या वेळच्या मध्यवर्ति असेंब्लीच्या डीबेटसमधे पहावयास सापडेल. त्या प्रोसिडींग्सच्या बाहेरची अशी एकच गोष्ट सांगण्यासारखी आहे. तो एक योगायोगच समजला पाहिजे. ज्याप्रमाणे माझ्या असेंब्लीच्या कामाची सुरवात एका संन्याशाचे भेटीने झाली त्याप्रमाणेच त्या कामाचा शेवट एका ब्रम्हचारीच्या—मसूरकर महाराजांच्या-आशोर्वादानें (Blessings ने) झाला. मसूरकर महाराजांचा आश्रम व Estate सरकारने आपल्या ताब्यात घेतली होती ती त्यांच्या ताब्यातून सोडवली. महाराजांनी आशीर्वाद पाठवायला कारण हे. पण १९४५ साल माझ्या व देशाच्या दृष्टिने महत्वाचे व संस्मरणीय आहे ते ह्याकरिता—सरकार व कांग्रेस हायकमांड ह्यांच्यात तहाच्या वाटाघाटी होऊन कांग्रेसने देशाचा राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी शिरावर घेतली. ती जबाबदारी पार पाडत असताना एक महत्त्वाची घटना घडली. मी त्या वेळेला मध्यवर्ति असेंब्लीचा जरी

सभासद नव्हतो नंगे सेंट्रल शुगरकेन कमिटीचा सभासद होतो व त्या निमित्तान मला दिल्ली कानपुरकडे जाव लागे. अशा एका वेळी मला तिच्या संबंधी माहिती मिळाली. ती घटना अशी.

## " हैद्राबाद् मधे सत्याग्रह करू नका "

मी सागणार ती घटना १९४६ सालातली आहे. कांग्रेसन मध्यवर्ति सरकारची सुत्र हातात घेतली होती. मी एक दिवस दिल्लीच्या इंडीयन सेंट्रल शुगरकेन कमिटीच्या सभेच काम आटोपून ग्रँडट्रंकन नागपुरास येण्याकरितां जुन्या दिल्ली स्टेशनवर गेलो. सेकंड क्लास मधे बर्थ रिझर्व्ह केली होती तेव्हां गाडी सुटण्याच्या फार तर पाच दहा मिनिटेच्च आधी गेलो असेन. डब्याच्या दरवाजाजवळच्या आडव्या बर्थ वर एक रोड स्वामी निजला होता. त्याच्या बर्थला काटकोन करून पण प्लॅटफार्मच्या दुसऱ्या बाजूला माझी बर्थ होती. तिच्यावर बिछाना पसरून मी निजलो होतो. गाडी सुटण्याच्या-आधी पाचक मिनिट एक व्हाईसरॉय कमीशन्ड मुसलमान ऑफीसर डब्यात आला व त्या स्वामीच्या बर्थवर पायाकडे बसला. त्यांच्यामधे बोलाचालीला सुरवात झाली.

"यहां मत बैठो. शिपाई लोकोंके लिये दुसरा डबा है. वहां जाव"—स्वामी जरा संतापूनच म्हणाले,

"क्यों जायेंगे ? यहां पर ही बैठेंगे. हमको कहते हो उधर जाओ. देखते हम नही रहते तो आप कैसा ट्रॅव्हल करते ! देशके लिये मरे हम, और आराम करे आप !" ऑफीसर ही संतापून म्हणाला.

प्रकरण एकेरीवर आल. स्वामी तर बिचारा अगदीच रोड. तेव्हां आपण ह्या प्रकर्णात भाग घ्यावा अस ठरवून मी स्वामीना इंग्रजीत म्हणालो' शिपायाकरिता ( Military करिता ) जो डबा आहे त्यात मिलिटरीवाल्यानीच बसाव अस आहे. पण मिलिटरी वाल्यान दुसरीकडे म्हणजे सिव्हिलियन्सच्या डब्यात बसू नये अस नाही. हे काहीस लेडीज कम्पार्टमेंट सारख आहे. लेडीज कम्पार्ट-

मेटमधे माणसाला जाता येत नाही. पण माणसाच्या डब्यांत लेडोजना बसता येत. नूर्त तुमच्या बर्थवर तुम्ही एकटेच आहा. बर्थ रिझर्व्ह केल्याचा पूर्ण फायदा मिळेल रात्री ८।९ च्या नंतर. तो पर्यंत दुसऱ्या उतारूंना रिझर्व्ह केलेल्या बर्थवर बसता येत. आपण दोन तास वाट पहा. गाडी मथुरेला पोहोंचली की ह्या मनुष्यान तुमचो बर्थ खाली केलीच पाहिजे हे मी पाहिन."

माझ भाषण संपल्याबरोबर **स्वामी** मला मराठो भाषेंत म्हणाले 'आपण देशमुख का ?"

**मी:**—होय. पण आपणाला माझ नाव कस कळल ?"

**स्वामीः**—मी आलो त्या वेळेला डब्यावरच्या रिझर्व्ह लेबलवरची नाव वाचली. सर्व उतारू आले होते. तुम्हीच तेवढे येण्याचे राहि ला होता. ते सर्व उतारू अपकंट्री 'देशमूख' हे आडनाव महाराष्ट्रातल्यांचच. तेव्हा आपल नाव मी ओळखल हे काही विशेष नाही"

**मीः** आपल नाव.

**स्वामी:**—मला रामानंदतीर्थ म्हणतात. मी हैदराबादकडे असतो

**मी:**—आपण दिल्लीकडे कशाला आला होता ?

**स्वमी:**—निझामान नवीन राजकीय सुधारणा आपल्या राज्यात अमलात आणायच ठरवल आहे. त्या प्रतिगामी स्वरूपाच्या आहेत म्हणून आम्ही त्यांच्यावर बहिष्कार टाकला व सत्याग्रह करण्याच ठरवल. सर **मिर्झा इस्मायल** ह्यानी मला बोलावून दोन सीट्स वाढवतो तुम्ही निवडणुकीवर बहिष्कार टाकू नका व सत्याग्रह करू नका असं म्हटल. पण तेवढ्यान माझ समाधान झाल नाही. मी म्हणालो ' तडजोडीचा मार्ग मला एकच दिसतो. तुम्ही निवडणुकी लांबणीवर टाका.' त्या गोष्टीला सर मिर्झा राजी नव्हते. तेव्हा आम्ही सत्याग्रह करण्याच ठरवल. ते पंडीतजीला कळल्यानंतर त्यानी मला एकदम दिल्लीस येण्यास सांगितल. मी आलो. पंडीतजी म्हणाले तुम्ही सत्याग्रह करू नका. बंद ठेवा. तेव्हा बंद ठेवणार. "

ह्या वेळेला पंडित नेहरू हंगामी मध्यवर्ति सरकारचे मुख्य प्रधान होते. मी स्वामीना त्यांची माहिती विचारल्यानंतर त्यानी ' सव्हेंट ऑफ इंडीया ' सोसायटीचे ते सभासद होते तेव्हांपासूनचा तर कांग्रेसमधे शिरुन हैदराबादला जाऊन चळवळ करू लागले तो पर्यंतचा इतिहास सांगितला. मथूरा स्टेशन आल गाडी थांबली. काही वेळान सुरू झाली. पण तो व्हॉइसरॉय कमीशन्ड ऑफीसर जो नाहीसा झाला तो आला नाही.

हैदराबाद संस्थानातल्या कांग्रेस चळवळीत व इतर संस्थानातल्या कांग्रेस चळवळीत बरवर फरक दिसून येतो. इतर संस्थानातल्या चळवळी बेलगाम चालतात अस म्हटल तर ते अयोग्य होणार नाही अस वाटत.

* एकंदरीत काय की मुस्लीम कम्युनिटि व मुस्लीम स्टेट *
| ह्याना Preferential treatment ( विशेष |
| सवलतीची वागणूक ) कांग्रेसकडून दिल्या जाते. आणि |
* इतकही असून त्यांची कांग्रेसविरुद्ध ओरड कायमच ! *

ह्या नंतरचा इतिहास हिंदुस्थानचा भारत व पाकिस्तान होण्यात, भारताची घटना होण्यात, भारत रिपब्लिक होण्यात जो झाला तो आता सर्वांच्या परिचयाचा आहे. तो चर्वित चर्वण करण्यात मतलब नाही.

## "कीर्ति करून नाही मेले । ते उगेच आले आणि गेले"

वाचकापैकी बहुतेक प्रापंचिक आहेत हे गृहित धरून **श्री समर्थ रामदास स्वामी** ह्यांनी प्रापंचिकाना जो उपदेश केला आहे तो देऊन ही मंजूषा बंद करतो.

श्री समर्थ रामदास स्वामी ह्यांचा प्रापंचिकाना उपदेश
" प्रपंची जाणे राजकारण । परमार्थी साकल्य विवरण "

प्रपंच करणाराला राजकारणाच ज्ञान असलच पाहिजे अस समर्थांनी सांगितल. पण राजकारणाचा अनुक्रम त्यानी असा ठरविला आहे. :—

मुख्य हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण
"तिसरे ते सावधपण । सर्व विषई"

प्रमुखत्व हरिकथानिरूपणाला द्याव की राजकारणाला ह्या बाबतीत मतभेद होण्याचा संभव आहे. पण एवढ तर खर की प्रत्येक प्रापंचिकाला हरिकथानिरूपणाची म्हणजे अध्यात्मज्ञानाची, राजकारणाची व सर्व गोष्टी-विषयी सावधपण म्हणजे जागरूकता ठेवण्याची आवश्यकता सांगितली आहे. अशा ह्या प्रापंचिका समोर ध्येय काय असाव ?

"आवघेचि सुखी असावे । ऐसी वासना"

ह्या करिता मनाची तयारी कशी पाहिजे ?

दुसऱ्याच्या दुःख दुःखवावे । परसंतोषे सुखी व्हावे
"प्राणिमात्रास मेळवून घ्यावे । बऱ्या शब्दे"

आवघेचि सुखी असावे ही ज्याची वासना ती यान नुसती मनात बाळगून सिद्धीस जाणार नाही. 'ये उंबरा पड तोंडा' म्हटल्यान उंबर तोंडात पडत नाही. नुसती व्याख्यान देऊनही सिद्धीस जाणार नाही. तर

"बोलण्या सारिखे चालणे । स्वतः करून बोलणे"
"कष्टेंविण फळ नाही । कष्टेंविण राज्य नाही"
"केल्याविण होत नाही । साध्यजनी"
"शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे"
"उणे पडो ने द्यावे । कोणीयेकाचे"

अशा रीतीने जे वागतील त्यांची अर्थातच कीर्ति होणार. ज्यानी अस काही परोपकारी काम केल नाही त्यांच्या संबंधी समर्थ म्हणतात.

"कीर्ति करून नाही मेले । ते उगेच आले आणि गेले"

* ज्या देशात कीर्ति करून मरणारे नागरीक असतात *
| त्या देशाचा काल नेहमीच उज्वल राहील हे काय |
* सांगायला पाहिजे. *

——×——

# आमचे निवेदन



कु. मालती देशमुख



कु. शांता देशमुख

# —: आमचे निवेदन :—

"लेखकाचे अगदी जवळून दर्शन झाले नाही" अशी टीका कालसमुद्रांतील रत्नें रत्नकरंडक १ ला ह्यावर झाली म्हणून भाऊजींनी "मी" ही मंजुषा दुसऱ्या करंडकाच्या शेवटी लिहीली. मंजुषेच्या शेवटच्या ओळींत ते म्हणतात "ह्यावरुन लेखकाचे अंतरंग कसे आहे, स्वभाव विकास कसा होत गेला व स्वभाव वैशिष्ट्य काय आहे ह्याचा अंदाज बांधता यावा असे वाटते." विविधवृत्तानेही पहिल्या करंडकाचे परीक्षण करतांना म्हटले आहे की "संबंध पुस्तकांत प्रकाशाचा झोत स्वतः वरच केंद्रित न करतां शक्यतो इतरांना प्रकाशांत आणण्याचेच धोरण स्वीकारलेले दिसते." दुसऱ्या करंडकातील "मी" प्रकरणावरुन त्यांचे अंतरंग, स्वभावाचा क्रमशः विकास व स्वभाव वैशिष्ट्य यांची पुरेपूर ओळख वाचकांना पटली नसेल म्हणुनच ह्या निवेदनाची आवश्यकता आम्हाला भासली व आपल्या निवेदनांत प्रकाशाचा झोत त्यांच्यावर केंद्रित करावा असे वाटले.

ह्या ग्रंथाच्या शेवटी आम्ही लुडबुड करावी म्हणजे लहान तोंडी मोठा घांस घेणेच आहे. पण ज्याप्रमाणें लहान मुलाला एखादी गोष्ट करू नको असे म्हटल्यानंतरही तो हट्टास पेटून करतो त्याचप्रमाणें आम्हाला लिहिण्यास आडकाठी घेतली तरी ती आम्ही जुमानली नाहीं. आमच्या वहिनींचे नेहमीचे ठरलेले वाक्य, "तुम्ही दोघी भाऊजींना मुळींच घाबरत नाहीं." त्यांच्या लहानपणी भाऊजींचा स्वभाव फारच कडक असल्यामुळें स्वानुभवाने त्या सांगतात कीं त्यांच्यावर भाऊजी फार चिडत असत व त्यांना कधी कधी चौदावे रत्नही मिळत असे.

मनुष्याच्या स्वभावांत किती भयंकर परिवर्तन घडुन येऊ शकते हे भाऊजींच्या संबंधी ज्या अनेक गोष्टी सौ. आई किंवा बहिणींकडून सांगण्यांत येतात त्यावरुन पटते.

भाऊजी लहानपणी फारच अबोल होते. ते अजुनही त्यांचा विद्यार्थी दशेंतील जो दिनक्रम सांगतात तो एखाद्या आदर्श विद्यार्थ्याला शोभण्यासारखाच होता. सकाळी ४-४॥ वाजतां उठणें, नंतर तोंड धुवुन आखाड्यांत जाणें, व्यायाम झाल्यानंतर दूध घेऊन स्नान करणें व ९॥ पर्यंत अभ्यास व जेवण करणें. नंतर शाळेंत जाणें, संध्याकाळीं शाळेंतून परतल्यावर थोडा वेळ शिक्षकांनी घेतलेल्या पाठांची उजळणी करून पुनः फुटबॉल खेळावयास जाणें. घरीं आल्यावर जेवण व झोंप लहानपण पासुनच जणुं कांहीं भाऊजींना त्या इंग्लीश उक्तीचे ‘ Early to bed and early to rise, makes a man healthy; wealthy and wise ’ ( लवकर निजे, लवकर उठे, त्यास आरोग्य धनसंपदा लाभे ) महत्व पटले होते त्यांच्या या लवकर झोंपण्यामुळें त्यांची आई म्हणत असे “ कावळ्या चिमणीचे डोळे मिटले. ” कॉलेजमधे गेल्यानंतरही त्यांचा दिनक्रम हाच होता. फक्त फुटबॉल खेळण्याऐवजी दांडपट्टा, लाठीकाठी, गदगाफरी वगैरे शिकण्यांत व करण्यांत ते वेळ घालवित असत. हल्लीचा कोणता विद्यार्थी अशारीतीनें आपले विद्यार्थीजीवन व्यतित करतो ?

एकंदरीत काय तर लहानपणापासून भाऊजींना बोलावयास मुळींच आवडत नव्हते. किंबहुना त्यांचा तो स्वभावधर्मच नव्हता म्हणाना ! आपण बरे, शाळा बरी व आखाडा बरा !!! पण आतां ? स्वप्नांत सुद्धां ही गोष्ट खरी वाटणार नाहीं. आम्हीं कांहीही पुढें लिहीण्याच्या आधी वाचकच म्हणतील कीं छट् ! यांतील कांहीही खरे नाहीं. ज्यांना आपल्या कार्याचा इतिहास द्यावयाला तीन खंड लिहावे लागले तो मनुष्य अबोल ! कांही तरी वेडच लागलं आहे ह्या मुलींना !! लहानपणी भाऊजी खरोखरच अबोल होते. त्याच्या आईला सतत वाटे कीं हा मुलगा बोलत

नाहीं तर बॅरीस्टरी कसा करेल ? ती १९१० मध्ये वारली. त्या माऊलीने जर १९२० नंतर भाऊजींना बोलतांना ऐकले असते तर ती आश्चर्याने थक्क झाली असती. १९२० पासुन भाऊजींच्या भाषणाचा जो प्रवाह सुरू झाला तो गंगौघाप्रमाणें अव्याहत चालु आहे. कोणत्याही विषयावर, कोणाबरोबरही—विद्यार्थ्यांपासून तर विद्वांनापर्यंत; खेडुतापासून शहरवासीयापर्यंत—बोलण्यास ते सतत तयार असतात. ह्या वयांतही आरोग्याला अतिशय हितावह असा व्यायाम-नेमाने फिरावयाला जाणें-तो सुद्धां भाऊजी जर कुणी बोलावयास असले तर टाळतात.

कित्ती एक पालक असें असतात की त्यांना आपल्या लहान मुलांशी काय बोलावे हेच समजत नाहीं. परंतु भाऊजी ह्या सर्वांहून अगदीं वेगळे ! आम्ही लहान वर्गांत होतो तरी शक्य तितके भाऊजी आमच्याशी बोलत असत. सकाळी व दुपारी चहाच्या वेळेला सहज एक तास गप्पा व जेवावयाच्या वेळेला तर ठरलेल्याच. गप्पा म्हणजे वायफळ बडबड नव्हे तर ह्याच गप्पांमधुन विविध विषयांचे ज्ञान व आवड भाऊजींनी आमच्यांत उत्पन्न केली आहे. येथे एकदम "काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्" ह्या सुभाषिताची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. दशांतील घडामोडी पासून तो तहत निरनिराळ्या कलांवर भाऊजी सतत टेबलापाशी बोलत असतात. त्यांनी आमच्यांत घेतलेल्या Interest मुळेंच चित्रकला, संगीत, फोटोग्राफी व इतर विविध गोष्टींकडे आम्ही लक्ष देऊं शकलो शाळेंत Botany (वनस्पतिशास्त्र) चा अभ्यास आवश्यक आहे असं तें म्हणत असत. त्यामुळें बगिच्यांत काम करण्याची आवड माणसांत उत्पन्न होते व मनुष्य निरनिराळे प्रयोगही करू लागतो. स्वत: भाऊजींना बगिच्यांत काम करणे फार आवडे. बगिच्याची सर्व अवजारे त्यांनी आणवलीत. ते स्वत; मेंदी, व झाडे कापणें; झाडावर डोळे बांधणे वगैरे आवडीने करीत असत व आतांही वयोमानाप्रमाणें जे जमेल ते करीत असतात. आप्पाजींनी (आमचे काका, मुंबईचे डॉ. देशमुख) पेडर रोडवर (मुंबईला) बंगला

घेतला. आप्पाजींनी हा बंगला विकत घेण्याच्या आधी त्या बंगल्यात एक पारशी भाडेकरी रहात होता. त्याला मनापासून वाटत होते कीं तो बंगला विकल्या जाऊं नये. दुर्दैव त्याच ! बंगला विकल्या गेला. पण त्याने अखेरीस दावा साधलाच ! बंगला तर बरोबर नेता येत नव्हताच. तर त्याने झाडून सगळी झाडे, कुंड्या वगैरे बरोबर नेलीत व आवार भकास करुन ठेवले. आप्पाजी दुसऱ्या दिवशी जातात तो काय ? देखावा पाहून त्यांना फारच वाईट वाटले. पारशाचा संतापही आला पण उपयोग काय ? आतां बंगल्याला शोभा आणावयाची कशी ही चिंता लागली ! भाऊजी त्यावेळेला मुंबईलाच होते त्यांनी नर्सरीतून मोठमोठी झाडे (सात, सात, आठ, आठ फूट उंचीची) आणवून एका रात्रींतून बगिचा उभारला. जणुं अल्लाउद्दीनचा दिवाच भाऊजींजवळ होता. शेजारचे श्री. चंदावरकर आप्पाजींना म्हणावयास लागले कीं ही किमया झाली तरी कशी ? तेव्हां आप्पाजी मोठ्या अभिमानाने म्हणाले, "तुम्ही काय समजलांत ? आम्ही शेतकरी आहोत !"

खरोखर सर्व शेतकरी हे अवघड काम करू शकतील की नाहीं हा प्रश्नच आहे. पण भाऊजींनी आम्हाला हा प्रसंग सांगण्याचा उद्देश हा की प्रत्येकाने Hobbies हस्तगत करण्याचा प्रयत्न करावा. त्यांचा पुरेपूर अभ्यास करणे अत्यावश्यक आहे व म्हणुनच बगिचांत जर प्रयोग करावयाचे असतील तर वनस्पतिशास्त्राचा अभ्यास आपण केला पाहीजे.

शाळेच्या अभ्यासाशिवाय व्यायामावर भाऊजींचा जोर आहे व तो कां हे ज्यांचे ज्यांनी तीनही खंड वाचले असतील त्यांना निराळे सांगणे नकोच. मुलींना स्वावलंबी बनण्यास विद्येची जितकी आवश्यकता तितकीच शारिरिक बलाची हे त्यांचे ठाम मत ! आम्हा सर्व बहिणींना लाठी, काठी, बंधाटी, जंबिया, माड्रू, वगैरे शिकविण्यास त्यांनी शिक्षक ठेविले होते. सौ. विमलने ( आमची मोठी बहीण ) व नंतर आमच्या घरीं ( सिन्हील लाईन मधील ) भरलेल्या स्वदेशीप्रदर्शनांत व ( ह्या संबंधाचे विस्तृत वर्णन का. र. क. २ रा पान ) इतर प्रदर्शनांतही प्रात्याक्षिके करून दाखविलीत.



सौ. बकुल चावजी



सौ. सरल कोरटकर

स्वदेशी लीगच्या व वसंत गौरीच्या प्रदर्शनांत लाठी, काठी, मल्लु
व जंबिया यांची प्रात्यक्षिके करून दाखविणाऱ्या

## —: आमच्या भगिनी :—



सौ. विमल देशमुख



कै. कु. तारा देशमुख

मुलींना First Aid ( तात्कालीक उपचार ) करतां यावेत असं भाऊजींचं ठाम मत ! ह्या त्यांच्या मतामुळेच आम्ही First Aid चे The st John Ambulance Association चे सर्टिफिकेटस् मिळविलेत. ह्या संबंधीची एक गोष्ट उल्लेखनीय वाटते ती अशी– १५ ऑगष्ट १९४७ चा क्रांतिकारक दिवस ! सर्व शाळा. कॉलेजांतील विद्यार्थ्यांना कस्तुरचंद पार्क मधे जमावयाचे होते. राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रम होणार होते. पहिला स्वातंत्र्यदिन ! आपण स्वतंत्र झालो ह्या भावनेमुळेच उत्साह द्विगुणित झाला होता. पूर्वी कधीही न अनुभविलेल्या अशा आनंदात आम्ही सकाळीं कस्तुरचंद पार्कमधे गेलों. कार्यक्रम पार पडता पडता दुपारचे बारा वाजलेत. व तरीही आम्ही जणु उत्साह ओसंडत होता की काय म्हणुन पायींच घरीं येत होतो. अगदीं घराजवळच्या चौरस्त्यावर एक मुलगी चक्कर येऊन पडली होती. तिचे हातपाय खरचटल्यामुळें त्यांतून रक्त येत होते. आमच्या पैकीं एकीनें ( शांताने )'घरीं जाऊन पाणी, डेटॉल, आयडोन, कापूस व बँडेज आणले. एकीने तोंडावर पाणी शिंपून तिला शुद्धीवर आणले व दुसरीने तिच्या जखमा बांधल्या. नंतर दोघींनी तिला धरून घरीं आणले. दूध बिस्कीटे व केळं खावयास दिलीत. थोड्या वेळाने तिला घरीं पोहोचते केले.

विद्यार्थ्यांना एखाद्या कार्यक्रमास हजर राहण्यास भाग पाडून त्यांना तीन, तीन, चार, चार, तास उन्हात ताटकळत ठेवणें कार्यक्रमाच्या व्यवस्थापकास शोभत नाहीं असे म्हणणे भाग आहे. कदाचित् कार्यक्रमाच्या व्यवस्थापकाचा हा दोष नसून ज्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होतात त्यांचाही दोष असूं शकतो. कोणाच्याही मुळें कां असेना पण कार्यक्रम वक्तशीर व आटोपशीर झाल्यास तो कंटाळवाणा व विद्यार्थ्यांना थकवा आणणारा होणार नाही. निदान विद्यार्थिनींना जेव्हां कार्यक्रमाला हजर राहणें भाग पडते तेव्हां त्यांना उन्हापासून त्रास होणार नाहीं व लांब लांबच्या मुलींना बसेसमधून पोंचविता येईल अशी तरी व्यवस्था करावयाला पाहिजे हे सांगितल्यावाचून राहावत नाहीं.

वरील प्रसंगामुळें तर आमचेही असें ठाम मत झाले कीं खरोखर First Aid प्रथमोपचाराचे ज्ञान सर्वांनी संपादन करावे भाऊजी तर प्रवासांत व घरीही सतत महत्वाच्या औषधी ठेवतात. प्रवासांतील असे अनेक प्रसंग ते सांगतात कीं जेव्हां त्यांच्या जवळच्या औषधींचा फायदा इतरांना झाला.

भाऊजींनीं संगीत, चित्रकला आदि कलांची आमच्यांत लहानपणा-पासून आवड निर्माण केली इटलींतनून शिक्षण घेऊन आलेले कै. श्री. कोठारे यांच्यासारख्या निष्ठावंत कलाकाराचे थोडे दिवसच कां होईना आम्हाला मार्गदर्शन झाले. गुरुजींचे तत्वच हे कीं हातांत ब्रश घेऊन विद्यार्थ्याला शिकवायचे नाहीं. त्यांनी नुसते विद्यार्थ्याजवळ उभे राहून त्याच्या चुकांची दुरूस्ती त्यालाच करावयाला लावित लावित त्याला चित्रकलेंत तरबेज करावयाचे. आमच्या तरी पहाण्यांत अजुन असा दुसरा शिक्षक आला नाहीं. भाऊजींना चित्र काढता जरी येत नसले तरी ते उत्तम टीकाकार आहेत. त्यांनीही अनेक वेळा आमच्या चुका दाखवून आम्हाला मार्गदर्शन केले आहे. भाऊजींना चित्रकला अवगत नसली तरी तिची आवड आहे पण वादनाच्या बाबतींत निव्वळ आवडच नाहीं तर सतार वाजवावयास येते. त्यांचा संगीताचा अभ्यास गवयां इतका दांडगा नसला तरी बराच आहे व म्हणूनच आम्हा बहिणीं नाही संगीताची तोंडओळख करून दिली.

वरील उच्चकलांबरोबरच जर माणसाला साधे व्यवहारिक ज्ञान नसले तर कशा फजितो होण्याची वेळ येते हे स्वतःसंबंधी एक गंमतीदार उदाहरण देऊन भाऊजी सांगत असतात एकदां काय झाले कीं भाऊजी एकटेच नागपूरला होते. घरीं स्वयंपाकाला एक परदेशी स्वयंपाकी ठेवला होता. रोज जेवतांना भाऊजींना पानांत वरण मळकट दिसे. त्यांना समजेना कीं एरवीं वरण पिवळे व आता मळकट कां ? शहरांत आपल्या चुलत बहिणीजवळ चौकशी केल्यावर (कारण घरची बायामंडळी परगांवी होती) कळले कीं वरण शिजताना त्यांत हळद टाकतात व म्हणून ते

पित्रळे दिसते. एवढीशी क्षुल्लक गोष्ट माहित नसल्यामुळें आपली कशी फजिती झाली हे ते सर्वांना सांगतात. त्यांचे म्हणणें कीं मुलांना व मुलींना स्वयंपाक करता आला पाहिजे. मनुष्यावर स्वयंपाक करण्याची पाळी येवो न येवो त्याला माहिती असली तर तो इतरांना तशा सूचना तरी देऊं शकतो. ह्या संबंधी ते उदाहरणही देतात. ते एकदा हिंदुसभेच्या कामा-करितां राजे लक्ष्मणराव भोंसले यांच्याबरोबर जळगांवला गेले होते. राजेसाहेबांना स्वयंपाकयाला पपईचा मुरब्बा करण्याची कृति सांगत असतांना भाऊजींनी स्वतः पाहिले आणखी एका मोठया व्यक्तीच त्यांनी उदाहरण आम्हाला सांगितल. कै. सर गिरजाशंकर बाजपै ह्यांनी श्री. मोहनलाल सकसेना, कॉंग्रेस पार्टीचे असेंब्लीचे सभासद, ह्यांना भाऊजींना जेवणाचे निमंत्रण देण्यास पाठविले. भाऊजी त्यांच्याकडे जेवायला गेलेत केलेल्या पदार्थांत भाऊजींना सूत गुंडाळलेले सबंध कारले वाढण्यांत आले. अर्थात खातांना ते सूत काढून बाजुला ठेवले तो काय ! ते कारले पोखरून त्यांत मसाला भरलेला आढळला. त्याची चव अत्यंत उत्तम. कडू कारले व चव उत्तम किती दोन विरोधी गोष्टी !! पण वस्तुस्थिति तशी होती. भाऊजींनी त्या मसाल्याच्या कारल्याची तारीफ केली तेव्हा बाजपै म्हणालेत, "मींच बनविले. मला मी विद्यार्थी होतो तेव्हांपासून स्वयंपाक करण्याची संवय आहे." आजकालच्या मुलांना विचारा बरे ! आम्हाला अमुक एक पदार्थ बनविता येतो असे सांगावयाची लाज वाटते. स्वयंपाक नां ? तो मुलींनीच करावा. त्यांना कांही एक त्यांतील कळत नाहीं असं सांगण्यांतच ते प्रौढी मिरवतात. माझ्या चुलतभावांना भाऊजींनी Scouting join करावयास लावले व त्याच-बरोबर त्यांना स्वयंपाक शिकावयास लावून त्यांची परीक्षा घेतलीं. हल्ली ते दोघेजण इंग्लंडमधे आहेत. व त्यांतील एकाला तर उत्तम स्वयपाक हिंदुस्थानांतच असतांना करतां येत होता. तेव्हां इंग्लंडमध्यें वास्तव्य करून राहिला असतांना अधुन मधुन तो आपल्या आवडीचे तिथे न मिळणारे पदार्थ घरीं तयार करतो. वेळ येते तेव्हां पडतेच कीं नाहीं त्याचे ज्ञान त्याच्या उपयोगी !

आम्हा बहिणींचा जो सर्वांगीण विकास होऊं शकला त्याचे सर्व श्रेय भाऊजी व सौ. आई यांना देणेंच योग्य ठरेल. अभ्यासाप्रमाणेच प्रवासाने "मनुजा चातुर्य येतसे फार" असे भाऊजी स्वानुभवाने सांगत असतात. त्यांच्या तीनही खंडावरून त्यांनी केलेल्या प्रवासाची कल्पना वाचकांना आलीच असेल. मुलींनीही आपल्याप्रमाणे भारतांतच का होईना पण थोडासा प्रवास करावा म्हणुन त्यांनी आमच्या शाळेच्या (सेंट अर्सुला मुलींची शाळा) मुख्याध्यापिका मिस. ए. जे. एम. शिरस यांना पत्र पाठविले. मुख्याध्यापिकेने पाठविलेल्या उत्तरातील थोडासा उतारा देणें इष्ट वाटते म्हणून देत आहोत.

Nagpur
22 nd January 1938

XXX I am in receipt of your letter of to-day's date. I am glad to hear you are planning to take Leela, Malti, Tara and Shanta to see Delhi, Agra and Fatepursikri. That will widen their outlook on life and is an education in itself. If they are not away more than a fortnight I think what they will gain from such a journey will go a long way in making up for what they will miss in school.

मुली शाळेंत गैरहजर राहिल्या तरी त्यांच्या ज्ञानांत भर पडेल हे जाणून आम्हाला पंधरा दिवसांची सुट्टी मिळाली. ज्ञान संपादन करण्याचा हो विशाल दृष्टी स्वतंत्र भारतांत प्रत्येक शिक्षणसंस्थेनें लक्षांत ठेवावयास पाहीजे. आम्हो दिल्ली, आग्रा, फत्तेपूरसिक्री, मथुरा, वृंदावन वगैरे शहरे पाहिलींत. त्यामुळेंच 'इतिहास' या विषयांत गोडी वाटुं लागली. व त्या विषयाचा आम्ही दोघींनी बी. ए. पर्यंत अभ्यास केला. १९४५ मध्ये आम्ही कॉलेजांत शिकत असतांना पुनः एकदा दिल्लीला चक्कर मारून आलो. आमच्याकरीता भाऊजींनी वेळ व पैसा सारखाच खर्च केला पैसा

खर्च करण्याच्या बाबतींत भाऊजींचा हात कोणी धरू शकणार नाहीं. भाऊ-जींनी लिहीलेले तीनही खंड वाचल्यावर वाचकांच्या सुद्धां हे लक्षांत झाले असेलचगुण (किंवा कांहींच्या मते दुर्गुण) मला वाटते आमच्यांतही बराचसा उतरला आहे. १९२० मध्ये असहकारितेच्या कालांत नेहमीकरितां प्रॅक्टीस सोडून, आमच्या मतें अत्यंत थोर असा स्वार्थत्याग त्यांनी केला. व तदनंतरही पूर्वीप्रमाणें उत्पन्न राहाणार नाही याची खात्री असतां-नाही त्यांनी हात अखडुन पैसा खर्च केला नाहीं. सिव्हील लाईनच्या आमच्या नबाबी बंगल्यात थाटही कांही औरच होता. तो बंगला सोडला तेव्हा आम्ही फारच लहान—७ ८ वर्षांच्या होतो. त्या बंगल्यातील घडामोडी जेव्हां आम्ही ऐकतो तेव्हा ते एक ऐतिहासिक सत्यच वाटते. दुसऱ्या करंडकाला लिहिलेल्या पुरस्कारांत श्री. बाबासाहेब खापर्डे लिहितात "त्या काळी राजकीय चळवळीचें व बैठकीचे भाऊजींचा सिव्हील लाईन्स मधला बंगला हे माहेरघर होते." त्या सर्व घडामोडी जर भाऊजींनी आपल्या पुस्तकांत नमुद केल्या असत्या तर कै. ओगलेंच्या म्हणण्याप्रमाणें १०००–१५०० पानांचे पुस्तक सहज झाले असते.

आम्ही लहानांचे मोठे झालो तेव्हां भाऊजींना अनेक आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागले असेल पण त्याची झळ त्यांनी आम्हाला कधीच लागु दिली नाहीं. म्हणुनही कदाचित् त्यांचा तो गुण आमच्यांत उतरला असेल. स्वतः भाऊजींनी त्यांनी केलेल्या स्वार्थत्यागाचा कधीच उल्लेख केलेला नाही. बरे! प्रॅक्टीस सोडल्यामुळें असंख्य आर्थिक अडचणींतुन जावे लागले तरी त्यांना त्याबद्दल कधी पश्चाताप झाला नाहीं. त्याच पुरस्कारांत बाबासाहेब खापर्डे म्हणतात. "इतराप्रमाणे विचार स्वातंत्र्याचे व स्वाभिमानाचें गाठोडे त्यांनी स्वार्थाच्या खुन्टीस अडकविले असते तर त्यांच्याही पदरी भोपळा ना आवळा कांही तरी आलेंच असते. देशाच्या गरजेकडे पाहून त्यांनी मायभूमीच्या हाकेला ओ दिली व मला वाटते स्वतःच्या मूळ स्वभावाला थोडी संयमाने मुरड घालून आत्यंतिक स्वार्थत्याग करुन दाखविला. आणि हें सर्व ढोल पिटऱ्या वाचून व

गाजावाजा केल्यावाचून केलें. विषम स्थितींत आनंद मानला पण मन मळूं दिले नाहीं. ”

त्यांच्या तीनही खंडावरून वाचकांना दिसून येईल की राजकारणांत उडी घेतल्यानंतर इतक्या विविध क्षेत्रांत त्यांनी काम केले कीं ज्यामुळें समाजाचा व देशाचा फायदा झाला. भाऊजी व आप्पाजी दोघा बंधुनी जणु स्त्रियांचे अनेक प्रश्न सोडविण्याचा विडाच उचलला होता असे दिसते. समाजांतील ज्या अनेक गोष्टींचा भाऊजींच्या मनावर परीणाम झाला अशा पैकी दोन, तीन इथे नमूद कराव्याशा वाटतात. भाऊजींना त्यांचा उल्लेख आपल्या लेखनांत केलेला नाहीं.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत नॅशनल वीक ( जालियनवाला बाग फायरींगच्या स्मरणार्थ ) पाळल्या जात असे. त्या आठवड्यांत शहरांत दंगाधोपा न होउ देण्याचे व शांतता राखण्याचे काम भाऊजीकडे असे. एक दिवस भाऊजी बर्डीवरील राजाराम लायब्ररी समोरील टांगा स्टँड वरुन घरच्या टांग्यांत बसुन येत होते. तेथे त्यांना खुप मोठा जमाव दिसला. “ क्या चला है, क्या चला है ” असे दटावून विचारीत विचारीत भाऊजी गर्दीत घुसलेत. अंगात हिंमत असल्यामुळें ( मस्त झालेल्या घोडयांना सुद्धां भाऊजी न कचरतां वठणीवर आणित व ह्याकरीता त्याची नागपूरांत प्रसिद्धी होती. त्यांच्या कोणाही मित्राने घोडा सरळ मार्गावर आणण्याकरितां म्हणुन भाऊजींकडे पाठवावा व ते काम भाऊजींनी फत्ते केलेच म्हणुन समजावे. ) कसाही प्रसंग आला तरी भाऊजी कचरत नाहींत. गर्दीत घुसल्यानंतर भाऊजींना काय दिसले ? एक हिंदु मनुष्य आपल्या बायकोला वाटेल तसे मारीत होता, व बाकीचे तमासगीर तो तमाशा बघत होते. जणु कांहीं अस्वल किंवा माकडाचा खेळच ! भाऊजी गर्दीत घुसल्या बरोबर जवळच टांगा स्टँड-वर उभा असलेल्या पैकीं एक मुसलमान टांगेवालाही घुसला. तो त्या माणसाला खूप मारावयास लागला. व तोंडाने शिव्या देऊ लागला “ साला अपने औरतको पिटता है ? ” भाऊजींनी जोराने दरडावल्यावर

सगळी गर्दी पांगली व त्या नवरा बायकोला टांग्यांत बसवून आमच्या घरी आणले आमच्या घरच्या सर्व नोकरांनी त्यांना समजावले व ती दोघेजण आपल्या घरी निघून गेलीत. हे भांडण तर मिटले पण याचा परीणाम भाऊजींच्या मनावर फार खोल झाला. हिंदु समाजाचा स्त्रियांकडे पहाण्याचा दृष्टीकोण कोणता ? नवऱ्याने बायकोला चव्हाटयावर आणावे व बेदम मारावे ! बाकीच्यांनी तिचे हाल मजेत पहावे! एखाद्या जनावराप्रमाणें तिला बागविण्यांत यावे !

यवतमाळ जिल्ह्यांतील एक श्रीमंत गृहस्थ आपल्या पत्नीला घेऊन मुंबईला आप्पाजींकडे गेला. त्याच्या पत्नीला क्षय झाला होता. आप्पाजींनी त्याला त्याच्या पत्नीला पंचगणीला सनिटोरियममधें वर्ष दीड वर्ष ठेवण्याचा सल्ला दिला. त्याबरोबर तो म्हणाला " डॉक्टर. काय खर्च येईल ? " आप्पाजी म्हणालेत, "येईल ४–५ हजार रुपये " त्यावर तो उदगारला ' अबब ! एवढा काढी ! " त्याच्या ह्या बोलण्याने आप्पाजी खुप चिडलेत व म्हणालेत, " कशाला करता एवढा खर्च ? त्या पैशांत नविन् बायको मिळेल व कदाचित् वर हुंडाही. " मघाचा बायकोला मारणारा अशिक्षित मनुष्य व हा श्रीमंत सुशिक्षित गृहस्थ दोघेही एकाच माळेतील !

एकदां नागपूरहुन भाऊजी मुंबईला जात होते. तेव्हां आगगाडींत बोलतां बोलतां एका गृहस्थाने भाऊजींना म्हटले. " मला आपल्याला एक सल्ला विचारावयाची आहे. माझी एक बहीण ५–६ वर्षापासून परित्यक्ता आहे. तिने पैसे मिळवून पोट भरण्याकरितां म्हणुन नागपूरच्या मेयो हॉस्पिटलमधें नर्सिंगचा कोर्स घेतला. शिक्षण झाल्यावर ती हॅस्पिटल-मधेंच नर्स म्हणुन काम करू लागली. आतां तिची परिस्थिती बदलली. तिला पैसे मिळु लागले होते. तिचे पैसे आपल्याला मिळावे ह्या स्वार्थी हेतूने तिच्या पतिने, तिच्या बहिणीला व हॉस्पिटलच्या मेट्रनला नोटिस दिली की त्याच्या पत्नीचा कब्जा त्याला घ्यावयाचा आहे आम्हाला आता प्रश्न पडला. कीं काय करावे ?" त्याची हकिकत ऐकुन घेतल्यावर

भाऊजींनी त्याला सल्ला दिला की नर्सने तिचा शारीरिक छळ होतो व त्याच्या वागणुकीनें मनस्ताप होतो ह्या मुद्यावर स्वतःचा बचाव करावा.

वरच्या दोन चित्रांपेक्षा हे एक वेगळेच चित्र. पैशाची हांव सुटेना म्हणुन टाकून दिलेल्या बायकोचा कब्जा घेणारा हा मनुष्य ! हिंदुसमाजांत स्त्रीने आपल्या पोटापाण्याचा प्रश्न जरी सोडविला तरी समाजांत तिचा दर्जा कोणता ? पूर्वीप्रमाणें बायकोला मारण्याची पशुवृत्ति जरी आतां बारंवार समाजांत दिमत नसली तरी वरील उदाहरणांवरून निरनिराळ्या मार्गाने स्त्रीयांना कोणता ना कोणता तरी त्रास होतोच हे स्पष्ट होते.

त्यांना ( स्त्रीयांना ) समाजांत मानाचा दर्जा मिळावा, त्यांच्या उन्नतिच्या मार्गावरील अनेक अडचणी दूर व्हाव्यात म्हणुन भाऊजींनी व आप्पाजीनीही अनेक प्रयत्न केलेत. त्यांचा उल्लेख भाऊजींनी आपल्या तीन खंडात केलेला आहेच.

कोणतेही काम करीत असतांना भाऊजी अमुक एका पक्षाचे जरी गणल्या जात होते तरी इतर पक्षांतील लोकांना ते हवेसे वाटत. ते सर्वांशी मिळुन मिसळुन वागत असत. परंतु हे त्यांचे मित्र कै. बॅ. अभ्यंकर किंवा कै. डॉ. मुंजे यांना जमत नसे. १९३५ च्या असेंब्लीच्या निवडणुकीचे वेळी कै. बॅ. अभ्यंकर व डॉ. खरे आमच्या आमच्या सिव्हील लाईन मधील बंगल्यावर भाऊजींकडे आलेत. अभ्यंकर भाऊजींना मध्यवर्ति असेंब्लीकरितां कांग्रेसतर्फे उभे राहण्याचा आग्रह करु लागले. भाऊजींनी त्याना सांगितल की ते उभे राहु इच्छीत नाहीत. कम्युनल अवार्ड विरुद्ध भाऊजी असल्यामुळे भाऊजी उभे राहत नसावेत असे अभ्यंकरांना वाटले म्हणुन ते भाऊजींना म्हणालेत, " मी तुला कम्युनल अवॉर्डवर मत देण्यासंबंधी गांधीजींना जी मोकळीक बापुजी अणे यांना दिली ती देववून देतो. " पण भाऊजी या गोष्टीस राजी झाले नाहीत. डॉक्टर मुंजे याना ही गोष्ट कळली असावी कारण त्यांनी निरोप पाठविला की भाऊजी उभे रहात असतील तर ते उभे रहाणार

अनुक्रम २०९

नाहींत. कारण त्यांना माहित होत, भाऊजी कम्युनल अवॉर्डच्या विरुद्ध आहेत म्हणुन. पण त्यांनाही भाऊजींनी आरोप पाठविली "मी उभा रहात नाहीं. ह्यावेळेस असेंब्लीत जाण्याची माझी इच्छाच नाही." नंतर १९३७ साली भाऊजी मध्यवर्ति असेंब्ली करितां उभे राहिले व ते निवडल्या गेले. कम्युनल अवॉर्ड वरील व्होटींग यापूर्वीच होऊन गेल होत.

आमच्या घरीं ही सर्वच मंडळी जेवावयास येत असत. ती सर्व भाऊजींशी बोलत पण डॉ. खरे व कै. बॅ. अभ्यंकर डॉ. मुंजेशी बोलत व डॉ. मुंजे त्यांच्याशी. राजकारणांत पडुनही काम करतांना इतरांना विरोध केला तरी तो कोणत्या मर्यादेपर्यंत जाऊ द्यावा व लगेच तो मतभेद विसरून एरवी मित्र, मित्र ह्या नात्याने कसे वागावे हे भाऊजींना चांगले जमत असे.सर्वांनाच ही कला साधणार नाहीं. मनाचा मोठेपणा भाऊजींमधे फार दिसुन येतो क्षुल्लक गोष्टींना त्यांनो कधींच महत्व दिले नाहीं. एखादी गोष्ट आपण करूनही जरी दुसऱ्याला त्याचे श्रेय जात असले तरी त्याचा भाऊजींना कधीच खंत वाटला नाहीं. अमुक एक बिल पास होते आहे नां, समाजाला त्याचा फायदा होतो आहे नां—मग ते कुणाच्या का हातून पास होईना त्याची भाऊजींना पर्वा नहीं. अशी साधुपुरुषाची वृत्ति भाऊजींच्या ठिकाणी दिसुन येते. अनेकवेळा आप्पाजींचे नांव भाऊजींच्या ऐवजी वर्तमानपत्रांत छापलेल्या गेले आहे. असेंब्लीचे सभासद बाबू बजारिया शेठजी यांनी असेंब्लीत भाषण करताना म्हटल "काम करतो मिस्टर देशमुख व नांव होत डॉ. देशमुखच." पण ह्या त्यांच्या उद्गारामुळें भाऊजींच्या साधुवृत्ति मधे फरक झाला असें वाटतें कां ? मुळींच नाहीं. भाऊजींची वृत्ति सदोदीत आनंदीत. पक्के आशावादी आहेत ते. त्यांच्या सतत उलहसित वृत्तिवरून कुणालाही शंका येणार नाहीं कीं अनेक अडचणी त्यांच्यासमोर "आ" वासून उभ्या आहेत. ह्या ठिकाणी शाळेंत वाचलेल्या एका कवितेची आठवण आल्यावाचून रहात नाहीं. ती कविता अशीः—

It is easy enough to be pleasant,
When life flows by like a song,
But a man is worth a while
When he will smile,
When every thing goes wrong.
For the test of Heart is trouble,
And always comes with years,
And the Smile that is worth the praises
on Earth
Is the smile that shines through Tears

अभ्यासु वृत्ति जागृत ठेऊन ते उद्योग करीत असतात. व आम्हालाही करावयास लावतात. एखाद्या कलाकाराने आपली कृति निर्माण करण्यास जेवढे परीश्रम घ्यावेत तेवढे भाऊजी व सौ. आई आमच्या बाबतींत घेत असतात. भाऊजी व सौ. आई म्हणजे पाश्चिमात्य व पौर्वात्य संस्कृतिचा झालेला सुरेख संगम ! शिक्षणामुळें व देशपर्यटनामुळें भाऊजींची जी विशालदृष्टी दिसुन येते, तिची छटा सौ. आईच्या ठिकाणीही दिसून येते. भाऊजींच्या सान्निध्यामुळें तिचे विचार प्रगलभ झाले. ज्याप्रमाणें भाऊजा सनातनी नाहींत त्याचप्रमाणें तिचेही विचार पुढारलेले आहेत. ती भाऊजींशी प्रत्येक बाबतींत सहमत असल्यामुळें नविन पद्धतिची रहाणी व आचार विचार आमच्या घरात चटकन् रुळल्या गेलेत. जे चांगले असेल ते आत्मसात् करावयाचे. मग ते पाश्चिमात्यांचे कां असेना. भाऊजींनी जितकी घराबाहेर समाजसेवा, देशसेवा केली तितकीच सौ. आईने घरांत राहून केली. अनेक देशभक्त, पुढारी आमच्याकडे येऊन रहात असत. त्यांची व्यवस्था ठेवणें, कित्येकांना औषधपाणी देणें ही तिची नित्याची कामे होत. उत्तम दर्जाचा स्वयंपाक कोणी करावा तर तो सौ. आईनेच ! तिला येणाऱ्या निरनिराळ्या पदार्थांच्या कृति लिहुन काढु म्हटले तर एका पाकशास्त्रावरील पुस्तकच तयार होईल. १९३२-३३ मध्यें घर संभाळुन तिने निरनिराळ्या कांग्रेसच्या



# स्वदेशी लीगची मिरवणूक

× लीगचे अध्यक्ष बॅ. जी. व्ही. देशमुख व सौ. रमाबाई देशमुख
इनसेट फोटो–सौ. आई (सौ. रमाबाई देशमुख).

कार्यक्रमांतही भाग घेतला होता. सार्वजनिक सभांना हजर राहाणे, प्रभात फेऱ्यामध्ये भाग घेणें वगैरे. कांग्रेस स्वयंसेविका एकत्र आणण्याकरिता व स्त्रियांत स्वदेशीचा प्रचार करण्याच्या दृष्टिने सौ. आईने १९३२ च्या एप्रिलमध्ये "महाराष्ट्र" वर्तमानपत्रांतून जाहीर रीतीने सर्व भगिनींना वसंतगौरी निमित्त हळदीकुंकवास बोलाविले. हळदीकुंकवाबरोबरच बंगल्याच्या आवारांत स्वदेशी मालाचे एक लहानसे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. (ह्यासंबंधीचे विस्तृत वर्णन का. र. क. २ रा पान १८७) स्वदेशी वस्तुचे महत्त्व पटवून देण्याकरिता कांही स्त्रियांची व्याख्याने ही झालीत. ज्याप्रमाणें लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरुप आणून लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न केला त्याचप्रमाणें हळदीकुंकु हा सार्वजनिक समारंभ करून त्याला शैक्षणिक स्वरुप देण्याचा हा प्रयत्न होता. दुर्दैवाने इतरांनी ती प्रथा पुढें चालु ठेवली नाहीं म्हणुन आमच्याकडील तोच एक प्रसंग संस्मरणीय असा ठरतो. महात्मा गांधींच्या प्रभावी वक्तृत्वामुळें एकदां सभेंत स्त्रियांनी पटापट आपापले दागिने कांग्रेसला मदत म्हणुन द्यावयास सुरुवात केली त्याचवेळेला सौ. आईने बोटातील एक मौल्यवान अंगठी काढून दिली घरची सांसारिक जबाबदारी तिने ओळखुन जणु काही भाऊजींना त्या काळजींतून मुक्त केले. व म्हणुनच ते बाहेरच्या कार्यांत जास्त लक्ष घालु शकले असें म्हणावयास हरकत नाहीं.

विविधक्षेत्रांत १९२०-१९४६ पर्यंत निःस्वार्थी बुद्धीने काम केल्यानंतर कांग्रेसने पुनः भाऊजींना देशाची सेवा करावयास संधी दिली नाहीं-ह्याबद्दल सर्वांनाच वाईट वाटले. दुसऱ्या करंडकाला लिहीलेल्या पुरस्कारात बाबासाहेब खापर्डे म्हणतात "भाऊजी सारख्या कणखर वृत्तीची व शुद्ध जीवनाची, सचोटीची माणसें कांग्रेसला लाभली हे तिचे सुदैव असलें तरी कांग्रेस त्यांना आत्मसात् करु शकलो नाहीं हे तिचे दुर्दैव आहे व ते अनेक दिशांनी आज देशाला भोवत आहे" परंतु भाऊजी स्वस्थ बसले नाहीत. देशाची व समाजाची सेवा करण्याचा एक अभिनव मार्ग त्यांनी शोधुन काढला व

तो म्हणजे "कालसमुद्रांतील रत्नें" हा तीन खंडरूपी इतिहास लिहून हा इतिहास लिहून प्रसिद्ध करण्याकरितां ज्या असंख्य अडचणी आल्यात त्यांना भाऊजींनी धैर्याने तोंड दिले.

"छायामन्यस्य कुर्वंति स्वयं तिष्ठति चा ऽऽ तपे ॥
फलंति वै परार्थे च ना ऽऽ त्मनोऽर्थे महाद्रुमाः ॥

वरील सुभाषिताप्रमाणेंच त्यांनी समाजाच्या कल्याणाकरीतां परिस्थितीशी झगडून नेटाने आपले कार्य फलद्रुप केले. डॉ. पेंडसे दुसऱ्या रत्नकरंडकाला लिहीलेल्या प्रस्तावनेंत म्हणतात, " या रत्नमंजूषा वाचकांना उपलब्ध करुन देऊन आपल्या तीन तपांच्या सार्वजनिक जीवनांतील अनुभव व त्यांच्या आधाराने परिपक्व झालेले आपले देशहितकारक सिद्धान्त पुढील पिढ्यांच्या मार्गदर्शनाकरितां भाऊजींनी सांगितले आहेत. साठी उलटून गेल्यावरही त्यांनी वाङ्मयरुपाने ही एक महत्वाची लोकसेवाच चालविली आहे."

---

REFBK-0008858

अनुक्रम ९८५६
वि. ८२८
क्र. ६
नों. दि.
वाचनालय

ग्रंथालय
क्र. ८५५८